# प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी
म्हणजेच
सातारा-याच्या राज्यक्रांतीचा इतिहास

मराठीत असा चरित्रनायक झाला नाही आणि चरित्रलेखकही झाला नाही. प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी या पुस्तकाविषयी असं लिहिणं, हे एखाद्याला अतिशयोक्ती वाटेल. पण हे सत्य आहे. अजूनही खोटं वाटत असेल, तर पुढे वाचून बघा. जातिवादामुळे तोडमोड झालेल्या इतिहासात हरवलेले मराठी इतिहासातले हे नायक प्रबोधनकारांनी बिनतोड पुरावे आणि कसदार भाषाशैलीत मांडले आहेत. हा इतिहास समोर यावा ही राजर्षी शाहू महाराजांनी एक अंतिम इच्छा होती, यातच या पुस्तकाचं मोठेपण आलं.

लेखक

केशव सीताराम ठाकरे

[प्रबोधनकार]

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई ४.

मूळ ग्रंथांची एकूण पाने ६३२]          [१९४८ सालची किंमत दहा रुपये

प्रथमावृत्ती (पुनर्मुद्रण)

१९९८

प्रकाशक –

सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

नवीन प्रशासकीय इमारत

मुंबई ४०० ०३२

सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ सजावट

कला विभाग, शासन, मुद्रण व लेखनसमाग्री संचालनालय

नेताजी सुभाष रोड, मुंबई

मुद्रक –
व्यवस्थापक

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई

मूल्य –

रुपये १२४/-

प्रकाशक

रघुनाथ दिपाजी देसाई

नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई ४.

या ग्रंथाच्या पुनर्मुद्रण पुनर्प्रकाशनाचे, तर भाषांत भाषांतर करण्याचे, नाटक, सिनेकथा, कादंबरी तयार करण्याचे वगैरे सर्व हक्क माझ्याकडे आहेत. या ग्रंथाचा स्पष्ट ल्लेख करून यातील उतारे घेण्यास मात्र कोणाला बंदी नाही.

जोशी बिल्डिंग,

रानडे रोड एक्स्टेंशन, (प्रबोधनकार) के. सी. ठाकरे

मुंबई नं. २८

मुद्रक

रघुनाथ दिपाजी देसाई
न्यू भारत प्रिटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगाव, मुंबई नं. ४

## अध्यक्षांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रबोधनकारांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्याचे योजिले आहे. त्या योजनांतर्गत पहिला खंड, `आत्मचरित्र' सहा महिन्यांपूर्वीच प्रसिद्ध झाला. आता हा दुसरा खंड `रंगो बापूजी' यांचे चरित्र. यारूपाने प्रसिद्ध होत आहे. सातारचे राजे प्रतापसिंह आणि मावळातील एक वतनदार रंगो बापूजी अशा दोघांची परस्परनिगडित चरित्रे ह्यातून पहावयास मिळतील. मराठेशाहीच्या अखेरीचा वस्तुनिष्ठ इतिहास म्हणून तर ह्या ग्रंथाचे मोल अनमोल आहे. प्रबोधकारांनी उपलब्ध असलेली सर्व मूळ कागदपत्रे अभ्यासून एक अभिनव ऐतिहासिक `पर्व' सर्व जनतेला त्यांच्या रोचक शैलीत उपलब्ध करून दिलेले आहे. सामान्य वाचक आणि इतिहासाचे अभ्यासक ह्या दोघांनाही हे पुस्तक उपयुक्त वाटेल यात शंका नाही. प्रचंड श्रम आणि मराठेशाहीबद्दलची कळकळ ह्या ग्रंथात सातत्याने जाणवते. आधुनिक स्वतंत्र भारताच्या निर्मितीच्या प्रक्रियेची मुहूर्तमेढ झाल्याचे सूचक दर्शन ह्या एक प्रकारच्या ऐतिहासिक दस्तावैजातून घडते. असा हा सर्वतोपरी मौलिक ग्रंथ प्रकाशित करताना, मंडळ प्रबोधनकारांची कृतज्ञता व आपल्या कर्तव्यपूर्तीचे समाधानही प्रकट करीत आहे.

मा. बाळासाहेब ठाकरेंनी ह्या पुस्तकासाठी बरीच दुर्मिळ साधने पुरविली. मंडळ त्यांचे ऋणी आहे. श्री. पंढरीनाथ सावंत ह्यांनी परिश्रमपूर्वक हा ग्रंथ तयार करवून घेतला आहे. मंडळ त्यांचे आभारी आहे. संपादन समितीच्या अथक प्रयत्नाने हे प्रकाशन सिद्ध झाले आहे. या संपादन समितीत श्री. पंढरीनाथ

सावंत (निमंत्रक), श्री, अर्जुन डांगळे, डॉ. मा. गो. माळी, प्रा. शेषराव मोरे, श्री. दि. रू. भालेराव हे सदस्य आहेत. मंडळ या समिती सदस्यांचेही आभार मानते.

डॉ. अ. र. कुलकर्णी ह्यांची एक अभ्यासपूर्ण विवेचक प्रस्तावना ह्या पुस्तकाला जोडलेली आहे. डॉ. कुलकर्णींचेही मंडळ आभारी आहे. पहिल्या खंडाप्रमाणेच प्रबोधनकारांच्या ह्या दुस-या खंडाचेही उत्स्फूर्त स्वागत होईल ह्यात तिळमात्र शंका नाही.

शासकीय मुद्रणालयांचे श्री. प्र. शं. मोरे, संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री वप्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व श्री. प. ज. गोसावी, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई व त्यांचे सहकारी, तसेच मंडळाचे सचिव, श्री. चंद्रकांत वडे यांनी या पुस्तकाच्या छपाईच्या कामात स्वतः लक्ष घातल्याने हे पुस्तक वेळेवर वाचकांच्या हाती देणे शक्य झाले आहे.

मधुकर आष्टीकर

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रास्ताविक

राजर्षि छत्रपती शाहू महाराजा मृत्यूशय्येवर असताना ५ मे १९२२ रोजी प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी शपथ घेतली होती की, ``सत्यनिष्ठ छत्रपती प्रतापसिंह आणि छत्रपतिनिष्ठ रंगो बापूजी यांचा तपशीलवार इतिहास मी लिहितो.'' सतत ३० वर्षे मेहनत करून, उपलब्ध सर्व साधनांची छाननी करून २१ मे १९४७ रोजी ग्रंथ पूर्ण केला आणि तो राजर्षींच्या स्मृतीला अर्पण केला. पुढे `प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी' या नावाने हा ग्रंथ १९४८ साली प्रसिद्ध केला आणि आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात एक मौलिक भर घातली.

सातारचे राजे प्रतापसिंह आणि मावळातील एक वतनदार रंगो बापूजी यांची चरित्रे परस्पराशी इतकी निगडित आहेत की सातारा राज्याचा उदय, विकास आणि अस्त यांच विचार करताना या दोन व्यक्तींच्या कार्याचा विचार कत्रितपणे कराणे अनिवार्य आहे, आणि म्हणूनच प्रबोधनकारांनी ग्रंथाची रचना तशी केली असावी. या चरित्रात इतर जी प्रसंगानुसार पात्रे आणि अमित्र येतात त्यात बाळाजीपंत हा देशी आणि एलफिन्स्टन, ग्रँट डफ बिग्ज, कॅप्टन रॉबर्टसन, कॅप्टन कोगन, लाडविक यांच्यासारखे स्थानिक अधिकारी मित्र, कर्नल ओव्हन्स, रॉबर्ट ग्रँट, सर जेम्स रिवेट कारनेक हे जन्मवैरी आणि शेवटी डॉ. मिल्न, पार्लमेंटचा सभासद जोसेफ ह्यूम, जॉर्ज थॉमसन सारखे परदेशस्थ पाठीराखे यांचा उल्लेख करावा लागेल.

असे असले तरी या चरित्रग्रंथात प्रामुख्याने तीन व्यक्ती आल्या आहेत. दोन नायक – राजा प्रतापसिंह आणि रंगो बापूजी आणि एक खलनायक बाळाजीपंत नातू आणि त्याला हाताशी धरून खेळी करणारा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट. सूडबुद्धीने माणूस पेटला म्हणजे तो कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतो याचे अलिकडच्या काळातील एक उदाहरण म्हणजे बाळाजीपंत नातू. प्रबोधनकारांनी एकूण ३० प्रकरणांत (पृष्ठे २७५) आणि त्यास पूरक अशा विस्तृत परिशिष्टात हे चरित्र कथन तपशीलवार केले आहे. त्यांच्या मते प्रतापसिंह आणि रंगो बापूजी म्हणजेच साता-याच्या राज्यक्रांतीचा इतिहास.

या ग्रंथाचा मुख्य चरित्र नायक म्हणजे रंगो बापूजी पण त्याच्या जन्ममृत्यूची नोंद कोठे आढळत नाही. रंगो बापूजीच्या आयुष्यातील लक्षणीय कार्याला उठाव मिळावा म्हणून त्याचे पूर्ववृत्त सांगतांना प्रबोधनकारांनी शिवाजीराजाच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याची पार्श्वभूमी मोठ्या औचित्यपूर्णपणे या

ठिकाणी मांडली आहे. `हिंदवी स्वराज्य’ या शब्द प्रयोगाबद्दल जरी काहीमतभेद असले तरी दादाजी नरसप्रभूंची पत्रे, `हे म-हाष्ट्र राज्य आहे’ हा जेधे करीण्यातील उल्लेख या आणि इतर समकालीन साधनावरून `शेंद्री(सह्याद्री) लगतच्या स्वयंभू रोहिडेश्वराच्या मनातील `हे राज्य व्हावे’ ही इच्छा `बंडवाल्या’ शिवरायांनी  कशी पूर्ण केली याचे थोडक्यात पण समर्पकपणे निरूपण प्रबोधनकारांनी केले आहे आणि पुढील कथावस्तूची पार्श्वभूमी उत्तम रीतीने तयार केली आहे.

१७व्या आणि काही अंशी महाराष्ट्राचा इतिहास हा वतनासाठी झालेल्या भांडणतंट्यांनी भरलेला आहे. ऐतिहासिक घराण्यांची जी कागदपत्र प्रसिद्ध झालेली आहेत त्यात `वतन’ हाच विषय प्रामुख्याने आलेला आहे. याचे कारण `वतन’ हे सामाजिक प्रतिष्ठेचे आणि राजकीय आकांक्षाचे साधन होते. त्यातला आर्थिक भाग हा गौण स्वरूपाचा होता. `उतरंडीला नसेना दाणा, पण दादला असावा पाटील राणा’ या लोकगीतावरून `वतन’ ही संस्था मध्ययुगात सामाजिकदृष्ट्या किती मोलाची होती याची कल्पना येईल. दिल्लीपतीला नियंत्रित करणा-या महादजी शिंद्याला वकिल-इ-मुतालिक या पदापेक्षा श्री गोंद्याचा `पाटीलबाबा’ हा किताब अधिक भूषणाचा वाटत होता. तेव्हा वतनासाठी धडपड ही गुप्ते घराण्यातील लोकांनाही अटळ होती, आणि म्हणून रंगो बापूजीने वतनासाठी धडपड केली या कारणाने त्याला दोषी ठरविणे योग्य नाही.

शिवरायाकडून आपल्या वंशजांना मिळालेले वतन हे `र ’ आहे. वतनदार’ हे राज्याचे `दायाद’ खरे पण `दायाद’ म्हणजे वाटेकरी नव्हे तर स्वराज्यस्थापनेच्या कार्यातील `सहकारी’ होत याची जाणीव ठेवून आपल्या वतनावर पाणी सोडून अनेक वतनदार शिवकार्यात सामील झाले होते. रंगो बापूजीला ही विचारसरणी मान्य असावी. १६५५साली गुंजणमावळच्या देशमुखाला अभयदान देताना शिवाजीराजे म्हणतात, `आमच्या इमानावरी आपली मान ठेवून आम्हापासी येणे, कोणे गोष्टीची चिंता न करणे’ हे अभयदानच रंगो बापूजीला प्रेरणा देणारे ठरले असावे, हे कसल्याही पदाची अपेक्षा न करता केवळ प्रतापसिंहाच्या इमानावरी आपली मान ठेवून रंगो बापूजी निष्ठेने लढला हे प्रबोधनकारांनी रेखाटलेल्या त्याच्या चरित्ररेषेवरून स्पष्ट होते.

१८०३च्य् वसईच्या तहाने रावबाजीने `मराठी राज्य’ इंग्रजांच्या पतपेढीवर (?) गहाण टाकले होते. १८११ साली एलफिन्स्टन पुण्याचा रेसेडेंट म्हणून आला. त्याची नियुक्ती ही जणू काय `मराठी राज्याची’ दिवाळखोरी जाहीर करून ते लंपास करण्यासाठीच विधात्याने केली होती. योगायोग असा की हा साहेब १७९५ साली आले नशीब काढण्यासाठी म्हणून मायदेश सोडून भारतात आला आणि १७९६ साली त्याची पहिली नेमणूक बनारस येथे न्याय खात्यातील एक साधा सहाय्यक म्हणून झाली आणि नेमके त्याच वर्षी दुसरा बाजीराव पेशवा झाला. पुढे बाजीरावाला पदच्युत करून त्याची नेमणूक बनारसजवळच्या परिसरात ब्रह्मवर्तात केली, आणि दुर्दैवाने १८३९ साली सातारच्या प्रतापसिंहाला याच शहरी वनवासासाठी धाडण्यात आले आणि मराठ्यांच्या सत्तेची उरलीसुरल नावनिशाणीही उद्ध्वस्त होण्याच्या मार्गाला लागली. `काशी’ हे ठिकाण मराठ्यांच्या उत्कर्षकाल आणि विनाशकाल यांच्याशी अप्रत्यक्षरित्या निगडित झाले आहे. `मराठा पातशहा एवढा पत्रपति झाला.’ या मंत्राचा उद्घोष करण्यासाठी गागाभट्ट काशीहून आला, परमानंदाने शिवचरित्राचे प्रवचन काशीत केले आणि त्याच काशीच्या परिसरात छत्रपतीचे राज्य खालसा करून प्रथम दुस-या बाजीरावाला आणि मराठी सत्तेची नामोनिशाणी देखील राहू नये म्हणून इंग्रजांनी प्रतापसिंहाला पाठविले. इतिहासाचे वळण हे असे अनाकलनीय असते.

प्रतापसिंहाला आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्यासाठी रावबाजी आणि कंपनी सरकार आपापल्या परीने प्रयत्न करीत होते. सातारजे राजे दुसरे शाहू महाराज तथा आबासाहेब यांच्या मृत्यूनंतर १८०८ साली प्रतापसिंह मराठी दौलतीचा धनी बनला. तुम्ही थोरले शाहू व मी थोरला बाजीराव असे आपले नाते राहील. अशी बतावणी करून राजाला आपल्या अंकित ठेवण्यासाठी साखरपेरणीचे काम रावबाजी सतत करीत होता. पण राजाची होणारी कुचंबणा लोकांच्या लक्षात येत होती. अशावेळी राजाची सुटका करण्यासाठी रंगो बापूजी पुढे आला. आणि काही निमित्ताने एलफिन्स्टनची गाठ घेऊन छत्रपतीच्या दैन्यावस्थेचे निवेदन त्याने साहेबास केले. आणि छत्रपतीला वाचविण्यासाठी मदतीची याचना केली. एव्हाना एलफिन्स्टनने चिटणीसाने सादर केलेल्या मराठ्यांच्या बखरीचे वाचन करून शिवशाहीचा

परिचय करून घेतला होता, पण प्रत्यक्ष राजकारणात हस्तक्षेप करण्यापूर्वी सातारच्या किल्ल्यावर नजरकैदेत असलेल्या प्रतापसिंहाची त्यासाठी संमती हवी होती. रंगो बापूजीने आव्हान स्वीकारले आणि रामदासी शिष्यांचा वेष धारण करून `जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना करीत, अनेक हालअपेष्टांना, मारहाणीला तोंड देत महाराजांची गुप्तपणे भेट घेऊन साहेबाला हवे ते संमतीपत्र मिळविले आणि त्याच्याकडून मदतीचे आश्वासन घेतले. आणि येथूनच रंगो बापूजीच्या कार्याचा शुभारंभ झाला. रावबाजीला याचा सुगावा लागला असवा कारण, त्याने प्रतापसिंहाची साता-याच्या किल्ल्यावरून उचलबांगडी करून वासोट्याच्या दुर्गम किल्ल्यात त्याला कडेकोट बंदोबस्तात त्याने डांबून ठेवले. हा सारा रोमहर्षकारक प्रसंग प्रबोधनकारांनी मोठ्या कौशल्याने रंगविला आहे.

रंगो बापूजीच्या प्रयत्नामुळे असेल अथवा आपल्या जासूसांमार्फत राज्याच्या छळासंबंधी मिळालेली माहिती एलफिन्स्टनला पटली असेल म्हणून असो, इंग्रज-मराठे संघर्षाला तेव्हापासून सुरुवात झाली. राजा इंग्रजाकडे जाऊ नये असे रावबाजीचे प्रयत्न आणि राजाला आपल्या बाजूला वळविण्याचे साहेबाचे प्रयत्न यातून परस्परांचे संबंध बिघडत गेले. २८ ऑक्टोबर १८१७ रोजी बाजीरावाने आल्या सैन्याची जमवाजमव गारपीरावर (आजचे ससून हॉस्पिटल) केली आणि इंग्रजांच्या रेसिडेन्सीवर चालून जाण्याचा दिवस निश्चित केला. पण सिद्ध झालेले सैन्य, जरीपटक्याची काठी मोडली, अपशकुन झाला म्हणून पुढे गेलेच नाही. बेसावध असलेल्या इंग्रजांची २८ची काळरात्र टळली ते सावध झाले आणि जरीपटक्याची मोडलेली काठी मराठी राज्य मोडून बसली.

१८१७-१८ हा काळ प्रतापसिंहाच्या जीवनातील अत्यंत कसोटीचा काळ होता. रावबाजीने राजाला त्याच्या परिवारासह वासोट्यावरून बाहेर काढले आणि आपल्या युद्धछावणीत दाखल करून घेतले, आणि तो इंग्रजांच्या हाती लागू नये म्हणून आपल्याबरोबर रानोमाळ फरफटत नेले. पुढे युद्ध संपले. रावबाजीने शरणागती पत्करली. इंग्रजांनी राजाचा कब्जा घेतला. मोठ्या दिमाखाने त्याला साता-यास आणले आणि तेथून पुढे नवे पर्व सुरू झाले.

प्रबोधनकारांनी समकालीन मराठी, इंग्रजी साधने विशेषतः पेशवे दप्तर, मराठी दप्तर, रुमाल प्रवासवर्णने, ऐतिहासिक कागदपत्रे, एलफिन्स्टनचे चरित्र आणि तर इंग्रजी ग्रंथ यांचा तपशीलवार अभ्यास केला होता.याचा आपल्या ग्रंथात जागोजागी जे उल्लेख केले आहेत आणि आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ जी दीर्घ परिशिष्टे जोडली आहेत त्यावरून चांगलाच प्रत्यय येतो. प्रबोधनकारांपूर्वी हा विषय बी. डी. बसू, `स्टोरी ऑफ सातारा' कलकत्ता १९२२, आणि अडव्होकेट र. गो. राणे, सातारा, `छत्रपति प्रतापसिंहमहाराज यांचे चरित्र' पुणे १९२९, या दोघांनी हाताळलेला होता, पण त्यांच्या निवेदनाना काही मर्यादा होत्या. प्रबोधकारांनी त्या ग्रंथाहून अधिक तपशीलवार माहिती देऊन या विषयाला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात १९४७नंतर जी नवीसाधने उपलब्ध झाली, ग्रंथ निर्माण झाले, त्याचा उपयोग करून घेऊन विद्यमान ग्रंथातील विषयाला पूरक अशा माहितीचा परिचय करून देणे आवश्यक वाटल्याने तसे करण्याचा प्रयत्न या प्रास्ताविकेत केला आहे.

प्रतापसिंहाला राज्य मिळाले, पण रंगो बापूजीला साता-यात नोकरी दिली गेली नाही. प्रतापसिंह त्याला विसरला होता की काही हेतूने त्याला बाजूला ठेवले होते हे सांगणे कठीण आहे. प्रबोधनकार म्हणतात, `रंगो बापूजी उघडा राहिला(पृ. ४५) पण आपली सोय लावा असा त्याने `आक्रोश' केला नाही. सातारच्या नोकरीपेक्षा रंगो बापूजीने जाणूनबुजून कंपनी सरकारची नोकरी पत्करली असावी. कंपनीत राहून आपण राजाची सेवा चांगल्या रीतीने करू शकू अशी त्याची भावना असावी. कंपनी सरकार `नेटिवास' जवळ करीत असत त्यामागे त्यांचाही काही हेतू असावा. पेशव्यांच्या विरुद्ध बाळाजीपंत नातू आपणास चांगला उपयोगी पडेल म्हणून एलफिन्स्टन त्याला कंपनीच्या नोकरीत ठेवले होते, आणि त्याचा साहेबांनी मराठी राज्याचा संपूर्ण नाश करण्याच्या कामी चांगला उपयोगही करून घेतला होता. रंगो बापूजी हा एलफिन्स्टनकडे प्रतापसिंहाची कैफियत घेऊन गेला तेव्हा छत्रपतीशी कंपनीची काही बोलणी चालली आहेत, ह्याचा सुतराम सुगावा बाळाजीपंताला लागू देऊ नकोस, असे त्याला बजावण्यात आले होते. कदाचित नातूच्या साता-यातील कटकारस्थांनावर बारीक नजर ठेवण्यासाठीच रंगो बापूजीला कंपनी सरकारच्या सेवेत रूजू करून घेतले असावे.

१८१८ ते १८३९ या २१ वर्षांच्या कालखंडात जे जे घडले त्याचा साद्यंत वृत्तांत प्रबोधनकारांनी दिला आहे. त्यामुळे त्याविषयी अधिक लिहिणे येथे आवश्यक नाही. परंतु एलफिन्स्टनची या संपूर्ण प्रकरणातील भूमिका. सातारचा पोलिटिकल एजंट आणि राजाचा एक सन्मित्र म्हणून कॅप्टन जेम्स ग्रँट याने निवृत्तीनंतरही राजाशी ठेवलेला ऋणानुबंध आणि बाळाजीपंत नातू याने सूडबुद्धीने वागून प्रतापसिंहाचा कसा छळ केला, यासंबंधी प्रस्तुत लेखकाला नव्या संशोधनाच्या आधारे जी काही माहिती त्यासंबंधी येथे अल्पसे विवेचन करावयाचे आहे.

सातारा राज्याची निर्मिती हा एलफिन्स्टनच्या खास राजनीतीचा विजय होता असे सामान्यतः मानले जाते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात दख्खन देशाचा कारभार करण्यासाठी कंपनी सरकारने माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन आणि थॉमस मन्रो या दोन माणसांची नेमणूक केली होती, यांपैकी पहिला राजनीतीज्ञ होता आणि दुसरा रणनीतीज्ञ. कंपनी सरकारची दक्षिणेत आणि पुढे सर्व देशावर सत्ता दृढमूल करण्यास या दोघांची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरली. हे दोघेही मूलतः साम्राज्यवादी होते, पण इंग्रजांचे राज्य लोकांनी स्वीकारावे म्हणून त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही अंशी त्यांनी उदारमतवादी धोरणाचा पुरस्कार केला होता. मन्रो हा प्रामुख्याने सेनानी होता, आणि एलफिन्स्टनच्य राजकीय डावपेचांना त्याचा पूर्ण पाठिंबा होता. एलफिन्स्टनची `शेवटचा पेशवा' अशी तो संभावना करीत असे.

पेशव्यांशी लढा देऊन कंपनीने जो मराठी प्रदेश जिंकला होता त्याची विल्हे कशी लावावयाची ही एक मोठी समस्या गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जपुढे होती. कंपनी सरकारपुढे दोन पर्याय होते – एक शिवाजीच्या वंशजाला एक छोटीशी जागीर देऊन त्याला स्वस्थ बसविणे आणि दोन राजाला जिंकलेल्या मराठी मुलखाचा विशेषत- नीरा-भीमा नद्यांमधला एक छोटासा प्रदेश बांधून देणे आणि त्याला मर्यादित स्वरूपाचे सार्वभौमत्व देणे, मर्यादित सार्वभौमत्व ही संकल्पना राज्यशास्त्राच्या कोणत्याही सिद्धांतात बसत नाही. सार्वभौमत्वाचे विभाजन म्हणजे सार्वभौमत्वाचे विनाशीकरण होय. साता-यासाठी इंग्रजांनी ही खास राजनीती शोधून काढली होती. ब्राह्मणांनी बळकावले तरी मराठी सत्ता छत्रपतीच्या वंशजाला परत मिळवून देऊन मराठ्यांची सहानुभूती आणि पाठिंबा कंपनी सरकारला मिळवावयाचा होता. इकडे ब्रह्मवृंदांना खूष करण्याकरिता आणि लिखापढी केलेले निष्ठावंत कारकून कंपनी सरकारला मिळावेत म्हणून श्रावणमाशी रमण्यात ब्रह्मवृंदांना जी दक्षिणा मुक्तपणे वाटली जात असे. त्याच दक्षिणेचा एक फंड बनवून त्यातून संस्कृत कॉलेजची (हेच पुढे पूना कॉलेज आणि नंतर डेक्कन कॉलेज बनले) कल्पना निघाली आणि आपल्या उदारमतवादाचे प्रदर्शन करून त्याने ब्राह्मणांचा ही विश्वास संपादन करण्याचा आणि पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनादेखील ब्रिटिश राजवट हे `ईश्वरी वरदान' वाटू लागले, अशा या साम्राज्यवादी एलफिन्स्टनने इंग्लंडमधील समकालीन तत्त्वज्ञ जेरेमी बेंथॅम यांच्या `अधिकांचे अधिक सुख' या उदारमतवादाचा बुरखा घेऊन आपले मूळ साम्राज्यवादी स्वरूप झाकण्याचा प्रयत्न केला.

एलफिन्स्टनने २५ सप्टेंबर १८१९ रोजी ११ कलमी तहनामा राजाबरोबर केला तो म्हणजे पुढे होणा-या सामीलनाम्याची पूर्वतयारी होती असे म्हणता येईल. विशेषतः करारातील २ आणि ५ या कलमानी राज्याच्या विलिनीकरण्याचे सूतोवाच करून ठेवले होते. कलम २ म्हणजे `इंग्रज बहादूर याचे सरकारांतून जे राज्य देत आहे ते घेऊन सरकार इंग्रेज बहादूर यांचे कह्यात व मदतीत निरंतर संतोषाने राहून इंग्रेज बहादूर यांचे सल्लामसलतीने हरएक काम करीत जाऊ.' अशी नमनालाच भूमिका घेऊन कलम ५मध्ये स्वच्छ इशारा दिला आहे की, `महाराज याचे सरकारातून काही तफावत पडल्यास या तहनाम्याचे रूईने (विचाराने) महाराज याचे सरकारास जो फाईदा आहे तो बरबाद होईल. राजाने बाहेरच्या माणसांना भरावयाचे नाही. पत्रव्यवहार करावयाचा नाही, लग्नास बाहेरगावी जावयाचे नाही, अथवा घरगुती कारणास्त्व बाहेरच्या लोकांशी व्यवहार करावयाचा असेल तर तो इंग्रजांच्या मार्फत करावा अशी जाचक बंधने या कलमात होती. हेच मर्यादित सार्वभौमत्वाची स्वरूप होते. ५व्या कलमात अशी सवलत दिल्याने जहागीरदारांचे फावले व राजाशी त्यांचा संघर्ष सुरू झाला आणि केवळ या ५व्या कलमाचा आधार घेऊन रॉबर्ट ग्रँट या गव्हर्नरला राजाच्या पदच्युतीची कारवाई करणे सोपे झाले. हे सारे एलफिन्स्टनने मोठ्या धूर्तपणे केले होते.

१८१९च्य या तहनाम्यास १८२६ साली एक चार कलमी पुरवणी जोडून परत एकदा १८१९ सालचा तहनामा बळकट करण्यात आणि राज्याच्या सीमांचा तपशील, सहा जहागीरदारांची नावे, राजाच्या खर्चाची तरतूद, यांचा पुनरुच्चार करण्यात आला होता. प्रतापसिंहाला असे वाटत होते की, आपल्या नोकराला म्हणजे बाजीराव पेशव्याला एकदा तडीपार केले म्हणजे त्याने गिळंकृत केलेला सर्व मुलूख इंग्रज आपल्या स्वाधीन करतील. पण हा सरळसोट व्यवहार इंग्रजांच्या राजनीतीत बसत नव्हता. येथे एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे, ती ही की एलफिन्स्टनने शिवाजीच्या वंशजात रूढ झालेला `छत्रपति' ह्या किताबाचा चुकूनसुद्धा कोठे उल्लेख केला नाही. साता-याचा पोलिटिकल एजंट म्हणून ग्रँटची नेमणूक केल्यावर त्याला दिलेल्या एका सूचनेत एलफिन्स्टन म्हणतो, `राजाची प्रजा आणि स्वतः राजा यांच्या मनावर असे बिंबवावे की, सातारा राज्याच्या हद्दीतील खेड्या-खेड्यातून राजाचा झेंडा फडकविला असला, आणि तेथील रहिवासी हे जरी राजाचे प्रजाजन असले तरी, नावापुरतेसुद्धा शिवाजीच्या साम्राज्याचे पुनर्जीवन करण्याचा इथे इरादा नाही. (it is not intended to revive even in name the empire of seevajee) ब्रिटिश सरकार हे सार्वभौम आहे हा विचार जर राजाने आत्मसात केला नाही तर आपण निर्माण केलेले हे सातारा राज्य एक दिवस आपल्यावरच उलटेल' अशी धोक्याची सूचनाही त्याने ग्रँटला दिली होती. `छत्रपती'हा किताब साहजिकच इंग्रजी तहनाम्यात नाही पण त्याचा मराठीत तर्जुमा करताना लिपिकाने `छत्रपती' हा शब्दप्रयोग केला आहे.

एलफिन्स्टन हा साम्राज्यवादी असला तरी ब्रिटिशांचे साम्राज्य भारतावर किती काळ टिकेल याबद्दल त्याच्या मनात शंका होतीच. आपला मित्र जेम्स मॅकिनटोश याला १८१९ साली लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो की, ``ब्रिटीश सरकार हे कालांतराने नष्ट होणार हे माझे विधान कोणत्याही पूर्वग्रहावर आधारलेले नसून निव्वळ तर्कावर आधारलेले (not orejudice, but reason) आहे.'' भारतीयांच्या सिक्षणासाठी प्रादेशिक भाषेतून तयार केलेल्या त्याच्या पुढे पडलेल्या पुस्तकांचा ढिगारा पाहून त्याचा सहकारी ब्रिग्ज त्याला हे सार कशासाठी, असा सवाल करतो. त्यावर एलफिन्स्टन म्हणतो, एतद्देशीयांना शिकविण्यासाठी पण त्याचप्रमाणे आपल्याला युरोपला परत जाण्याचा मार्ग दाखविण्यासाठी (To educate the natives, but it is high road back to Europe)

वास्तविक एलफिन्स्टन हा प्रतापसिंहाच्या राज्यकारभारावर खूष होता. साता-याच्या एका भेटीत ग्रँट डफच्या तालमीत तयार झालेल्या या राजाच्या वाड्यातील खाजगी खोलीला तो भेट देतो. त्या खोलीत टेबल-खुर्चीवर बसून शिवाजीचा हा वंशज कामकाज करतो याचा त्याला अचंबा वाटतो. आणि तो म्हणतो अशा प्रकारच्या शांततावादी वंशजाबद्दल त्याच्या पूर्वजाला (शिवाजीला) काय वाटले असते हे मला सांगता येणार नाही. (I do not know what his ancestor would think of so peaceful a descendent) राजाला देखील एलफिन्स्टनबद्दल आदर वाटत असे. एलफिन्स्टनच्या निरोप समारंभप्रसंगी जे मानपत्र त्याला देण्यात आले होते त्यावर पहिली स्वाक्षरी प्रतापसिंहाची होती. १८३६पासून ब्रिटिस अधिका-यांनी जेव्हा राजाविरुद्ध कुभांड रचण्यास सुरुवात केली. तेव्हा आपल्या २३ मार्च १८३७च्य कोर्ट ऑफ डायरेक्टर्स या कंपनी सरकारच्या सर्वश्रेष्ठ संस्थेकडे केलेल्या विनवणी पत्रात तो आल्यावर केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी एलफिन्स्टनचे मत मागवावे अशी विनंती करतो. ग्रँट डफने देखील १८३९ ते १८४९ असा सतत दहा वर्षे पत्रव्यवहार करून राजाचे निर्दोषित्व एलफिन्स्टनला पटविण्याचा प्रयत्न केला, पण त्याने या प्रश्नावर राजाच्या बाजूने अथवा विरुद्ध असे कोणतेच मत ग्रँट आणि तर ब्रिटिशांप्रमाणे का केले नाही हे एक न उकलणारे कोडे आहे. समजा एलफिन्स्टन या काळात भारतातच असता तर त्याने हे संकट टाळले असते का? का साम्राज्यवादी एलफिन्स्टनला जे होते आहे ते ठीकच आहे असे वाटत होते? का याच उत्तर आजपर्यंत तरी कोठे सापडले नाही. रंगो बापूजी त्याला कधी भेटलाच नाही काय? का त्याच्या प्रयत्नाला यशच आले नाही? एलफिन्स्टनने अशी विरक्ती आणि मौन का स्वीकारले होते?

या प्रकरणापाशी सुरुवातीपासून संबंधित असलेली दुसरी प्रमुख व्यक्ती म्हणजे कॅप्टन जेम्स ग्रँट. १८१८१ साली प्रथम राजाला भेटला, आणि दिवसेंदिवस त्याचे ऋणानुबंध दृढच होत गेले. राजाच्या पदच्युतीचे, वनवासाचे आणि शेवटी अवतार समाप्तीचे सर्वात अधिक दुःख जर कोणा इंग्रजास झाले असेल, तर ते जेम्स ग्रँटला, असेच म्हणावे लागेल.

१८१८१च्या एप्रिल महिन्यात ग्रँटने साता-याच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. एलफिन्स्टनच्या सूचनांप्रमाणे राज्यकारभार पाहिला. राजाला शहाणे करून सोडले. तहनाम्याचे काटेकोर पालन करणे आणि एलफिन्स्टन साहेबाची मर्जी संपादन करणे, कारण `मित्र म्हणून तो फार मोठा माणूस आहे, पण एकदा का जर तो संतापला, तर त्याच्या सारखा भयंकर माणूस नाही.' (great in friendship and terrible in wrath) याची जाणीव त्याला सतत करून देणे, इत्यादी कामे त्याने अक्कलहुशारीने पार पाडली. आणि १८२२साली राजाकडे कारभाराची सर्व सूत्रे स्वाधीन करून तो २८२३ रोजी लंडनला परतला. राजा आणि ग्रँट हे समवयस्क होते आणि त्यामुळे त्या दोघांची चार वर्षांत चांगलीच मैत्री जमली. सातारा राज्य, राजा आणि प्रजा यांच्या हिताची त्याला जाणीव होती हे त्याच्या उपलब्ध खाजगी पत्रव्यवहारावरून लक्षात येते. भारतातून निवृत्त होऊन येणा-या कंपनीच्या अधिका-याकडे तो आवर्जून साता-याची चौकशी करीत असे. १८२३ साली राजाला धाडलेल्या एका पत्रात तो म्हणतो, `साता-याविषयी सगळ्या चांगल्या गोष्टी ऐकण्यास मी उत्सुक आहे. जगातल्या कोठल्याही भागापेक्षा मला साता-यात अधिक रस आहे.' १८३० साली साता-याचा रेसिडेंट रॉबर्टसन् त्याला भेटला आणि म्हणाला, `श्रीमंत महाराज आपले रयतेला बहुत सुंदर आणि योग्य आहेत. आपले राज्य मोठ्या दक्षतेने आणि उदारत्वे करून चालवितात व आपला देश सुरक्षित राखला आहे. इतके असून कंपनी सरकारशी अकृत्रिम स्नेह करून असतात. याजप्रमाणमे मी सदोदित अपेक्षा करितो की जे जे उत्तरोत्तर गवरनर जनरल तिकडे येतील त्यांनी आपली स्तुती बादशहापाशी करावी, जीपासून मला जल्मबर समाधान होईल.' (इंग्रजी पत्राचे मराठी भाषांतर पेशवे दप्तर भाग ४२:४५) राज्यकारभाराविषयी सूचना देताना १८२८च्या एका पत्रात तो राजाला लिहितो, `कार्यप्रवणता, सावधानता, काटकसर आणि उदारता ही तुझ्या कार्याची चतुःसूत्री असली पाहिजे.' (Be active, vigilant, economical and liberal) सातारची प्रजा, शेतीव्यवसाय, शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रांकडे आपल्या सेवानिवृत्तीनंतरही त्याने आपले लक्ष पुरविले होते. सातारा राज्य आणि राजा वाचले पाहिजेत असे त्याला सतत वाटत राहिले. `सातारा देश माझा खासगत असता तर इतके अगत्ये केले नसते, परंतु आपले देशाचे सर्वकाळ हित व्हावे' हीच त्याची भावना होती.

१८३९ची राजाची पदच्युती, आणि १८४८साली झालेले सातारा राज्याचे विलीनकरण यासंबंधीची आपली मते निर्भिडपणे एलफिन्स्टनला कळवून कंपनी सरकारचे कसे चुकले हे दाखवून देण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. साता-याचा राजा आणि त्याचे राज्य हे अशारीतीने आपल्या डोळयादेखत नाहीसे व्हावे, आपण लावलेले रोपटे, जे डौलाने वाढत चालले होते ते असे एकाएकी उखडून टाकले जावे याची खंत त्याला शेवटपर्यंत लागून राहिली होती. (त्याचा मृत्यू २८ सप्टेंबर १८५८ रोजी वयाच्या ६९व्या वर्षी झाला) साताराप्रकरणात ब्रिटिशांची वागणूक प्रामाणिकपणाची नव्हती याबद्दल त्याच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती, असे असूनही आपली खाजगी मते जाहीरपणे मांडण्याचे आणि रंगो बापूजीला मदत करण्यासाठी एलफिन्स्टन आणि ग्रँटसारखी माणसे पुढे का आली नाहीत हे समजत नाही, आणि त्याची खंतही वाटते.

प्रतापसिंह आणि ग्रँट यांची मैत्री असाधारण स्वरूपाची होती. कृष्णराव रामराव चिटणीस याने रचलेल्या समकालीन पद्यमय चरित्रात म्हटले आहे, ``ग्रांटसाहेब बडो धूर । सब राजनमो महशूर । उसे राजा प्रताप चतुर । मिलाय लिया अपनेमे ।। ग्रँट स्वतःला `मराठा माणूस' म्हणवून घेत्से. मराठ्यांचा संपूर्ण इतिहास त्याने लिहिला तो केवळ ज्या मराठ्यांपासून आपण भारताचे राज्य जिंकून घेतले ते मराठे कोण आहेत, हे सा-या युरोपला कळावे या हेतूने होय. त्यामुळे ग्रंथाच्या नामाभिधानात `मोगलांचा –हास आणि ब्रिटिश सत्तेचा उदय' हे जॉन मरे या प्रसिद्ध प्रकाशकाने सुचविलेल्या नामांतराचा धिक्कार करून तो आपले हस्तलिखित परत घेऊन येतो, आणि या पुस्तकावर स्वतःचे सुमारे २००० पौंड खर्च करून लाँगमन कंपनीमार्फत प्रकाशित करतो. असा हा तडफदार ग्रँट सातारा प्रकरणात मूग गिळून का बसला होता?''
[ग्रँट डफच्या इतिहास प्रकाशनाबाबत प्रबोधनकारांनी जो तपशील दिला आहे (पृ. ६८) त्यात थोडीसी दुरुस्ती हवी. पाहा, प्रस्तुत लेखकाचा ग्रँट डफ हा ग्रंथ (पृ.१९६-२०५)]

१८३५पर्यंत सारे काही ठीक होते. ग्रँटनंतर आलेले रेसिडेंट कॅ. ब्रिग्ज (१८२३-२६) कॅ. रॉबर्टसन (१८२७-३२) आणि लॉडविक (१८३२-३७) यांनी ग्रँट डफचा दस्तुरच चालू ठेवाल होता, आणि त्यामुळे

राजाविरुद्ध तक्रार करण्यास कंपनीस काहीच जागा नव्हती. कोर्ट ऑफ डायरेक्टर्स या कंपनीच्या उच्च अधिकार संस्थेनेदेखील २९ डिसेंबर १८३५च्या पत्रान्वये राजाची प्रशंसा करणार पत्र आणि एक तलवार नजर केली होती, पण प्रत्यक्षात मुंबईचा गव्हर्नर आणि राजाचा दुष्मन रॉबर्ट ग्रँट याने ते सारे राजापर्यंत पोहोचणार नाही याची दक्षता घेतली होती. अशा या सद्गुणी राजाच्या पदच्युतीची (१५ ऑक्टोबर १८३९) बातमी जेव्हा ग्रँटला कळली तेव्हा ताबडतोब आपल्या ८ जानेवारी १८३९ च्या पत्रात तो एलफिन्स्टनला लिहितो, `राजाला पदच्युत करणे आम्हाला भाग पडावे याची मला कीव येते. प्रतापसिंहासारख्या माणसाला पदच्युत करून हे राज्य खालसा करण्यापेक्षा कंपनीने आपल्या प्रतिष्ठेचा काहीसा त्याग करणे शहाणपणाचे ठरले असते, आणि हिंदुस्थानभर पिकणा-या कंड्यांपासून आला बचाव झाला असता.' प्रतापसिंहाच्या कृत्याचे समर्थन करताना तो म्हणतो, `मुंबईचा गव्हर्नर माल्कम किंवा साता-याचा रेसिडेंट रॉबर्टसन यापैकी कोणीही तहनाम्याच्या ५व्या कलमाचे उल्लंघन होत असल्याचे राजाच्या निदर्शनास आणून देऊ शकला नाही, आणि त्यांच्या हातून घडले ते त्यांच्या अविवेकी दयाळूपणा (injudicious kindness) मुळेच होय.'(१०-२-१८४०). प्रतापसिंहाच्या पदच्युतीमुळे तो इतका बेचैन झाला होता की, `आज ५ जून १८४० रोजी मी अशी प्रतिज्ञा करितो की, महाराज प्रतापसिंहासंबधी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असा एकही प्रश्न मी विचारणार नाही. बिचारा महाराजा' असे पत्राने एलफिन्स्टनला कळविल्याशिवाय त्याला राहवले नाही. असे असूनही गप्प बसावे असे त्याला का वाटले? १८४० ते १८४९ या कालावधीत एलफिन्स्टनशी झालेल्या पत्रव्यवहारात साता-याविषयी त्याने काहीही लिहिलेले आढळत नाही. कदाचित एलफिन्स्टननेच त्याला हा विषय बंद करण्यास सांगितले असावे.

पण १८४८ साली इंग्रजांनी सातारा राज्य खालसा केल्याचे वृत्त त्याला जेव्हा कळले तेव्हा आपल्या प्रतिज्ञेचा भंग करून तो १० जानेवारी १८४९ रोजी एक शेवटचे दीर्घ पत्र लिहितो, तो म्हणतो, `शिपायांना फूस लावणे व गोवा सरकारशी संगनमत करणे हे आरोप पूर्णतया बनावट आहेत अशी माझी खात्री आहे. मी सारा पुरावा वाचला आहे. त्या माणसाचे चारित्र्य त्याच्या गुणदोषासह मला पूर्ण ज्ञात असल्याने मी असे विधान करू शकतो. मुंबईचा गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट म्हणतो त्याप्रमाणे राजा दोषी आहे से जरी पण गृहीत धरले तरी ज्या पद्धतीने सर जेम्स कारनॅक याने राजास पदच्युत केले ती पद्धती अन्यायाची होती. राजाचे हक्क अबाधित राखण्याची तहनाम्यात पूर्ण तरतूद होती. आणि त्याच्या हातून काही कमीजास्त घडले असते तर ती आमची चूक ठरली असती. अर्थात राजाने ब्रिटिशसत्तेला विरोध करण्याचा दृढ निश्चय केला असता तर त्याचे सार्वभौमत्व कायमचे नष्ट झाले असते. अशा परिस्थितीत ब्रिटिस मुत्सद्यांनी साध्या आणि सरळ प्रामाणिकपणाच्या मार्गाशिवाय दुस-या कोणत्याही विचाराचा प्रभाव आपल्य धोरणावर होऊ द्यावयास नको होता.'

दत्तक विधानासंबधी जो वाद निर्माण झाला होता त्या बातीत ग्रँटचे म्हणणे असे होते की, प्रतापसिंहाने घेतलेली दोन्ही दत्तके हिंदुशास्त्रानुसार कायदेशीर होती, पण ती तशी आहेत असे मानण्याच्या मनःस्थितीत ब्रिटिश अधिकारी नव्हते. कारण त्यांना राज्य खालसा करण्याची घाई झाली होती. प्रतापसिंहाने ज्याला दत्तक घेतले होते त्याला मान्यता दिलीच पाहिजे असे आपले ठाम मत या पत्रात त्याने व्यक्त केले आहे. राजाला दोषी ठरविम्यापूर्वी आपण तरी कराराचे पालन केले आहे का याचा अधिका-यांनी विचार करावयास हवा होता. राजाच्या भावाला गादीवर बसविणे हे या तहातील अटीशी विसंगत आहे, तसेच ब्रिटिश सरकार साता-याचा सर्व मुलूख आपल्याकड़े घेऊ शकत नाही. आप्पासाहेबाच्या दत्तकाला मंजुरी देणे शहाणपणाचे नाही इत्यादी अनेक गोष्टी, ज्य प्रतापसिंहाचा पाठपुरावा करणा-या होत्या त्या तो केवळ स्वतःच्या समाधानासाठी एलफिन्स्टनला कळवितो आणि स्वस्थ बसतो. जाहीर उच्चार करीत नाही.

ग्रँटनंतर साता-याचा रेसिडेंट म्हणून कॅ. जॉन ब्रिग्ज याची नेमणूक झाली. राजाच्या वृत्तीत थोडासा फरक पडत चालला आहे असे त्याला वाटू लागले होते. शेजारच्या कोल्हापूर संस्थानाला जे स्वातंत्र्य आहे तसे आपल्याला मिळावे. सत्तांतरानंतर पूर्वीच्या तहनाम्यात बदल व्हावा असे त्याला वाटणे स्वाभाविकही होते. आपले राजाविषयीचे मत ब्रिग्जने अधिकृतरित्या सरकारकडे पाठविले नाही. पण आपली नाराजी व्यक्त करणारे एक गोपनीय पत्र ८ ऑक्टोबर १८२६ रोजी एलफिन्स्टनला लिहिले आहे. विठ्ठलपंत

दिवाणाच्या मृत्यूनंतर ज्याला लिहिता वाचता येत नाही अशा बाळासाहेब नावाच्या एका आपल्या मर्जीतल्या व्यक्तीला दिवाणपदी नेमले हे ब्रिग्जला आवडले नाही. राजाच्या वर्तनात काही सुधारणा झाली नाही, आपण स्वतंत्र आहोत. तहनामा बंधनकारक नाही, रेसिडेंटची जरूरी नाही असे तो जे जाहीरपणे बोलतो. तसेच कोल्हापूरकरांशी संबंध जोडण्याची त्याची तीव्र इच्छा सफल झाली तर सातारा राज्याचा कारभार आपल्या हाती परत घ्यावा लागणार असे ब्रिग्जने आपल्या पत्रात सूचित केले आहे. आपली मुदत संपत आली आहे आणि या सा-या प्रकरणातून आपली लौकरच सुटका होणार याचा आनंदही तो येथे व्यक्त करतो. आपण राजाविरुद्ध अधिकृत तक्रार करीत नाही असे ब्रिग्ज म्हणतो त्यावरून त्याचा आशावाद व्यक्त होतो, आणि सारे काही ठीक होईल असेच त्याला वाटत असावे असे दिसते.

ग्रँटसारखे राजाने ब्रिग्जने मैत्रीचे संबंध ठेवले नाहीत याचे कारण त्याला इंग्रजाचा स्वभाव कळला नाही, त्याचे सारे आडाखे चुकले असे ब्रिग्ज एलफिन्स्टनच्या एका पत्रात म्हणतो, (१२ नोव्हेंबर १८२६) तो पुढे असेही म्हणतो की त्याच्या अव्यवहारीपणामुळे तो माझ्या मनातून उतरला आहे. पण त्याचा निरोप समारंभ मोठ्या सौहार्दपूर्ण वातावरणात पारपडला. राजाने दिलेली भेट हि-याची अंगठी, त्याने प्रेमाने स्वीकारली. असे सर्व ठीकठाक असले तरी पण सातारा सोडण्यापूर्वी त्याने मुंबई सरकारला जो एक विस्तृत अहवाल सादर केला आहे त्यात त्याच्या राज्यकारभाराची भलावण केली आहे पण नजिकच्या माणसांवर देणग्यांची खैरात करणे, कोणावर विश्वास न ठेवणे आणि इतर काही बाबींसंबंधी खंतही व्यक्त केली हे. शेवटी त्याने असा इशारा दिला आहे की, राजाला वेळीच जागे करणे, त्याला ताकीद देणे हे त्याच्या हिताचे आहे. राजा एखाद्या कारस्थानात अडकला की त्याच्यावरचा आमचा विश्वास नष्ट होईल, आणि त्याचा नाश होईल (१ जानेवारी १८२७)

राजा कोणत्या कारस्थानात गुंतला असेल या ब्रिग्जच्या विधानावर एलफिन्स्टनला विश्वासच बसत नाही. ब्रिटिश सरकार उलथून पाडण्याच्या कोणत्याही कटात राजा असणार नाही असे त्याला वाटत होते. पण राजाबद्दल काही विश्वसनीय आणि निश्चित बातमी असेल तर मात्र त्याला ताकीद दिली पाहिजे असे तो प्रभारी रेसिडेंट सिम्पसन यास कळवितो (१९-२-१८२७) आणि या बातमीने थोडेसे जरी काही तथ्य असेल तर `आपल्यावर सरकारचा विश्वास नाही अशी त्याची भावना होऊ देऊ नका. फक्त सौम्य ताकीद प्रथम द्या, पक्का अधिकृत पुरावा हाती आल्याखेरीज कारस्थानाविषयी काही बोलू नका.’ असे तो सिम्पसनला बजावतो. (६ मार्च १८२७) राजाविषयी विनाकारण प्रतिकूल मत करून घेतले आहे अशी भीती त्याला वाटते म्हणून तो त्याला लिहितो, `राजा कारस्थानात गुंतलाच असेल, तर त्याला दिली जाणारी शिक्षा अगदी सौम्य असेल.’ (७ मार्च १८२७) यावर, `सकृतदर्शनी राजा जरी गुंतलेला वाटत असला, तरी आता लगेच त्याला काही समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही.’ असे सिम्पसन एलफिन्स्टनला आश्वासन देतो. (९ मार्च १८२७) ऑक्टोबर १८२७मध्ये एलफिन्स्टनने मुंबईचा निरोप घेतला. जॉन मालकम हा १ नोव्हेंबर १८२७ रोजी त्याच्या जागी रूजू होणार होता. २९ ऑक्टोबर १८२७ रोजी एलफिन्स्टनने राजाला निरोपाचे आणि एक प्रकारे शेवटचे पत्र लिहिले. त्यात त्याने राजाचे आभार मानले आहेत, राजाने दिलेल्या त्याच्या राजघराण्याच्या शकावलीचा आदरपूर्वक स्वीकार केला आहे. राजाचे भावी आयुष्य सुख समृद्धीचे जावो असे अभिष्टचिंतन केले आहे. त्यांच्या मैत्रीची आठवण पण सतत ठेवू, नव्या रेसिडेंटबद्दल-रॉबर्टसनबद्दल राजाने काढलेले धन्योद्गार आणि राजाने उदारहस्ते २५ हजार रुपयांची एलफिन्स्टन प्रोफेसरशिपसाठी दिलेली देणगी याचा आवर्जून उल्लेख केला आहे.

असे असताना लंडनला गेल्यावर त्यांचे मतपरिवर्तन झाले का, अथवा ब्रिग्जच्या गोपनीय पत्राचा, अहवालाचा त्याच्या मनावर परिणाम झाला आणि या प्रकरणात आपण तोंड उघडावयाचे नाही अशी शपथ त्याने घेतली होती, आणि म्हणून हे सारे उघड्या डोळ्यांनी तो तटस्थपणे पाहत राहिला होता. ग्रँटच्या बेचैनीने लिहिलेल्या पत्रांना तो प्रतिसाद देत नव्हता. रंगो बापूजीशी तो संबंधच ठेवत नव्हता. सप्टेंबर १८४१ रोजी साता-याच्या काही मुसलमान सेवकांनी पाठविलेल्या पत्राची (हे दीर्घ मोडी पत्र इंडिया ऑफिस लायब्ररीत आहे) तो दखलसुद्धा घेत नाही. हे सारे काही गूढ वाटते.

एलफिन्स्टन आणि ग्रँट डफ या दोघांपेक्षा ब्रिग्ज मात्र निराळा होता. साता-यात असताना राजा त्याच्या मनातून उतरला असला तरी राजावर झालेला अन्याय त्याला सहन झाला नाही. रंगो बापूजीने आणि इतर ब्रिटिश सद्गृहस्थांनी जेव्हा झाला प्रसंग त्याच्या निदर्शनास आणला. तेव्हा या प्रकरणात त्याने

हिरीरीने भाग घेतला. पार्लमेंटमध्ये भाषण करून राजाची बाजू प्रभावीपणे मांडली आणि रंगो बापूजीशी असलेल्या आपल्या मैत्रीचा जाहीर उच्चार केला. प्रबोधनकारांनी त्याचे समर्थ निवेदन आपल्या ग्रंथात दिले आहे. (पृ. २११-२१२) आपल्या आठवणीच्या ग्रंथात तो म्हणतो, `साता-यात मी जेव्हा होतो, तेव्हा राजाला आपला कारभार सांभाळण्याचे सर्वाधिकार दिले होते, आणि तो त्यांचे एलफिन्स्टनने दिलेल्या सूचनांप्रमाणे काटेकोपणे पालन करीत होता, त्यात थोडीही कसर तो करीत नव्हता. तो धूर्त होता. आपल्या देशबांधवात असलेल्या पुष्कळशा गैरसमजुतीपासून मुक्त होता; न्याय आणि नैतिकता यासंबंधी त्याच्या काही ठाम कल्पना होत्या, आणि त्यामुळे खोटेपणा करण्याची त्याच्यापासून तिळमात्रही अपेक्षा करता येणार नाही.'

सातारा प्रकरणातील ग्रँट डफ, एलफिन्स्टन आणि ब्रिग्ज यासंबंधित ब्रिटिश अधिका-यांच्या भूमिका समजावून घेतल्यानंतर, या प्रकरणाला विशिष्ट वळण लावणा-या बाळाजीपंत नातू याच्या कारस्थानाचा आपणास थोडक्यात परामर्ष घ्यावयाचा आहे. `पाचवडच्या एका भिक्षुक भटाचे पोर ते काय, आणि राज्यक्रांतीच्या काळात स्वदेशी मुत्सद्यांच्या नाकात वेसणी घालून त्यांना आपल्या धोरणावर नाचवते काय?' असा सवाल करून प्रबोधनकारांनी या खलपुरुषाचे कपटकारस्थान विस्तृतपणे मांडले आहे.

पेशव्यांच्या फडात कारकुनी मिळाली नाही म्हणून पेशव्यांचे शत्रू इंग्रज यांच्या नोकरीत तो सामील झाला, आणि त्याच कारणावरून प्रतापसिंहानेदेखील त्याला आपल्या सेवेत दाखल करून घेण्यास इंग्रजांना संमती दिली. वास्तविक बाळाजीचा उपयोग जसा एलफिन्स्टनने बाजीरावाविरुद्ध करून घेतला. तसाच त्याला साता-याबाबतही पुढे मागे जरूर पडल्यास होईल असे त्याला वाटत असावे. प्रतापसिंहाची सुटका करण्यास आपण मदत करू असे आश्वासन देताना एलफिन्स्टनने रंगो बापूजीला अगदी बजावून सांगितले होते की, चुकूनसुद्धा ही गोष्ट बाळाजीला समजता कामा नये. एलफिन्स्टनने पुढे मोठ्या धूर्तपणे बाळाजीची नेमणूक ग्रँटचा सहायक म्हणून केली, आणि इंग्रजांना सातारच्या राजघराण्याशी उद्भवलेल्या प्रारंभीच्या समस्या सोडविण्यास त्याची खूप मदत झाली. प्रथम त्याने माईसाहेबांची समजूत काढून आपल्या मुलांचा मार्गदर्शन करण्याचा म्हणजे पर्यायाने `रीजंट' बनण्याचा विचार त्यांच्या डोक्यातून काढून टाकला. दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे तनख्याचा. राजाची मागणी ३० लाखांची होती पण बाळाजीच्या मध्यस्थीने ग्रँटने ती साडेतीन लाखांवर मिटवली. बाळाजीपंताने ग्रँटला एकदा सांगितले की, ``शाहू महाराजांनी हे राज्य एका ब्राह्मणाच्या स्वाधीन केले हा फार मोठा शहाणपणा केला; नाहीतर मराठी साम्राज्य यापूर्वी केव्हाच लयाला गेले असते.'' (४-५-१८१८)

४ मार्च १८१८ रोजी बाळाजीपंत साता-यास प्रथम प्रतापसिंहाशी बोलणी करण्यासाठी एलफिन्स्टनबरोबर गेला होता. त्याकामी त्याने केलेली मदत पाहून ग्रँटचा मदतनीस, चीफ नेटिव्ह एजंट म्हणून द. म. ५०० रु. वर त्याची नेमणूक झाली होती. सुरुवातीस राजास तो इंग्रजाशी बोलणी करण्यास फार उपयुक्त आणि विश्वासार्ह वाटत होता. ग्रँटने लवकरच नातूची चाल ओळखली, आणि राजाला आणि त्याच्या कुटुंबियांना त्याने स्पष्टपणे इशारा दिला की, त्यांना जी काही बोलणी करावयाची असतील ती फक्त त्याच्याशीच करावीत, बाळाजीच्या मध्यस्थीने नाही.

राज्यकारभारातील त्याचे महत्त्व तर कमी करावयाचे असा बेत ग्रँटने आखला. मराठ्यांचा इतिहास लेखनाच्या कामी साधनसामुग्री, विशेषतः प्रतापसिंहाकडील ऐतिहासिक कागद मिळविण्यासाठी त्यान खूपच मदत केली. चिटणीस कागद देत नाही असे पाहून बाळाजीने मोठ्या आर्जवी स्वरात राजास विनंती केली, ``सारे कागद पाहून छाप्यात छापून विलायतेस जाईल. सर्वास महाराजाचा पराक्रम, राज्ये वगैरे जाहीर होईल.'' त्याने बाळाजीकडून मराठ्यांच्या इतिहासाची बखर लिहून घेतली होती, आणि त्याचे इंग्रजी भाषांतर मॉरिस या त्याच्या सहका-याने केले होते. या दोन्ही ग्रंथांचा प्रस्तुत लेखकाने खूप शोध घेतला, पण यश आले नाही. इंग्रजाच्या दृष्टिकोनातून बाळाजीने इतिहास कसा लिहिला असेल हे पाहणे उपयुक्त ठरले असते.

इतिहास लेखनाचा मतलब साध्य झाल्यानंतर क्रमशः ग्रँटने त्याची साता-याहून उचलबांगडी करण्याच्या कामास सुरुवात केली होती. पण हे काम काहीसे कठीण होते. कारण तो एलफिन्स्टनच्या मर्जीतला होता. केवळ ग्रँटचा मदतनीस म्हणून त्याला साता-यात राहावयाचे नव्हते, तर त्याला प्रतापसिंहाचा दिवाण

बनावयाचे होते. आपल्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण त्याने दिले होते. त्या पत्रात तो म्हणतो, `साहेबाचे कदम मुबारक होऊन कार्य सिधीस जाई ते जाहाले पाहिजे. लोखंड परसास लागल्यावर सोने होईल की नाही ही काळजी लोखंडास राहात नाही. माझे मनात काय आहे ती येते वेलेस विनंती केली आहेच.'' (२१-५-१८१८) पण याचा काही फारसा उपयोग झाला नाही. बाळाजीस पूर्वी एलफिन्स्टनने पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांतील गावे इनाम दिली होती, आणि आता कोल्हापूरकराकडूनही त्याला दोन गावे इनाम मिळणार होती त्यालाही ग्रँटचा सल्ला न स्वीकारता एलफिन्स्टनने ती घेण्याची परवानगी दिली होती. बाळाजी हा रास्ते यांचावकील होता व त्यासाठी आपणास पुण्यास जाण्यास तो ग्रँटकडे परवानगी मागे पण रास्ते प्रकरणात बालाजीने पुण्यात येण्याची आवश्यकता नाही एलफिन्स्टनने मान्य केल्याने ग्रँटला धैर्य आले, आणि त्याच्यावर कारवाई करण्यास तो सिद्ध झाला.

बाळाजी हा प्रामाणिक नाही, तो लोकाकडून लाच घेतो याबाबतीत त्याची पक्की खात्री झाली होती. ग्रँटने एकदा त्याची परीक्षा घेण्याकरिता त्याला सरळ विचारले की, बापू आपटे नावाच्या एका इसमाकडून सदाशिव जोशी नावाच्या इसमाने तुला तीन हजार रुपये दिले का? त्यावर बाळाजीचे उत्तर असे की, जोशी जेव्हा पैसे घेऊन आला तेव्हा आपण त्यास म्हणालो, ``या पैशाला मी हात लावला तर गोमांस भक्षण केल्याचे पातक माझ्या हातून घडेल, हे पैसे तू परत घेऊन जा.'' या उत्तरावर ग्रँटचा विश्वास बसणे शक्य नव्हते. ग्रँटने घडला प्रसंग एलफिन्स्टनला सविस्तर  कळविला; बाळाजीला त्याला भेटण्याची परवानगी नाकारली.

बाळाजीला सारे चित्र स्पष्ट दिसू लागले. राजा, त्याचे सहकारी, आणि आता खुद्द ग्रँट  साहेबही आपल्याविरुद्ध झाल्याचे पाहून आपल्याला साता-याच्या सेवेतून मुक्त करावे अशी विनंती त्याने ग्रँटला केली. कंपनी सरकार इतरत्र जे काम देईल ते आपण करू, नाही तर काशीस जाऊ असेही तो म्हणाला बाळाजीने आपले स्थान टिकविण्याचे खूप प्रयत्न केले, पण ``राजाचे तोंडही पाहणार नाही'' असे म्हणणा-या आणि परत आपले चुकले असे कबूल केले तरी बाळाजीला शेवटी ४ नोव्हेंबर १८१९ रोजी ग्रँटने निरोप दिला. वास्तविक बाळाजीपंताला इतक्या तडकाफडकी काढून टाकले हे प्रतापसिंहालाही मान्य नसावे. त्याच्या रोजनिशीतील एक नोंद सांगते, ``आमी ब्राह्मण लोक सारे पाहिले, परंतु बालाजीपंताप्रमाणे कोणी नाही शाहणा. मग आणखी बोले ग्रॉंट की दोन तीन काम वाईट खुनसी व राग मनी धरून ठेवणे त्याचे छातीवर चढणे.'' प्रतापसिंहाला माणासाची जी पारख करता आली नाही, ती ग्रँटने बरोबर केली होती. प्रतापसिंहाच्या एका अप्रकाशित कैफियेतीत म्हटले आहे, ``नातू याचे मनात आपण इकडील कारभार करावा व आम्ही  त्याचे जरबेत असावे असे येऊच नातू हे इकडील मंडळीपासी उगीच जिकिर करू लागले.''  ही कैफियेत काशीच्या वनवासात लिहिली असावी. बाळाजीपंत साता-यात परत आला तो आप्पासाहेबांचा दिवाण म्हणूनच राजाच्या पदच्युतीचा त्याला इतका आनंद झाला होता की, त्याने लगेच एलफिन्स्टनला पत्राने कळविले, ``राजाने अशा प्रकारे नियमबाह्य वर्तन करण्यास प्रारंभ केल्यावर त्याचे राज्य टिकेल असे अपेक्षिणे कठीण होते. पण ब्रिटिश सरकारच्या औदार्यामुळे व दयाळूपणामुळे हे राज्य त्याच्या घराण्यातच राहिले ही अत्यंत समाधानाची बाब असून तीमुळे सरकारचा मोठा नावलौकिक झाला आहे.'' (२५-१०-१८३९) ग्रँट डफला जेव्हा बाळाजीच्या साता-यातील पुनरागमनाची वार्ता कळली तेव्हा तो म्हणतो, ``बाळाजीपंतास साता-यास पंतप्रधान म्हणून राहू दिल्यास ब्रिटिश सरकारवर मोठा ठपका येईल. सातारा राज्य खालसा होण्यास, आणि रंगो बापूजीच्या कार्यात अडथळे निर्माण करण्यास बाळाजीने जी कुटिल कारस्थाने केली त्याचा साद्यंत वृत्तांत प्रबोधनकार ठाकरे यांनी दिला असून सातारा प्रकरणात बाळाजीपंत नातू कसा प्रमुख आरोपी होता हे तपशीलवार सिद्ध केले आहे.''

प्रतापसिंहाच्या पदच्युतीसंबंधी `प्रभाकर'साख्या मराठी वृत्तपत्रातून आणि `लोकहितवादी'सारख्या सुधारकांच्या लिखाणातून, तसेच देशी, परदेशी इंग्रजी वृत्तपत्रांतून आलेल्या वृत्तांताचा प्रबोधनकारांनी आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. १८४३च्या सुमारास रामकृष्ण विश्वनाथ या विचारवंताने लिहिलेल्या, `हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार याविषयी विचार' या ग्रंथाचा येथे उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत ग्रंथात देशी संस्थाने हडप करण्याच्या कंपनी सरकारच्या राजनीतीचे समहारक स्वरूप प्रगट करताना लेखकाने गुजरातेतील `निंबोरी' आणि

महाराष्ट्रातील `सातारा' या दोन संस्थानांत ब्रिटिशांनी घातलेल्या गोंधळाची माहिती दिली आहे. लेखक म्हणतो, ``दुसरा कब्जा (पहिला निंबोरीचा) ज्यामध्ये कंपनी सरकारची राज्यनीतीची वर्तणूक उघड दिसती तो साताराचे राजाचा आहे. या राजास पदच्युत करून त्याचा इन्साफ न करिता व त्याचे अपराधाचा काहीदाखला नसता व जरी याचा निरपराधीपणा स्थापन करण्यास पुष्कळ आधार होता, तरि त्यास कैद करून काशीस पाठविला.'' असे म्हणून १८४३पर्यंत जे काही घडले ते थोडक्यात दिले आहे. राजाचे चारित्र्य हनन करण्यासाठी ``मुंबई सरकारने एक आंग्ल युवती मिसेस लाडार हिला राजास मोहित करण्यासाठी पाठविले होते, पण राजाला त्याच्या मित्रांनी या वेश्येपासून सावध राहण्याचा वेळीच इशारा दिला होता. `राजाचा कोणत्या प्रकारे नाश करावा' हाच या मागे हेतू होता हे सिद्ध होते. पुढे १८४१च्या `मुंबई टाइम्स'मध्ये यासंबंधी एक मोठा व निरर्थक वृत्तांत लिहिला आहे.'' प्रबोधनकारांनी `नूस पेपरात गैरवाका मजकूर(पृ. १०१) या शीर्षकाखाली जी त्रोटक माहिती दिली आहे ती कदाचित या टाइम्समधील वृत्तांतासंबंधी असावी (पाहा, रामकृष्ण विश्वनाथ, पृ. ३०)

रंगो बापूजीचे सारे कर्तव्य प्रतापसिंहाशी निगडित असल्याने त्याचे चरित्र म्हणजे १८०८ ते १८४८ पर्यंतचा सातारा प्रकरणाचा इतिहास असेच म्हणावे लागेल. त्यामुळे त्याच्या चरित्रकथनात प्रामुख्याने प्रतापसिंह आणि त्याचा काळ याचाच वृत्तांत येणे अपरिहार्य आहे.

रंगो बापूजीने कंपनी सरकारची नोकरी १८३१साली सोडली. १८१८ ते १८३१ या कालखंडात प्रतापसिंहाला आपल्या या `स्वामीनिष्ठ' सेवकाची आठवण झालेली दिसत नाही. पण एलफिन्स्टन, ग्रँट, ब्रिग्ज, रॉबर्टसन या मित्रांचे प्रेमळ छत्र नाहीसे झाले, आणि त्याच्या विरोधकांनी जेव्हा त्याच्याविरुद्ध तुफान उठविले तेव्हा १८१८ पूर्वीच्या या आपल्या सेवकांची राजाला एकदम आठवण झाल्याचे दिसते. कारण मुंबईत राजाचा एजंट म्हणून त्याने काम करावे आणि साता-यात जे घडत होते त्याची कल्पना मुंबई आणि कलकत्ता येथील वरिष्ठ अधिका-यांना द्यावी, विशेषतः तहनाम्यातील कलम ५चा आधार घेऊन जहागिरदारांनी राजाशी जो संघर्ष मांडला होता आणि समस्या निर्माण केली होती ती कायमची धसास लावावी यासाठी प्रयत्न करण्याचे काम त्याच्याकडे सुपूर्द केले होते. विशेषतः कंपनीचे निवृत्त आरोग्याधिकारी डॉ. मिल्न यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यामार्फत राजाची बाजू वरिष्ठांपुढे मांडावी व त्या दृष्टीने हालचाली कराव्यात असे त्यास सांगितले होते. तसेच इंग्लंडमधील कंपनीच्या सर्वोच्च अधिका-यांनाही सत्य कळणे आवश्यक होते. रंगोबाने त्यासाठी सय्यद मीर आफजल अली यास राजाचा वकील म्हणून पाठविण्याचे ठरविले. कंपनीचे अधिकारी या बाबतीत काय अडचणी निर्माण करतील याचा पूर्ण विचार करून या वकिलाला ८१३७साली मक्केच्या यात्रेचे निमित्त करून बाहेर काढले. पण त्याला विशेष यश आले नाही. तो परत आला. राजाने यशवंतराव शिर्के यांना १८३८ साली लंडनला पाठविले. मुंबईत रंगो बापूजीच्या हालचाली जोरात सुरू होत्या. त्याने जगन्नाथ शंकरशेट, जमशेटजी जिजीभाई इत्यादींच्या गाठीभेटी घेतल्या, आणि मदतीची याचना केली. यशवंतराव शिर्क्याने पैशाचे आमिष दाखवून बोर्डापुढे राजाचा अर्ज दाखल करून घेतला. पण एवढ्यात आपला धनी पदच्युत झाल्याचे त्याला कळले आणि तो निराश झाला. प्रतापसिंहाची बाजू इंग्लंडमध्ये ब्रिग्ड, लॉडविक, रॉबर्टसन या निवृत्त अधिका-यांनी मांडली. पण पदच्युतीला तहकुबी द्यावी ही त्यांची मागणी बहुमताने फेटाळली गेली. ग्रँट डफ आणि एलफिन्स्टन यात सामील झाले नव्हते याचे कारण समजत नाही.

रंगो बापूजी अनेक अडचणींना तोंड देत, कॅप्टन कोगन या निवृत्त ब्रिटिश अधिका-याचे आर्थिक सहाय्य घेऊन, वेषांतर करून आरबी व्यापा-यांच्या काफिल्याबरोबर १८४०च्या जून अखेर लंडनमध्ये दाखल झाला. पण सर्व मार्ग खुंटल्याने तो यशवंतराव शिर्क्यांच्याबरोबर १ जुलै १८४१ला भारत परतीच्या प्रवासात दाखल झाला. भेडसावणा-या आर्थिक अडचणी, इंग्रज अधिका-यांचा उद्दामपणा, न्यायी म्हणविणारे इंग्रज अर्ज विनंत्यांना दाद देणारे नव्हते याचा मराठी माणसांना चांगला प्रत्यय आला होता, त्यामुळे माघारी फिरण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. अस्वस्थ मने तो बोटीवर चढला. पण माल्टा येथे तो बोटीतून उतरला आणि त्याचे साथीदार पुढे गेले. `सरकार स्वारी परत सातारला येईपर्यंत मी स्वदेशाला तोंड दाखवणार नाही.' अशी त्याने घोर प्रतिज्ञा केली होती. अशी प्रखर स्वामी निष्ठा रंगो बापूजी जवळ होती. प्रबोधनकार म्हणतात त्याप्रमाणे तो `निराशा प्रभू' होता. जॉर्ज थॉमसनच्या मध्यस्थीने त्याने सतत आठ वर्षे `छत्रपती बचाव' चळवळ पेटती ठेवली. १८४६-४७ या कालखंडात

लोकांना वस्तुस्थिती समजावी म्हणून लेख, पुस्तके, पोस्टर्स, व्याख्याने या माध्यमांद्वारे `गो-यांचे काळे कारस्थान' जनतेपुढे आणण्याचा त्याने अहर्निश प्रयत्न केला.

१८४५ साली ब्रिग्जने पार्लमेंटमध्ये जे भाषण केले त्यात तो म्हणतो, ``मिस्टर रंगो बापूजी यांचा नि माझा दाट परिचय झालेला आहे. गेली चोवीस वर्षे मी रंगोबाला ओळखत आहे. शिवाय तो गेली सात वर्षे आपल्या पदच्युत राजाच्या वाजवी हक्कासाठी झगडत या देशात वस्ती करून राहिलेला आहे. सत्ताधीश मालकाने सोपविलेली कामगिरी इतक्या प्रामाणिकपणे आणि नेकीने पार पाडणारा उमदा रंगो बापूजीशिवाय दुसरा माझ्या आढळात नाही, असे छातीठोक विधान करायला मला काहीही दिक्कत वाटत नाही.'' (ठाकरे पृ. २११-१२) केवढे प्रचंड प्रशस्तीपत्र रंगो बापूजीने मिळविले होते. १४ ऑक्टोबर १८४७ रोजी प्रतापसिंह परलोकवासी झाला. रंगो बापूजीला ही हातमी ४ डिसेंबरला कळली. `राजा मेला तरी न्याय मेला नाही' असा विचार करून, `अंगावरील वस्त्र नाहीसे होत तोवर मी येथे इन्साफाचा लढा देत राहणार' म्हणून या एकांड्या शिलेदाराने आपली जिद्द सोडली नाही.

इकडे बाळाजीपंत नातूने प्रतापसिंहाचा पिच्छा अद्याप सोडला नव्हता. सातारा राज्य खालसा झाले. प्रतापसिंहाच्या राणीने साता-यास परत जाण्याची इच्छा व्यक्त केली. डलहौसी या लाट साहेबाने ती मंजूरही केली, पण तिची कार्यवाही करण्यास मुंबई सरकारने विलंब लावला. बाळाजीपंत नातू काशीस जाऊन राणीस भेटला आणि म्हणाला की तुम्ही रंगो बापूजीचा केवार घेता म्हणून सरकारचा तुमच्यावर रोष आहे. तुम्ही त्याच्याशी आपला काही संबंध नाही असे लिहून दिले तर मी सरकारात तुमची रदबदली करेन. राणीसाहेबांनी नाईलाजाने नातूचे म्हणणे मान्य केले आणि शरणागती पत्करली व रंगो बापूजीस परत बोलाविण्याचा खलिता लिहून दिला, आणि १४ डिसेंबर १८४७ रोजी कंपनीचा चेअरमन हॉबहाऊसने सातारा राज्य खालसा करण्याचा सल्ला डलहौसीला दिला.

राणीला तसा अधिकार नाही, राजाचे त्याला मृत्यूपूर्वी ९ दिवस आलेले गुप्त पत्र हेच त्याचे मृत्यूपत्र होय असा त्याने आग्रह धरला. `पण आम्ही तुम्हाला ओळखत नाही' हा एकच घोष कंपनीच्या अधिका-यांनी चालू ठेवला. शेवटी `कायदेबाजीच्या अट्टाहासा'पुढे त्याचे आणि त्याच्या इंग्रज मित्रांचे सारे श्रम वाया गेले. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, ``रंगो बापूजी हा तर इंग्लंजातला पहिल्या हिंदी चळवळ्या म्हणून त्याचे नाव अजरामर राहील. हिंदी प्रश्नाबद्दल इंग्रजी जनतेपुढे जाहीर व्याख्याने देणारा हाच पहिला राजकारणी पुरुष.'' (पृ. २५३)

१८५३च्या अखेरीस रंगो बापूजीला हताश होऊन परतावे लागले. यात त्याची चौदा वर्षे गेली. त्याच्या जिद्दीचे आणि त्याने सत्यासाठी उभ्या केलेल्या झगड्याचे महत्त्व ओळखून त्याच्या २२ इंग्रज मित्रांनी १८ पाकळ्यांचे एक चांदीचे तबक भेट म्हणून दिले. त्यावर जॉन ब्राईट, ब्रिग्ज, ग्रँट डफ, जोसेफ ह्यूम, जॉर्ज थॉमसन, रॉबर्टसन, कोगन इत्यादी अनेक मान्यवरांच्या सह्या आहेत. पण एलफिन्स्टनची नाही याचे नवल वाटते. एलफिन्स्टन आणि रंगो बापूजी या उभयतांची भेट कधी झाली असल्याचा उल्लेख कोठे आढळत नाही. डॉन ब्रिग्ज, ग्रँट डफ सारखे त्याचे विश्वासू सहकारी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या रंगो बापूजीच्या कार्यात सहभागी झाले होते, एलफिन्स्टन मात्र शेवटपर्यंत अलिप्तच राहिला.

१८५४च्या फेब्रुवारीत रंगो बापूजी भारताच्या किना-यावर दाखल झाला, काशीला गेला, साता-याला गेला आणि पुढे १८५७च्या शिपायांच्या उठावात देखील सामील झाला. वेषांतर करून भारत यात्रा त्याने केली, आणि सर्व परिस्थितीची जाणीव करून घेतली. महाराष्ट्र सरकारच्या दप्तरखान्यातील `पोलिटिकल डायरीज'मधील संदर्भावरून त्याने सातारा, कोल्हापूराच्या परिसरात उठावाची आखणी कशी केली होती याची कल्पना येते. आपला मुलगा सीताराम, मेव्हणा केशव निलकंठ चित्रे, गणेश सखाराम कारखानीस, सत्तू रामोशी, सखाराम दाजी काबाडे, नारायण पावसकर सोनार, शिवराम मोरेश्वर कुलकर्णी, दौलताहरी पवार, आप्पा फडणीस इत्यादी सहकार-यांची संघटना बांधली. ठिकठिकाणी गुप्त केंद्रे सुरू केली, आणि गो-या अधिका-यांची झोप उडविली. या उठावाचा शेवट अपेक्षेप्रमाणेच झाला. ५ जुलै १८५७ पासून रंगो बापूजी जो भूमिगत झाला तो कायमचा. त्याला पकडण्यासाठी ५००० रु.चे सरकारी इनाम जाहीर झाले होते. पण शेवटपर्यंत तो इंग्रजांच्या हाती कधीच सापडला नाही. ज्याचा जन्म कधी झाला आणि मृत्यूकधी

झाला याची काहीच नोंद नसलेला हा भारताचा स्वातंत्र्यसैनिक अमर होऊन राहिला. (पाहा – खोबरेकर वि. गो. `महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, प.७८-८६')

प्रबोधनकार ठाकरे यांनी रंगो बापूजीच्या चरित्राची रचना विविध अंगानी केली आहे. इतिहास संशोधक, साहित्यिक आणि पत्रकार यांचा त्रिवेणी संगम प्रबोधनकारांच्या प्रस्तुत चरित्र ग्रंथात आढळून येतो. इतिहाससंशोधकाचा साधनासंबंधीचा चिकित्सक विचार, साहित्यिकाची ओघवती भाषा आणि साधने अपुरी पडतील तेथे कल्पनाशक्तीचा वापर करून इतिहासाचा सांधा जोडून घेण्याचे कौशल्य आणि पत्रकाराची आक्रमकता आणि ठोसपणा या त्रिगुणांचा ठायी ठायी प्रत्यय हा चरित्रग्रंथ वाचत असताना येतो.

प्रबोधनकारांनी समकालीन इंग्रजी, मराठी साधनांचा चिकित्सकपणे अभ्यास केला होता हे विशेषतः पेशवे दप्तर, मराठी दप्तर रुमाल, प्रवास वर्णन, ऐतिहासिक कागदपत्रे यांचे जागोजागी जे उल्लेख केले आहेत त्यावरून स्पष्ट होते. एलफिन्स्टनच्या आणि एकूणच ब्रिटिशांच्या राजनीतीचा आणि त्यांनी विशेष अभ्यास केला होता याचीही कल्पना या ग्रंथाच्या वाचनावरून येते. एखाद्या विषयाचे महत्त्व चटकन लक्षात यावे म्हणून त्यांनी काही प्रकरणांना, आतील परिच्छेदांना जे मथळे दिले आहेत अथवा मधूनमधून जे शब्दप्रयोग केले आहेत त्यावरून त्यांच्या रचना कौशल्याचा आणि पत्रकारितेचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ `सोनेरी पिंज-यात सातारचा सिंह', `भरी वर्चस्वाचा ज्वालामुखी भडकू लागला', `ओता, ओता आणखी तेल ओता', `राजा मेला तरी न्याय मेला नाही', `ग्रंथ आटोपला तरी प्रवचन चालूच' ही प्रकरणांची नावे अथवा, `डफळ्यांची जत तिची भलतीच गत', `सचिवाचे भोर त्याला छत्रपतीचा घोर', `नातूने आपले कावळे जमविले', `शंकराचार्याचा दरोडखोर दौरा' हे मथळे अथवा `चितपावनी आयागो(बाळाजीपंत नातू), निराश प्रभू (रंगो बापूजी), `पोलिशी समजूत(कबुली जबाबासाठी) हे शब्दप्रयोग, प्रबोधनकारांच्या शैलीचे निर्देशक आहेत.

इतिहासपर चरित्र लेखनात नेहमी वस्तुनिष्ठता असावी असे म्हटले जाते. परंतु हा सिद्धांत इतका काटेकोरपणे पाळला जात नाही किंवा तसे शक्य होत नाही असे अनेक इतिहासकारांचे मत आहे आणि अनुभवही आहेत. प्रबोधकारांनी केलेल्या काही व्यक्तींच्या स्वभावचित्रणाबाबतीत मतभेद होण्याच सक्यता आहे. पण आपले प्रतिपादन वाचकांच्या मनावर ठसावे म्हणून एखाद्या लेखकाने विशिष्ट तंत्राचा अवलंब केला असेल आणि वाचकांनी आपल्या विचारसरणीस तेवढाच भाग घेतला, तरी प्रतापसिंह महाराज, रंगो बापूजी आणि त्यांचा काळ या संबंधीची बरीच नवी माहिती वाचकांना या ग्रंथात मिळेल हे निर्विवाद आहे.

प्रबोधनकारांनी १९४७ साली हा ग्रंथ पूर्ण केला. त्यानंतरच्या काळात जी नवी अस्सल आणि दुय्यम प्रकारची साधने निर्माण झाली त्याच्या आधी या ग्रंथास पुष्टीकारक अशा माहितीचा प्रपंच या प्रास्ताविकेत येथवर केला आहे. अर्थात या नवीन साधनामुळे या मूळ ग्रंथातील चरित्र कथनात काही बदल होतो असे नाही उलट, प्रबोधनकारांच्या प्रतिपाद्य विषयाला काही अंशी पोषक ठरेल अशीच ही माहिती ठरणारी आहे.

या प्रास्ताविकेत काही अप्रकाशित साधनांचा वापर केला आहे. उदाहरणार्थ प्रतापसिंहाची मोडी लिपीत लिहिलेली एक अप्रकाशित कैफित. ती अपूर्ण असून तिचा लेखक अज्ञात आहे. प्रतापसिंहाच्या बनारस येथील वास्तव्यात कर्नल ओव्हन्सने ही तयार करून घेतली असावी असे दिसते. या कैफियतेतील भाषेवरून ती प्रतापसिंहाने तोंडी सांगितली असावी आणि कोण्या लेखनिकाने ती उतरून घेतली असावी. दररोज रोजनिशी लिहिण्याची राजाला सवय जडली असल्याने हे अशक्य वाटत नाही. राजाला वाड्यातून काढून निंबळा छावणीत आणून ठेवले येथपर्यंतची हकीकत या कैफियतीच्या ४८ बंदांत आली आहे. ही संपूर्ण मिळाली असती तर राजाच्य काशी येथील वनवासास्थेची माहिती आपल्याला कळली असती. कंपनीच्या भारतातील आणि इंग्लंडमधील अधिका-यांच्या माहितीसाठी तयार केलेला हा कच्चा मसुदा असावा. ही कैफियत दोन दृष्टीने महत्त्वाची आहे. एक, तिस-या इंग्रज मराठे युद्धाच्या प्रारंभीच्या काळात एलफिन्स्टन आणि प्रतापसिंहाचे सहकारी यांच्यात ज्या गुप्त बैठका झाल्या त्या ठिकाणची नोंद आहे आणि दोन, प्रतापसिंहाविरुद्ध करण्यात आलेल्या आरोपांची तयारी कशी करण्यात आली याचा

तपशील, विशेषतः या कटात सामील झालेल्या व्यक्तीचे नावे, आणि त्यांच अंतस्थ हेतू याचीही नोंद येथे आढळते. पेशवे दफ्तरातील हस्तलिखित फेरिस्तात (यादीत) रूमाल नं. ४ अशी याची नोंद आहे.

याखेरीज पेशवे दप्तरातील प्रतापसिंहाच्या अप्रकाशित २६ रोजनिशी (यापैकी काही तुरळक नोंदी पेशवे दफ्तर, खंड ४२मध्ये आल्या आहेत.) सातारा महाराजांचे दफ्तर, डेक्कन कॉलेजातील मेणवली दफ्तर अथवा पारसनीस संग्रह, पुणे आणि मुंबई येथील पुराभिलेखागारातील अप्रकाशित इंग्रजी साधने, इंडिया ऑफिस लायब्ररी, लंडन येथील एलफिन्स्टन, ग्रँट डफ यांचा खाजगी पत्रव्यवहार इत्यादी साधनांचा अल्पसा उपयोग या प्रास्ताविकात केला आहे.

प्रबोधनकारांच्या या ग्रंथाचे पुनर्मुद्रण ५० वर्षांनी, आणि तेही भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात होत आहे हे फार औचित्यपूर्ण आहे. साता-यासारख्या एका आकाराने छोट्या पण परंपरेने मोठ्या संस्थानाच्या स्वातंत्र्यासाठी, स्वकीय आणि परकीय यांच्याशी, देशात आणि परदेशात १८३९पासून सतत लढा देणारा एक साधा माणूस, रंगो बापूजी किती महान कामगिरी करून जातो हा सारा इतिहास मोठा उद्बोधक आहे. एका छोट्या संस्थानाच्या स्वातंत्र्यासाठी लढणारा रंगो बापूजी सा-या देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातदेखील कसा महत्त्वपूर्ण ठरतो, आणि इंग्रज हा केवळ संस्थानिकांचा नव्हे तर सा-या भारताचा एकमेव शत्रू आहे हे आपल्या कृतीने कसे पटवून देतो, आणि भारताच्या भावी स्वातंत्र्याच्या लढ्याची कशी पायाभरणी करतो हे वाचकांच्या मनाव ठसविण्याचा समर्थ प्रयोग प्रबोधनकारांनी या ग्रंथात केला आहे.

1. रा. कुळकर्णी

संदर्भ ग्रंथ (१९४७ नंतरचे)


(1)मराठी :

| | |
|---|---|
| कुलकर्णी अ. रा. | जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ, पुणे १९७० |
| खरे ग. ह. (सं) | मराठ्यांचा इतिहास खंड ३, पुणे, १९८६ |
| खोबरेकर वि. गो. | महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४) मुंबई, १९९४ |
| बेडेकर दि. के. (सं) | चार जुने मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथ : |
| | `रामकृष्ण विश्वनाथ, पुणे १९६९ हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिती व पुढे काय त्याचा परिणाम होणार या विषयी विचार(प्रथम प्रकाशन १८४३), पृ. १४२ |
| नातू ग. वि. (सं) | नातू कुलवृत्तांत, पुणे १९६६ |

(ब) इंग्रजी :

| | |
|---|---|
| Ballhatchet K. A. | Social Policy & Social Change in Western India (1818-1830) |
| Choksey R. D. | Mountstuart Elphinstone. The Indian Yeard (1796-1827), Mumbai, 1971 |
| - (Ed.) | Raja Pratap Sinha of Satara (1818-1839), Pune, 1970 |
| - (Ed.) | Raja Shahaji of Satara (1839-1848), Pune, 1974 |
| Kulkarni, Sunmitra | The Satara Raj, Delhi, 1995 |

Varma, Sushama Mountstuart Elhinsotne in Maharashtra, Calcutta, 1981

अनुक्रमणिका

प्रकरण १ ले. रंगो बापूजीचे घराणे

• स्वराज्याची शपथ, शिवाजीचे आश्वासन • सचिवाची कारवाई, राजारामाची तंबी वतनासाठी वंशजांची धडपड.

प्रकरण २ रे. रंगो बापूजीचा पूर्वरंग

• पेशव्यांच्या कैदेत छत्रपति • चतुरसिंगाचा चरफडाट • छत्रपतिनिष्ठांची गुप्त खलबते • पेशवे आंग्रेज हातघाईवर

प्रकरण ३ रे. राज्यक्रांतीच्या शेवटच्या घटका

• रावबाजी प्रतापसिंहाची मनधरणी करतो • रावबाजी अलपिष्टन मुलाखत • पुणे पडले • छत्रपतीची फरफटणी, बापू गोखल्याचा पराक्रम • चिटणिसाचे प्रसंगावधान, छत्रपती आंग्रेजांना मिळतात.

प्रकरण ४ थे. आंग्लाई पेचाची पहिली सरगाठ

- सातारा किल्ला जिंकण्याचा फार्स, अलपिष्टनाचा पहिला जाहीरनामा • वाईची बामणे साहेबावर खूष, बामणेतर गठवले • आंग्रेज नि छत्रपतींच्या मुलाखती, मिरवणुका • वासोट्यावर राजपुत्राची हत्या • प्रतापसिंहाचा जाहीरनामा

प्रकरण ५ वे. सभोवारच्या छाया पडछाया

- मातोश्री आनंदीबाई, राजकुटुंबाचा छळ • दिवाणगिरी दिली नाही म्हणून नातू छत्रपतीवर डूक धरतो • अलपिष्टनाच्या ग्रांटडफला गुप्त सूचना • छत्रपतीचा जाहीरनाम्याला आक्षेप.

प्रकरण ६वे. अखेर साता-याला पाय लागले

- सातारचा दरबार, ग्रांटडफला मुतालकी • चतुरसिंगाची अखेरची धडपड • रंगो बापूजी पडला एका बाजूला, कंपनी सरकारची नोकरी

प्रकरण ७ वे. ग्रॅण्टसाहेब गुरू नि छत्रपती चेला

- ग्रांटडफ छत्रपतीला राजकारणाचे शिक्षण देतो • चित्पावन कारकुनांची टिंगलखोरी ग्रांटडफची बखरीची योजना • तहनाम्याचा काटेरी पिंजरा

प्रकरण ८ वे. सोनेरी पिंज-यात सातारचा सिंह

- माईसाहेब नि नातूची खडाजंगी • तहनाम्याची बळजबरी • ५व्या कलमाची दगलबाजी • दस-याला ग्रांटचा सत्कार अलपिष्टनाची संभावित हरामखोरी

प्रकरण ९ वे. प्रतापसिंहाच्या प्रतापाने साता-याचे नंदनवन झाले

- महाराष्ट्रातला पहिला छापखाना, शहर-सुधारणा, शिक्षणाचा प्रसार, ग्रंथरचना नि प्रकाशन • मराठी तरुण तरुणींना लष्करी शिक्षण, प्रतापसिंहाला सर्वाधिकार

प्रकरण १० वे. प्रतापसिंहाचा सर्वत्र जयजयकार

- कौटुंबीक घडामोडी • ग्रांटडफचा जिव्हाळा • अलपिष्टनाची प्रतापप्रशस्ति • महाबळेश्वराची प्राणप्रतिष्ठा

प्रकरण ११ वे. कलिपुरुष बाळाजीपंत नातूची कारस्थाने

- नातूचे हेरगिरीचे यंत्र • तरुण पिढीला नोकरीचे आमीष • जहागि-यांचे सांधे नि वांधे • सचिवाच्या भानगडी • छत्रपतीची अक्कलकोटवर स्वारी • साहेब आपण जाता, माझे काय?

प्रकरण १२ वे. भटी वर्चस्वाचा ज्वालामुखी धुमसू लागला

- ग्रामण्यांविषयी सामान्य विचार • शंकराचार्याचा दौरा, सक्तीने दक्षिणा वसूल करण्याची छत्रपतीची मनाई, चिटणीसाच्या पाद्यपूजेने ब्राह्मण खवळतात • चिंतामणराव सांगलीकराचे खोडसाळ जाहीरनामे, शंकराचार्यावर कुरघोडी • गवर्नराच्या छावणीवर भटांचा मोर्चा नाना शंकरशेटवर भटांचा बहिष्कार

प्रकरण १३ वे. प्रतापसिंहाचे ब्राह्मणांना आव्हान

- कलींत क्षत्रिय नाहीत, मराठेलोक खडबडले • अखिल भारतीय पंडितांची महासभा, तिचा छत्रपतीला अनुकूळ निर्णय • प्रतापसिंह जातिसुधारणेत बहकतो.

प्रकरण १४ वे. नातूंकंपूच्या कारस्थानांची उभारणी

- जहागीरदारांचा वाद विलायतेला पाठवला • बनावट पत्रांचा उपक्रम • नातूने गवर्नरला डागळले • लंडनच्या डायरेक्टर बोर्डाने पाठविलेली तलवार नि अभिनंदनाचे पत्र गवर्नर दडपून ठेवतो • सातारा पुण्याची छत्रपतिविरोधी संघटना, गवर्नरकडे छत्रपतिविरुद्ध नातूच्या कागाळया नूसपेपरात गैरवांका मजकूर • नातूसचिवाची पाप-युति

प्रकरण १५ वे. नातूच्या ब्राह्मणसंगटनेचे स्वरूप

- रंगो बापूजीची वकील म्हणून मुंबईला नेमणूक • लाडविक रसिदंड नि छत्रपतीचा पहिला खटका • बनावट दस्तऐवजांची ब्राह्मणी गिरणी, खोटे कागदपत्र तयार होतात नागो देवरावचा गोवाकट • आप्पासाहेब भोसल्यांची व्यसने नि कारस्थाने • गवर्नर ग्रांटाने भोळया लाडविकला बनवले.

प्रकरण १६ वे. संत्री कटाच्या नाटकाची उभारणी

- पलटनचे शिपायी छत्रपतीवर उखडले • अंताजी वाघाचे संत्रीकट नाटक • गोविंदराव दिवाणाला पकडण्यासाठी राजवाड्याला वेढा • गो-या हपसरांचे कमिशन साता-याला, चौकशी आंग्लाई फार्स • नातूच्या गुप्त जबान्या • खोट्या पुराव्याची मसलत फसली.

प्रकरण १७ वे. ओता ओता, आणखी तेल ओता.

- लाडविकला उखडला भाऊ लेल्याचा बनावट कागद विकण्याचा तडाका • कबुलीजबाबासाठी गोविंदराव दिवाणाचा छळ • कृष्णाजी भिडे नातूवर उलटला • बळवंतराव चिटणिसाला अटक • बाळकोबा केळकराकडून गोवा कटाचे कागद विकत घेतले, खोट्या शिक्क्यांचे प्रदर्शन कलकत्त्याने गवर्नर ग्रांटला तंबी दिली, शंकराचार्याचा कबुली जबाब • शिक्के कागद एकजात बनावट

प्रकरण १८ वे. क्रांतिचक्र जोराने गरगरू लागले

•जोधपूरच्या कटाची उभारणी, मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब भोसल्याची मनोरंजक माहिती • पांडोबा गयावळाची साडेसाती • गवर्नर ग्रांटाची राज्यापहाराची चिथावणी • छत्रपतीविरुद्ध असंतुष्ट लोकांची

कावकाव • गवर्नर ग्रांट थडग्यात गेला, त्याचे दापोडीचे भूत • रंगो बापूजी नि डॉ. मिलन कलकत्त्यापर्यंत तक्रार नेतात, बनावट पत्रवाल्यांची धरपकड नि जबान्या • प्रतापसिंहाचा पुन्हा वेदोक्त राज्याभिषेक

प्रकरण १९ वे. .शवंतराव शिर्के याची लंडन-यात्रा

- रंगो बापूजीच्या मुंबईच्या खटपटी, कॅप्टन कोगनची दोस्ती, मुंबई सरकारचा कोगनला इषारा • यशवंतराव शिर्क्यांची माहिती, त्याची भाऊबंदकी, लंडनला जाण्यासाठी नेमणूक • शिर्के मंडळींना प्रतिबंध, जहाजावरून उतरविले, जामिनक्या दंड वगैरे छळ • सन १८३९ सालचा विलायतेचा १४४ दिवसांचा प्रवास, मनोरंजक माहिती

प्रकरण २० वे. कारन्याक गव्हर्नरचा सैतानी धिंगाणा.

- आप्पासाहेब आंग्रेजी छावणीत जातो... सर जेम्स रिवेट कारन्याक गवर्नरची माहिती • कारन्याकला मुंबईचे कौन्सिलर नि नातू डागळतात • कारन्याक-कोगन खटका • प्रतापसिंहासाठी चार गाठीचा फास • कारन्याक प्रताप मुलाखत, प्रतापसिंह कारन्याकला धुडकावून लावतो.

प्रकरण २१ वे. आंग्रेजांनी छत्रपतीला भटी थडग्यात गाडले

- रंगोबाला छत्रपतीच्या शेवटच्या आज्ञा • साता-याला मुंबई पुण्याचे लष्कर रवाना होते, प्रतापसिंहाचा निःशस्त्र सत्याग्रह • मध्यरात्री छत्रपतीला अटक करतात, लिंबगावात गाईम्हशीच्या गोठ्यात ठेवतात, गावोगाव ब्राह्मणलोक पेढे वाटतात, गोजराबाईचा गर्भपात • राजाची पदच्युती बेकायदेशीर • आप्पासाहेबाला गादीवर बसवतात, प्रतापसिंहाला दरिद्री केले, बाळासाहेब सेनापतीवर हिशोबासाठी वारंट

प्रकरण २२ वे. महाराष्ट्राचा छत्रपती वनवासाच्या मार्गावर.

- आप्पासाहेब भोसल्याच्या राज्याभिषेकाचे वर्णन • प्रतापसिंहाच्या जन्मठेपीला काशीच का पसंत केली, रावबाजीचा ब्रह्मावर्ताचा थाट, तुलना • रंगो बापूजी मुंबईहून बेपत्ता होतो • वनवासाला सुरुवात, नाशिक पंचवटीच्या हद्दीत बाळासाहेबांचे सर्वस्व बुचाडण्यात येते, सेनापतीच्या बायकोची जंगलात प्रसूति, आमांशाच्या विकाराने बाळासाहेब सेनापतीचा मेण्यात मुर्दा पडतो, काशीला आगमन • छत्रपतीच्या पदच्युतीने लंडनात शिर्के प्रभृतींची उडालेली तारांबळ

प्रकरण २३ वे. जातिवंत इंग्रेज गृहस्थ खवळले

- सर चार्लस फोर्ब्स प्रभृति इंग्रेज मंडळी डायरेक्टर प्रोप्रायटर कोर्टापुढे तक्रार करतात • रंगो बापूजी अचानक माल्टाला येऊन दाखल झाल्याची शिर्क्याला चिठ्ठी, कोगन पैसे पाठवून त्याला लंडनला आणतो • रंगो बापूजी हिंदुस्थानातून कसा निसटला • मुंबईच्या पेढ्यांवर नातूचा दरबारी दरोडा • प्रेत्ने करून लंडनला आलो कोगनचे डॉ. मिलनला पत्र • लंडनच्या डाकेची मुंबईला पकडापकडी

प्रकरण २४ वे. रंगोबाचा `म-हाठी’ बाणा गाजला

- इंग्रेजी दोस्त आणि जनता यांचे पाठबळ रंगोबा मिळवतो, लंडनात पागोटीवाल्या हिंदूंचे बंड • ब्रिटिश इंडियन सोसायटी, लंडन • रंगो बापूजी गोवा कटाचा फोलकटपणा सिद्ध करतो • शिर्के, चिटणीस, सुर्वे वकील हिंदुस्थानात परततात • रंगोबा माल्ट्याला उतरतो, लंडनला परत • लेखालेखी नि तोंडातोंडीचे युद्ध चालू होते. चार्लस नोरीसची छत्रपतिसेवा • लंडनच्या रंगोबाच्या हाकाटीचे हिंदुस्थानात पडसाद • रंगोबाचे इंडिया हौसमध्ये पहिले म-हाठी व्याख्यान • सर्व पुरावा पार्लमेण्टरी खर्चाने छापविण्याची खटपट

प्रकरण २५ वे. भारत-सेवक जॉर्ज थॉमसनची कामगिरी

- दिवाण नातूची पेशवायी • सज्जन कारपेण्टरचा प्रतापसिंहाला काशीला आधार • थॉमसन नि जोसेफ ह्यूम मार्फत रंगोबा कंपनीच्या कारभा-यांना मोर्चे लावतो. • थॉमसन हिंदुस्थानात येतो, मुंबई सरकारवर जाहीर आरोप करतो, प्रतापसिंहाची भेट घेतो • थॉमसन आणि ह्यूम प्रभृति मंडळी इंडिया हौस आणि पार्लमेण्टला छेडतात • रंगो बापूजीचे लढाऊ प्रचारतंत्र, मुंबईची पातके लंडनच्या चव्हाट्यावर • रंगो बापूजीचे मोडी पुस्तक आणि पत्रव्यवहार

प्रकरण २६ वे. समुद्रमंथनातले काळकूट

- राजाच्या अर्जाची टोलवाटोलवी • रंगोबाने कॉमन्सला धमकावले • प्रतापसिंह लॉर्ड हार्डिंजला सणसणीत दम भरतो • मेजर कारपेण्टरचा गवर्नर जनरलला सडेतोड जबाब • जंगली महाराजाचे दत्तविधान • चौकशी नाही, तर तिजोरी बंद-जोसेफ ह्यूमने नाक दाबले, लंडनच्या मुख्य प्रधान लॉर्ड रसेलची धांदल उडाली • कंट्रोल बोर्डाचे चेअरमन सर जॉन हॉबहौस रंगोबाशी गोडीगुलाबी करतो • रंगोबा लक्षावधी ब्रिटिश नागरिकांच्या सह्यांचे अर्ज तयार करतो • रंगोबाच्या खिसाची अवस्था • विलायतची पारल्मेण्ट निवडणूक, रंगोबाची कॉमन्सकडे तक्रार • रॉबर्टसन् नि कोगन यांचे मृत्यू • प्रतापसिंहाच्या मृत्यूचे पत्र आले, ईश्वरे मोठा घात केला.

प्रकरण २७ वे. राजा मेला, तरी न्याय मेला नाही.

- रंगोबाचा करारी निश्चय • प्रतापसिंहाचे रंगो बापूजीला गुप्त पत्र • काशीला आली सातारी भुतावळ, त्यांची काशीची कारस्थाने • हॉबहौसचा डलहौशीला आगाऊ इषारा, रंगो बापूजीचा त्यावर उतारा, दोस्त नि दुषमनांना एकवटण्याचा संदेश • लंडनातले चार्टिस्टांचे बंड • ब्राह्मण दगा करण्यास चुकणार नाहीत, रंगोबाचा इषारा • नातूने गोविंदराव दिवाणाला उठवले • आप्पासाहेब भोसल्याचा मृत्यू, दत्तक अमान्य, सातारचे राज्य खालसा • काशीकरांची उपासमार • हिंदुस्थानात फण्ड जमविण्याची रंगोबाची सूचना

प्रकरण २८ वे. ग्रंथ आटोपला तरी प्रवचन चालूच.

- इंग्रेज दोस्तांचे पार्लमेण्टात आकांडतांडव • ज्वलज्जहाल लेखांबाबत आणि बेफाट व्याख्यानांबाबत रंगो बापूजीवर सरकार खटला का भरत नाही • नातू काशीला येऊन, प्रतापसिंहाच्या राणीकडून राज्याचा बेदावा लिहून घेतो • नातू संन्यास घेऊन काशीला मरतो • रंगोबा राणीच्या बेदाव्याला धुडकावतो • ब्रह्मावर्ताची हालहवाल • रंकाचा राव अजिमुल्लाखान, त्याचे लंडनातले चाळे • कंट्रोल बोर्डाला रंगोबाचे जहाल आव्हान

प्रकरण २९ वे. कायदेबाजीचा अट्टहास फोल ठरला.

- काशीकरांची फसवणूक झाली, गोजराबाईचा सातारला मृत्यू • इंग्लिश दोस्तांची कामगिरी • प्रतापसिंहाच्या आत्मयज्ञाची फलश्रुति • लंडनात रंगोबाचा जाहीर सन्मान • रंगो बापूजीविषयी आमंग्लपत्रांचे अभिप्राय • रंगोबा मुंबईला येतो, मुंबई सरकार त्याची सरबराई ठेवते • रंगोबा काशीला रवाना, नेमणुकीची रक्कम वसूल करतो • परळच्या बंगल्यात झीलसाहेबाचा मृत्यू, रंगो [illegible]

प्रकरण ३० वे. सत्तावनच्या बंडात रंगो बापूजीचे स्थान

राइरेश्वराला कलमदान नि पागोटे वाहून रंगो बापूजी सर्वसंगत्याग करतो • रंगोबाचा उत्तर हिंदुस्थनाचा अज्ञातवासाचा प्रवास नि परिस्थितीची पाहणी • रंगोबाची लढाऊ गुप्त संघटना दिल्लीच्या उठावाचे दक्षिणेत वादळ, सचिवाचे आंग्रेजाशी कारस्थान, शिंदकर रंगो बापूजीला [illegible]डून देववतो • पकडल्यानंतर काय झाले • रंगोबाचे पुतणे वामनराव यांची माहिती • शेवटची ए[illegible] आठवण

महत्त्वाचे टिपण

प्रबोधनकार ठाकरे यांच्या या ग्रंथाचे प्रथम प्रकाशन १९४८ साली झाले. म्हणजे ४९ वर्षे झाली. ग्रंथात ज्या व्यक्तींचे त्या वेळेस हयात असल्याचे उल्लेख आहेत त्यांपैकी काही आज हयातही नसतील. शोध घेणे शक्यही झाले नाही. वाचताना काळाची ही तफावत अवश्य लक्षात घ्यावी.

परिशिष्टाची अनुक्रमणिका


(1) दादजी नरस प्रभूच्या गुमास्त्याचे यजितपत्र

(2) मुअज्जीम बादशहाचे शाहूला पत्र

(3) भोरचा पंतसचिव

(4) रंगो बापूजी ईस्ट इण्डिया कंपनीच्या नोकरीत

(5) रंगो बापूजीचे छत्रपति प्रतापसिंहाला पत्र

(6) प्रतापसिंहाची आठ पत्रे

(7) बळवंतराव चिटणीसाला नातूचा बदसल्ला

(8) छत्रपतीचे पार्लमेंटला २ अर्ज

(9) छत्रपतिद्रोही कटबाजांच्या जबान्या

(10) नातू कटातल्या लोकांची माहिती

(11) गोवा कटाचे खोटे शिक्के (सचित्र)

(12) चतुरसिंग भोसले यांचे त्रोटक चरित्र

(13) रंगो बापूजीचे पारल्मेंटपुढे दिलेले व्याख्यान

(14) आप्पासाहेब भोसल्याने दत्तक कसा घेतला

(15) बाळाजी नारायण नातू

(16) रंगो बापूजी ब्राह्मण नव्हे (सावरकरांची चूक)

(17) प्रताप-प्रशस्तीचे डायरेक्टर बोर्डाचे इंग्रेजी पत्र

(18) मर्द प्रभूवीर सीताराम रंगराव गुप्ते

(19) स्टोरी ऑफ सातारा ग्रंथावरील नरसोपंत केळकरांचा अभिप्राय

(20) दोन दांगडी पोवाडे

(21) रंगो बापूजीच्या तसबिरीची कहाणी

(22) जंगली महाराज ऊर्फ शहाजीराजे भोसले यांची समाधी

(23) रंगो बापूजीचे वंशज

**BIBIOGRAPHY (संदर्भ ग्रंथ)**


1. **Proceedings** at a Special General Court of Proprietors of East India Stock, held at the East India House on the 12th and 13th February 1840, respecting the Dethronement of His Highness the Rajah of Satara. LONDON: Printed by John Wilson, 18, Charles Street, Berner's Street. **1840**

2. **Dethronement** of the Raja of Satara , by the East India Company in 1839. (Brochure issued by Eswunt Row Raja Sirkey, Bhugwunt Row Wittul and Rungo Bapoojee.) 8th Febtruary **1841**

3. **Statement** of Rungo Bapujee. Vakeel to His Highness the Raja of the East India Company, held at East India House on the 8th February **1843**

4. **Report** of proceeding at a Special General Court of Proprietors of the East India Company, held at East India House on Wednesday, 7th February **1849**. Lt. Genl. Sir J. Law Lushington, G. C. B. in the Chair. (Taken in Shorthand by Messrs. W. B. Gurney and Sons.) Printed by G. J. Younge. 5, Upper Charles St., Parliament Street.

5. **Second Letter** to the Rt. Hon. John Hobhouse, Bart. M. P. conveying the Opinions of Lord Amherst, Lord W. Bentinck, Lord Auckland and Lord Metcalfe, on the Right of the Princes and Chiefs of India to adopt successors. LONDON G. Norman, printer, Maiden Lane, Covent Garden, **1850**

6. **Treatment of the Ranee** Captive Widow of his late Highness Pertaub Shean and infant son and heir, Shahoo Maharaj, the Raja of Satara by Government of India and the court of Directors of the East India Company with Comments on the Proceedings by **Rungo Bapojee,** Vakeel. LONDON, October **1851**

7. **Petition to Parliament** in favour of the Claims of **His Highness Shahoo Maharaj,** now a State Prisoner at Banaras, The adopted son and rightful heir of **Pertaub Shean,** the late Raja of Satara, addressed to **the Friends of Justice throughout the British Empire,** by RUNGO BAPOJEE, **1852**

8. **Story of Satara** by Major B. D. Basu, I.M.S.

9. **Rani Sagunabai's** Appeal.

१० रंगो बापूजीने लंडन येथे शिळाछापावर स्वतः लिहून छापलेले. इंग्रेजी-मोडी पुस्तक : सन १८४३

११ मराठी रियासत उ. वि. (सरदेसाई)

१२ ब्रिटीश रियासत (उत्तरार्ध)

१३ सिद्धांत विजय, कै. प्रो. डोंगरे, कोल्हापूर

१४ पेशवे दप्तर, भाग ४१ व ४२

१५ ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास, ठाकरे

१६ हू वेअर द शूद्राज (डॉ. आंबेडकर)

१७ सन १८५७ प्रो. ना. के. बेहरे, एम. ए.

१८ १८५७चे स्वातंत्र्य-समर (सावरकर)

१९ वोल्गा ते गंगा (राहुल सांकृत्यायन)

२० राजे लक्ष्मणराव भोसले यांचे चरित्र, (इतिहास भास्कर रानडे)

२१ प्रतापसिंहाचे चरित्र, कै. राणे वकील, सातारा.

## कोल्हापूरचे छत्रपति राजर्षि शाहू महाराज
## यांचे तेजस्वी उद्गार

(ब्राह्मणेतर बहुजन समाजांच्या उठावाची चळवळ बंद करण्याविषयी इंग्रेज सरकार आणि काही वजनदार गोरे अधिकारी यांनी आग्रह केला, तेव्हा महाराजांनी लेखी जबाब दिला तो.)

``क्षत्रियाला अनुचित रीतीने मला वागता येणार नाही. मला कैद केले तरी माझा देह कोणत्या ना कोणत्या सत्कारणी खर्चण्याचा मी यत्न करणार. ज्या रणभूमीवर मी उभा राहिलो आहे तेथून पाय मागे घेणे, म्हणजे माझ्या शीलाला डाग लावण्यासारखे आहे. तुमच्या उपदेशाप्रमाणे वागणे मला अशक्य आहे. लॉर्ड... यानीच काय, पण खुद्द ब्रह्मदेवाने अथवा यमाने मला धमकी घातली आणि मी भ्यालो, तर माझे पूर्वज नि स्वर्गातले देव माझ्याकडे पाहून हासतील नि रडतील. जयापजयाची मला पर्वा नाही. माझा स्वभाव तुम्हाला बदलता येणार नाही. भित्र्या भागूबाईप्रमाणे मी माझी मते सोडणार नाही किंवा जीव बचावण्यासाठी देखिल शरण जाणार नाही. मी तुटेन, पण वाकणार नाही. जपमाळ ओढीत भटजीसारखा मी कालक्षेप करणार नाही. सरकार रागवेल, असे तुम्ही म्हणता? रागावो बिचारे! मला त्रास होईल यात संशय नाही. पण गरजवंतांना मदत केल्याबद्दल, अस्पृश्यांना हात दिल्याबद्दल आणि मराठ्यादि मागासलेल्या बहुजनसमाजांचा उद्धार करण्याकरिता माझी शक्ति खर्च केल्याबद्दल, परमेश्वराकडून खचित मला न्याय मिळेल. माझ्या पूर्वजांचे स्मरण करून मी तुम्हाला सांगतो की क्षत्रियाला अयोग्य असे मी काहीहीकरणार नाही, माझ्या आईच्या नावाला मी काळिमा लावणार नाही. तुमचे धोरण मला बिलकूल मान्य नाही.''

## सातारचे छत्रपति सत्यनिष्ठ प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब महाराज
## यांचे तेजस्वी उद्गार

गवर्नर सर जेम्स रिव्हेट कारन्याकला तोंडावर दिलेला जबाब –

``राज्य जाईल अशी धमकी देता कशाला? मी कधीच राज्याची हाव धरलेली नाही. उघड चौकशीशिवाय केलेले आरोप मुकाट्याने मान्य करून राज्यावर राहण्याची माझी मुळीच इच्छा नाही. जे गुन्हे मी केलेच नाहीत, त्यांना उघड चौकशीशिवाय, केवळ तुम्ही सांगता म्हणून मी मान्यता देऊ? प्राणांतीही ते शक्य नाही, समजलात. मी कधी कोणाचे काही वाकडे केलेच नाही तर तुम्हाला किंवा प्रत्यक्ष काळालाही मी भिणार नाही. नुसत्या कबुलीच्या सहीसाठी एवढ्या विनवण्या कशाला करता नि धाक तरी कशाला देता? छाती असेल तर करा ना उघड चौकशी. कटाचा एकेक मुद्दा तुमच्या पदरात घालून ख-या खोट्याचा निवाडा आत्ताच दाखवतो. हव्या त्या कबुली जबाबावर सही करायला मी काही बाजीराव नव्हे! तो बिचारा भेदरट भटजी होता, म्हणून त्याच राज्य तुम्ही घेतले. त्याच्यासारखा मी तुमच्यापुढे डगमगणारा नव्हे बरे का नामदारसाहेब, माझे चिमुकले राज्य! राहिले काय नि गेले काय! माझी कशालाच हरकत नाही. पण लक्षात ठेवा काही वाटेल ते केलेत तरी असत्यापुढे या प्रतापसिंहाची मान रेसभरसुद्धा वाकणार

नाही. फायद्याचा किंवा स्वार्थाचा लोभ धरून, मी आपले चारित्र्य कलंकित करून घेणारा नव्हे. तुमच्या या चिठो-यावर मी सही करीत नाही जा.''

गवर्नर जनरल लॉर्ड हार्डिजला दिलेला जबाब –

``तुम्ही मला एखादा दुकानदार, महाजन, सावकार, बंगाली बाबू किंवा जमीनदार शेतकरी समजता? समजता तरी कोण मला तुम्ही? म-हाठी स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराजाच्या गादीवरचा मी त्यांचा खास वंशज आहे. त्या स्वराज्यावरील हक्क मी सोडून देऊ म्हणता? असे करून माझ्या पूर्वजांच्या नावाला मी तर कलंक लावणार नाहीच, पण माझा एकही वंशज तसे करणार नाही. तुमच्या अटी मान्य करण्यापेक्षा मी मरण पत्करीन.''

तमाम म-हाठ्यांना लंडनहून मारलेली रंगो बापूजीची
निर्वाणीची हाक

``कोर्ट डरेकटरस याचा मतलब नजरेस येतो की महाराष्ट्र राज्ये बुडऊन आपले घरात घालावे... सारे राज्य आपले घरात घ्यावे. हिंदूचे राज्य बुडवावे आसा क्रम सुरू आहे. परंतु ईश्वर कसे करतो ते पाहावे. हा समय औरंगजिबियाचा, जसे सर्व हिंदू बुडवावे, तसा आहे. ईश्वर हिंदू राजेय बुडवील असे घडणार नाही. कारण औरंगजीब या क्रमात मेले. सेवटी हिंदूलोक राज्येसुधा कायेम आहेत. आसेच ईश्वर करील असे वाटते... याजकरिता हिंदूमंडलातील सर्वत्र दोस्त अगर दुष्मान याणी पुर्ते दिलात आणावे आणि हिंदू धर्म संरक्षणावर नजर ठेऊन सर्वत्रांनी कृपा करून येकदिलीने जसी ज्याचे हाते मदत होईल, त्याप्रमाणे करावे, हे मागणे आहे... चोराचे टोलीस आबरू गैरआबरू पहाण्याची गरज नसती. कसाहि फायदा झाले म्हणजे झाले. त्याप्रमाणे हे ईष्ट इंडिया कंपनी बनिया व्यापारी याचे नौकर कौर्ट डरकटरस यांची रीत मारवाडी लोकाप्रमाणे आहे. जबरदस्त जबरी करिते तरी बेहत्तर, परंतु भरवसा वचने देऊन, माणसास करार मदारात गुंतऊन, अखेर तेच तरकट करून, खोटा टपका ठेऊन, बुडवून सर्व आपहाराची इच्छा... माहाराष्ट्र राज्य बुडवावे, हिंदू धर्म उच्छेद करावा आसा क्रम मनोभाव नजरेस येतो. या लोकास भ्याले किंवा नरमाई दाखविली म्हणजे तात्काळ गळा कापतात. दूरचे दूर सख्त खरेपणानी बोलणे जेव्हाच्या तेव्हा जाहले म्हणजे जबरदस्त लाच्यार होतात. तूर्त राज्य नाही. मग नरमाई व आर्जव कर्ण कशास पाहिजे... माझे लिहिण्याचा बेभरवसा मानू नका. न जाणे आदेशा आल्यास, हे लिहिणे खरे किंवा खोटे, हे माझे देहसमाप्ती जाहल्यावर पुढे नजरेस येईल.''

आत्म निवेदन

म-हाठी शाळेत शिकत असतना मोडीवाचनाचा अभ्यास मला नियमाने करावा लागत असे. निरनिराळ्या तेढ्याबाक्या वळणांचे अनेक मोडी कागद परिक्षेत घडघडा वाचावे लागत त्यासाठी पनवेलच्या मामलतदार कचेरीतल्या जुन्या रिकार्डातल्या जाडजाड चोपड्या मुद्दाम शाळेत आणवून विद्यार्थ्यांकडून त्या वाचवून घेत, मोडी वाचनाच्या या अभ्यासासाठी माझ्या वडिलांनी एक दिवस (१८९६) मला एक छापील मोडी मजकुराचे पुस्तक आणून दिले. लंडन येथे शिळाछापावर छापलेले हेच ते रंगो बापूजीचे मोडी पुस्तक. त्या पुस्तकाचे नि रंगो बापूजीचे महत्त्व मला त्यावळी ते काय वाटणार? रावसाहेब सीताराम विश्वनाथ पटवर्धनाच्या मोडी पुस्तकासारखेच, अभ्यासासाठी वडिलांनी डोक्यावर धोंड म्हणून ठेवलेले, आणखी हे पुस्तक! या पेक्षा त्या बालवयात विशेष ती काय कल्पना मला असणार? पुढे ते पुस्तक संग्रहातून नाहीसे झाले. आणि मलाही त्याचे काही वाटले नाही. इतर अभ्यासाची पुस्तके नाहीशी होतात, त्यातलेच हे एक.

पण पुढे त्याच पुस्तकासाठी मुंबई, पुणे येथल्या बुकसेलरांच्या जुन्या ग्रंथांचे गळाठे उपसण्याचा प्रसंग येईल; कलकत्ता, लाहोर, दिल्ली, मद्रास, अलाहाबाद येथल्या आणि लंडनातल्याही अनेक नामांकित बुकसेलरांकडे पत्रावर पत्रे पाठविण्याची निकड लागणार, याची मला कल्पनाही नव्हती. अखेर सन

१९१९ साली ``या दुर्मिळ पुस्तकाची एक प्रत कलकत्ता येथील कॅम्ब्रे आणि कंपनीच्या संग्रहाला आहे. त्याची किंमत ते ७५ रुपये मागतात, पाहिजे असल्यास व्हीपीने रवाना करण्याची व्यवस्था ठेवतो,'' अशी कै. बाळासकृष्ण आत्माराम ऊर्फ रायबहादुर भाईसाहेब गुप्ते, कलकत्ता म्युझियमचे क्युरेटर, यांची मला अचानक तार आली. त्या वेळी दरमहा अवघे ४० रुपये कमावणारा मी तरुण धडपड्या संसारी! संसाराच्या तोंडमिळवणीसाठी शिकवण्या करून आणखी जेमतेम ४०-४० कसेबसे हाती यायचे पण माझ्या फाटक्या खिशाचा कसलाही विचार न करता, मी उलट तार पाठविली की, ``ग्रंथ तात्काळ व्हीपीने पाठवून द्यावा.'' त्या वेळी पोष्टात वरचे वर सूचना देऊन एकेक महिनाभर व्हीपी थोपवून ठेवता येत असे. ग्रंथाची व्हीपी येताच मी पंधरा दिवसांची मुदत मागून घेतली नि रक्कम जमा करायच्या मागे लागलो. माझे मित्र माझ्यासारखेच फाटक्या खिशांचे! तरीही कोणी ५, कोणी २ तर कोणी १० अशा देणग्या देऊन, रु. ७५-१२-० जमा होताच, ता. ७ एप्रिल १९१९ रोजी मी त्या अनमोल ग्रंथाचा ताबा घेतला.

ग्रंथ हाताच येताच त्याचा अभ्यास सुरू झाला. एकहाती, एकटाकी, एवढा २५-३०० पानांचा ग्रंथ मोडी लिपीत स्वतःच्या हाताने लिहून लंडनला शिळाप्रेसवर छापवून घेणा-या रंगो बापूजीच्या कौशल्याने नि कर्तबगारीने माझे डोळे दिपले. त्या पुरुषोत्तमाविषयी हृदयात आदराचा, आश्चर्याचा नि कौतुकाचा दर्या बेफाट उसळू लागला. सातारच्या अखेरच्या हरिश्चंद्रावत सत्वधीर प्रतापसिंह छत्रपतीच्या अस्सल मराठशाही मानीपणाचा नि सत्याग्रही सर्वस्वावर लाथ मारणा-या त्याच्या पीळदार तडफेचा प्रत्यक्ष प्रत्यय पटल्यावर, म-हाठी इतिहासातल्या या उपेक्षित भागाचे संपूर्ण संशोधन करण्याचा माझा निश्चय बळावला. मांजराच्या पिलकटाची मान मुरगाळून ते गुपचूप दूर झुगारून द्यावे, त्याची वार्ताही पुढे कोणाला लागू नये. इतक्या कसाई करणीने आंग्रेजानी प्रतापसिंह छत्रपतीचे निर्दाळण केले होते. रंगो बापूजीने जिवाचे रान करून, व्याख्याने लेख अर्जाअर्जी नि पार्लमेण्टातल्या भांडाभांडीने तमाम इंग्लंडभर तुफानी चळवळीचा वणवा भडकवला नसता, तर प्रतापसिंहाच्या या दुर्दैवी कहाणीचे एक अक्षरही शिलकी उरले नसते. पण पुढे १८५७च्या बंडाळीनंतर आंग्रेजांनी रंगो बापूजीच्या घरण्याची, त्याच्या नातलगांची आणि ठाणे, पुणे, कुलाबा नि सातारा जिल्ह्यातल्या कायस्थ प्रभु ज्ञातिबांधवांची जी रानटी ससेहोलपट केली, त्य धुमाळीत रंगो बापूजीविषयी कागदपत्रांचीही भयंकर जालपोळ नि वाताहत झाली. अशाही दिव्यातून वाचलेल्या साहित्याचा उपयोग करून, हा इतिहास ठाकठीक लिहून मुद्रांकित केला नाही, तर ती मोठी नामुष्कीची गोष्ट होणार आहे, या विवंचनेने माझ्या काळजाला दंश केला.

या प्रकरणाचे मिळेल तेवढे साहित्य हस्तगत करण्याचा चौफेर तडाका चालू झाला. भराभर अनेक हिंतचिंतकांकडून जुनी पुस्तक, जुने अप्रसिद्ध कागदपत्र माझ्याकडे येऊ सागले. जेथे मी जाई, तेथे रंगो बापूजीविषयी बैठी व्याख्याने मी देऊ लागले. प्रतापसिंह छत्रपति नि रंगो बापूजी यांच्याविषयी सर्वसाधारण चरित्रेतिहासाची रूपरेषा सन १९२१पर्यंत तयार झाली. बारीकसारीक तपशिलांचा शोध हा ग्रंथ छापल जात असतोवर चाललेलाच होता. स्पष्ट मुद्रे स्पष्ट होत गेले. माझे स्वाध्यायशील जिवलग स्नेही कै. प्रो. गोविंदराव गोपाळ टिपणीस, महाडकर, यांची या साहित्यजुळणीच्या कामात कमाल मदत झाली. महाडहून ते दादरला आहे का नेहमी काही ना काही नवीन पुरावे, नवीन कागदपत्र नि नवीन माहिती घेऊन यायचेच. एक दिवस तर त्यांनी रंगो बापूजीच्या अस्सल पत्रव्यवहाराचे एक जीर्ण चोपडे आणि यशवंतराव शिर्क्याची स्वदस्तुरची हस्तलिखित रोजनिशी आणून दिली. रोजनिशी आणि पत्रव्यवहार यांचे महत्त्व काय सांगावे? ते दोन थोर पुरुष प्रत्यक्षच आम्हाला भेटून आपापल्या दैनंदिन हालचालीच्या कथा बारीकसारीक तपशिलानी स्वतःच सांगू लागल्यावर, संशोधकाला आणखी ते काय हवे? `शिर्क्याची डायरी ज्याची त्याला परत केली पाहिजे, तेव्हा त्यातले तुम्हाला जे उतारे घ्यायचे असतील ते घेऊन पुढच्या खेपेला ती मला परत द्या.' असे टिपणासानी सांगितल्यावरून, मी त्यातले अनेक महत्त्वाचे उतारे नकल केले नि डायरी परत केली. त्यावेळी माझे प्रबोधन पाक्षिक चालू असल्यामुळे, यशवंतराव शिर्क्याचा सन १८३९ सालचा विलायतचा प्रवास हा मजकूर ता. १६ जुलईच्या अंकात प्रसिद्ध केला. प्रतापसिंहाचे एक महत्त्वाचे पत्र ता. १६-४-१९२३च्या अंकात आणि रंगो बापूजीची २ महत्त्वाची पत्रे ता. १ आगष्ट १९२३च्या अंकात प्रसिद्ध केली. (ते विलायत-प्रवास वर्णन आणि ती ३ पत्रे, सन १९४० साली प्राध्यापक कृ. पां. कुळकर्णी आणि श्री. श्रीपाद रामचंद्र टिकेकर यांनी संपादन केलेल्या `मराठी गद्यविलास मध्यम श्रेणी' पुस्तकात मार्मिक प्रस्तावनेसह समाविष्ट केलेली आहेत.)

रंगो बापूजीच्या मोडी पत्रांचे नकलकाम मात्र मोठे कठीण नि किचकट होते. लंडनचा सर्व पत्रव्यवहार रंगो बापूजी कॉपिंग शाईने मोडी लिपित करून ती पत्रे क्रमवार एका पातळ टिशू कागदांच्या बांधीव पुस्तकात ओल्या ब्लॉटिंग कागदाच्या सहायाने दाबून काढीत असे. अशी ही अंदाजे ४००वर पत्रे आधी हातात धरताच येत ना. वाचायच्या बाजूला मजकूर फिकट पडलेला. मागल्य बाजूला शाईचा प्रत्यक्षच संस्कार झालेला, तेव्हा तेवढी बाजू मात्र बरीच स्पष्ट, आरशाच्या काचेवर पत्राचा पाठमोरा भाग प्रतिबिंबीत करून वाचन करायेच आणि ते अस्सलबरहुकूम नकलायचे अतिशय त्रासाचे नि डोळेफोडीचे काम पुण्याचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक, हिंदवी इतिहासाचे साहित्य-शोधन करण्यासाठी मुंबई सरकारने मुद्दाम लंडनला पाठविलेले स्कॉलर चि. वासुदेव सीताराम ऊर्फ बाप्पा बेन्द्रे यांनी अंगावर घेऊन, फार मेहनतीने नि कुशलतेने सन १९२३ अकेरपुरे केले. म्हणूनच हा ग्रंथ लिहिताना त्या पत्रव्यवहाराचा अभ्यास मला बिनत्रासाचा झाला.

बहुजन समाजवादी चळवळ आणि शाहू महाराज

एकदा (सन १९२०) नेहमीप्रमाणे मी कै. शाहू महाराज छत्रपती करवीरकर यांच्या भेटीला खेतवाडीतल्या त्यांच्या पन्हाळा लॉज निवासस्थानी गेलो. त्या वेळी बामणेतर बहुजन समाजाची आत्मोद्धाराची चळवळ सोसाट्याने चालू होती. शाहू महाराज तिचा कमाल अट्टहासाने पुरस्कार करीत होते आणि पुणे साता-याच्या बामणी वृत्तपत्रांतून नि बामणांच्या सदाशिवपेठी जाहीर सभांतून महाराजांची निंदा नि उपहास बेफाम अखंड चालू होता. ``महाराजांनी, फार झाले तर आपल्या कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीत काय धिंगाणा घालायचा असेल तो खुशाल घालावा. पण बाहेरच्या महाराष्ट्रातल्या बामणेतर बहुजन समाजांना चिथाऊन, शहाण्यासुर्त्या नि सार्वजनिक हरएक कर्माचे बुद्धिसिद्ध कंत्राट चालविणा-या बामण समजाविरुद्ध बामणेतरांची फळी उभारण्याचे काम करू नये.'' अशा मतलबाची गुप्त राजकारणे सातारा, पुणे, धुळे येथली चळवळी बामण मंडळी मुंबई दिल्लीच्या आंग्रेजी दरबारात अट्टाहासाने लढवीत होती. जवळजवळ प्रतापसिंहकालीन नातूप्रासादीक भटांच्या कारवायांच्या इतिहासाची तंतोतंत पुनरावृत्तीच म्हणा ना ती! सातारा जिल्ह्यात बामणेतर सत्यशोधकांनी बामणांवर सगळीकडे भयंकर अत्याचार चालवल्याची हाकाटी पुण्याची बामणी पत्रे कसारखी करीत होती महात्मा ज्योतीराव फुल्यांच्या सत्यशोधकी पद्धतीप्रमाणे मराठे वगैरे मागासलेल्या समाजात भिक्षुकांच्या मध्यस्थीशिवाय विवाह साजरे होऊ लागल्यामुळे, गावोगावच्या पंचांग्या भटाभिक्षुकांची साहजिकच कर्कश कावकाव चाललेली होती आणि व-हाडात तर जोशी हक्काच्या सबबीवर अनेक असल्या बामणेतरांवर फिर्यादी ठोकण्यात येऊन, अनेक नामांकित भट वकील ते खटले लढविण्यात विनावेतन सरसावले होते. लोक-जागृतीचे साधन म्हणून शाहू महाराजांच्या प्रेरणेने तयार झालेल्या सत्यशोधक जलसेवाल्यांवर गावोगाव धोंडेमार करण्यासाठी बामण तरुणांच्या सेना, आजकालच्या हिंदुत्वनिष्ठांप्रमाणे किंवा राष्ट्रीय स्वयंसेवकांप्रमाणे, सर्वत्र संचार करीत होत्या.

कसल्या तरी मनस्संतापाचा प्रश्न होता. नेहमीप्रमाणे महाराज, दिवाणसाहेब सर सबनीस आणि मी अशी फक्त तिघांचीच बैठक जमल्यावर, त्या प्रश्नावर आमची चर्चा चालू झाली. महाराजीनी आपल्या संस्थानाबाहेरच्या हद्दीत कसलीही चळवळ करू नये. अशा दमधाटीच्या शिफारशीचा खलिता मुंबई सरकारातून आलेला होता नि आदल्याच दिवशी महाराजांनी त्याला खणखणीत जबाबही दिलेला होता. ``महाराष्ट्रातील अस्पृश्यांसकट तमाम मागासलेल्या बहुजन समाजांचा उद्धार, हे माझे पवित्र जीवनकार्य आहे. या लक्षावधि शेतकरी, कामकरी नि मजूर बांधवाची सामाजिक, धार्मिक नि आर्थिक सुधारणा झाल्याशिवाय, सरकारने राजकारणी हक्कांची भाषा बोलावी तरी कशाला? हक्क देणार कोणाला? घेणारे कोण? आणि त्यांचा अजाणी बामणेतरांना अर्थ तो काय कळणार नि फायदा तरी काय होणार? सरकार मला पदच्युतीच्या बुरखेबाज धमक्या देत आहे. त्या मागे कोणाच्या चिथावण्या नि कारवाया आहेत. ते मला माहीत आहे. तुम्ही पदच्युत करण्यापूर्वी, मीच आत्मसंतोषाने गादीचा राजीनामा देईन. वयात आलेला माझा युवराज तात्काळ बसेल गादीवर. पण एकदा हातात घेतलेली बामणेतर बहुजन समाजांच्या उद्धाराची चळवळ प्राण जाई तोवर हा शाहू सोडणार नाही.'' अशा अर्थाचा तो जबाब होता.

``क्षत्रियाला अनुचित कर्म मी करणार नाही''

सरकार दरबारी खलित्याच्या जोडीनेच, काही निवडक इंग्रज मित्रांकडून, चळवळ सोडण्याविषयी महाराजांवर वजन खर्च करण्याची खटपट चालू होती. अशा एका इंग्रेज मुत्सद्याच्या पत्राला महाराजांनी जबाब दिला - ``मी ब्राह्मणांच्या विरुद्ध भाषणे केलेली नाहीत, अगर दुसरे काहीही केलेले नाही. पण आपल्या स्वभावाला अनुसरून ते माझ्यावर सूड उगवीत आहेत. त्यांच्या पेशवाई बरवेशाही किंवा परमशुरामशाही कारस्थानांना यश देवो. मी तुमचा उपदेश ऐकेनस पण क्षत्रियाला अनुचित रितीने मला वागता येणार नाही. मला कैद केले तरी माझा देह कोणत्या तरी सत्कारणी खर्चण्याचा मी प्रयत्न करीन. ज्या रणूमीवर मी उभा राहिलो आहे, तेथून पाय मागे घेणे माझ्या शीलास डाग लावण्यासारखे आहे. मी तुमचा उपदेश स्वीकारीन, पण त्याप्रमाणे वागणे मला अशक्य आहे. लॉर्ड... यांनीच काय, पण खुद्द ब्रह्मदेवाने अथवा यमाने मला धमकी घातली आणि मी भ्यालो, तर माझे पूर्वज आणि स्वर्गातील देव माझ्याकडे पाहून हासतील नि रडतील. जयापजयाची मला पर्वा नाही. माझा स्वभाव तुम्हाला बदलता येणार नाही. भित्र्या भागूबाईप्रमाणे ती माझी मते सोडणार नाही, किंवा जीव बचावण्यासाठी देखील कोणाला शरण जाणार नाही. मी तुटेन पण वाकणार नाही. जपमाळ ओढीत बसणा-या भटजीप्रमाणे मी कालक्षेप करणार नाही. तुम्ही म्हणता, सरकार रागावेल. रागावो बिचारे. मला त्रास होईल यात शंका नाही. परंतु गरजवंतांना मदत केल्याबद्दल अस्पृश्यांना हात दिल्याबद्दल आणि मराठ्यादि मागासलेल्या समाजांचा उद्धार करण्याकरिता माझी शक्ती खर्च केल्याबद्दल, परमेश्वराकडून मला खचित न्याय मिळेल. माझ्या पूर्वजांचे स्मरण करून मी तुम्हाला सांगतो की, क्षत्रियाला अयोग्य असे काहीही मी करणार नाही. माझ्या आईच्या नावाला मी काळिमा लावणार नाही. मला तुमचे धोरण मुळीच मान्य नाही.''

छत्रपतीपुढे छत्रपतीची कहाणी

महाराजांच्या सूचनेवरून दिवाणसाहेबांनी त्या पत्राची नक्कल मला वाचायला दिली. वाचून झाल्यावर, ``यात नवीन काय आहे? ही तर इतिहासाची पुनरावृत्ती आहे! या पत्रात मला तर छत्रपति प्रतापसिंहच बोलतो आहेसा दिसतो.'' असे उद्गार सहज माझ्या तोंडातून बाहेर पडले. महाराज एकदम चमकले नि मला म्हणाले, ``प्रतापसिंह छत्रपति? म्हंजे, आमचे बुवासाहेब महाराज की काय? त्यांची भाषा या पत्रात? ही काय भानगड?'' साक्षात् छत्रपतीपुढे एका दिवंगत छत्रपतीची कहाणी सांगण्याचा असा अवचित योग आल्यामुळे, मीही मोठ्या अवसानात येऊन, सत्वधीर प्रतापसिंह आणि स्वराज्यनिष्ठ रंगो बापूजी यांचा इतिहास, दीड दोन तासांच्या अस्खलित प्रवचनाने महाराजांना ऐकवला. त्याच्या डोळयांतून सारखा अश्रूप्रवाह वाहत होता. माझे पुराण संपल्यावर महाराज म्हणाले - ``वाहवा! आज मला मोठा धीर आला. कारस्थानी बामणांच्या चिथावणीने आंग्रेज बहादुरांच्या डोळयात सलणारा मीच एकटा छत्रपति नव्हे तर! मोठे भयंकरच राजकारण होते ते म्हणायचे! पण हा सारा इतिहास कोठेच छापलेला दिसत नाही. मी तर तो आजच ऐकला. आमची आपली समजूत की बुवासाहेब महाराजांनी खरोखरच काही बंड केले नि आंग्रेजानी त्यांना गादीवरून काढून हद्दपार केले. अस्सा इतिहास आहे का हा? हे बघ कोदण्ड, तुझी इतर लिहिण्याची कामे ठेव बाजूला नि पहिल्या प्रथम हा इतिहास मुद्यापुराव्यांनिशी तपशीलवार लिहून काढ. वाटेल तर दे नोकरीचा राजीनामा मी सांभाळतो तुझा सारा प्रपंच. छापण्याबिपण्याची जबाबदारी सारी माझ्यावर. मात्र, झटपट झाले पाहिजे हे काम.''

``साता-यात प्रतापसिंहाची कहाणी सांग"

शाहू महाराजांचे उत्तेजन मिळाल्यामुळे, या इतिहासाचे मिळेल तितके साहित्य गोळा करण्याच्या उद्योगाला मी लागलो. काम चालू आहे अशा सबबीवर दीड दोन वर्षे सहज निघून गेली. सन १९२२ एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात शिवजयंतीनिमित्त जाहीर व्याख्यानासाठी मी साता-याला जात असताना, पुणे स्टेशनवर शाहू महाराजांची अचानक गाठ पडली. कोठे जातो, कशाला जातो, वगैरे चौकशी करून महाराज म्हणाले, - ``अरे आता शिवाजीचा इतिहास सगळयांना माहीत आहे. त्यात नवीन आणखी काय सांगणार? साता-यालाच जातो आहेस तर प्रतापसिंह छत्रपतीची कहाणी, मला सांगितलीस तशीच, सांग सगळया मावळयांना नि घाल त्यांच्या डोक्यात नव्या विचारांचे वारे. मी जातोय बडोद्याला लग्नासाठी. परतल्वायवर मला मुंबईला भेट. हा इतिहास छापण्याची आता लगबग केली पाहिजे.''

सातारच्या व्याख्यानांचा परिणाम

प्रतापसिंह नि रंगो बापूजी यांच्या संमिश्र चरित्रांचे ३ हस्यांचे नि ३ दिवसांचे माझे व्याख्यान साता-याला चांगलेच दणाणले. ज्या राजवाड्यात तो चित्तप्रक्षोभक मुकाबला घडला, त्या वाड्याच्या पाय-यांवरच उभे राहून, ती कथा सांगण्यात आल्यामुळे, व्याख्यानाला भलताच रंग चढला. कित्येक महिने सबंध सातारा जिल्हा प्रतापसिंह आणि रंगो बापूजी यांच्या कहाणीच्या तपशिलानी घोंगावत होता. ज्याच्या त्याच्या तोंडी एकच विषय. तेथल्या दोघा शाहिरांनी दोन दांगडी पोवाडे तात्काळ रचून, त्यांचे जलसे जिल्हाभर गाजवले. [परिशिष्टात हे पोवाडे छापले आहे.] कै. श्रीपतराव शिंद्यांच्या `विजयी मराठा'च्या पत्राच्या खास बातमीदाराने त्या व्याख्यानांचा रिपोर्ट पाठोपठ तीन अंकांत छापल्यामुळे, हा इतिहास तमाम महाराष्ट्रात सर्वश्रुत झाला. माझे दिवंगत स्नेही अच्युतराव कोल्हटकर यांच्या जिवाग्री हा विषय इतका झोंबला की त्यांनी त्यावेळी त्यांच्या हातात असलेल्या टिळक साप्ताहिकाच्या ता. १७ नि १५ जून १९२२च्या अंकांत ते सर्व व्याख्यान छापून त्यावर एक संपादकीय स्फुटही लिहिले. ते असे –

- ``प्रतापसिंह महाजारांना पाजी बाळाजीपंत नातू आणि विश्वासघातकी आप्पासाहेब भोसले यांनी गादीवरून कसे काढले. या हकिकतीचा पूर्वभाग आम्ही गेल्या अंकात दिलेला आहे. हा वाचून ज्यांना संताप येणार नाही. जो रागाने खवळून जाणार नाही, ज्याचे डोळे क्रोधे लाल होणार नाहीत, असा मनुष्य अस्तित्वात असणे अशक्य आहे. रा. रा. ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे जर सातारचे इंग्रज रेसिडंट यांनी महाराजांना ऐन रात्री पलंगावरून खेचले असेल, जर महाराजांना नुसत्या चोळण्यानिशी पालखीत बसावे लागले असेल, जर त्यांना लिंबास जनावरांच्या मुतारीच्या घाणीत उतरावे लागले असेल, जर राजकन्या गोजराबाई हिची तेथे अकाली प्रसूति झाली असेल आणि जर मेण्यातल्या मेण्यात बाळासाहेब सेनापतीचा मुडदा पडला असेल, तर आम्ही म्हणतो की असल्या मांगहृदयी कृत्यास इतिहासत जोड सापडणेच कठीम आहे. प्रतापसिंह महाराजांचे अखेरपर्यंत असे म्हणणे होते की `मी निर्दोष आहे' आणि हा आपला निर्दोषपणा स्थापन करण्याकरिता त्यांनी रंगो बापूजी गुप्ते याआपल्या विश्वासून अधिका-याला विलायतेस पाठविले होते. परंतु प्रतापसिंह महाजांची उघड चौकशी कधीही झाली नाही आणि `मी निर्दोष आहे, मी निर्दोष आहे' असे छातीठोकपणाने अखेरपर्यंत म्हणणारा हा सत्याग्रही राजा अखेर कुजून कुजून प्रतिबंधांत मरण पावला. प्रतापसिंह राजा, तुझे राज्य परत देणे हे आमच्या हाती नाही व तुला परत सजीव करणे हेही आम्हास शक्य नाही. परंतु अजूनही तू आम्हास प्रिय, वंद्य व संस्मरणीय आहेस व पाजी बाळाजीपंताने व विश्वासघातकी आपापासाहेबाने पीडलेल्या तुझ्या आत्म्याबद्दल रोज क्रोधाचा तीव्र श्वास सोडल्याखेरीज एकही महाराष्ट्रीय राहणार नाही.''

यानंतर अच्युतराव जेव्हा जेव्हा मला भेटायचे तेव्हा तेव्हा ``काय बाबा, आमच्या रमगो बापूजीचे काय केले?'' हा प्रश्न बिनचूक ठरलेला. त्यांच्या अकाली मृत्यूपर्यंत हे टुमणे सारखे चालू असे.

छत्रपतीच्या हातावर शपथेचा हात

सातारचे व्याख्यान देऊन मी परत मुंबईला आलो. २-३ दिवसांनी शाहू महाराज बडोद्याहून पन्हाळा लॉजमध्ये आल्याचे समजले. पण ते हृदयाच्या विकाराने अत्यवस्थ असल्याचे कळले. ४ नि ५ मे १९२२ अशा दोन दिवशी सकाळी मी त्यांच्या भेटीसाठी लॉजवर गेलो. तेथे सारे बडोदेवालेच दिसले. कोल्हापूरचा एकही इसम दिसे ना. महाराजांना कोणी भेटायचे नाही, असा डॉक्टरांचा हुकूम आहे, असे सांगून त्यांनी मला हुसकावून दिले. ५ तारखेला संध्याकाळी दिवे लागल्यानंतर एक मोटारगाडी दादरच्या लेडी जमशेटजी रोडवर चौकशी करीत फिरत होती. येथे ``कोदण्ड कोण राहतात?'' एवढेच विचारीत ते लोक फिरत होते. असाने त्या बडोदेवाले नवख्यांना माझा काय पत्ता लागणार? इतक्यात त्यावेळी कीर्तीकर चाळीत राहणारे माझे मित्र श्री. भास्कर हरि ठाकूर त्यांना भेटले. आम्ही कोल्हापूरच्या महाराजांकडून आलो आहो, असे सांगताच, ठाकूर यांनी `कोदण्ड' शब्दाचा अर्थ बरोबर बसवला नि त्यांना `ठाकरे, मिरांडाची चाळ' असा पत्ता देऊन बिनचूक माझ्याकडे पाठविले. दादरला शाहू महाराजाचा संबंधी फक्त ठाकरे, हे सगळ्यांना माहीत होते. पण शाहू महाराज मला `कोदण्ड' नावाने हाक मारीत, हे कोणालाच माहीत नव्हते.

शाहू महाराजांनी आत्ताच्या आत्ता बोलावले आहे, असा निरोप सांगताच मी तसाच त्या गाडीतून मुंबईला गेलो. तेथेही १० वाजेपर्यंत डॉक्टरांची परवानगी मिळेतोवर खाली स्वस्थ बसलो. रात्री १० वाजता एका हुज-याने मला पहिल्या मजल्यावर नेले. महाराजांची छावणी असताना जो पन्हाळा लॉज गडबडीने गजबजलेला असायचा, तोच आता मला निरूप शांत पाहून चमत्कारिक वाटले. वर गेलो. एका दिवाणखान्यात महाराजांचा तो धिप्पाड देह पलंगावर उताणा पडलेला होता. निळया दिव्याचा मंद प्रकाश मनाला उदासीन करीत होता. एक हुज-या महाराजांची छाती शेकत होता. जवळ डॉक्टर उभे होते. महाराजांच्या उजव्या हाताच्या बाजूला मी गेलो, दोन हात जोडून नमस्कार केला नि त्यांनी पुढे केलेल्या हाताच्या पंजावर मी मस्तक टेकले. ``काय केलेस साता-याला जाऊन?'' एवढेच शब्द महाराजांच्या तोंडून पडताच एकदम डॉक्टर म्हणाले - ``हं महाराज, बिलकूल बोलायचे नाही.'' ``छे छे, प्र७ विचारला.'' महाराज हसत म्हणाले, ``आता सारे हाच बोलणार आणि मी फक्त ऐकणार,'' मी सारी हकीकत सांगितली. अंदाजे पाच मिनिटे तरी मी बोलत होतो. ``छान'' महाराज म्हणाले, ``या विषयाला तोंड फुटले. ठीक झाले. मी उद्या कोल्हापूरला जातोय. तू चल माझ्याबरोबर. म्हणजे पुढचे बातबेत ठरवू.'' ``सध्या मला रजा नाही, मी मागाहून येईन'' असे मी सांगताच, महाराज म्हणालो - ``थापबाजी नाही ना करणार? तू वांड आहेस. ग्रंथ लिहून देईन अशी शपथ कर.''

``सत्वधीर छत्रपति प्रतापसिंह आणि रंगो बापूजी
हा ग्रंथ लिहून मी पुरा करीन, अशी शपथ घेतो''

असे बोलून महाराजांनी पुढे केलेल्या त्यांच्या उजव्या हातावर मी शपथेचा हात ठेवला. पुन्हा नमस्कार करून मी परतलो. साडेअकरा वाजता दादरला येऊन, जेवण-वाचन करून झोपलो. सकाळी ७च्या सुमाराला सौभाग्यवतीने जागे करून घाबरत सांगितले - ``उठा उठा, रस्त्यावर लोक जमले आहेत नि शाहू महाराज वारले असे बोलताहेत.'' बाहेर येऊन मी चौकशी केली. बातमी खरी ठरली. मस्तक सुन्न झाले. खलास मामला! कोल्हापूरचा संबंध कायमचा तुटला. मागासलेल्या बहुजनसमाजाचा वाली गेला. त्यांच्या आत्मोद्धाराच्या प्रचंड धडपडीवरील सर्चलाईट विझला!

शाहू महाराजांच्या आकस्मिक मृत्यूच्या धक्क्याने या इतिहासाचा विषय मागे पडल्यासारखा झाला. तथापि ठिकठिकाणच्या इतिहासप्रेमी प्रबोधन-भक्तांची आतुरता मात्र मला स्वस्थ बसू देई ना. बडोद्याचे माझे स्नेही राजरत्न प्रो. माणिकराव यांनी रंगो बापूजीच्या मोडी पुस्तकाचे बालबोधीकरण केलेले चोपडे पाठवून दिले. आता तरी हा इतिहास लिहून पुरा करा, हा त्यांचा आग्रहाचा हेतू. बोरगाव (सातारा जिल्हा) येथले चिटणीस वंशज श्री. भगवंत बळवंत चिटणीस यांनी रंगो बापूजी नि प्रतापसिंह यांच्या हातचे नि वेळचे काही दस्तऐवज नि पत्रे पाठवून दिली. त्यात कटबाजांच्या जबान्या, प्रतापसिंहाची ८ पत्रे आणि पार्लमेंटला पाठविलेले अर्ज. हे दस्तऐवज थेट लंडनची हवा खाऊन आलेले असल्यामुळे, त्यांचे महत्त्व जाणून परिशिष्टात त्यांची मी बरदास्त ठेवली आहे. पार्लमेंटाला पाठविलेले अर्ज फार प्रेक्षणीय होते. मोहोरेदार जाड घोटीव जुन्नरी कागदांना अभ्रकाच्या भुकटीने घासून चमकार बनविलेले. दोन्ही बाजूंनी सुंदर बॉर्डरीचे नक्षीकाम केलेले आणि मधोमध घोसदार वळणदार मोडी मजकूर काळया कुळकुळीत शाईने लिहिलेला. या सर्व कागदपत्रांचे माझ्या स्वाध्यायाश्रमात पंधरा दिवसांचे एक जाहीर प्रदर्शन मी भरविले होते. (सन १९२२). सातारा रोडला प्रबोधनची छावणी गेल्यावर तेथे हे सर्व कागद खास पुरवणीने छापून प्रकाशात आले.

मेजर बी. डी. बसूंची दादर भेट

या सुमाराला माझे कलकत्त्याचे पत्रपंडित स्नेही बाबू रामानंद चतर्जी यांची ओळखचिठ्ठी घेऊन मेजर बी.डी. बसू. आय. एम. एस. (अलाहाबाद) हे अवचित दादर स्वाध्यायाश्रमात मला भेटायला आले. त्यांच्या `स्टोरी ऑफ सातारा' या इंग्रेजी ग्रंथासाठी ते महाराष्ट्रात साहित्य जमा करीत होती. ``मिळेल ते म-हाठी साहित्य प्रथम ठाक-यांकडून मुद्दाम तपासून घ्या.'' अशा सूचनेने बाबू रामानंदजींनी मेजर बसूंची माझ्याकडे पाठवणी केलेली होती. तीन दिवस नि रात्र आम्ही दोघांनी हस्तगत साहित्याची चिकित्सा केली. माझ्या संग्रहीच्या म-हाठी साहित्याची काही भाषांतरे त्यांना दिली. बोरगावचे अस्सल साहित्य त्यांन पाहिले. या वेळी त्यांचा ग्रंथ कलकत्त्याला बहुतेक छापून झाला होता. फक्त परिशिष्टे राहिली होती.

मिळालेले म-हाठी साहित्य इंग्रेजीत संपूर्ण भाषांतर होणार कधी नि त्यांचा माझ्या ग्रंथात पुरस्कार होणार कसा, असा मेजर बसूंच्यापुढे पेच पडला. अखेर ``इंग्लिश भाषा जाणणारांसाठी मी आपली इंग्लिश स्टोरी आधी बाहेर काढतो. मागाहून तुम्ही या मोडी म-हाठी साहित्यावर आधारलेला तुमचा म-हाठी इतिहास बाहेर काढा. म्हणजे दोनही ग्रंथांचा एकमेकांना पुरस्कार होईल. शिवाय, प्रतापसिंह आणि रंगो बापूजी या थोर पुरुषोत्तमांना दोन प्रांतातल्या दोन भिन्नभाषी लेखकांनी आदराचे प्रणाम केल्यासारखेही होईल.'' अशी तडजोड बसूंनी काढली नि ते परत गेले. बसूंचा ग्रंथ अखेर बाहेर पडला आणि त्याने आंग्लभाषाभिज्ञ रसिकांना प्रतापसिंहाच्या आत्मयज्ञाने आणि रंगो बापूजीच्या अष्टपैलू मुत्सद्देगिरीने चकित केले. आंग्लाळलेल्या देशीपंडितांना आणि गो-या नोकरशाहीला मात्र या ग्रंथाच्या बॉम्बस्फोटाने चांगलेच दणके दिले. ता. ६ मार्च १९२३ च्या केसरीत नरसोपंत केळकरांनी स्वतः मेजर बसूंच्या स्टोरीचे केलेले परिक्षण त्यांच्या शतपैलू विद्वत्तेला साजणारे असल्यामुळे, मुद्दाम परिशिष्टात दिलेले आहे. नरसोपंतांच्या चिरंजीवाने अर्धवट अकलेच्या भांडवलावर रंगो बापूजीला देशद्रोही ठरविला असला, तरी त्या पुरुषोत्तमाविषयी आपल्या बापाचा काय अभिप्राय होता, एवढे तरी आता या शहाण्याला दिसून येईल.

मेजर बसूंनी आपल्या ग्रंथाच्य प्रस्तावनेत शेवटी लिहिले आहे की - ``माझा हा ग्रंथ हिंदुस्थानातल्या इंग्लिश भाषा जाणणारासाठी लिहिलेला असला तरी या ग्रंथाएवढाच एक मोठा म-हाठी इतिहास मुंबईचे ख्यातनाम पत्रपंडित श्रीयुत केशव सीताराम ठाकरे लिहून लवकरच बाहेर काढणार आहेत.'' `लवकरच' म्हटले तरी सन १९४७ साल खतम झाले!

पुण्याला प्रबोधनची छावणी पडल्यावर या विषयाला थोडा जोर लागला. श्री. बाप्पा बेन्द्रे आणि श्री. गोपीनाथराव बाळकृष्ण पोतनवीस, उरवडेकर, यांच्या अखंड आग्रहाने, रंगो बापूजीचे व्याख्यान आणि एक संक्षिप्त चरित्र प्रबोधनात छापले गेले. सन १९२६ साली छपाखाना नि माझी वृत्तपत्रे या एकांड्या शिलेदारी व्यवसायात माझ्या आजारामुळे मी हापटी खाल्ली, तेथपासून तो सन १९४६च्या सप्टेंबरपर्यंत या इतिहासाच्या बाबतीत, तो मला मेला नि मी त्याला मेलो, अशी अवस्था होती. तुका म्हणे नाही चालत तांतडी, प्राप्तकाळ घडी आल्याविना, या महिन्यात एके दिवशी माझी मलाच शरम वाटू लागली. शाहू महाराजांना दिलेल्या शपथेच्या आठवणीने माझे मन मला खाऊ लागले. सन १९३५च्या आजारातून मी वाचलो, तो काय नुसता जगण्यासाठी? ठेवली हातातली सारी कामे बाजूला, काढली संदर्भाची सारी पुस्तके टेबलावर आणि दोन प्रकरणे लिहून झाल्याशिवाय अन्नाला स्पर्श करायचा नाही अशा निश्चयाने बसलो ठाण मांडून कामाला. रोज १० तास अखंड काम झाल्याशिवाय जेवायचचे नाही, अशा निर्धाराने प्रकरणांमागे प्रकरणे रंगत गेली. या निर्धाराला माझे स्नेही श्री काशीनाथ महादेव ताम्हनकर बी.ए. (माजी संपादक, दैनिक नवशक्ति, मुंबई) यांचे उत्तेजन सारखे माझ्यामागे होते. मी हा इतिहास लिहिण्यास घेतल्याचे वृत्त सर्व वर्तमानपत्रांत त्यांनी जाहीर केले. श्री. श्रीपादराव रामचंद्र टिकेकर, मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीचे लायब्रेरिअन, यांनी तर मुंबईच्या ऑल इंडिया रेडिओवरून सन १९४७ला एका शनिवारच्या `नभोवाणीच्या परिसरात' या कार्यक्रमात यशवंतराव शिर्के यांचा १८३९सालचा विलायत प्रवास आणि रंगोबापूजीची कामगिरी यावर लिहिललेले एक चित्ताकर्षक प्रहसन ध्वनिक्षेपित करविले. मुंबईच्या आकाशवाणीने या इतिहासाची कहाणी सर्वश्रुत करताच, महाराष्ट्रात सर्वत्र मोठे कुतूहल निर्माण झाले नि तशी ठिकठिकाणची पत्रे सारखी येऊ लागली. उत्तेजनाचा असा नेट सारखा चालू झाल्यामुळेच, माझ्या हातून हे कार्य पुरे झाले. त्यात पुन्हा बेळगावच्या सौ. वैद्यालंकृति रंगुबाईसाहेब जाधव यांनी `लेखनाला उत्तेजन' म्हणून, माझे मित्र इतिहास भास्कतर पां. गो. रानडे यांचे हस्ते मला रोख १०० रुपयांची देणगी पाठवून दिली.

सातारचे पेन्शनर मामलेदार रावबहादूर एस. के. दुधुस्कर यांनीही बरेच नवनवे साहित्य नकलून पाठवून दिले. श्री. शांताराम रघुनाथ पोतनवीस यांनी वेळोवेळी लिहिला मजकूर वाटून, उपयुक्त सूचना केल्या आणि पोतनवीस दप्तरातले महत्त्वाचे कागद पुरविले. काशीच्या एका चित्रकाराने काढलेली प्रतापसिंह आणि यशवंत मल्हार चिटणीसाची रंगीत तसबीर, गेली शंभर वर्षे पोतनविसांच्या देव्हा-यात अखंड पूजली जात असते. ती या ग्रंथात छापण्यासाठी त्यांनी दिली. त्यांना अनेक धन्यवाद.

ग्रंथ लिहून झाला तरी तो वाचकांच्या हातात ठेवण्याचे काम प्रकाशकाचे, हल्लीच्या पेपर कंट्रोलच्या युगात एकादे पुस्तक छापणे म्हणजे तलवारीवरची कसरत आहे. मी रंगो बापूजी विषयी पुस्तक लिहीत आहे. ही बातमी समजताच, न्यू भारत प्रिंटिंग प्रेस नि नवभारत प्रकाशन संस्थेचे मालक श्रीयुत रघुनाथ दिपाजी देसाई स्वयंस्फूर्तीने माझ्याकडे आले आणि त्यांनी प्रकाशनाचा भार उचलला. वेळोवेळी मला त्यांनी उत्तेजन दिले, म्हणूनच रंगो बापूजी वाचकांच्या भेटीला येऊ शकत आहे. प्रकाशन कार्य ही धंद्याची बाब असली, तरी श्री रघुनाथजींनी मला त्या भावनेने मुळीच न वागवता, शुद्ध स्नेहभावनेने जे विविध सहाय्य केले, ते औपचारिक नुसत्या प्रणामाने भरपाई होण्यासारखे नाही. मी त्यांचा ऋणी राहू इच्छितो. अलिकडे माझी प्रकृती क्षीण असल्यामुळे, रघुनाथजींनी दादरला प्रुफे नेणे आणण्यासाठी नवभारत संस्थेचे कार्यकर्ते श्री. वसंतराव ऊर्फ बाबूराव पाथ्रडकर यांची खास नेमणूक केली. बाबूरावजींनी ते काम आपलेच समजून मला हरएक बाबतीत फार सहाय्य केले. त्यांचे मी आभार मानतो.

पुस्तकातील फोटो, चित्रे आणि जॅकेट तयार करण्याचे काम माझे चिरंजीव चित्रकार बाळ ठाकरे आणि फोटोग्राफर चि. प्रल्हाद महाजन यांनी केले. ते दोघे माझेच. तेव्हा त्यांना माझे आशीर्वाद.

छापखान्यातल्या कामगारांनी नि व्यवस्थापक महाशयांनाही ग्रंथमुद्रणाच्या कामी आपल्या कर्तव्याची कसोशी केल्याबद्दल मी त्यांचे सामुदायिकरित्या अभिनंदन करतो. इतर सर्व अज्ञात सहाय्यकांना कृतज्ञतेने प्रणाम करून हे आत्मनिवेदन संपवितो.

मकर संक्रांत, ता. १४-१-१९४८<br>
मुंबई नं. २८.<br>
केशव सीताराम ठाकरे

## प्रकरण १ ले

## रंगो बापूजीचे घराणे

राज्य म-हाठी शिवरायाचे का कायस्थांचे?<br>
कायस्थांच्या रक्तावरती बुरुज उभे त्याचे.<br>
प्राणप्रतिष्ठा त्य राज्याची कायस्थें केली<br>
अवतारी शिवमूर्ती वरती मग स्थापन केली.

शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याच्या कल्पनेच्या जन्मापासून तो अखेर प्रतापसिंह छत्रपतीच्या हद्दपारीने साता-यास त्या स्वराज्याचा घरच्या नि दारच्या कटबाजांनी खून पाडीपर्यंत छत्रपतींची नि स्वराज्याची पिढ्यानपिढ्या एकनिष्ठेने सेवा करणारी महाराष्ट्रात दोनच घराणी. एक बाळाजी आवजी चिटणिसाचे आणि दुसरे रोहीडखोरेकर देशपांडे दादजी नरस प्रभू गुप्ते यांचे. या दोन घराण्यातल्या प्रत्येक पुरुषाने स्वराज्यसेवा हाच कुळधर्म मानून, मुत्सदगिरीची, शौर्याची नि आत्मयज्ञाची कमाल केली. महाराष्ट्रातच काय, पण उभ्या भरतखंडात त्याला तोड नाही नि जोडही नाही.

बण्डवाला शिवाजी

मराठी दुस-या यत्तेतल्या लहान मुलांसाठी कै. रावसाहेब विनायक कोंडदेव ओक यांचे `महाराष्ट्राचा इतिहास' नावाचे एक छोटे इतिहासाचे पुस्तक अभ्यासाला नेमलेले असे. त्यात–

``शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाही तोंच त्याने आडदांड लोकांची संगत धरून देशात पुण्डाइ आरंभिली.''

असे एक वाक्य होते आणि आम्ही मुले ते अगदी मोठ्या आवेशाने नि सुराने घोकंपट्टी करीत असू. महाराष्ट्रात शिवाजी उत्सवाची टूम निघाल्यावर अनेक तत्कालीन विद्वानांनी ओकांच्या या विधानावर आक्षेप घेतला. अलिकडे कै. राम गणेश गडकरी यांनी `राजसंन्यास' नाटकात हे वाक्य देहू दफ्तरीच्या तोंडी घालून त्या आक्षेपांचा पुरस्कार केला. शिवाजीसारख्या प्रातःस्मरणीय स्वराज्यसंस्थापकाला, पुंडगुंडांचा म्होरक्या मानणे हात्य पुरुषोत्तमाचा केवढा अवमान! अशी या आक्षेपकांची, भाबडी भूमिका, कोंदणात चकाकणा-या हि-याची प्रथमावस्था गारगोट्यांच्याच खाणीतली असते. त्याचप्रमाणे कोमत्याही देशाच्या, कोणत्याही काळाच्या राष्ट्रपुरुषाची प्राथमिक अवस्था गावगुंडाचीच असते. पुंड नि गुंडच नानाविध पराक्रमानी, उघड गुप्त बंडाळयांनी आडवा येईल त्याला कापून काढून, स्वराज्य कमावून राष्ट्राचे उद्धारक पुरुषोत्तम होतात. कोठेच काही नव्हते, अशा अवस्थेत, दक्खनच्या धुरोळयातून, शून्यातून ब्रह्माण्ड काढावे त्याप्रमाणे, हिंदवी स्वराज्याचा सोहोळा महाराष्ट्राला दाखवणा-या छत्रपति शिवाजीच्या चरित्राची सुरुवात गुंडपणानेच झालेली आहे. शिवाजीच्या प्राथमिक लोकसंग्रहात मावळातले नि पुण्याच्या आसपासचे इमानी गावगुंडच होते. अवघे पंधरा वर्षाचे वय, पण ``ज्यानी महाराजांचे बोलणे परम आदराचे व पराक्रमाचे ऐकावे, त्यांस वेध लागून वाटावे की, हे परम थोर आहेत, यांचेच संमतें चालावे, हे सांगतील तसे चालावे. प्राणही गेले तरी जावोत. परंतु सेवा करून यांचे आज्ञेत चालावे, अशी सर्वांची चित्ते वेधून घेतली.'' मुसलमानी अंमदनी म्हणजे ``अंधेर कारभार. बादशाहीमध्ये कोणी मनास आणीत नाही. पैके पावले म्हणजे एकाचे वतन एकास देतील.'' स्त्रियांवर बलात्कार, हिंदूंचे खून, मंदिरांचा विध्वंस, गोवध, इत्यादी अनन्वित प्रकार उघड होत असत. प्रतिकाराची धमकच कोणात नव्हती. शिवाजीने खेडवळ मावळयात अन्यायाची चीड उत्पन्न करून, हिंदू राज्याच्याकल्पनेने त्यांच्या सुप्त पराक्रमाला जागे केले. आचरट गावगुंडी न करता, आपल्या देह मनातला तेख मुसलमानी जुलमी सत्तेची पाळेमुळे खणून तिला उध्वस्त करण्यात करा, या शिवाजीच्या आदेशाने सारा मावळ प्रांत शिवाजीच्या भजनी लागला. पुण्यास येताच ``बारा मावळे काबीज केले, मावळे देशमुख बांधून दस्त करून पुंड होते त्यांस मारिले.'' देशमुख मराठे नि त्यांच्यादेशमुखीचा कारभार पाहणारे देशपांडे कायस्थ प्रभू आणि दप्तर सांभाळायला ब्राह्मण (देशस्थ) कुळकर्णी, असी मावळातली व्यवस्था होती. देशमुख व्यसनी, भांडखोर, मानमरातबासाठी एकमेकांत नेहमी मारामारी, खून करणारे आणि मुसलमान सुभेदाराची मर्जी सांभाळून स्वतःच्या वतनावर चैनीत राहणारे होते. ज्या देशमुखांनी शिवाजीला प्रतिकार केला, त्यांना एकतर चतुरायीने त्याने आपल्या योजनेत मिळवून घेतले. बाकीच्यांना नातेगोते न पाहता, दयामाया न करता, पार चेचून काढले.

स्वराज्याची शपथ

मावळातल्या मराठे देशमुखांना मिळवून घेण्याच्या कामी शिवाजीने सर्वांआधी तेथल्या कायस्थ प्रभू देशपांड्यांची सहानुभूती मिळवून, त्यांना आपल्या हाती धरले. असा जो पहिला देशपांडे शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेच्या कामी राइरेश्वरासमोर बेलभण्डार उचलून शपथपूर्वक सामील झाला, तो रंगो

बापूजीचा पूर्वज दादजी नरस प्रभू गुप्ते हा होय. शिवाजीच्या स्वराज्यकार्यात कायस्थ प्रभूंचा जो दाटून संग्रह झाला, त्याचा उगम दादजीच्या या स्वराज्याच्या शपथकाळापासूनच होय. तेव्हापासून तो म-हाठ्यांचे स्वराज्य रावबाजीच्या पाजीपणाने अंग्रेजांच्या खिशात गडप होईपर्यंत एकाही कायस्थाने छत्रपतीशी किंवा स्वराज्याशी बेमानी केली नाही. दादजी नरस प्रभूच्या घराण्याने तर थेट रंगो बापूजीपर्यंत या इमानात एक प्रचंड रोमहर्षक इतिहासच अजरामर करून ठेवला आहे. तोच या ग्रंथात लिहावयाचा आहे.

शिवाजीचे आश्वासन

दादजीला हाताशी धरून, शिवाजी मावळात धुमाकूळ घालीत असल्याची बातमी `राजनिष्ठ' खोपडे नि जेधे यांनी विजापूरला कळविताच, तेथल्या वजिराने कायदेबाज धमकीचा एक सणसणीत खलिता दादजी देशपांड्याला पाठविला (ता. ३० मार्च १६४५) तो असा –

> इजत असार दादजी नरस प्रभू देशपांडे ता. रोहिडखोरे व वेलवंड खोरे यासि सु. खमस अर्बैन अलफ वजारतसाब सीवाजीराजे फरजंद शहाजीराजे याणे शहाशी बेमानगी करून तुझे खोरियात रोहिरेश्वरचे डोंगराचे असराण (आस-याने) पुंडायेवाने मावले वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात सिरला. हाली राजगड किला नाव करून बलकावला. तोहि वेलवंडखो-यालगत. त्यास लोकाचा जमाव तू सामील असून फिसात करून रशिद राजे मजकूरननिल्हेस देतोस व ठाणे सिरवली आमिनासी रुजू राहत नाहीस व जमाव बितरजुमा करीत नाहीस. तनखाहि हरदू तपियाचा दिवाणात देत नाहीस (दोनही पेट्यांचा वसूलही सरकारात देत नाहीस) मगरूरीचे जबाब ठाणगे व नाईकवाडियासी देतोस. हे जाहीरात आले. त्यास हे नामुष्की गोष्ट तुझे जमेदारीचे इज्जतीस आहे. तरी ठाणे मजकुरी आमिनासी रूजू राहणे आणि तनखा साह (जमा) करोन देणे. हे न जालियास खुदावंत शाह तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाही, हे मनी समजणे आणि या उपरी दिवाणात रूजू राहणे. छ. ११ सफर (राज. खं. १५-२७१-७२)

वजीरसाहेबांचा हा दमधाटीचा खलिता दादजीकडे आल्याचे वर्तमान शिवाजीला समजताच, त्याने तातडीने दादजीला धीरदिलाशाचे पत्र पाठवून भेटीला बोलाविले. ते पत्र असे –

> राजश्री दादाजी नरस प्रभू देशपांडे व कुलकर्णी ता रोहिरखोरे व वेलवंडखोरे यासि प्रति सीवाजीराजे सु।। खमस अर्बैन अलफ. तुम्हास मेहबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अमिनानी तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप नरसिबाबा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुतेक लि।।. त्यास शाहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री राईरेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावार शेंद्रीलगत (सह्याद्रीलगत) स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बावास हवाल होऊ नये. खामाखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणे. राजश्री दादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यात अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे. या प्रमाणे बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणे. रा। छ. २९ सफर बहुत काय लिहिणे. (राज. ख. १५-२७५) [१७ एप्रिल १६४५ शुक्रवार]

शिवाजीसारख्या हिंमतबहाद्दर जवान पुढा-याने दादजीसारख्याला एवढा दिलदिलासा दिल्यावर, त्याच्या घराण्यातल्या हरएक वंशजाने छत्रपतीच्या शब्दासाठी नि तक्तासाठी प्राण द्यायला मी मी म्हणून सारखे पुढे सरसावावे, यात नवल ते कसले? असले जिवात जीव नि आत्म्यात आत्मा ओतणारे शिवाजीसारखे जवानमर्द सानथोरांचा संग्रह करायला सजल्यावर, त्याच्या हिंदूराज्याची बाजी राखायला दादजी, बाळाजी नि बाजींचा तुटवडा कशाला पडेल? पडलाच नाही.

रंगो बापूजीची वंशावळ

भिकप्रभू-हरप्रभू-बालप्रभू-भानप्रभू-जाऊप्रभू-सावप्रभू-
नरसप्रभू

दादजी प्रभू (दत्तक)

कृष्णाजी (शाहूबरोबर दिल्लीस) येसाजी

*रामाजी (*पानपतास पडले) चिटको*

बापूजी

गो (प्रतापसिंहासाठी १४ वर्षे लंडनला आंग्रेजांशी सामना देणारा नि
खेर दक्षिणेत सत्तावनी राज्यक्रांतीचा उपक्रम करणारा प्रभूवीर)

सचिवाची कारवायी

शिवाजीच्या अंमदानीत दादजीने आपल्या ``स्वामीपाशी फार शर्थीची चाकरी, हरवक्त हुजूर राहून धारेक-यात मर्दुमकी, मोठे धाडस, जिवाची पर्वा न धरिता केली.'' राजारामाच्या कारकीर्दीपर्यंत दादजी हयात होता. पण त्याची स्थिति मात्र फार हलाकीची झालेली होती. रायगड पडला तेव्हा बालराजा शाहू नि मातोश्री येसूबाई यांच्याबरोबर त्याचा मुलगा कृष्णाजी बादशाही छावणीत सेवेला गेला. जिंजीच्या राज्यक्रांतीच्या धामधुमीत, मावळात मुख्त्यार नेमलेल्या शंकराजी नारायण सचवाने दादजीचे वतन बलजबरीने खालसा करून, शिवाजी महाराजांच्या लेखी वचनावर बोळा फिरवला. बिचा-या दादजीची वृद्धापकाळी अन्नान्नदशा झाली. राज्यक्रांतीचा काळ. धनी जाग्यावर नाही. थोरला पुत्र स्वामीसेवेसाठी स्वामीबरोबरच वनवासात नि बंदीत. केल्या कामाची नि गाळल्या रक्ताची बूज राखणारा कोणी नाही. जेधे, देशमुख आणि लोहोकर विरुद्ध बिथरून शंकराची सचिवाच्या खाकेत घुसलेले. खुद्द धनि छत्रपतीच वनवासात तेथे त्यांच्या सेवकांनी कोणाकडे कसली दाद मागायची?

राजारामाची तंबी

शेवटी चंदीला (जिंजीला) स्वतःच जावे या निश्चयाने दादजी निघाला तो वाटेतच रांगण्याच्या मुक्कामाला राजाराम छत्रपतीची गाठ पडली. दादजी हकिकत ऐकून राजारामाला फार वाईट वाटले नि संतापही आला. त्याने शंकराजी सचिवाला कडकडीत पत्र पाठविले, ते असे –

राजमान्यराजश्री संकराजी नारायण पंडित यासी आज्ञा ऐसिजे. राजश्री दादजी नरस प्रभू देशकुलकर्णी व गावकुलकर्णी देहाये तर्फ रोहिडखोरे व वेलवंडखोरे याचे वतन तुम्ही जप्त केले. त्यानी नजराण्याचा ऐवज रायगडी हुजूर कैलासवासी स्वामीपासी जामदारखान्याकडे दिल्हा. त्याजवर वतनाची मोकळीक सर्वा जमेदाराबरोबर मावळ प्रांताची मोकळीक जाली तेव्हा याचीहि केली. पुढे तुम्ही सर्जेराऊ जेधे देशमुख त्याचे तर्फेने आकसामुळे याचे वतन आपल्यास जेधे याजपासून करून घेतले. येविसी खबर प्रभू देशपांडे याणी पनाल्याचे मुकामी जावून राजश्री रामचंद्रपंत अमात्य यास सर्व वाका समजाऊन त्यानी त्याची तकरीद घेवून हुजूर चंदीचे मुकामी तेव्हा र।। केली. नंतर याचे वृत्तीचा बंदोबस्त करावा तरी तुम्हीच अफलादीचा विशेष, वतन बेवारसी, आपल्यास द्यावे म्हणोन विनंती पत्र संक्राजी ढग्याबरोबर लिहिले. तेव्हा स्वामीनी राजकारणावर नजर ठेवून बेवारस वतन असल्यास तुम्हास देसी आल्यावर चौकसी करून देता येईल असे लिहिले असता त्याचे पत्रावर, तुम्ही प्रभूवर बलात्कार करून घरातून कागद नेले. त्यास हाली दादाजी प्रभू हुजूर किले रांगण्याचे मुकामी चंदीस येण्याबद्दल आले. तो स्वामी देसी येता भेट घेतली. सर्व कैफियत कळविली. त्यास तेच वेळी तुम्हाला पत्र लिहिले की हे वतन घ्यावयाचे नाही... त्याचे वतन त्यास देवावे. अस ठरून हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे. तरी देशकुलकर्णी व गावकुलकर्णी हरदु खोरी प्रा।। मजकूरची तुम्ही व जेधे व लोहकर वगैरे मिळोन हे वतन नाहक घेतले. याचे जिरंजीव कृष्णाजी प्रभू अशा अडचणीचे प्रसंगी स्वामीस संकट समइ बादशहानी चरंजीव (शाहू) व कबिले नेले त्यापासी चाकरीवर हजर असतामागे त्याचे वतन दरोबस्त  घेता, हे तुम्हास उचित एकंदर नाही. तरी याउपरी याचे वतनाचे कागदपत्र नेले त्यासुधा परत देऊन याचेवतन याजकडेचालत असल्या प्रा। चालवणे आणि खासा स्वारी तिकडे येताच येऊन भेटणे. यानी कैलासवासी थोरले राजश्री स्वामीपासी फार शर्तीची चाकरी हरवक्त हुजूर राहून धारकरीयात मर्दुची मोठे धाडसे जिवाच परवा न धरता केली व स्वामी एहि (यांही) विजापुरी बंद सोसिले त्या काली सर्जेराव व खंडोजी खोपडे व बांदल देशमुख याणी तुरुक लोकांसी मिळून फिसात केलीआणि अडचण स्वामीस फार केली. ते वेळी खंडू खोपडे व बांदल धरून मारिले. सर्जाराव कैद केला. त्या निमिती आकस धरून तुम्हास गैऱवाका मजकूर समजाऊन त्याचा व याचा अकस असता ही वृत्ती तुम्ही जबरदस्त म्हणोन करून देता आणि तुम्ही पत्रे करून घेऊन घेता. त्यास याचे तुम्हास देण्यास जेधे यास अधिकार नाही व तुम्ही करून घेण्यास अधिकारच नाही. पेशजी व हाली या जातीने फार मर्दुम्या करून राज्य मेळविले. स्वामाकरिता खराब जाले व मारले गेले. असे यत्ने करून दिवस पूर्वीपासून काढले असता तुम्ही सरकारची चार माणसे हाती घेऊन भलाई केली व करिता. यानी चाकरी जमाव करून व जातीनेही प्रथमपासून केली व करीत आहे. ती एकीकडे जाऊन आपले मनी मोठेपणा वागविता व पाहिजे (ते) करिता, परंतु तुम्ही याचे वृत्तीस गल पडण्याचा समंध एकंदर नाही. स,बब बे वतन परत देणे. मावळ मजकुरी स्वारी येण्याचे पूर्वी वतन दिल्याचा मजकूर लिहिणे. याउपरी वतन न दिल्याचा बोभाटा आल्यास तुमचे अबरूस व पदास धका येईल असे स्वामीस भासत आहे. व पुढे नाना प्रकारच्या अडचणी तुम्हास अशा करणीच्या येतील. कारण चिरंजीव (शाहू) काले करून तरी श्री देसी आणील. तेव्हा संकटी जी माणसे उपयोगी पडली त्यांच्या तसनसी आम्ही करविल्या. हे इकडे यावे. त्याचे चित्ती द्वेश यावा व राज्यकर्त्यास इनसाफ पाहणे जरूर. त्यात हे तरी विचाराचे कलम. भलाई जाली ती सारी आमची एकीकडे जाऊन असी करणी तुम्ही केली यात स्वामीद्रोहाचेच करणे. ते (शाहू) मुख्य. सर्व राज्यास अधिकारी. आम्ही करितो तरी त्याचेसाठीच आहे. प्रसंगास सर्व लोकास तिकडेच पाहणे येईल व वागतील. हे कारण ईश्वरींच नेमिले आहे. उगीच भलते भरीं न भरणे. पुढे उर्जित होय ते करणे. हे न केलिया केले कामाची फळे ज्याचे ते भरतील असी श्रीची इच्छाच असली तरी तुम्हीतरी का समजाल? तरी नीट चालीने वागणे म्हणजे पुढे सर्वोपरी ऊर्जीताचेच करण जाणिजे. जाणिजे निदेश समक्ष प्रा। असे. तेरीख १७ सफर सु।। समान तिसैन अलफ [२८ एप्रिल सन १७०८७]

राजारामाच्या या पत्राला शंकराजी सचिवाने धूपसुद्धा दाखवला नाही. पुढे शाहू दक्षिणेत परत आल्यावरही या प्रकरणात त्याने चौकशी करावी म्हणून दादजीच्या मुलाने (येसप्रभूने) खटपट केली. ``मावळप्रांती शंक्राजी नारायण पंडत याणी जबरीने दादाजी नरसप्रभू देशपांडिया... कृ,णाजी प्रभूचा बाप हा कदीम जमेदार असता त्याचे वतन घेतले व आणखीही बहुत जमेदार व रयतलोकांच्या तसनसी केल्या. ये बाबें पंडत यास शाहूने बोलावले असता न

आले. हिरकणी खावून मेले.’’ सारांश, पंतसचिवाने संथपणे पचविलेले दादजीच्या इमानाचे इनाम वतन त्याच्या घराण्याला, रंगो बापूजीला सुद्धा, पुन्हा कधीच लाभले नाही. शंकराजी नारायणाचा वतनखाऊ खराटा मावळातल्या अनेक इमानदार लोकांच्या वतनांवर फिरून फिरूनच भोरच्या पंतसचिवी संस्थानाची उभारणी झालेली आहे. अर्थात, या संस्थानांच्या पायात किती शिवभक्तांच्या गर्दना गाडलेल्या असतील आणि किती गोरगरिबांच्या तळतळाटावर या संस्थानचे बामणी ऐश्वर्य लकलकत आहे, याची वाचकांनीच कल्पना करावी.

वतनासाठी वंशजांची धडपड

शिवाजीने दादजीला दिलेल्या वतनाला चांगला मुहूर्त लागला नव्हता, असे म्हणावे लागते! कारण सिवाजीच्या हयातीतच दादजीचा गुमास्ता बाबाजी सिवदेव सोनटक्के याने कागदोपत्री घालमेल करून वतन गिळण्याचा यत्न केला होता. पण ती गोष्ट उघडकीला येताच, शिवाजीने सोनटक्याला राजगडावर कैद करून चौदावे रत्न दाखविताच, स्वारीने यजितपत्र लिहून देऊन (शके १५४५ मार्गशीर्ष शुद्ध ३) प्रायश्चित्त घेतले. [परिशिष्ट पहा] ब्राह्मण गुमास्त्यांनी यजमानांची आडनावे घेऊन मावळातल्या अनेक कायस्थ प्रभू देशपांड्यांची वतने गडप केलेली आढळून येतात.

शाहूच्या कारकीर्दीत कृष्णाजी नि येसाजी या दादजीच्या दोन पुत्रांनी वतनासाठी पुन्हा खटपट केली. तोवर दादजी दारिद्र्याने ग्रस्त होऊन मृत्यूही पावला होता. दादजी हा नरसप्रभूचा दत्तक पुत्र असूनही तो अस्सल (अवलाद) नव्हे, अफलाद आहे, तेव्हा ते वतन सरकारजमा ऊर्फ सचिवायस्वाहा करायला हरकत नाही, अशी शंकराजीने कायदेबाजी लढवलेली होती. दादजीचा काटा काढण्यासाठी, `तुला तीन गावचे कुळकर्ण, कारी गावात एक घर नि शेत देतो. वतनाचा राजीमाना लिहून दे, दत्तपुत्र म्हणऊ नकोस, अफलाद म्हणवीत जा.’ असा सचिवाने दादजीला नि त्याचा पुत्र येसाजी याला जबरीचा सवाल टाकला. तो त्यांनी नाकारताच, सचिवाने त्यांचे घरदार लुटले, त्यांना कोंडून मार जबरदस्ती केली आणि पोलिशी समजुतीचा हवा तसा कागद जोरीने लिहून घेतला.

सन १७०८त शाहू देशी परत आल्यावर, कृष्णाजीचे वतन त्याला बिनबोभाट परत देण्याचा बंदोबस्त करून `इनसाफ बराई खुद जातीने पहावी’ असा एक बादशाही खलिता (१६३० शके ज्येष्ठ वद्य ४चा) कृष्णाजीने शाहूला सादर करविण्याची खटपट केली होती. त्यावर सन १७१९ (शके १६४१ फाल्गुन शुद्ध ४) चे एक पत्र शाहूने दत्ताजी सिवदेव राजाज्ञा याला लिहून, या वतनाचा बंदोबस्त करण्याविषयी लिहिले. तरीही काही दाद लागल्याचे दिसत नाही. पुढे कृष्णाजीचा मुलगा रामाजी आणि येसाजीचा मुलगा चिटको नानासाहेब पेशव्याकडे तक्रार घेऊन गेले. त्यावेळी उत्तर हिंदुस्थानच्या स्वारीचे राजकारण पुण्यास शिजत होते. `सध्या तुम्ही उत्तरेच्या स्वारीला चला. परत आल्यावर तुमची भानगड मिटवतो.’ असे नानासाहेबाने सांगितल्यावरून, रामाजी नि चिटको तिकडे गेले आणि पानपतावर खलास झाले.

रामाजीचा मुलगा बापूजी यानेही थोडीशी खटपट केली. पण तिचाही काही उपयोग झाला नाही. नंतर रंगो बापूजीने अखेरचा जोर केला. ती हकिकत यापुढे सांगायची आहे.

रंगो बापूजीच्या चरित्रावर पुणेरी अक्कल पाजळणारे काही चित्पावन संशोधन, `रंगो बापूजी एकसारखा आपल्या वतनासाठी जीव टाकीत होता. त्याच्या प्राप्तीसाठीच त्याने हजार उलाढाल्या केल्या.’ अशा अर्थाचे शेरे मारून शंकराजी नारायण गांडेकराच्या पंक्तीला ते बसले आहेत. वतने, इनामे, जहागिरी, संस्थाने, अलिकडची पेनशने यांच्यासाठी पूर्वी नि आजकाल कोण जीव टाकीत नाही? सारेच टाकतात. सांगली, मिरजेचे पटवर्धन पेशव्यांचे नोकर. एकट्या बापू गोखल्याखेरीज कोणत्या चित्पावन सरदाराने आपल्या पेशवे धन्यासाठी खाल्ल्या मिठाचे चीज केले, हे ते चित्पावन संशोधक सांगतील काय? उलट ईस्ट इंडिया कंपनीच्या कारस्थानांची सद्दी जोरावर दिसताच, रावबाजीने शेणाच्या पणत्या पाजळण्यापूर्वीच, त्याच्या एकूणएक चित्पावन सरदारांनी बनिया कुंफणीशी संगनमत करून, तिचा पाठिंबा पोटिंबा मिळविला. दक्षिण महाराष्ट्रातली सगळी भटी संस्थाने आंग्लाई पाठिंब्याची निमकहरामीची प्रतिके आहेत. काही वर्षांपूर्वी मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन सांगली संस्थानच्या भेटीला गेले होते. त्यांना दिलेल्या मानपत्रात सांगलीचे विद्यमान अधिपति श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी म्हटलेले आहे की, ``पेशवाई नष्ट होण्याच्या पूर्वीपासूनच आमच्या संस्थानाचा नि इंग्रेजाचा स्नेहसंबंध जुळलेला आहे.’’ शिंदे, होळकर, गायकवाड या पेशव्यांच्या बड्या सुभेदारांनी आंग्रेजांच्या सुलतानीला मुलतानी मुजरे करूनच आपल्या सत्तेच्या नि वंशजांच्या बडेजावी टिकावाची सोय करून ठेवली आहे ना? रंगो बापूजीच्या

पूर्वजाला शिवरायाने दिलेले टीचभर जमिनीच्या तुकड्याचे वतन हरामखोरीचे नव्हते. इमानदारीचे ते इनाम होते. मावळात प्रथम दादजी नरसप्रभू शिवाजीला स्वराज्यस्थापनेची शपथ देऊन उठला, म्हणूनच सारा मावळप्रांत नि तेथले कायस्थप्रभू तरुण जवान शिवाजीच्या झेंड्याखाली जमा झाले. त्या लोकसंग्रहाचे शिवाजीने दिलेले ते अभिमानास्पद बक्षीस होते. ते सचिवाने हरामखोरी करून हिसकाऊन घेतले. ते परत मिळण्यासाठी रंगो बापूजीने खटपट केली, यात स्वार्थ कोठे आला? आज चालू घटकेला (सन १९४६-४७) आंग्रेज बहादुरांना भारतीय जनता, `चले जाव' हुकुमाने दरडावीत असता, आणि संस्थानिकांचे जन्मसिद्ध अवतारीपणाचे नि वारसाचे हक्क आम्ही जुमानणार नाही, असे पंडित जवाहरलाल नेहरू, मध्यवर्ति सरकारचे पंतप्रधान नात्याने, धमकावीत असता, `आता आमचे पुढे काय होणार?' या दहशतीने यच्चावत देशी संस्थानांचे छोटे मोठे राजे आपला जिवाचा हुळा कायदेबाजीच्या फुफाट्यावर भाजून घेत आहेत ना? हिंदुस्थानातील सगळा संस्थाने या ना त्या जातीच्या हरामखोरीनेच जगली नि पुढे जगण्याची तंगडझाड करीत आहेत. महाराष्ट्रातील पटवर्धनादि चिपटीमापटी तर उघडाउघड धन्याच्या चितेवर पावन झालेली आहेत. आपले संस्थान हातचे जाणार की काय, या विवंचनेने त्यानाहि जर आता झोपा येत नसतील, तर बिचा-या रंगो बापूजीने आपल्या टीचभर वतनासाठी, स्वतःच्या स्वराज्यनिष्ठ घराण्यावर झालेल्या अन्यायाच्या भरपाईसाठी, शेवटच्या छत्रपतीपर्यंत आणि अलपिष्टनापर्यंत हाका आरोळयांचा ओरडा केला, तर त्याला काकबुद्धीने दोष देणा-यांना म्हणावे तरी काय?

## प्रकरण २ रे

## रंगो बापूजीचा पूर्वरंग

रंगो बापूजीच्या जन्म मृत्यूच्या निश्चित तारीख सालांचा पत्ता नाही. आपल्या हयातीत त्याने पर्वतासमान पत्रव्यवहाराचा ढीग रचला, अनेक इंग्रेजी, मराठी (मोडी लिपीत) पुस्तके लिहून छापली नि हिंदुस्थानात नि तमाम इंग्लंडात फैलावली. चुकूनसुद्धा कोठेही त्याने आपल्या जन्मतिथीचा उल्लेख केलेला आढळत नाही. छत्रपति प्रतापसिंह आणि रंगो बापूजी यांची जीवनचरित्रे एकमेकात सरमिसळ मिसळलेली आहेत. प्रतापसिंहाचे नाव निघताच रंगो बापूजीचे चरित्र सिनेमासारखे नजरेपुढे नाचू लागते. वाल्मिकाने श्रीरामचरित्र अजरामर केले, तसे रंगो बापूजीने प्रतापसिंह छत्रपतीचे चरित्र नि चारित्र्य यूरप-आशिया खंडांत गाजविले. प्रतापसिंहाच्या अमदानीच्या प्रथमार्धात जे अनेक मोठमोठे मुत्सद्दी, लढवय्ये आणि मसलतगार स्वराज्याच्या पुनर्घटनेसाठी सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून झगडले, ते सारे उत्तरार्धात आंग्रेजी वरवंट्याखाली सपरिवार चेचले जाऊन, अखेर एकटा रंगो बापूजीच छत्रपतीचा प्रतिनिधी वकील म्हणून आंग्रेजी दगाबाजीशी प्राणांतीच्या टकरा द्यायला शिल्लक उरला. याविस्तीर्ण मुकाबल्याचा पार्श्वभाग समजण्यासाठी, थोडेसे मागे जाऊन, छत्रपति, पेशवे नि आंग्रेज यांचे एकमेकांना चीत करण्यासाठी कसकसे डावपेच चालू होते, याचा धावता आढावा या प्रकरणात घ्यायचा आहे.

### नोकराच्या कैदेत धनी

सन १७७७ साली छत्रपति रामराजे यानी धाकटे शाहू ऊर्फ आबासाहेब महाराज याना दत्तक घेतले. हे प्रतापसिंहाचे पिते. शाहू जात्या तल्लख बुद्धीचा शरिराने सुदृढ सशक्त आणि स्वभावानेही मानी होता. पण गादीवर आल्यापासूनच त्याची सारी हयात सातारच्या किल्ल्यावर अटकेदाखल खर्ची पडल्यामुळे, त्याची बुद्धी चमकायला कसलाच अवसर मिळाला नाही. पूर्वीच्या पेशव्यांनी छत्रपति मालकांच्या नाड्या सर्व बाजूंनी आवळलेल्याच होत्या. पण शाहू गादीवर येताच, नाना फडणिसाने त्याचा कोंडमारा विशेषच केला.

``त्यांचे खर्चाचे ऐवज परभारे येणे, ते कशास पाहिजे? जो ऐवज देणे तो पुण्याहून नक्त पाठवावा. कारखाने व कारखानदार यांचा खर्च पाचसहा लक्ष रुपयांचा ऐवज पोचत होता. त्यास लाख रुपयांत खर्च आटोपतो, म्हणून पागा, हत्ती सर्व पुण्यास आणिले. देशमुखी व खासगी गाव यांचेऐवज पुण्यातच घेऊ लागले. महाराजांची अमर्यादा करून चौकीपहारा ठेवून, राजमंडळाचे लोक कोणी जाऊ नये, ऐसे केले. चाकरीच्या बायका दोनचार व लेकावळे दोनचार खेरीज करून सर्वांच्या अडेश्री बंद केल्या. राजपत्रे कागदपत्र होणे याचे काही एक कारण नाही, या प्रमाणे बंदोबस्त केला.'' (रिया. उ. भाग ३ पान ५१३-१४)

वाचकहो, पाहिलात ना हा पेशवाई स्वामीनिष्ठेचा प्रकार? धन्याचा धतुरा नि चोराला मलिदा. ही म्हण, मला वाटते, पेशवाई कारभारावरूनच रूढ झालेली असावी.

सवाई माधवरावाने नाना फडणिसाच्या काचाला कंटाळून आत्महत्या केल्यानंतर, बारभाईच्या नि रावबाजीच्या कारकीर्दीत भटी राजकारणाचा पुण्याला भलताच एळकोट उडाला आणि आंग्रेजी कोळयांच्या जाळयात रावबाजी एकसारखा अडकतच जाऊ लागला. हे पाहून शाहूचे माथे सणाणू लागले आणि तो म-हाठी स्वराज्याच्या भवितव्याचा विचार करू लागला. पण नुसता विचार करून काय उपयोग? हातात ना सत्ता, ना सैन्य, ना खजिना! स्वराज्यातल्या टिंपाड जहागिरदार इनामदारांना जेवढे स्वातंत्र्य, सत्ता नि पैका आणि प्रसंग पडल्यास शेपाचशे बारगीर जमविण्याची हिम्मत होती, तेवढीही बिचा-या या शाहू छत्रपतीला नव्हती.

चतुरसिंगाचा चरफडाट

शाहूचा (औरस भोसले घरचा) धाकटा भाऊ चतुरसिंग भोसले हा शाहूजवळ साता-यासच असे. तक्तनशीन थोरल्या भावाची सर्वांगीण हतबलता आणि परघरमे लछमी दास नात्याने रावबाजीने चालवलेली स्वराज्याची धूळधाण पाहून चतुरसिंग सारखा चरफडत असे. खरोखर, शाहूच्या बदली चतुरसिंग छत्रपती म्हणून गादीवर आला असता, तर म-हाठ्यांच्या इतिहासाला निराळेच सामर्थ्यवान वळण लागले असते. हा देशी परदेशी बखरकारांचा अभिप्राय वावगा नाही. `नोकराच्या कैदखान्यात मळमळीत जिण्याने कणकण झिजून मरण्यापेक्षा, एकादी जबरदस्त टक्कर देऊन त्याचा तरी खातमा करावा अथवा स्वतः तरी मरून जावे.' असे वरचेवर तो शाहूला सुचवीत असे. तसे पाहिले तर, शाहूच्या आवतीभवती चतुरसिंगाच्या बरोबरीचे येलोजी राजे नि संभाजी राजे मोहिते, कुशाबाराजे नि दुर्गोजीराजे महाडीक हे आप्तांपैकी आणि इतर किती तरी प्रभू नि देशस्थ ब्राह्मण तरुण मंडळी छत्रपतीसाठी हव्या त्या धाडसात स्वतःच्या प्राणाचे दिव्य करायला सिद्ध होती. शाहूला हे समजत होते. पण सारी हयात बंदिवासात गेल्यामुळे कमजोर मनाच्या शाहूला या क्रांतिवादी तरुणांच्या धडाडीला एकाकी हो म्हणण्याची छाती होई ना. आणि तेहि वाजवी होते. क्रांतीसाठी धाडसी मंडळी तयार असली तरी क्रांति वठवायला जी अनेकविध साधन-सामुग्री लागते, ती तरी उपलब्ध हवी ना? मुख्य सामुग्री पैशाची आणि तसाच छत्रपतीजवळ फाक्या! एका लौकिकी म-हाठी म्हणीने सांगायचे तर, छत्रपतीजवळ कपाशी टेकायला छत्रपतिसुद्धा मिळण्याची पंचाईत!

पण क्रांतिवाद ही चीज अथवा भावनाच अशी जिव्हाळयाची जादूची आहे की माणूस तिच्या नादाने वेडा झाला म्हणजे तो असले व्यवहारीविवेकाच्या गुंतागुंतीचे धागेदोरे सोडवीत बसत नाही. जिवावर उदार होऊन क्रांतीच्या गर्जना करीत तो घराबाहेर पडतो. हां हां म्हणता त्याच्याभोवती समविचारी मंडळी भराभर गोळा होते आणि जयपजयाची पर्वा न करता, तो क्रांतिवीरांचा संघ प्रतिकाराच्या दणादण टकरा देऊन, आजूबाजूचे वातावरण हादरून सोडतो. म-हाठी स्वराज्याच्या पडत्या काळी, काळालाही कलाटणी देणारे अनेक धाडसी क्रांतिवीर महाराष्ट्रात निपजले. राष्ट्रासाठी देहमनाचा धुरोळा करून झिजले. पण त्यांना यश न मिळाल्यामुळे `बण्डखोर' सदराखाली ते सारे तडफडते जीव इतिहासजमा झाले!

पेशव्याला पायबंद ठोकून, आंग्रेजाना भारतपार हुसकावण्याचा चतुरसिंहाने प्रचंड व्यूह रचला. शेकडो मित्रांचे पाठबळ मिळवले. अखिल भारतीय संघटनेसाठी उभा हिंदुस्थान पायदळी तुडवला. दिल्लीला जाऊन लेक नि मालकम यानाही स्वतः दम भरला. पण काळचक्रच उलटले होते, त्याला तो तरी काय करणार? या वनवासात असतानाच, छत्रपति शाहू वारला आणि रावबाजीने आपल्या पत्नीला नि मुलाला कैद केले, अशी बातमी चतुरसिंगाला लागली. महाराष्ट्रात तो परत येत असता, त्रिंबकजी डेंगळयाच्या दगाबाजीला तो कसा बळी पडला आणि कांगोरीच्या तुरुंगात अखेर मरणाधीन झाला, तो इतिहास वाचकांनी परिशिष्टात पहावा.

`तुम्ही शाहूच, मी थोरला बाजीराव'

धाकटे शाहू महाराज ४ मे १८०८ बुधवारी मरण पावले. तेराव्याच्याच दिवशी १६ मे १८०८ सोमवार रोजी, रावबाजीने प्रतापसिंहाला गादीवर बसविले. `शिक्का बदलेले, तेव्हा आपणही शाहू नावानेच राज्य करावे, आपण थेट थोरले शाहू महाराज मी समजतो आणि मीही थोरल्या बाजीराव साहेबाप्रमाणे आपली सेवा करून राज्याची बढती करीन, स्वामीचा वरदहस्त असावा -' वगैरे गोडगोड बोलून रावबाजीने प्रतापसिंहाला आणि त्याच्या मातोश्रीला अगदी गारेगार करून टाकले. झाले गेले सारे विसरून जा, मी आपला निष्ठावंत सेवक आहे, माझ्यावर स्वामींनी कृपादृष्टी ठेवावी. वगैरे भरपूर साखर पेरून मायलेकराला रावबाजीने अगदी खूष करून टाकले.

प्रारंभी काही दिवस सारे ठाकठीक चालवले. पण थोड्याच दिवसांत रावबाजीची `पालकगिरी' आपला प्रभाव गाजवू लागली. या वेळी प्रतापसिंहाचे वय अवघे १५ वर्षांचे होते. अर्थात सारा पेशवेच पाहणार. कारभार म्हणजे काय? तर `मागील अंकावरून पुढे चालू' होणारा कैदखानाच! रावबाजीने सातारचा कारभार त्रिंबकजी डेंगळयाला सांगितला. त्याच्यातर्फे काशीपंत बंदरे नावाचे ब्राह्मण गृहस्थ सातारा किल्ल्याचे `जेलर' किल्लेदार म्हणून काम पाहू लागले. मोठा आग्यावेताळ होता लेकाचा! काही चारपाच ठरावीक मंडळी शिवाय इतरांना छत्रपतीला भेटायची सोय उरली नाही. किल्ल्यावर आजूबाजूला दिमतीला म्हणून ठेवलेले सारे लोक त्रिंबकजीचे हेर असायचे. प्रतापसिंह काय बोलतो, त्याची आई काय बोलते करते, याची बित्तंबातमी जेव्हाच्या तेव्हा काशीपंताकडे जायची. या राजमंडळातील चिटणीस प्रभृती लोकांनाही किल्ला वर्ज. दरवाजावर कडेकोट पहारा. पेशव्याकडून नेमणूक येईल तेवढ्या पैशात खावे प्यावे नि किल्ल्यावर फेरफटका करावा. हेच नि एवढेच छत्रपतीचे जीवन होते. मातोश्री माईसाहेब (आनंदीबाई) दूरदर्शी, चाणाक्ष आणि तडफदार होत्या. पण त्यांचाही काही इलाज चाले ना. नव-याला पेशव्यानी कसा वागवना नि नागवला. अखेर चतुरसिंग दिराचाही घात कसा केला, वगैरे घडामोडी तिने प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. विवेकाने सर्व अपमान गिळून, तरुण छत्रपतीला ती गुप्तपणाने शहाणपणाच्या चारगोष्टी नित्य शिकवीत असे. छत्रपतीला निर्बुद्ध ठेवण्याचे कारस्थान तर पेशव्याने मोठ्या बंदोबस्ताने चालविले होते. आपला पुत्र निरक्षर राहू नये, म्हणून माईसाहेब त्याल पहाटे दोनअडीच वाजता उठवून शिकवायची आणि चारसाडेचारला परत निजवायची. म्हणजे आजूबाजूच्या कोणाच्या लक्षात ते येत नसे.

छत्रपतिनिष्ठांची गुप्त खलबते

सहा वर्षे किल्ल्यावरील हा कोंडमारा बाहेरचे अनेक छत्रपतिनिष्ठ लोक, आज कमी होईल, उद्या कमी होईल, अशा आशेने सहन करीत होते. अखेर, काहीतरी निर्वाणीचा तोडगा काढल्याशिवाय, छत्रपतीची धडगत दिसत नाही, अशा हेतूने, चाफळचे स्वामी (रामदासाचे दण्डधारी) एक दिवस (सन १८१४ साली) बोरगावास चिटणिसांकडे आले. या मसलतीत विठ्ठलपंत, दाजीबा उपाध्ये, रंगोपंतदादा, सेटिबा देवपुडे आणि रंगो बापूजी वगैरे मंडळी होती. त्यावेळी आंग्रेजांचा अलपिष्टनसाहेब पुण्यास गारपिरावर ठाण मांडून बसला होता आणि पुण्याच्या पेशवाई राजकारणाच्या पायात त्याने अनेक भानगडींचे लंगर अडकविले होते. सन १८०२ सालच्या वसईच्या तहाने पेशवा आंग्रेजांचा जवळजवळ मांडलीकच बनला होता. अशा वेळी युक्तीप्रयुक्तीने खुद्द अलपिष्टनाची पुण्यास भेट घेऊन छत्रपतीची हालहवाल त्याला सांगावी आणि छत्रपतीची सुटका होऊन दौलत त्यांचे हाती येईल, याचा काही पर्याय सापडतो का ते पहावे, यावर या बोरगावच्या बैठकीत खूप खल झाला. सातारा ते पुणे प्रांतात पेशव्याचे नि त्रिंबकीचे हेर रस्त्यावरील खड्यागणिक फैलावलेले असता, पुण्याला जाऊन साहेबाची भेट घ्यायचे काम बिकट नि धाडसाचे होते. ते करायला बैठकवाल्यानी रंगो बापूजीची निवड केली. रंगोबा पक्का धूर्त, प्रसंगावधानी, वेळ मारून नेणारा, नाना वेषांतरे करून निसटणारा, हव्या त्य सबबीवर हवा तेथे घुसणारा आणि मिठ्ठास नि मुद्देसूद गोड बोलून कार्यभाग साधणारा असामी होता. पुण्याची मसलत सफाईत पार पाडील तर तो रंगोबाच, या धोरणाने त्याची नेमणूक केली.

पण इतक्यात एक संधी चालून आली. पेशव्याचे कारभारी चिंतोपंत देशमुख यांचे चिटणीसाकडे एक जरूरीचे पत्र घेऊन स्वार आला. अलपिष्टनकडे वाडीकर सांवताने असे बोलणे लावले की `आम्ही काही पेशव्यांचे चाकर नव्हत. आम्ही स्वतंत्र, आमची दौलत स्वतंत्र, तेव्हा पेशव्यांच्या ब-यावाईटाशी आमचा काही संबंध नाही.' या बाबतीत तुमच्याकडे काही कागदपत्र असल्यास ते घेऊन ताबडतोब पुण्यास यावे, अशी श्रीमंतांची आज्ञा त्या पत्रात होती. चिटणीसानी दप्तरातून या प्रकरणाचे कागद काढून पुण्याला जाण्याची तयारी केली. बरोबर रंगो बापूजीला अगत्याने घेतले.

चिटणीस नि रंगोबा पुण्याला

चिंतोपंत देशमुखाला भेटून दोघांनी रावबाजीची भेट घेतली नि कागद दिले. रावबाजीने ते अलपिष्टनास दाखविले. कोठे मिळाले हे कागद, असे अलपिष्टनाने विचारले, `छत्रपतीचे चिटणीस हे म-हाठशाहीचे कदीम दप्तरदार. त्यांनी आणून दिले.' असे रावबाजीने सांगितले. चिंतोपंताकडून ही हकिकच चिटणीस रंगोबाला समजताच, अलपिष्टन साहेबाची नि आमची भेट कशी होईल याचा मार्ग सांगा, असे दोघांनी चिंतोपंताला विचारले. तो म्हणाला, बाबाजी आंगरे यांचे कारभारी आहेत. त्यांच्याकडे साहेब नेहमी येत जात असतो. त्याला भेटल्यास तुमचे काम होईल. नंदीची आराधना करण्यापेक्षा थेट शंकरालाच गाठले तर काय वाईट, या इराद्याने रंगोबाने चिटणिसाला

एकदम बाबाजी आंग-याकडेच नेले. त्याला हेतू सांगताच तोच त्यांना घेऊन अलपिष्टनाकडे गेला आणि दोघांची रुजुवात करून दिली. कारभारी राहिला एका बाजूला.

अलपिष्टनाशी रंगोबाचे सूतोवाच

``साहेबांनी विचारिले की, माहाराज सरकारानी पेशव्यांस दौलत कशी दिली व कोण्ही कोण्ही दौलतदार वगैरे महाराजापासी राहून चाकरी कसी केली, हे सविस्तर आम्हास कसे कळेल?'' चिटणिसानी सुचविले की, साहेबानी हा मजकूर श्रीमंतास सांगावा आणि त्यांनी परवानगी दिली तर सविस्तर हकिकत शिवाजी महाराजांचे वेळेपासून तो आतापर्यंत बखर लिहून आणतो. रावबाजीचे काय? साहेबाचा शब्द जाताच त्याने बखर तयार करण्याची परवानगी दिली. पुण्यासच चारपाच दिवस रात्र खपून बळवंतराव मल्हार चिटणिसाने मुद्देसूद तपशीलवार बखर लिहून तयार केली आणि रंगो बापूजीला ती घेऊन गारपिरावर साहेबाच्या भेटीला पाठवून दिला. या भेटीत रंगोबाने संधि पाहून, प्रतापसिंह छत्रपतीच्या कोंडमा-याविषयी साहेबाला सविस्तर वृत्त सांगितले. हरएक यत्न करून महाराजांची आम्हाला सुटका करून त्यांची दौलत त्यांच्या हाती येईल, असे करावयाचे आहे. हा मुद्दा ऐकून अलपिष्टन म्हणाला, `तुमचा हेतू रास्त आहे. पण तुमच्या खटपटीना छत्रपतीचा पाठिंबा हे का नाही?' त्यावर रंगोबाने जबाब दिला की, `छत्रपतींची नि आमची गाठभेट होण्याचीच पंचाईत?' तेव्हा साहेबाने सूचना केली की, धाडसाशिवाय काय होणार आहे? कसेही करून छत्रपतीची या राजकारणाबाबत आम्हाला चिठ्ठी घेऊन या, मग विचार ठरवता येईल.

किल्ल्याचा भेद घेण्याचे कारस्थान

रंगोबा नि चिटणीस परत जैतापुराला आले. चफळच्या स्वामींना बोलावून घेतले. मसलतीची बैठक बसली. किल्ल्यावर रोज निर्धोक जाणारे येणारे कोण? तर तात्या नारोळकर वैद्य, कृष्णाबाई, नरसू काकडे आणि खंडेराव महाराजे शिर्के, मंडळी सातारला येऊन नारोळकर वैद्याला भेटली आणि इंग्रेजांकडे राजकारण चालू केले. असा गुप्त संदेश प्रतापसिंहाकडे त्याच्याबरोबर पाठविला. मसलत करणा-यांपैकी कोणीतरी किल्ल्यावर आला पाहिजे, म्हणून रंगोपंतदादानी नरसू काकडे, नारोळकर प्रभूति मंडळीशी रंगो बापूजीचा परिचय करून दिला आणि उद्या त्याला किल्ल्यावर पाठवतो, तो नारोळकरांना येऊन गुप्त वेषाने भेटेल, आज संध्याकाळी महाराजांना तुम्ही गुप्त सूचना देऊन ठेवावी आणि उद्या रंगोबा येताच, साहेबास खात्री पटण्यासाठी महाराजांचे हातची चिठी घेऊन त्याच्याजवळ द्यावी, असे ठरले.

मंगळीच्या दर्शनाला गोसावी चालला

चाफळकर स्वामींनी आपली कफनी झोळी माळा उतरून रंगोबाला गोसाव्याचा वेष दिला आणि स्वतः प्रतापसिंहाला खात्री पटण्यासाठी स्वदस्तुरची एक चिठी दिली. जयजय रघुवीर समर्थच्या गर्जना करीत रंगोबा गोसावी किल्ल्याच्या दरवाजावर येताच पहारेक-यांनी चौकशी केली. `बाबा, श्री मंगळी देवी तुझे कल्याण करील. मी तिच्याच दर्शनाला जात आहे.' अशी बतावणी करून हा गोसावी किल्ल्याच्या आत तर घुसलाच. तात्या नारोळकराला स्वामीची खुणेची खुणेची चिठी दिली. त्याने ती प्रतापसिंहाक़डे नेऊन दाखवली. खात्री पटताच महाराजांनी आपली चिठ्ठी नारोळकराजवळ दिली न त्याने ती रंगोबा गोसाव्याच्या झोळीत टाकली. काम झाले!

काम कसले झाले? किल्ल्यातून चिठ्ठीसह निसटण्याचे कर्म महाकठीण होते. चिठ्ठी उघडकीला आली का सगळय कटबाजांच्या माना तर लटकणारच फासावर, पण बिचा-या प्रतापसिंहाचीही धडगत उरायची नाही. रंगोबाने एका बाजूला जाऊन आपल्या पायाची पोटरी चिरली. त्यात छत्रपतीची चिठ्ठी लपवून, वर चुना, झाडपाल्याचा चेचलेला पेण्ड बांधून, कुतरे चावल्याचा बहाणा करीत लंगडत लंगडत आमचा गोसावी परत जाण्यासाठी दरवाज्यावर ला. पाहतो तो काय! नुकतेच शहरातून वर परत आलेले किल्लेदार काशीपंत बंदरे समोर दरवाजावरच उभे! गोसाव्याला पाहताच स्वारी उखडली. केव्हा आला? कोणी आत सोडला? वगैरे चौकशीच्या डरकाळया फोडू लागली. शिव्यागाळीची सरबत्ती झडू लागली. फितुरीच्या संशयावरून काशीपंताने चिंचेच्या फोका आणवून गोसाव्याला सडकून काढला. पण तो कसलाच काही थांगपत्ता लागू देईना. ``मी गरीब रामदासी गोसावी. देवी मंगळाईच्या दर्शनाला आलो होतो.'' या पलिकडे एक शब्दही तो सांगे ना. कचेरीत गेल्यावर काशीपंताने पुन्हा कारकून पाठवून आणखी एकदा कस्सून झाडा घेतला. काही सापडले नाही. दोन दिवस अन्पाण्याशिवाय चौकीवर अटकेत ठेवण्याचा हुकूम दिला.

मित्रांच्या तोंडचे पाणी पळाले

किल्ल्यावर काशीपंताने एका गोसाव्याला पकडून चोप दिला नि अटकेत ठेवला आहे, ही बातमी सगळीकडे फैलावली. रंगोबा सापडला म्हणून जैतापुराला स्वामी चिटणीस विठ्ठलपंत रंगोपंतदादा कपाळाला हात लावून बसले. दोन दिवस ना स्नान ना अन्न. स्वामींनी तर देव पाण्यात घालून समर्थांना साकडे घातले. रंगोबा फुटला का सगळयांचीच कपाळे फुटणार, असा भयंकर प्रसंग होता. यात स्वामीकंपू तर सापडणारच, पण त्यांच्यावर उपकार करायला गेलेल्या तात्या नारोळकरादि असामीनाही प्रायश्चित घेण्याची ती पाळी होती. अर्थात सगळा कटच उघडकीला आल्यावर छत्रपतीच्या संभाव्य अवहेलनेची कल्पनाच केलेली बरी.

जय जय रघुवीर समर्थ

दोन दिवस अन्नपाण्याशिवाय तळमळत ठेऊनहि हा गोसावडा काही कबूल करीत नाही, तेव्हा काशीपंताने `गरीब वेडा भिकारी' समजून त्याला किल्ल्याबाहेर हाकून दिले. रंगोबा त्याच पावली उपाशीतापाशी तड माहुलीहून जरंड्याच्या डोंगराकडून जैतापुराला गेला. पायाला जखम, रक्त वहातच आहे, चालवत नाही, तशात दोन दिवसांचा उपाशी, अशा अवस्थेत चिटणिसांच्या घराच्या अंगणात तो आला आणि मोठ्याने जय जय रघुवीर समर्थ अशी गर्जना केली. स्वामी वगैरे मंडळी बाहेर येऊन पाहतात तो रंगोबा गोसावी! स्वामीनी धावत जाऊन मिठी मारली नि उत्कंठेने विचारले, `रंगोबा क्षेम आहे ना?' त्याने निश्चयदर्शक होकाराची मान हालवताच, स्वामीनी मोठ्या ललकारीने –

समर्थाचिया सेवका वक्र पाहे<br>
असा सर्व भूमंडळी कोण आहे<br>
जयाची लिलावर्णिती लोक तीनी<br>
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

हा श्लोक गर्जून म्हटला. चिटणिसादि मंडळी धाऊन आली. सर्व घडली हकिकत रंगोबाने सांगितली. ``स्वामीनी मला पोटासी धरून नेत्रातून पाणी आंगावर टाकिले. फार श्रमी सर्वत्र जाहले. आणि बोलिले की आज कासीपंताना चिंचेच्या फोका व बेडी वगैरे जरब देणे ती दिल्ही. परंतु तू कोणाचे नाव न घेता सर्वांचा बचाव केलास व माहाराजाची हातची चिठी पायाचे मणगटास बांधून आणली, हो गोष्ट श्रीनी मोठी केली. बरे, माहाराजाचे पायास तू मळ लाविला नाहीस. मोठे संकटातून पार पाडिलेस. नाहीपेक्षा प्राण चिटणिसानी व आम्ही व ज्याची नावे कळती त्याणी देणे आला होता. विठलपंतबाबा इत्यादि तू आज वाचविलेस, ये वेळेस बक्षिस तुला काय द्यावे बोलिले.''

सचिवपंताने गिळलेले माझे वतन मला परत मिळाले का तेच बक्षिस, असे रंगोबा म्हणताच, `श्रीस्वामीनी श्रीरामाची पूजा करतेवेळी शफत वाहून तुळशी देवावरील दिल्या आणि सांगितले की हे वचन आज माहाराजानीच दिल्हे असे समज. हे वतन माहाराज चालवितील. तुझे वतन हरप्रयत्न घेऊन देऊ बोलले व चिटणीसाकडून व बाबाकडूनही वचन रंगोपंतदादाचे साक्षीने देविले.'

रंगोबा चिठ्ठी घेऊन पुण्याला

`चिठ्ठी फक्त साहेबाला दाखव, बाळाजीपंत नातूला तिचा मागमूसही लागू देऊ नकोस.' अशी सूचना देऊन स्वामीनी रंगोबाला अलपिष्टनाच्या भेटीसाठी पुण्याला रवाना केले. तो तडक गारपिरावर गेला. तेथे त्याच्या ओळखीचा एक चपराशी भेटला. त्याच्यामार्फत, `मी आलो आहे, भेट पाहिजे, काम नाजूक आहे, नातू गेल्यावर भेटीला बोलवावे.' असा साहेबाला आत निरोप धाडला. त्याने लगेच रंगोबाला आत बोलावले नि इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर, `आमची खान्याची वेळ झाली, तुम्ही ता जा, या कारकुनाला बसू द्या येथेच,' असे नातूला सांगून त्याला घालविले.

`बोला आता,' अशी अलपिष्टनाने प्रस्तावना करताच, रंगोबाने पायाची पट्टी सोडून छत्रपतीच्या स्वदस्तुरची चिठ्ठी बाहेर काढून साहेबाला दिली नि घडली हकिकत सारी सांगितली. रंगोबाच्या धाडसाने अलपिष्टन चकितच झाला. त्याने त्याची वाहवा केली. पाठ थोपटचली. एका पुस्तकात रंगोबाचे नाव, गाव, पत्ता व इतर हकिकत त्रोटक लिहून घेतली आणि त्याला पाच मोहरा इनाम दिल्या.*१

नंतर `मी आपल्याला भेटलो, चिठ्ठी दिली, याची लेखी पोच द्यावी.' असे रंगोबाने म्हटल्यावरून अलपिष्टनाने चिठ्ठी लिहून दिली की सर्व वृत्तांत समजला. आमची खात्री झाली हे. त्याने रंगोबाला सूचना दिली की चिठ्ठीचा मजकूर नातूला सांगू नये. त्यावर रंगोबा म्हणाला की साहेबाने काळजी करू नये. स्वामी कोण, त्यांची हकिकत काय, वगैरे गोष्टी साहेबाने मला विचारल्या, ते छत्रपतींचे गुरु असे सांगताच, टोपी काढून स्वामीना सलाम दिला, हीच थाप मी नातूला देतो. नंतर साहेबाने चिटणिसादि मंडळींना आमचा सलाम सांगावा असे बोलून रंगोबाला निरोप दिला. रंगोबाने मागितली म्हणून छत्रपतीची चिठ्ठीही त्याने परत केली.

परतताना शिरवळास झाडझाडती

साहेबाने दिलेली चिठ्ठी तेलात भिजवून, युक्तीने बनवलेल्या लाखेच्या पोकळ गोळीत ती ठेवली आणि वर चांगला चुना लेपून, चुनाळयाच्या डबीत बुडाशी लपवून ठेवली. नंतर रंगोबा बाळाजीपंत नातूला भेटला. त्याने त्याला का बाजूला नेऊन, साहेबाशी काय काय राजकारण केले, त्याची खोदखोदून चौकशी केली. काशीबंत बंद-याच्या चिंचेच्या फोकाला जो रंगोबा बधला नाही तो काय नातूला दाद देतो? नातूनेही त्याला एक चिठी दिली आणि तो साता-याकडे परत फिरला. वाटेत शिरवळच्या नदीवर येणा-या जाणा-यांची कसून झडती घेण्याचे काम शिपायी करीत होते. नातूची चिठी बटव्यात होती. ती चटकन काढून तंबाखू खाल्ल्याच्या बहाण्याने रंगोबाने पटकन तोंडात टाकली नि गिळून फस्त केली. नंतर झडती दिली नि सुटला. आंगावरचे सारे कपडे फेकून देऊन, भिका-याचे सोंग घेतले नि मार्ग चालू लागला. श्रीमहादेवाकडून चाफळास आल्यावर स्वामी प्रभृतींची भेटी होऊन, छत्रपतीची चिठ्ठी, साहेबानी दिलेली चिठ्ठी नि पाच मोहरा त्यांच्या हवाली केल्या.

मसलतदाराना छत्रपतीच्या सूचना

चाफळाहून स्वामीकंपू सातारला येऊन, ठरलेल्या व्यक्तीच्या तोंडून घडल्या सगळया हकिकतीचे वृत्त थेट प्रतापसिंह नि मातोश्री माईसाहेब यांना गुप्तपणाने कळविण्यात आले. त्यांचा परत निरोप आला की `चिटणीस वगैरे पुरातन सरकार पदरचे. या समई सेवा करून दाखववावी. परंतु आपला बचाव करून करणे ते करावे. स्वामीसही विनंती करावी की श्रीची प्रार्थना करावी... हाली आम्हापासी राजकारण प्रकर्णी काही कागद साधनी वगैरे होते. ते कागद आम्हास आंदेशा येऊन, सारे खोलीत एकीकडे बसून, जाळून पाणी करून टाकिले, अशी अडचण आहे. तरी जपून अंगावर न येता सावधगिरीने करणे ते करावे. तूर्त तुम्हाला पुरा आश्रयही तेथे कोणाचा नाही (परंतु) ही मसलत सेवटास न्यावी. सर्व दौलत स्वामीचीच (रामदासांच्या गादीची) आहे. ते जे करतील ते आमचे कल्याणाचेच करतील हा भरंसा मला आहे.' मातोश्री माईसाहेब नि प्रतापसिंह यांचा हा निरोप आल्यामुळे, स्वामीना दीडबोट मांस चढले. छत्रपतीसाठी हव्या त्या धाडसात उडी घ्यायला रंगोबाही फुरफुरू लागला. तेव्हा स्वामीनी त्याला इषारा दिला - ``बातमी फार नाजूक जिवावरील आहे. बहुत तजविजेने रहावे. लाहान माणसाची संगत असल्यास करू नये, कारण माणूस स्नेह्यापासी बोलते. त्यात ही गोष्ट निघाली म्हणजे घात होईल.''

स्वामी-चिटणीस कंपूच्या वतीने चिटणिसाच्या नि रंगोबाच्या पुण्याला येरझारा चालू आहेत, तेव्हा कसले तरी राजकारण शिजत आहे, असा बिनचूक कयास काशीपंताने बांधला आणि किल्ल्याचा बंदोबस्त कडवा राखून, वर आणि खाली शहरात पटाईत हेरांच्या टोळया जागोजाग पेरून ठेवल्या. तिकडे पुण्याचेहि वातावरण बरेच बघडत चालले होते. सातारा ते पुणे फितुरांचा सुळसुळाट उडाला होता. सातारा किल्ल्यावरचे राजकारण पुण्यास गारपिरापर्यंत भिडल्याची शंका रावबाजीला येऊ लागली होती. बाळाजीपंत नातूकडून या विषयी काही सुगावा घेण्याचा त्याने पुष्कळ यत्न केला. पण त्याने कानावर हात ठेवले. बळवंत मल्हार चिटणिसाने अलपिष्टनाला जी बखर लिहून दिली होती. तिचा इंग्रेजी तरजुमा करण्याचे आणि वास्तव अवास्तव तपासण्याचे काम नातूकडे होते. एके रात्री चिटणीस ज्या वाड्यात उतरत असत, तेथे नातू नि चिटणीस कागदपत्र पहात बसले असता, २५ शिपायी बरोबर घेऊन त्रिंबकजीने वाड्याला वेढा घातला. मुद्देमालासह दोघानाही पकडून श्रीमंतापुढे उभे करावे, असा हा डाव होता. पण गराड्याची चाहूल लागताच, गडबडीने कागद गुंडाळून, वाड्याच्या मागील परसाच्या भिंताडावरून उडी मारून चिटणीस नातू पसार झाले. यावरून आपले राजकारण रावबाजीला कळले, एवढी अटकळ स्वामीकंपूने बांधली.

पेशवे आंग्रेज हातघाईवर

गंगाधर शास्त्र्यांच्या खुनापासून पेशवे नि आंग्रेज यांची दोस्ती बरीच चिघळू लागली होती. १३ जून १८१७च्या तहाने तर रावबाजीचे म-हाठशाहीतले सारे वजन नष्ट होऊन तो एक लहानसा संस्थानिक बनला. हरोज रावबाजीच्या नि अलपिष्टनाच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष कलागति चालू झाल्या. छत्रपतीच्या राजकारणाचा सोक्षमोक्ष साधायची हीस संधि, असा विचार करून, रंगोबा पुण्यास अलपिष्टनला भेटला. `बाजीरावचा नि आमचा नुकताच तह झाला आहे. त्यातत्याने जर बिघाड केला, तर महाराजाशी दोस्ती पुरी करायची किंवा कसे ते सांगता येईल.' असा अलपिष्टनाने खुलासा केला.

रंगोबा साहेब, इतक्या दिवसाचा तुमचेवर टाकलेला भरवसा एका शब्दात तुम्ही वा-यावर उडवू दिलात! या निसरड्या बोलण्याने आमचा बचाव कसा होणार? पेशव्यांच्या अटकेतून छत्रपती महाराजेची मुक्तता करून, त्यांच्या दौलतीचा बंदोबस्त आपण कराल, या आशेवर एवढे राजकारण आम्ही केले. पेशवे तर लागले वाटेला.

अलपिष्टन –तुम्ही निराश होऊ नका. बाजीराव तहाला धुडकावण्याच्या कारवाया करीत आहे. आमची सक्त नजर आहे. किंचित त्याने अटकळ केली पुरे का आम्ही पाहून घेतो. तुम्ही धीर धरावा. योग्य वेळी सब कुठ ठीक होजायगा. महाराज सबका धणी है.

रंगोबा साता-यास परत येऊन झाला मजकूर किल्ल्यावर महाराजांना कळविण्यात आला. पण उलट निरोप काहीच आला नाही. सारी मंडळी पुण्याकडच्या हालचालीकडे लक्ष लावून बसली.

टीप *१ –मोठी मंडळी असली बक्षिसे नेहमी योग्य माणसाला देत असतात. तसात रंगो बापूजीने स्वामीकार्यासाठी घेतलेले श्रम आणि धाडस केव्हाही कोणी कौतुक करण्यासारखेच होते. अलपिष्टनाने पाच मोहरा देऊन रंगोबाला शाबासकी दिली. यात नवलाला जागाच कोठे आहे? तसे काही त्याने केले नसे तरच आपण म्हटले असते का लेकाचा शुद्ध कोरडा पाषाण खरा! या पाच मोहोरांच्या मुद्यावर ठाणे येथील एक मयत संशोधक भावे यांनी आपल्या एका मराठी दप्तर रुमालात. `रंगो बापूजीने पाच मोहरा घेऊन स्वराज्याची भाड खाल्ली.' अशा अर्थाचे चित्पावनी गरळ ओकले आहे. या को. ब्रा. भटांचा पिण्डच मुळी असा का त्याना आपल्या जातीशिवाय इतरांचे गुण घेण्याचा धर्मच माहीत नाही. चित्पावनेतरांच्या खोडसाळ निंदेनेच ते आपल्या जातभाईंचा इतिहास रंगवण्याचे कर्म करीत असतात. रंगोबाने अलपिष्टनाच्या पाच मोहरा घेऊन स्वराज्यविक्रीची बोहाणी केली, आणि दक्षिण महाराष्ट्रातल्या पटवर्धनादि चित्पावन संस्थानिकांनी पेशवाई हयात असतानाच कुंफणीच्या पंखाखाली जाऊन कसल्या कर्माचे दिवे लावले?

## प्रकरण ३ रे
## राज्यक्रांतीच्या शेवटल्या घटका

रावबाजीचे आसन डळमळू लागले आणि तो भराभर आंग्रेजी जाळयात अडकत चालला, तेव्हा स्वराज्याचे काय होणार या विवंचनेनेच छत्रपतींनी किल्ल्याबाहेरेच्या आपल्या निष्ठावंत मंडळीतर्फे आंग्रेजाकडे मसलतीचे संधान बांधले, हे आपण मागील प्रकरणात पाहिले. सन १८१७ साल उजाडताच आंग्रेजांचा जोर वाढला. १३ जून १८१७च्या तहामुळे, आपल्याच हाताने आपल्या सत्तेखाली आपण सुरूंग लावून घेतला, या स्पष्ट जाणिवेने रावबाजी अस्वस्थ झाला. आपले सारे सरदार सरंजामदार, इनामदार, जहागिरदार आपल्या अंमदानीला कंटाळून, स्वतःच्या साधनासाठी, आंग्रेजांच्या संधानी लागले; इतकेच नव्हे तर खुद्द छत्रपतींचीही आंग्रेजांकडे राजकारणे चालू झाली. तेव्हा आता उरले तरी काय? लोकसंग्रहाचा पाठिंबा गेला. खुद्द धन्यालाही बेमुर्वतीने वागवल्यामुळे, त्याच्याही भरवशाला आपण मुकलो. आता पेशवाई म्हणजे अलपिष्टनाच्या सुस्का-याचा लहरी खेळ आहे!

छत्रपतींना कसेही करून आपल्या बाजूला प्रसन्न करून घेतले तर त्यांच्या नावासाठी नि मुर्वतीसाठी तरी बिथरलेली सरदार मंडळी एकवटून आपल्याला आंग्रेजांशी अखेरचा निर्वाणीचा मुकाबला देता येईल, असा बेत ठरवून, अधिक श्रावण मासाच्या धार्मिक निमित्ताने रावबाजी माहुलीला तीर्थस्नानास गेला. महाराजांकडे मोठ्या आदबीचा निरोप पाठवून, त्यांना सपरिवार माहुलीला येण्याचे निमंत्रण दिले. प्रतापसिंह, त्यांचे दोन धाकटे भाऊ नि मातोश्री आनंदीबाई यांना मोठ्या थाटामाटाने वाजतगाजत माहुलीला आणले. स्वतः अनवाणी पुढे जाऊन महाराजांचे स्वागत केले. तीर्थस्नानांचा बादशाही थाट केला. मेजवान्यांची झोड उडवून देऊन, महाराजांचे नि परिवाराचे मन अगदी निहायत खूष करून टाकले. साता-याचे कारभारी नि किल्ल्यावरचे नोकर लोकच पाजी नि हरामखोर, पेशवा फार सज्जन, निर्मळ मनाचा, आदबदार, असा देखावा रावबाजीने निर्माण केला. प्रतापसिंह नि माईसाहेब अगदी प्रसन्न असल्याची संधी पाहून, रावबाजीने त्यांच्या जवळ राजकारणाची भाषा काढली.

“इंग्रेजांशी तह केला. चूक झाली ती. रयतेला त्रास होत आहे. बंडाळी फार माजली. बारीकसारीक इनामदारसुद्धा आंग्रेजांशी संगनमत होऊन दौलतीशी फटकून वागत आहेत. आंग्रेज त्यांना आतून फूस देत आहेत. माझे काहीही होवो, पण महाराजांची दौलत राखण्यासाठी, आंग्रेजांचा काटा काढलाच पाहिजे. महाराजांचे बाबतीत आतापावेतो माझे वर्तन दोषी असेच झाले. सेवकाचे अपराध खावंदांनी मायपोट करून क्षमावे. आंग्रेजांची खोडकी मोडल्यावर, सारा कारभार महाराजांवर सोपवून, त्यांच्या आज्ञेबाहेर वागायचे नाही, अशी मी शपथ घेतो.”

डोक्याचे पागोटे काढून रावबाजीने प्रातपसिंहाच्या पायावर ठेवले आणि तो आसवे ढाळू लागला. पोटात शिरून मतलब साधण्याच्या कामी रावबाजीसारखा नट त्याचा तोच. प्रतापसिंह, विशेषतः त्याची आई आनंदीबाई त्याला पुरी ओळखून होती. त्यांनी हो ला हो ठोकून वेळ मारून नेली. आंग्रेजी संधानाबाबत महाराज काही तरी बोलतील. असा रावबाजीचा अंदाज होता. पण तो फोल ठरला. मायलेकारांनी कसलाच काही थांग त्याला लागू दिला नाही.

महाराज आपल्या जाळयात आले, अशा कल्पनेने, ‘आंग्रेजांशी लढाई आम्ही पुकारणार, तेव्हा महाराजांनी सुरक्षिततेसाठी वासोटा किल्ल्यावर जाऊन रहावे आणि आमचा निरोप येताच आम्हाला छावणीत येऊन मिळावे.’ असे सांगून, रावबाजी गेला. पेशव्याच्या या मानभावी मनधरणीची आईसाहेबांनी आपल्या खास विश्वासातल्या मंडळींशी वाटाघाट करून, ‘सध्या स्वस्थ बसावे, आंग्रेजांकडील मसलत चालूच ठेवावी, वेळ प्रसंग पडेल तसे आयत्या वेळी वागावे.’ असा निर्णय घेतला.

**लढावे की न लढावे?**

पुण्यास जाऊन रावबाजी सैन्याची जमवाजमव करू लागला. एकट्या बापू गोखल्याशिवाय इतर कोणीही सरदार आंग्रेजांशी लढाईचा प्रसंग आणायचा सल्ला देई ना. लढावे की न लढावे, असा रावबाजीपुढे हॅमलेटी प्रश्न पडला. अतिप्रसंग येण्यापूर्वी साहेबाला बनवता येईल की काय हे पहाण्यासाठी ता. १४ ऑक्टोबर १८१७ मंगळवारी रावबाजी अलपिष्टनच्या भेटीला गेला. ही त्याची शेवटचीच भेट ठरली. “साहेब, तुमचे आमचे ऐक्यतेस किती संवत्सरे झाली? आगम निगम भूत भविष्य पाहून तुम्हाशी ऐक्यता केली. ते समई करार मदार, कितेक कामाच्या तजविजी करून रूपास आणावे त्याचा जिम्मा तुम्ही सर्व प्रकारे करता, आजतागाईत काय झाले याचे स्मरण करावे. इतके तुम्ही करीत असता तुमचे मानस मी कदापि तोडले नाही. येणेकरून ऐश्वर्य अथवा जो पदार्थ माझे अंगी होता तो तेजोहीन झाला. मी मूळ मंत्रावेगळा तुमचे करण्यांनी झालो. जो मी होतो तो आज नाही. तुम्ही कशास पुसता? तुमचे स्नेहाची जोड मात्र केली की जी कला अंगी होती ती दवडून बसलो.” असे रावबाजी पुष्कळ बोलला. साहेबाने सारे हसण्यावारीच नेले. आज विसाव्या शतकाच्या पाचव्या दशकातही आम्हाला आंग्रेज प्राण्याच्या अंतःकरणाचा नीटसा ठावठिकाणा उमगत नाही, तर तो बिचा-या रावबाजीला काय किंवा प्रतापसिंहाला काय, लागला नाही. म्हणून त्यांना दोष देण्यात काय अर्थ?

**ठिणगी पडली – आग भडकली.**

१८१७ चा नोव्हेंबर महिना पेशव्यांच्या कुंडलीत फार खराब असावा. पेशवा आणि आंग्रेज दोघेही, प्रथम अटकळ कोण करतो, याची वाट पहात असतानाच,
२ नोव्हेंबर रविवारी, ले. शॉ. नावाचा एक आंग्रेज अधिकारी गणेशखिंडीकडून जात असता, विश्रामसिंग नावाच्या पेशव्याच्या नाईकाची नि त्याची बोलाचाली होऊन, विश्रामसिंगाने त्याला भाला मारून जखमी केले. ही आगळीक होताच, आंग्रेजांनी उठाव केला. २ तारखेला खडकीची, १५ तारखेला

घोरपडीची लढाई होऊन, १७ तारखेला सोमवारी आंग्रेजांच्या पलटणी पुणे शहरात घुसल्या आणि बाळाजीपंत नातूने शनवार वाड्यावरचा म-हाठ्यांचा भगवा झेंडा दूर भिरकावून आंग्रेजांचा युनियन जॅक बावटा फडकवण्याची कामगिरी बजावली. पुणे पडले. पेशवा पसार झाला. तमाम महाराष्ट्रात हाहाकार उडाला. पेशवा पुढे पळतो आहे, आंग्रेज गब्रू त्याच्या पाठलागावर धावताहेत, मधून मधून दोघांच्या सैन्याच्या चकमकी झडताहेत. असा क्रम १८१८च्या फेब्रुवारीच्या अखेरीपर्यंत चालला.

पुणे पडले – पुढे काय?

या सर्व भानगडी होत असताना, छत्रपतिनिष्ठांचा कंपू स्वस्थ बसला नव्हता. सातारा किल्ल्यावरून माहुलीला जातानाच प्रतापसिंहाने, किल्ल्याबाहेरील आपल्या खटपट्यांशी प्रत्यक्ष संबंध जोडण्याचा यत्न केला. महाराज किल्ल्यातून बाहेर पडताना, एकाकी त्यांच्या बोटातली हि-याची आंगठी कोठेतरी गळून पडल्याची अफवा फैलावला. पेशवा माहुलीला जाताच, चाफळच्या स्वामीलाही महाराजांनी भेटायला आणण्याची तरतूद केली होती. पण ते जमले नाही. इकडे रंगो बापूजी नि चिटणीस यांच्या पुण्याला खेपा चालू असतानाच, विठ्ठलपंत (विठ्ठल बल्लाळ महाजनी फडणीस), दाजीबा उपाध्ये नि तात्या नारोळकर यांच्या सल्ल्यानुसार, नरसू काकडे जामदार या छत्रपतीच्या खास दिमतीतल्या. इमानी इसमाला, रंगोबाने शिजत घातलेल्या राजकारणाचा ठाव पहाण्यासाठी प्रतापसिंहाने, आलपिष्टन आणि थेट मुंबईच्या गव्हर्नरकडे पाठविले. दोघांनीही काकडे याजबरोबर निरोप पाठविला की, ‘‘तुम्ही आपल्या राज्याविषयी फिकीर करू नये, थोड्याच दिवसांत आपल्या मनोदयानुरूप आपला बंदोबस्त होईल. असे महाराजास सांगावे.’’

माहुलीस महाराजांचा निरोप घेताना, रावबाजीने आपल्या कारभा-यांना, महाराजांची सपरिवार वासोटा किल्ल्यावर रवानगी करण्याचे हुकूम दिले होते. इतकेच नव्हे तर, यदाकदाचित आंग्रेजांनी एकाकी वासोट्याला वेढा देऊन छत्रपतींची सुटका करण्याचा घाट घातला तर मागेपुढे न पहाता, छत्रपतींची परिवारासह एकदम कत्तल करावी, असेही गुप्त हुकूम सोडले होते. खडकीच्या लढाईची (५-११-१८१७) बातमी येताच, कारभा-यांनी छत्रपतींना त्यांच्या खुषी नाखुषीची पर्वा न करता, सातारा किल्ल्यावरून काढले आणि ९ नोव्हेंबर रविवारी त्यांना सपरिवार वासोटा किल्ल्यावर आणून कडक बंदोबस्ताने ठेवले. आंग्रेजाशी चाललेल्या छत्रपतीच्या संधानाची कुणकुण रावबाजीला लागल्यामुळे, हवा तो भीमप्रयत्न करून छत्रपति त्यांच्या हाती जाऊ द्यायचा नाही, हा रावबाजीचा यत्न आणि आपली तर पेशव्याच्या कचाट्यातून सुटका व्हावी, हा छत्रपतीचा नि त्यांच्या बाजूच्या मंडळींचा यत्न, अशी ही चुरशीची शर्यतच चालू झाली.

घोरपडीच्या लढाईच्या दिवशी रंगोबापूजी पुण्यातच होता. त्याने अलपिष्टनाची गाठ घेऊन महाराजांना वासोट्याला आणून ठेवल्याची खबर दिली. साहेब म्हणाला, ‘‘थोड्याच दिवसांत आमची पलटणे माहुलीला येतील, तेव्हा योग्य दिसेल तो बंदोबस्त करू.’’ रंगोबा परत साता-याला येतो, तो निंबाच्या पाराजवळच चिटणीस गडबडीने पुण्याला जाताना भेटले. त्यांच्याजवळ छत्रपतीची हि-याची आंगठी*१ खुणेसाठी बरोबर घेतली होती आणि रावबाजीने प्रसंग पडल्यास छत्रपतींची कत्तल करण्याचे हुकमाची कुणकुण ते अलपिष्टनाच्या कानावर घालून, पुढे काय करणार, याचा नक्की ठराव करायला जलदीने जात असल्याचे रंगोबाला समजले. पाठोपाठ नरसू काकडेही वेषांतर करून पुण्याला जाताना भेटला.

अलपिष्टनाने दोघांच्याही बातम्या ऐकून घेतल्या. ‘‘वासोट्यावर आमचा हल्ला गेला नाही, तर पेशवा छत्रपतींना आपल्या सैन्यात घेऊन जाणार आहे. ठीक आहे, आम्ही वासोट्याच्या वाटेला जातच नाही. बाजीरावाची नि आमची कोठेतरी लढाई होईलच. तेव्हा महाराजांनी अक्कलहुशारीने पेशव्याच्या छावणीतून आमच्या सैन्यात येऊन मिळावे.’’अशी अलपिष्टनाने तरकीब सुचवून चिटणिसाला प्रतापसिंहाच्या अगदी नजीक राहण्याची सूचना देऊन परत जायला सांगितले आणि हा निरोप गुप्तपणाने महाराजांना कळवून त्यांची तयारी करण्याची मसलत तडीला नेण्यासाठी नरसू काकड्याला पाठोपाठ परत पाठविले.

छत्रपतीची फरफटणी

पुणे सर केल्यानंतर आंग्रेजी फौजा पेशव्याच्या मागे लागल्या आहेत, ठिकठिकाणी त्याच्या सरदारांच्या नि आंग्रेजांच्या खडाजंगीच्या चकमकी झडत आहेत, बापू गोखल्यासारखे काही वीर आंग्रेजांशी ठासून तोंड देण्याची शिकस्त करीत आहेत, पण खुद्द पेशवाच धड एक्या जागी नेटाने उभा न

रहाता वाट फुटेल तिकडे धूम जीव घेऊन पळत सुटला आहे, अशा अवस्थेत म-हाठी सैन्याचा आंग्रेजांपुढे टिकाव लागे ना. २ डिसेंबर १८१७ला रावबाजीने छत्रपतीला पत्र लिहून छावणीत दाखल होण्याची विनंती केली. १४ डिसेंबर रोजी प्रतापसिंह, दोघे भाऊ नि आईसाहेब आपल्या परिवारांसह गारदौंडाजवळ सिद्धटेक येथे पेशव्याच्या लष्करात दाखल झाले. (अथवा 'दाखल केले' असे म्हणणे सार्थ होईल.) या दिवसापासून तो २० फेब्रुवारी १८१८ला गोपाळ आष्टीची लढाई होईपर्यंत पेशव्याच्या बेसुमार पळणीबरोबर त्या बिचा-यांची एकसारखी फरफटणी चालूच होती. याच धावपळीत 'पंधरा दिवसांच्या आत तुम्हाला साता-यास पोचवतो' असा अलपिष्टनाचा नरसू काकड्यामार्फत महाराजांनी निरोप आला.

बापू गोखल्याच्या पराक्रम

१९ फेब्रुवारीला रावबाजी गोपाळ आष्टीच्या मुक्कामावर असताना, जनरस स्मिथने पेशव्याच्या छावणीवर चाल केली. बापू गोखले धावत आले. रावबाजी जेवायला बसला होता. "श्रीमंत, इंग्रज जवळ आले आहेत. आता आपण पळू नये. आमच्या मागे जरा ठासून उभे रहाल, तर तरवारीची शर्थ करून त्यांना पुरे पडतो." असे सांगितले. भोजनप्रिय रावबाजी गोखल्याच्या अंगावर खेकसून म्हणाले - "आजवर तुम्ही लढाईची मसलत दिलीत आणि आता आम्हाला सुखाने जेऊनसुद्धा देत नाही. असेच आमचे संरक्षण करणार की काय?" बापूने तडाड जबाब दिला. - "श्रीमंत, आपला हुकूम असो वा नसो. मी आज – आता – लढाई देणार." असे बोलून गोखले झपाट्याने निघून गेले. खरे पाहिले तर, "सरदार मंडळीचे चित्त शुद्ध नव्हते. कोणीही सरकार कामास झटत नव्हता, आणि श्रीमंत आपल्या एकट्यालाच दोष देतात. यामुळे संताप येऊन मी रणमुख होणार, मागे काय पाहिजे ते होवो, आज रण सिद्धच आहे. सेवकजनांवर स्वामीचे चित्त असे विटल्यावर, रणांगणी स्वामी कार्यावर आल्याने बहुमानच आहे. याउपरी चरणदर्शन होईल तर उत्तम. नाहीपेक्षा हेच शेवटचे. असे बोलून नमस्कार कूरन इंग्रजाचे सन्मुख जाऊन उभे राहिले.... लष्करात गलबल झाली. घाबरेपणाने बाजीराव भोजन टाकून डे-याबाहेर आले. लष्करात आरडा चालला. मेणा जलद आणवून बसून चालीस लागले. महाराजांस चलावे म्हणून सांगून पाठविले. इंग्रजांशी मुकाबला होताच बापू गोखल्यांनी चालून घेतले. पन्नास आसामीनिशी हत्यार चालविले. घेरा पडला. मागून कुमक पोचली नाही. बाजीराव निघून जाताच फौज पळून गेली. गोखल्याने इरेस पडून खुद्द स्मिथसाहेबावर तरवार केली. तीन चार गोरे मारले. आडवे बाजूंनी स्मिथसाहेबांनी पिस्तोल मारिला. जोडगोळया लागल्या. तत्रापि संभाळून ज. स्मिथवर हात टाकला. बोलले, बापू गोखले म्हणतात तो मी. उजवे मानेवर जखम केली. जनरेलानी बापूचे डोईवर हात चालविला, डोईची कपरी फुटून घोड्याखाली आले. प्राण*२ सोडिला.

मरेना का तो छत्रपति

बापू गोखले जिवाची तमा न बाळगता अवघ्या ५० अनुयायांसह लढतो आहे, पण त्याला कुमक न पाठवता, रावबाजी मेण्यात बसून समरांगणावरून धूम ठोकीत पळत सुटला. छत्रपतींनाही पळा पळा, घोडी दपटा, म्हणून सारखा निरोपावर निरोप धाडू लागला. अखेर त्याने आपला एक तेखदार घोडा पाठवून. त्यावर बसून झपाट्याने मागोमाग या, असा निरोप पाठवला. प्रतापसिंह चिडला. तो म्हणाला, "पूर्वी आम्ही घोडी मागितली, तेव्हा दुष्काळ पडला होता. आता कशाला? आहे त्याच घोड्यावर बसून, येववेल तसे येतच आहो." शामराव व बाळाराव रास्ते छत्रपतींच्या कबिल्यामागे राहून, चला चला, लवकर चला, असा अट्टहास करीत होते. प्रतापसिंहाने राघोपंत जोशाला विचारले. कोण रे हे? त्याने सांगितले. श्रीमंताकडचे रास्ते. प्रतापसिंह - "आस्सं. इतक्या दिवस आमच्यामागे चालायला कोणी नव्हते. आजच कोठून आले?" रास्ते विरमले. धावत रावबाजीकडे गेले नि झाला प्रकार सांगितला. पेशव्याने सखू खैरा हुज-याला पाठवले नि विनंती कळविली की "स्वामीची यासमई मजवर मर्जी प्रसन्न असावी. दोन कोश सांभाळून गेल्यावर मी विनंत्या करून सर्व स्वामीचे पुढे ठेवतो."

नंतर लढाईची एकच रणधुमाळी माजली. रावबाजी पळू लागला त्याच्या पाठीवर आंग्रेजाच्या काही पलटणी लागल्या. बाकीच्या छत्रपति होते तिकडे वळल्या. पिस्तोल गोळया सणासण येऊ लागल्या. पण सैन्यातला एकही मायेचा पूत म्यानातून तरवार काढीना. जो तो सुखरूप पळायचा रस्ता शोधू लागला आणि पळता पळात गोळीबाराने पटापट उलथून पडू लागला. आंग्रेजी पलटणांची लगट चेपीत छत्रपतींच्या समोर येऊ लागली. संगीना उन्हानी चमकू लागल्या. महाराजाभोवती असेलले सैन्य केवळ भाडोत्री. ते आपल्या रावबाजी धन्याप्रमाणे यःपलायते स जीवति करण्याच्या तंत्रात तडफडणारे. ही

अवस्था रावबाजीला कळवण्यासाठी, राघोबा जोशी गडबडीने पुढे सरणार तोच समोरून बंदुकांची फैर झडली नि तडाड एक मुर्दा त्याच्या पुढेच येऊन कोसळला. राघोबा परतला नि म्हणाला, ''सरकार, गो-या काळ्या पलटणीचा वेढा पक्का पडला. आता पळण्यात शहाणपणा नाही.'' तेव्हा प्रतापसिंहाने म्यानातून तरवार उपसली, भाऊसाहेब आप्पासाहेबांनीही तरवारी उपसल्या नि हल्ल्याला तोंड देण्यासाठी ठाण मांडून घोडे आवरून उभे राहिले. हां हां म्हणता कंपनीची एक पलटण नीट रोखाने अंगावर चालून आलीच. बंदुकींच्या गोळ्यांचा मुसळधार पाऊस कोसळू लागला. प्रसंग पाहून बळवंतराव मल्हार चिटणिसाने घोड्यावरून उडी मारून तो पायउतारा झाला आणि धिटाईने हात वर करून नीट पलटणीच्या तोंडावर धावत आरडत गेला. ''सबूर सबूर, गोली मत चलाव. सातारेके महाराज छत्रपति सरकार यहां खडे है. गोली मत चलाव.'' चिटणिसाच्या या समयोचित धाडसाने छत्रपतीवरील मोठाच संकटाचा प्रसंग सावरला गेला. पलटणीचा मेजर दपटिन (Doveton) पुढे आला. पलटणीचे देशी अंमलदार सेख बडेबावा जमादार नि सेख मकबुल हेही पुढे आले. त्यांनी चौकशी केली. गोळीबार बंद करण्याचा इषारा (सिन्गल) दिला. सेख बडेबावाने आंगाभोवती तलवारीचे हात गरगर फिरवून जागा मोकळी केली. घेरा मात्र कायम ठेवला. दपटिन नि कर्नल प्रिंग्ले टेलर चिटणिसाबरोबर छत्रपति आपल्या परिवावारसह उभे होते, तेथे गेले. छत्रपति सभोवार बाळासाहेब भोसले सेनापति (चतुरसिंगाचे पुत्र), नरहरराव नि यशवंतराव चिटणीस बंधू घोडेस्वार होऊन तलवारी सरसावून उभे होते. दपटिनने तलवारी टाकण्याचा हुकूम केला. छत्रपतिंच्या हुकुमाशिवाय आम्ही कोणाचा हुकूम जुमानणार नाही, असे सडेतोड उत्तर बाळासाहेबाने दिले. चिटणीसाने छत्रपति कोण ते दाखविले. दपटिनने नि टेलरने टोप्या काढून मुजरा केला. दोघांनी पुढे होऊन प्रतापसिंहाशी शेखॅण्ड केले आणि तरवारी देण्याची सूचना केली. आपल्या सैन्याने हत्यारे खाली ठेवली आहेत. आपणही ठेवावे. प्रतापसिंह चिडला, ''निःशस्त्र होण्यापेक्षा तुमच्याशी दोन हात करून या समरांगणावर मेलेले काय वाईट? असा अपमान मी सहन करणार नाही.''*३ तेव्हा बळवंतरावाने समजूत घातली की आंग्रेजांशी ठरलेल्या मसलतीप्रमाणे दोस्तीची खूण म्हणून मेजरसाहेबा तरवार मागत आहेत. तेव्हा प्रतापसिंहाने तरवार दपटिनच्या हातात दिली. त्याने पुन्हा सलाम करून, महाराजांचा भगवा झेंडा उभारण्याचा हुकूम दिला आणि 'छत्रपति प्रतापसिंह महाराजकी जय' ललका-यात सर्वांनी त्याला प्रणाम केले.

साहेबानी सगळयांना घोडेस्वार व्हायला सांगितले. माईसाहेबांना आग्रहाने हत्तीवर अंबारीत बसविले. प्रतापसिंहाचा हात धरून दपटिन कंपनीच्या छावणीकडे घेऊन चालला. भगवा झेंडा पुढे आणि मागाहून ही मंडळी अंग्रजी बँजवादनात चालू झाली. जनरल स्मिथ बापू गोखल्याच्या तडाक्याने जखमी होऊन एका मेण्यात विवळत पडला होता. त्याला बातमी लागताच तो मेण्याबाहेर येऊन महाराजांना सामोरा गेला. नजरानजर होताच. त्याने टोपी काढून आदबीने सलाम केला नि बोलला - ''आता सगळे राज्य नि सिंहासन महाराजांचेच, यात शंकाच नको.''

अष्टीच्या तळावर एक कोटी रुपयांचा विषय आंग्रेजांना सापडला. छत्रपतीबोरबर सामान वगैरे काहीच नव्हते. तेव्हा लुटीतील सामानांचे सतरा उंट महाराजाकडे देऊन डेरे उभारले. रहाण्याची विसाव्याची व्यवस्था झाली. सर्वांनी साखरपाणी घेतले.

इतक्यात दोन डोल्या आल्या. एकीत गोखल्यांकडील अंताजीपंत हजीरनीरा जखमी होते. आणि दुसरीत बापू गोखले यांचे प्रेत होते. नरहर मल्हार चिटणिसाने ओळखले. ''फक्त आंगरखा मलमलीचा आंगात उरला होता. घोड्यांनी तुजविले. त्याणी पायाचे कातडे गेले होते. दोन जखमा होत्या.'' प्रतापसिंहाने शिबिराबाहेर येऊन बापूंना दोन हात जोडून नमस्कार केला. सगळयांच्या डोळयांतून पाणी वाहू लागले. चार घटिका रात्रीस नदीच्या काठी आबाजीपंत यांच्या हस्ते अग्निसंस्कार करविला. राघोपंत जोशी नि पांडोबा हे दोन रावबाजीचे आश्रित तेथे होते. पण त्यांनी या संस्कारकर्मात भाग घेण्याचे नाकारले. रावबाजीचे आश्रित खरे!

ही भानगड आटोपल्यावर जनरल स्मिथ नि बिलिमोर साहेब प्रतापसिंहाच्या शिबिरात आले. आता पुढे काय मर्जी आहे, विचारले. छत्रपति म्हणाले - ''अलपिष्टनाची भेट व्हायची, तो तुमचीच अगोदर झाली. हरकत नाही. त्यांचे आमचे राजकारण आधीच ठरलेले आहे. येथे सगळी पळापळा झाली. आमचेही घोडे तिखट होते. सहज आम्हीही निसटून गेलो असतो. गेले दोन महिने आमची निष्कारण फरफटणी चाललीच आहे. पण पूर्व संकेत समजून लगामा खेचून उभे राहिलो. आता अलपिष्टनाची नि आमची भेट घालून द्यावी, म्हणजे झाले.''

प्रकरण ४ थे

## आंग्लाई पेचाची पहिली सरगांठ

सध्या प्रतापसिंहाला आंग्रेजांच्या छावणीत विसाव्यासाठी तसेच सोडून, आपल्याला थोडे मागे जाऊन, अलपिष्टनाच्या हालचालींचा आढावा घेतला पाहिजे, म्हणजे पुढे घडणा-या अनेक घटनांचा अर्थ नीट ध्यानात येईल.

रावबाजीने आंग्रेजांवर हत्यार उपसल्याची बातमी कलकत्याला जाताच, गवर्नर जनरलने “पेशव्यांचे सगळे राज्य खालसा करावे” असा अलपिष्टनाला हुकूम सोडला. त्याची ‘चीफ कमिशनर ऑफ दि डेक्कन’ म्हणून कुलमुखत्यारीच्या हुद्यावर नेमणूक केली. ‘आपला हा हुकूम महाराष्ट्रात ताबडतोब जाहीर करा.’ हा ग. ज. चा हुकूम मात्र त्याने गुप्तच ठेवला होता. असला अरेरावी हुकूम जाहीर होता, तर एकदम सारा म-हाठा चोहीकडून आंग्रेजांना खायला खवळून उठला असता आणि दक्खनमध्ये नुकती कोठे मूळ धरीत असलेली आंग्रेजांची राजकारणी लुडबूड वादळातल्या पाचोळयासारखी तेव्हाच उधळून गेली असती. छत्रपतीविषयी आंग्लाई सहानुभूतीचे बुजगावणे पुढे करून, पेशव्याविषयी तमाम म-हाठ्यांच्या मनात तिटकारा निर्माण करायचा आणि रयतेला गोडगोड साखरपेरणीच्या लांबरुंद आशीर्वादांनी आपल्या भजनी लावायचे, हे काम महत्त्वाचे, तसेच चतुरायीचेही होते. अलपिष्टनाने ते साधण्याकडे आपल्या शक्तियुक्तिला कशी एकवटली, हे पाहिले पाहिजे.

## सातारा किल्ला जिंकण्याचा फार्स!

छत्रपतीला खाकोटीला मारून पेशवा रावबाजी धूम हवा तसा, हवेसारखा बेफाट पळतो आहे आणि आंग्रेजांचे लष्कर त्याच्यामागे धावत आहे. या ३-४ महिन्यांच्या धावपळीने कुंफणीचे लष्कर नि सेनापति अगदी मेटाकुटीला आले होते. ता. १० फेब्रुवारी १८१८ रोजी “फिरंगी याचा मुकाम कोरेगावाहून मंगलवारी प्रहर दिवसास सातारियास दाखल जाहाला. नंतर त्याच वेलेस नाकेबंदी शहरची करून, लोकास अभय देऊन, किल्यावर चिठी लिहिली की कुंफणीबहादर याचा हुकूम किला खाली करून देणे. त्याचे उत्तर आले की, श्रीमंतांची परवानगी पाहिजे. त्याजवर साहेब (कर्नल बॉल आणि जनरल स्मिथ) रागे भरून लषकरात जाऊन च्यार तोफा आणून कुलपी गोले वीसपर्यंत सोडले. इतक्यात किल्यावरील कारकून बोलणार आला. रुमाल फिरऊन तोफ बंद केली. वरला बंदुखीसुधा बार देखिल जाहाला नाही. बोलणे होऊन वर निरोप सांगून खाली निरोप सांगावयास यावे, इतक्यात दोन तीनसे पलटणचे लोक दरवाज्यास गेले. प्रहर रात्री वरील लोक खाली उतरून आले. कासीपंत याची बायका व आई मात्र खाली उतरू दिल्ही. चीजबस्त सकाली उतरून देऊ, आसा करार केल्यानंतर सकाली बंदी केली. वरले माणूस वर, खाले खाली, आसे केले. काल दोन प्रहरी निशाण आपले बडे लाविले, आणि लस्करच्या तोफा वीस केल्या आणि ते निशाण उतरून भगवे निशाण लाविले.” (पेशवे दप्तर नं. ४१, पत्र नं. १८७)

तोफा सोडून किल्ला सर करायचा, त्यावर आंग्रेजांचा युनियन जॅक बावटा चढवायचा आणि नंतर पाच दहा मिनिटांच्या आतच तो उतरून म-हाठ्यांचा भगवा झेंडा फडकवायचा, या फार्सात मोठा आंग्लाई अर्थ होता. पूर्व संकेताप्रमाणे छत्रपति आज ना उद्या आमच्या ताब्यात येणारच, त्यांना सातारला आणणे आम्हाला क्रमप्राप्तच, तेव्हा सातारा शहर नि किल्ला प्रथम आम्ही जिंकून नंतर तुमच्या ताब्यात (मेहरबानी म्हणून) दिला, अशी संभावीत कायदेबाजी या फार्साने तयार करून ठेवली.

## अलपिष्टनाचा पहिला जाहीरनामा

इकडे १० फेब्रुवारीला साता-याचा किल्ला जिंकण्याचा फार्स होतो, तोच तिकडे पुण्याहून ता. ११ फेब्रुवारीला, लगेच दुस-या दिवशी, अलपिष्टन एक लांबलचक जाहीरनामा महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून फैलावतो. त्यात “बाजीराव पेशव्याच्या कैदेत असलेल्या सातारच्या महाराजांना आम्ही मुक्त करणार आहो आणि त्यांना नि त्यांच्या कुटुंबियांना सुखाने, मानमरातबाने नि वैभवाने राहता येईल, एवढ्या मोठ्या विस्ताराचे स्वतंत्र राज्य करून देणार आहो. याच उद्देशाने सातारचा किल्ला आम्ही सर केला आणि त्यावर महाराजांचा भगवा झेंडा उभारला आहे. तसेच महाराजांच्या माजी दिवाणांना कामावर हजर होण्यास कळविले आहे.” हा मजकूर घातला जातो. हे आश्चर्यच नव्हे काय? त्या काळी आताप्रमाणे तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ वगैरे झटपट बातमीची साधने थोडीच होती? पण पहा, मंगळवारी दोन प्रहरी सातारा किल्ल्यावर बावट्यांची चढ उतरणी होते आणि बुधवारच्या पुण्याच्या जाहीरनाम्यात त्याची ठळक नोंद होते! आंग्रेजांची राजकारणे पहिल्यापासूनच कशी घड्याळाच्या यंत्रासारखी चालत असत, हेच

यावरून दिसून येते. आंग्रेजांचे सेनापति सातारचा किल्ला घेतात काय, त्यावर आपले निशाण लावतात काय आणि लगेच दोनचार मिनिटांत ते उतरून छत्रपतिंचा भगवा झेंडा चढवून त्याला तोफांची सलामी देतात काय! त्या वेळच्या भोळ्या म-हाठी रयतेला वाटले का आहाहा, आंग्रेज आपले खरे कैवारी आहेत. मोठे निरीच्छ आहेत. त्यांना स्वार्थ कसा तो ठावाच नाही. पहा कसे आमच्या छत्रपति धन्यासाठी ते झटताहेत. नाहीतर लेकाचा तो द्वाड बामण पेशवा! धन्याला धत्तुरा दाखवून चोर आपणच मलिदा खात होता! धन्य आंग्रेजबहादुर! अलपिष्टनाच्या जाहिरनाम्यात रावबाजीच्या दुष्ट बुद्धीचे नि नालायकीचे भरपूर देऊन, आंग्रेज महाशयांचे उद्देश रसाळ वाणीने स्पष्ट सांगण्यात आले. 'देशात सुव्यवस्था नांदावी, लोकांना न्याय मिळावा, त्यांच्या शेतवाडी वतनादिकांचे संरक्षण  व्हावे, यापेक्षा आमचा दुसरा कोणताही हेतू नाही.' रात्रंदिवस हल्ले, लूटमार, दरोडे आणि लढाया यांना कंटाळून गेलेल्या लोकांना, या आश्वासनाने दीडबोट मासच चढले. 'दोन महिन्यांच्या आत पेशव्याचा पक्ष सोडून जे स्वस्थ बसतील, त्यांची वतने, जहागि-या वगैरे पूर्वीप्रमाणेच बिनधोक पुढे चालविण्यात येतील.' खुषीने वा नाखुषीने पेशव्याच्या हाकेला हाक आपण दिली नाही तर तो आपला सूड घेईल, ही लोकांच्या मनातली भीती या जाहिरनाम्याने नाहीशी होऊन, ते घरोघर स्वस्थ बसले. रावबाजीबरोबर भटकणारे हजारो शिपायी नि बारगीर भराभर पळू लागले. अनेक ब्राह्मण सरदारांनीही तेच केले.

धार्मिक बाबतीत हात घालणार नाही.

रावबाजीच्या कारभारात ब्राह्मण संतर्पणाशिवाय दुसरे कसलेच राजकारण नसल्यामुळे, दीर्घ धोरणी अलपिष्टनाने भटाबामणांना खूष करून गप्प बसविण्यासाठी, 'लोकांच्या धार्मिक बाबती आहेत तशाच पुढे निर्वेध चालविण्यात येतील, त्यात कुंफणी सरकार लेषमात्र ढवळाढवळ करणार नाही.' असा ठळक खुलासा जाहीरनाम्यात केल्यामुळे, भोजनभाऊ भटांचा जीव भांड्यात पडला. ते म्हणू लागले, 'मरे ना का तो राण्डलेक पेशवा! आपल्या पुडी दक्षिणेची व्यवस्था ठाकठीक पुढे चालली म्हणजे झाले. राज्य कोणी का महार करीना! आपल्याला काय त्याचे?' धर्ममार्तण्ड भिक्षुक भटांची मनाची ही ठेवणे लक्षात ठेवण्यासारखी आहे. स्वार्थापुढे त्यांना केव्हाही कशाचीही पर्वा नसते. ही मक्खी ओळखून अष्ट्याची लढाई संपताच, भटाबामणांचा संतोष राखण्यासाठी, अलपिष्टन मुद्दाम स्वतः वाईला गेला. वाई म्हणजे भटाबामणांची दक्षिणेतली काशी. अजूनही अर्कट भटांचे नमुने वाईला पहाण्यात येतात. अलपिष्टनाने दवंडी पिटवून सा-या क्षेत्रस्थ भूदेवांची जंगी जाहीरसभा बोलावली. जाहीरनामा स्वतः मराठीत वाचून, त्यातले सारे मुद्दे नि कलमे खुलासेवार समजावून दिली. विद्वान भटांना शालजोड्या नि बक्षिसे वाटली. सहस्र भोजनाचा थाट उडवला. सगळ्या भूदेवांनी घसा फोडून कुंफणी सरकारचा नि 'अलफिसान' साहेबाचा जयजयकार केला. कुंफणीच्या कारभाराला वेदोक्त आशीर्वाद देऊन यश चिंतिले. हाच प्रयोग पुण्याला करून, अलपिष्टनाने तेथल्या भटांनाही आपल्या भजनी लाविले. छंगीफंगी पेशव्याचे राज्य जाऊन, शांतिप्रिय, न्यायप्रिय आंग्रेजाचे राज्य होवो, असा जो तो बोलू लागला.

बामणं मथवली – बामणेतर गठवले

वाई पुण्याची भटे भोजनाच्या खमंग वासाने कबजात आली. पण बामणेतर मराठ्यादि अफाट जनसमूहाचे काय? ते जातिवंत लढवय्ये. सदानकदा मुलुखगिरीचे शोकीन. मनाचे मानी नि तलवारीचे अभिमानी. ते काय भटांसारखे लाडू झोडून आंग्रेजांना भाळणारे थोडेच होते? पण आंग्रेजी हिकमतीने त्यांनाही गठवले. 'पेशव्याने अपहार केलेल म-हाठ्यांचे राज्य, दौलतीचे खरे धणी छत्रपती महाराज यांच्या हवाली करून, त्यांना साता-याला आम्ही स्थापन करणार.' या जाहीर वचनाने अलपिष्टनाने यच्चयावत बामणेतरादि मराठ्यांना खूष करून नाचायलाच लावले. कुंफणी सरकार म्हणजे अवतारी देवता नि अलपिष्टनादि तिचे भगतगण म्हणजे देवदूत. ही भावना महाराष्ट्रात सर्रास फैलावली. आंग्रेजांना यश येऊन त्यांचे राज्य लवकर प्रस्थापित व्हावे, म्हणून वाई पुण्याच्या कित्येक भटांनी मोठमोठे यज्ञ केले. तात्पर्य, अलपिष्टनाचा ११ फेब्रुवारीचा जाहिरनामा म्हणजे आंग्लाई राजकारणाची पहिली धोरणी. 'ग्यानबाची मेख' असे मानण्यात येते. या मेखेच्या तडाक्याने रावबाजी तडाक्यासरसा सगळीकडे उघडा पडला.

स्मिथच्या छावणीत प्रतापसिंह

अलपिष्टनाची नि आमची मुलाखत घडवून आणा, असे सांगतानाच, प्रतापसिंहाने स्मिथला बजावले - ''तुमच्या साहेबाशी शपथेवर ठरलेल्या राजकारणाप्रमाणे, आम्ही तुम्हाला येऊन तर सामील झालो. बाजीराव मोठा धूर्त नि लाघवी आहे. हजार मसलति लढवून तो तुमच्याशी तहाला तयार होईल आणि

आम्हा सर्वांना ताब्यात देण्याची मागणी करील, तर मग तुम्ही काय कराल? पूर्वी आम्हाला दिलेल्या आश्वसनांवर बोळा फिरवाल?'' त्यावर स्मिथने गंभीरपणाने उत्तर दिले - ''महाराज, आम्ही आपल्याला शपथपूर्वक आश्वासन देतो का आमचे प्राण जाईपर्यंत तरी हुजूर सरकारला बाजीरावाच्या ताब्यात आम्ही जाऊ देणार नाही. आपण आम्हाला सामील झाला आहात. बाजीराव आता आम्हाला कोण? तो आता एक बंडवाला झाला. सगळी म-हाठी रियासत आता महाराजांचीच आहे. आम्ही कोणत्याही सबबीवर बाजीरावाशी तह करणार नाही. तह करायचाच तर तो महाराजांशी.'' नंतर घडलेली हकिकत अलपिष्टनाला कळविण्यासाठी, स्मिथचे टपाल रवाना होणार होते. त्यात प्रतापसिंहाच्या सांगण्याप्रमाणे बळवंतराव चिटणीसाने बाळाजीपंत नातूच्या नावाने अलपिष्टनाला पत्र लिहून 'आम्ही येऊन सामील झालो, आता तुम्ही वचनाला जागा.' अशी विनंती कळविली.

''पेशव्याला हाकलून देऊन, आंग्रेजांनी छत्रपतींना स्वराज्याचे धनि केले.'' असा गवगवा स्मिथ प्रभृती मंडळींनी गावोगाव फैलावताच, खेड्यापाड्यातून नजराणे घेऊन लोक प्रतापसिंहाच्या भेटीला येऊ लागले. तेव्हा बिलिमोर महाराजासमोर येऊन म्हणाला, ''पाहिलंत सरकार, आता आपण खरोखरच आपल्या विशाल
म-हाठी रियासतीचे स्वामी झालात.''

शिलंगणाच्या थाटात पुण्याकडे प्रयाण

ता. २१ फेब्रुवारी १८१८ शनिवारी सपरिवार छत्रपतींना घेऊन स्मिथ पुण्याच्या रोखाने अलपिष्टनाला भेटायला निघाला. दस-याच्या शिलंगणाला असतो तशा थाटाने स्वारी चालविली. आघाडीला निशाणाचा शृंगारलेला हत्ती, त्याच्या मागे उंटावरल्या नौबदी, घोड्यावरच्या रण-नौबदी, बैलगाड्यांवरून रणढोल चौघडा, शिंगे कर्मे वगैरे देशी वाद्ये, आणि या सगळयांच्या मागे आंग्रेजी लष्कराचा बँड. नंतर आघाडीचे स्वार, मागे हत्तीच्या अंबा-यातून छत्रपति, त्यांचे दोघे भाऊ, माईसाहेब, इतर परिवार घोड्यावर, अशा डामडौलाने स्वारी चालत असता, गावोगावचे रयत लोक छत्रपतीचे दर्शन घेऊन त्यांना आरत्या ओवाळीत होते. लोक जमले म्हणजे स्मिथ नि दपटिन त्यांना सांगत की, 'देखो, आब डौलटके मालिक चट्रापाटी म्हाराज है. बाजीराव अभि भाग गया. वो अभि बंडवाला दुश्मन है.' गावोगावच्या लोकांना असे भासविण्यात आले का हे गोरे हापसर छत्रपतींचे नोकर आहेत.

हिंगणगावाला जरिपटक्याचा समारंभ

हिंगणगावच्या मुकामाला स्मिथने जरिपटका उभारण्याचा मोठा समारंभ केला. दोन प्रहरी पटांगणात झेंड्याच्या काठीभोवती तमाम खेडवळ लोकांची गर्दी झाली. स्मिथच्या दिमतीचे कॅपटन टोव्ही, कॅप, मेन, मि. बिलिमोर, कॅप, हार्डकॅसल नि शॉ, मेजर डव्हटन (दपटिन) आणि विसाजी रामाजी, छत्रपति नि त्यांच्या परिवारासह, आदबीने उभे राहिले. बळवंतराव मल्हार चिटणिसाने छत्रपतींना कुर्निसात करून, दोरी ओढून जरिपटका वर खेचताच, साहेब लोकांनी टोप्या काढून आणि इतरांनी म-हाठशाही थाटाचे झेंड्याला मुजरे केले. तोफांची सरबत्ती झडली. 'आता छत्रपति म-हाठी साम्राज्याचे मालक झाले आहेत.' वगैरे ठरावीक व्याख्यान स्मिथने दिल्यावर हा समारंभ आटोपला. पुण्याला जाताना गावोगाव असले जाहीर समारंभ करून, कुंफणीच्या अंमलदारानी, आपण सारे छत्रपतीसाठी नि रयतेसाठी एकनिष्ठेने झटत आहोत, असा लोकांत प्रचंड विश्वास निर्माण केला.

समारंभ आटोपल्यावर सारे जण डे-यात गेले. तेथे स्मिथने प्रतापसिंहाशी भाषण केले. तो इंग्रजीत बोलत होता आणि बिलिमोर हिंदुस्थानीत तर्जुमा सांगत होता. भाषणाचा सारांश - ''एलफिन्स्टन साहेबांचे बहोत खुषीचे पत्र आले आहे. बड्या लाटाकडे (मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज) कलकत्त्याला त्यांनी पत्र पाठविले आहे. लवकरच एलफिन्स्टन स्वतः महाराजांना भेटायला येताहेत. महाराज आता
म-हाठेशाहीचे मालक झाले आहेत. हे साम्राज्य (एम्पायर) त्यांचेच आहे. यापुढे महाराजांनाच जातीने त्याचा कारभार पहायचा आहे. आम्ही बाजीरावाला कायमचे हद्दपार करणार आहोत. आता महाराजांनी मन मानेल तेव्हा साता-यास जावे नि गादीवर बसावे. राज्यकारभाराची सूत्रे हातात घ्यावी. बाजीरावाचा नि आमचा कधी काळी समेट होईल, अशी भीती मुळीच बाळगू नये..... एक नाजूक गोष्ट केली पाहिजे. सध्या महाराजांच्या मुदपाकखान्यात राघोबा जोशी नि पांडोबा नावाचे दोन आचारी आहेत. ते आहेत बाजीरावाचे पक्षपाती. त्यांना ताबडतोब महाराजांनी हाकलून द्यावे. इकडच्या बित्तंबातम्या ते तिकडे कळविण्याचा संभव आहे. फार कायम त्यांच्यामुळे महाराजांच्या जिवालाही एकादे

वेळी धोका येण्याचा संभव आहे.'' नंतर पान अत्तर वगैरे झाल्यावर स्मिथ मंडळी वाकून मुजरे करून निघून गेली.

खाशा खाशांची पहिली भेट

मजल दरमजल करीत पुण्याच्या रोखाने छत्रपतींची छावणी ४ मार्च १८१८ बुधवारी बेलसर येथे पोचली. तोच नरसू काकड्याबरोबर बाळाजीपंत नातूचा महाराजांना निरोप आला की, 'अलपिष्टन साहेब आज भेटायला येत आहेत. आपण साहेबावर पुरा पुरा भरंसा राखावा आणि ते विचारतील त्या सर्व प्रश्नांना त्यांना आनंद वाटेल अशीच उत्तरे द्यावी.' महाराजांनी बशळवंतराव मल्हार चिटणिसाला सामोरा पाठविले. लष्करी लवाजम्यानिशी अलपिष्टन येत होता. बरोबर मि. रसेल, जन. स्मिथ, मि. बिलिमोर, कॅप. ग्रॅण्ट आणि बाळीजापंत नातू होते. महाराजांच्या डे-यात येताच सगळ्या साहेबलोकांनी टोप्या काढून आदबीने वाकून महाराजांना सलाम केले. महाराजांनी बसा म्हणून सांगितल्यावरच सारे खाली बसले. तब्येत कशी काय आहे, वगैरे मामुली संभावित प्रश्नोत्तरे झाल्यावर अलपिष्टन म्हणाला, ''महाराजांच्या केसालाही धक्का न लागता, ते सपरिवार आमच्या छावणीत सुखरूप येऊ शकले, हे महाराजांचे नि आमचेही मोठे भाग्य कलकत्त्याच्या बडे लाटसाहेबांना आम्ही लिहिलेच आहे. त्यांना फारफार आनंद झाला असेल. मी लवकरच या रसेल साहेबांना महाराजांच्या सर्व बंदोबस्ताविषयी चर्चा करून हुकूम आणण्यासाठी कलकत्त्याला रवाना करणार आहे. महाराजांना काही संदेश अथवा एकादा माणूस बडेलाटाकडे धाडायचा असेल तर खुशाल धाडावा.'' त्यावर प्रतापसिंहाने उत्तर केले - ''आमच्या बंदोबस्ताविषयी सर्व तपशील आमचे चिटणिसांनी साहेबाशी निश्चित ठरविलेलाच आहे आणि तो आता आपण नीतीला नि कायद्याला स्मरून पार पाडाल अशी मला आशा आहे. साहेबांवर माझा पूर्ण भरंसा आहे. तेवढ्यासाठी मी आप्तगणगोत सर्वस्वाचा त्याग करून आपल्याला येऊन सामील झालो.'' अलपिष्टन - ''महाराजांनी कशाचीही चिंता करू नये. नहरहरपंत चिटणिसाने महाराजांच्या प्रकरणाबाबत नुकताच माझ्याजवळ पुन्हा पाढा वाचलेला आहे. तो विचारात घेऊन आम्ही एक जाहीरनामा तयार केला आहे. त्याचा मसुदा आता बाळाजीपंत नातू वाचून दाखवितील.'' नंतर नातूने तो मसुदा वाचून दाखविला. ठीक आहे म्हणून महाराज, बळवंतराव चिटणीस नि अलपिष्टन बोलले. बैठक आटोपली.

छत्रपतींची आंग्लई सरबरायी

या भेटीनंतर अलपिष्टनाने मेजवान्या, नजराणे आणि स्वागताचे दरबार यांचा छत्रपतींवर नुसता पाऊस पाडला. चांदीची भांडी, बनातीच्या पालख्या, आरसे लावलेल्या अंबा-या, काय काय नि काय काय! हे साहेबलोक देवदूत का देव, याचा छत्रपतिकंपूला उलगडाच होईना. सकाळ संध्याकाळ साहेब समाचाराला यायचे नि गोडगोड बोलून जायचे. बाळाजीपंत नातू तर काय, एकाद्या तात्यापंतोजीच्या ऐटीने असे करा नि तसे बोलू नका, असा महाराजांना पावलोपावली इषारा देत होता.

पुढे एके दिवशी नातूला घेऊन कॅप्टन ग्रॅण्ट आला नि म्हणाला - ''मेहरबान अलपिष्टन साहेब जरूरीच्या कामासाठी गेले. त्यांना मला नित्य आपल्याजवळ दिमतीला राहून, त्यांच्याशी नि आमच्या सरकाराशी, महाराजांना जे काही बोलाचालायचे ते माझ्या मार्फत करावे, असे आपल्याला सांगितले आहे.'' कॅप्टन ग्रॅण्ट मध्यस्थ म्हणून येऊन बसला शेजारी. नंतर साता-याला जाण्यासाठी छावणी मागे फिरली. ठिकठिकाणचे गडकोट किल्ले कुंफणीचे लष्कर काबीज करीत आहे नि त्यांवर छत्रपतीचे निशाण उभारीत आहे. अशा क्रमाने स्वा-या २९ मार्चला वासोट्याच्या किल्ल्याखाली येऊन दाखल झाल्या. मुकामाच्या ठिकाणी ग्रॅण्टची नि महाराजांची रोज राजकारणी बोलणी चालूच होती.

ग्रॅण्ट –जागोजागचे हे सारे किल्ले आम्ही महाराजांच्या नावानेच काबीज करीत आहोत.

प्रतापसिंह –ते तर सारे आमचेच आहेत. काबीज ते काय करायचे?

ग्रॅण्ट –सध्या सगळीकडे बंडाळी चालू आहे. वतनदार जाहागिरदारांचे वाद चालू आहेत. तेव्हा सध्या हे किल्ले कंपनी सरकारच्या ताब्यात राहतील. निशाण मात्र महाराजांचेच फडकेल.

प्रतापसिंह –मग आमच्या ताब्यात काय काय देणार?

ग्रॅण्ट –या बाबतीत अलपिष्टन साहेबांचा मनोदय असा आहे, नीरेअलीकडील भीमा नदीची हद्द व वारणेची हद्द. कृष्णा भीमेच्या संगमापर्यंतचा पश्चिम सह्याद्रीच्या पायथ्यापासूनचा मुलूख आपल्याला द्यावा, अशी बडेलाटाकडे त्यांनी शिफारस लिहून पाठविली आहे.

प्रतापसिंह - म्हंजे? आपण काहीतरी चमत्कारीक सांगता हे, साहेब! पेशव्याच्या अंमलखालचा सगळा मुलूख कायद्याने आमचा, ते सलग आम्हाला बिनशर्थ मिळण्याचा साहेबाशी ठराव झाला असता, आज हे असे बोलणे का?

ग्रॅण्ट –महाराजांना कोणत्याही रीतीने नाखूष करण्याची आमची मुळीच इच्छा नाही. आपण हे सारे बडेलाटांना कळवून, त्यांचे हुकूम आणता येतील.

प्रतापसिंह –मग कराच तसे ताबडतोब. रसेलसाहेबाला पत्र पाठवून हे प्रकरण बडेलाटांच्या नजरेपुढे ठेवण्याची लगबग करा.

आजच – याच क्षणाला – प्रतापसिंहाला चटका बसला की हे वरवर गोरेगोमटे दिसणारे गोडबोले आंग्लाई जंतरमंतर प्रथम वाटले तितके सरळ नि सोपे नाही.पण आता करतो काय? घडेल त्या मुकाबल्याला धैर्याने तोंड देऊनच कुशलतेने हा गुंता सोडवण्याचा त्याने निश्चय केला.

तेलिणीच्या वासोट्याने तेल गाळले

सन १८१० साली बापू गोखल्यांना तब्बल आठ महिने बेजार करणा-या ताई तेलिणीच्या पराक्रमाने, ‘तेलिण मारी सोटा बापू गोखल्या संभाळ कासोटा’ ही सुप्रसिद्ध आर्या चिरंजीव करणारा वासोटा किल्ला सहजासहजी कंपनीच्या लष्कराला हस्तगत करता येई ना. वासोट्यावर छत्रपति नि त्यांचे बंधू यांच्या बायका नि भाऊसाहेबांचा मुलगा बाबासाहेब राजे भोसले होता. किल्लेदारावर अर्थात ही फार मोठी नाजूक जबाबदारी होती. “किल्ला खाली करून द्या.” या कंपनीच्या धमकीला त्याने वाटाण्याच्या अक्षता लावून धुडकावले आणि किल्ला लढवायचा बेत केला. आतापर्यंत सगळे किल्ले हाक मारताच हाती पडले. पण वासोटा प्रतिकाराला उभा ठाकला. या वेळी अलपिष्टन वाईला जाऊन तेथल्या भटाबामणांना भोजने बक्षिसे देण्यात गढला होता. ग्रॅण्ट त्याला भेटून आला आणि महाराजांना विचारले की “वासोटा पडत नाही. साहेबांचे म्हणणे तोफा डागाव्या, हुजूरचे म्हणणे काय आहे?”

प्रताप. – साहेबांची मर्जी आहे तर डागा तोफा.

ग्रॅण्ट –पण किल्ल्यावर महाराजांचे कबिले आहेत.

प्रताप. – बेहत्तर. तुमच्या दोस्तीसाठी आम्ही आमच्या जिवाची नि अब्रूची पर्वा केली नाही. आमच्या कुटुंबातल्या मंडळीनाही तसेच वागावे. खुशाल डागा तोफा. तुमच्या दोस्तीसाठी नि सार्वजनिक कल्याणासाठी कुटुंबाची हानी झाली तरी पत्करली.

खालून किल्ल्यावर तोफांचा भडिमार होऊ लागला. आत आगीचे डोंबाळे उठले. त्या आगीत छोटा राजपुत्र बाबासाहेब राजे भोसले भाजून मेला. तब्बल आठ दिवस किल्लेदाराने झुंज दिली. अखेर नाइलाज झाल्यावर आणि खाली लष्करात छत्रपति आहेत हे समजल्यावर, पांढरे निशाण फडकवून तो शरण आला आणि किल्ला हवाली केला. (६ एप्रिल १८१८) लगेच बळवंतराव चिटणीस किल्ल्यावर गेला आणि तिथले कबिले खाली घेऊन आला.

इतक्यात वाईहून अलपिष्टनही आला. वासोट्याच्या विजयाबद्दल त्याने महाराजांचा जयजयकार केला. मेजवान्या दिल्या. महाराजांना नि त्यांच्याबरोबरच्या यच्चयावत दरबा-यांना नि कुटुंबियांना मोलवान पोषाख नि जवाहीर वाटले. नंतर स्वारी साता-याकडे वळली. वाटेने गावोगावची रयत छत्रपतींना मुजरे करायला दुतर्फा रस्त्याने जमत असे. नजर नजराणेही चालत असत. अशा रीतीने चैत्र शु. ५ ता. १० एप्रिल १८१८ शुक्रवारी छत्रपतीची नि कंपनीच्या लष्कराची छावणी करंजे गावच्या आंबराईत झाली.

या ठिकाणी आंग्रेजांनी प्रतापसिंहाकडून एक जाहीरनामा प्रसिद्ध करविला तो असा -“बाजीराव रघुनाथ यांनी आम्हाला कुटुंबसुद्धा नजरबंदीत ठेवून, शेवटी प्राणांचाही घात करावा, अशी योजना केली, हे त्यांचे कामगार यांजकडून समजण्यात आले. या त-हेची अमर्यादा कोणतेही प्रकारे करण्यात कमी केले नाही. हे वर्तमान कंपनी बाहादर यांचेकडून समजाविल्यावरून, त्यांनी कै. महाराजांचे पूर्वापार हे राज्य याजवर नजर देऊन, बाजीरावाचे प्रतिबंधातून खुलासा करून, राज्याचे ठायी सिंहासनारूढ करून समारंभ केला, यावरून बहुत संतोष होऊन या सरकारची दोस्ती झाली. जे त्यांचे दोस्त, ते इकडील दोस्त. त्यांचे दुष्मन ते इकडील दुष्मन, हे सर्वास महशूर व्हावे.” या जाहीरनाम्याने छत्रपतीने पेशव्याला आपल्या नोकरीतून ‘डिसमिस’ केले. असा स्पष्टार्थ जाहीर झाला. (१०-४-१८१८)

प्रकरण ५ वे

सभोवारच्या छाया पडछाया

मातोश्री आनंदीबाई

प्रतापसिंहाची मातोश्री आनंदीबाई ऊर्फ माईसाहेब यांचा सातारी राजकारणात फार मोठा हात होता. जिजाबाई, ताराबाईप्रमाणेच भोसल्यांच्या राजघराण्याला शोभणारी माईसाहेब कर्तबगार राजमाता होता. सातारा किल्ल्यावर पेशवाई बंदिवासात असताना आणि सभोवार नोकर चाकरांच्या रूपाने त्रिंबकजीचे हेर वावरत असताना, या करारी बाईने आपल्या राजपुत्राचे शिक्षण नि शीलवर्धनाचे कार्य अत्यंत गुप्तपणाने आणि शिताफीने पार पाडले. शिवाजी जसा हरएक बाबतीत जिजामातेच्या सल्ल्याशिवाय पाऊल पुढे टाकीत नसे, तसाच प्रतापसिंहही माईसाहेबांच्या मसलतीशिवाय कोणत्याच गोष्टीला होकार नकार देत नसे. आतापर्यंत आंग्रेजांशी केलेल्या राजकारणातही माईसाहेबांचेच मार्गदर्शन त्याला होते.

''फिपटीन इअर्स इन इण्डिया('हिंदुस्थानात १५ वर्षे) नामक ग्रंथाचा एक गोरा प्रवाशी आपल्या त्या ग्रंथात लिहितो. - ''ही राजमाता मर्दाप्रमाणे घोड्यावर बसून फिरतीला बाहेर पडत असे. कसा का तुफान घोडा असे ना, ती त्याला तेव्हाच कह्यात आणून त्यावर सफाईत रपेट करीत असे. जात्या ती फार सौंदर्यवान होती आणि तलम भरजरी पोषाखात ते सौदर्य विशेष खुलून दिसे. ती एकदोनच ठळक दागिने वापरीत असे आणि बुरखा न घेता उघडपणे बाहेर येऊन भेटीला येणा-या हापसरांच्या मुलाखती घेत असे. त्या वेळी तिचा बोलका नि प्रेमळ स्वभाव तेव्हाच सर्वांच्या पहाण्यात येई. शरिराचा बांधा मजबूत नि मध्यम असून तिचा वर्ण केतकी रंगावर गोरा होता. तिचे वय ४०-५०च्या दरम्यानचे असावे. हिंदू स्त्रियांच्या अंगी स्वभावताच असणारा भित्रेपणा तिच्या अंगी नव्हता. थोडक्यात सांगावयाचे तर ही बाई मोठी बुद्धिवान आणि प्रसंगावधानी होती. राजा (प्रतापसिंह) काही तसा नसे. म्हणूनच राजकारणी मसलतीच्या वेळी कोणाला कोणत्या प्रश्नाला काय उत्तर द्यायचे. हे सुद्धा तो तिला विचारून देत असे.''

स्वभावाने माईसाहेब अत्यंत करारी नि मानी असल्यामुळे रावबाजींनी नेमलेल्या त्रिंबकजी डेंगळयांच्या हरएक साध्यासुध्या बाबतीतल्या प्रतिबंधामुळे, त्या इतक्या चिडलेल्या संतापलेल्या होत्या, का परकीय आंग्रेजांच्या ओंझळीने साधे माणुसकीचे मर्यादित पाणी पिणे बरे, पण नाव मोठे नि कर्म खोटे, असले हरघडी सेवकांच्या तोंडाकडे पहाण्याचे बेगडी वैभवाचे जिणे नको, असे त्यांना वाटल्यास टीकेला जागाच नाही. या राजकुटुंबाला कसकसे अवमान नि अडचणी सोसाव्या लागत, याची दोन तीन ठळक उदाहरणे पहा. नव्या राजवाड्यातल्या माजघरात ढेकूण झाले म्हणून वरच्या दिवाणखान्यातले तक्त नि जामदारखाना खाली आणून, आम्हाला दिवाणखाना वापरायला द्या. असे माईसाहेबांनी बंदरे कारभा-याला सांगितले, तर तो म्हणाला, ''पुण्याला सदाशिव माणकेश्वर (पेशव्यांचे कारभारी) यांना पत्र पाठवून खुलासा विचारतो, त्याशिवाय मला काही करता येणार नाही.'' प्रतापसिंहाचे वडील (धाकटे) शाहू महाराज यांच्या वैशाख शुद्ध ९च्या श्राद्धाला आकरा मराठे पितर आणि दहा मराठणी (सवाष्णी) जेवायला लागायच्या. त्या बायांची जातायेता कस्सून झडती घ्यायची, हा पडला डेंगळयांचा हुकूम. या मुद्यावर अर्थात कलागति व्हायच्या नि माईसाहेब संतापायच्या. झाडा घ्यायचा का नाही, याचेही हुकूम पुण्याहून काशीपंत मागवणार आणि तेहि श्राद्धाचा दिवस उगवल्यावर! तुम्हा आम्हाला सुद्धा असले प्रतिबंध संतापाने वेडे करतील, मग त्या मानी राजकुटुंबाला काय वाटत असेल, याची कल्पना केलेली बरी. माईसाहेबांची सासू (शाहू महाराजांची वृद्ध मातोश्री) शहरातल्या वाड्यात एकाकी भयंकर आजारी पडली. ''पायास गुडघ्याखाली कला बहुत लागल्या आहेत. सिरागत वायूची भावना, वैद्य बोलतात. ज्वरहि आहे. काहिली बहुत.'' किल्ल्यावर माईसाहेबांना बातमी समजताच त्यांनी चौकशीला एक दासी पाठविली. म्हातारी म्हणाली, ''माईला म्हणावे, मला येऊन जाऊन जा.'' झाले, काशीपंत उद्गारले, - ''ते सारे खरे. पण पुण्याचा हुकूम आल्याशिवाय मी काय करू शकणार? जाऊ देता येणार नाही.'' वाचकहो, या दोन तीन नमुन्यावरून, छत्रपतींची पेशवे महाशयाने कशी बडदास्त ठेवली होती, हे आलेना तुमच्या नीट ध्यानात? असल्या काचाला कंटाळून. कोणीही मानी माणूस आंग्रेजांच्याच कायपण जंगली आस्वलाच्याही गळयात सुटकेसाठी मिठी मारायला तयार होईल. चंद्रमौळी झोपडीतल्या कष्टाळू शेतक-यालाही त्याच्या लकतरी जीवनात केवढी मोकळीक नि मुभा असते, तेवढीही या राजकुटुंबाला पेशव्यांनी ठेवली नव्हती, हा मुद्दा आत्मीयतेने विचारत घेतला तर त्यानी आंग्रेजांकडे राजकारण करण्यात कसलीही चूक केली नाही, हे कबूल करावे लागेल.

चित्पावन आयागो बाळाजीपंत नातू.

माणुसकीला आरपार पारखा असलेल्या या इसमाचे त्रोटक चरित्र परिशिष्टात दिलेले आहे. येथे चालू राजकारणातल्या त्याच्या उलाढालीच आपल्याला पहावयाच्या आहेत. अलपिष्टनाचा शिरस्तेदार आणि संभावित हेर म्हणून, छत्रपतीशी वागताना नातू एकीकडे मोठा लाघवीपणा तर दुसरीकडे साहेबाच्या पाठिंब्याचा मगरूर तोरा मिरवीत असे. पेशव्याला खाड्यात घातला नि छत्रपतीला खोड्यात अटकावला, ही सारी कर्तबगारी माझीच असल्यामुळे, अलपिष्टन कोणत्याही बाबतीत माझ्या शब्दांपलिकडे जाणार नाही, ही नातूची मनोमन खात्री होती. म्हणून छत्रपतीपुढे तो नेहमी छाती वर काढून वागत असे. शिवाय छत्रपतीची आंग्रेजाशी झालेल्या मसलतींचे सूतोवाच नातूच्या मार्फतीनेच झालेले असल्यामुळे तेवढ्यापुरते तरी छत्रपतीवर आपले वजन आहे, असे त्याला वाटणे साहजिक होते. परंतु प्रतापसिंह नि माईसाहेब अगदीच काही दुधखुळे नव्हते. त्यांनी नातूच्या मनाचा नि हेतूंचा पक्का ठाव घेऊन ठेवलेला होता. बेलसरला झालेल्या पहिल्या भेटीपासूनच नातू त्यांच्या मनातून पुरा उतरला होता. साहेबाच्या तर्फे तो बोलणार चालणार, तेव्हा वरचेवर त्याच्याकडून होणा-या अतिप्रसंगाबद्दल चकार शब्द न काढता, हरघडी घडणा-या घटना मिटल्या तोंडी विवेकाने अभ्यासित मायलेक स्वस्थ असत. खरे पाहिले तर थोरले शाहू महाराज वारल्यानंतर सातारचा सारा कारभार पुण्याला रवाना झाला. अर्थात चिटणीस फडणीस सेनापति वगैरे राजमंडळाचे पुरातन अधिकारी पानतंबाकू चघळीत घरोघर स्वस्थ बसले. वतनांचे उत्पन्न खावे नि स्वस्थ रहावे. पुढे रावबाजीने तर त्यांची वतनेही बरीच खच्ची केली. आता प्रतापसिंहाला कुंफणी सरकार गादीवर बसवणार, आंग्रेजांच्या ताटाखालचे मांजर येवढीच या छत्रपतीची सत्तामत्ता असणार ही गौप्याची कुणकुण नातूला होतीच. छत्रपतीची पद्धतशीर स्थापना होताच. राजमंडळही अस्तित्वात येणार. तेव्हा छत्रपतीची दिवाणगिरी आपणाला द्यावी, असा नातूने अलपिष्टनाकडे जोर लावला. जुना फडणीस विठ्ठल बल्लाळ महाजनी याने सरकारसेवा अखंड केलेली असल्यामुळे, तो दिवाणगिरीच्या जागेवर टक लाऊन बसला होता. विठ्ठलपंताने बळवंतराव चिटणीसामार्फत आपल्या हक्काचे लोण अलपिष्टनापर्यंत पोचविण्याची खरटपट केली. ‘साहेबाजवळ माझा वशिला. या चिटणिसाला साहेब काय धूप घालणार?’ या कल्पनेत नातू होता. पण अलपिष्टन नातूला पुरा ओळखून होता, हे नातूला उमगत नव्हते. कामापुरता हवा त्याला मामा बनवून स्वार्थ साधण्याची आंग्लाई हिकमत अलपिष्टनापासून आजगदिनतागायत अखंड चालू आहे. अलपिष्टनाने विचार केला, बाळाजीपंत नातूसारख्या चित्पावनाला छत्रपतीचा पेशवा केले, तर काय बदल होणार? भट पेशवाईच्या मागोमाग नातू पेशवाई चालू होणार! चित्पावनी सत्ताबाजीला मराठ्यादि बामणेतर आणि यच्चावत चित्पावनेतर जसे विटले होते, तसे अलपिष्टनादि आंग्रेजही त्यांच्या कुटील नीतीला ओळखऊन होते. चित्पावन नातूपेक्षा क-हाडा महाजनी दिवाण केलेला बरा, या उद्देशाने त्याने हे दिवाणगिरीचे प्रकरण प्रतापसिंहाकडे आपल्या शिफारशीसह निवाड्यासाठी पाठवून दिले. प्रतापसिंहाने विठ्ठपंतालाच दिवाण करावे, असा निकाल दिला. नातू चरफडला. विठ्ठलपंताचे नि त्याचे कायमचे वैर आहे. प्रतापसिंहाविषयीही नातूने सापासारखा मनात डूक धरला. आपण वाईटपणा घेण्यापेक्षा, परस्पर छत्रपतीच्या इच्छेला पुढे करून, अलपिष्टनाने पाहुण्याच्या हातून विंचू ठेचण्याचे काम उरकून घेतले.

अलपिष्टनाच्या ग्रॅण्टला गुप्त सूचना

वासोटा जिंकून करंज्याच्या आंबराईत छत्रपतीची छावणी पडण्याच्या अवधीत. सातारा प्रकरणात आपले धोरण काय आहे, हे राज्य का उत्पन्न करीत आहोत आणि रेसिडेण्ट म्हणून तुमची नेमणूक होणार, तेव्हा कोणत्या डिप्लोमॅटिक (दगलबाजी) पॉलिसीने तुम्ही महाराजाशी वागायचे आहे, याच्या तपशीलवार सूचना देणारे एक पत्र (ता. ८ एप्रिल १८१८) अलपिष्टनाचे ग्रॅण्टला पाठविले. त्यातले इषारे सारांशात येथेच दिल्यास, आंग्रेजी कारवाईचे पुढले पाचपेच समजायला अडचण पडणार नाही. शिवाय, आंग्रेजी मुत्सद्दी – तेव्हा काय नि आता काय, - प्रत्येक मुकाबल्याच्या सृष्टी-स्थिती-लयाचा बिनचूक नकाशा तयार करूनच, दूरदर्शीपणाने राजकारणाचे डाव कसे खेळतात. याचेही प्रत्यंतर पटेल. या महत्त्वाच्या पत्राचा भावार्थ असा –

“गनर्नर जनरलची मंजुरी मागविलीच आहे. पण ती येईपर्यंत मी तुम्हाला सातारा राज्याचे रेसिडंट म्हणून नेमीत आहे. मराठ्यांचे हे छोटेखानी संस्थान निर्माण करण्यात आपले उद्देश काय नि ते साधण्यासाठी काय काय केले पाहिजे, याची रूपरेशा मी तुम्हाला कळवीत आहे. शिवाजीच्या जुन्या राजघराण्यातल्या वंशजांना मानमरातबाने रहाता यावे आणि पेशव्याच्या बामणी सत्तेच्या उरल्यासुरल्या वचकाला नि वजनाला पायबंद पडावा, या हेतूने ही सातारची गादी ठेवण्याचे गवर्नर जनरलने योजिले आहे. आपल्या

कंपनी सरकारच्या नोकरीत ठेवण्यालायक नाही असा लष्करी पेशाचा शिपायीवर्ग या संस्थानच्या गळयात बांधला म्हणजे त्याच्या खर्चाची ब्याद परस्पर भागेल. (आणि राजालाही आपले सैन्य आहेसे वाटेल.) शिवाय आज आपल्याला पोसता न येणा-या कित्येक धार्मिक नि सामाजिक संस्था आहेत, त्या जगवायलाही या संस्थानाच्या तिजोरीचा उपयोग होईल.

''हे हेतू साध्यासाठी पहिली जरूरीची गोष्ट म्हणजे तुम्ही महाराजांच पुरेपूर विश्वास संपादन केला पाहिजे. शिवाय ग. ज. कडून वेळोवेळी येणारे हुकूम आणि याप्रदेशात आपल्या ब्रिटीश सत्तेच्या हुकमतीचा पक्का टिकाव, या दोन गोष्टींचा तोलही सांभाळणे अगत्याचे आहे. हे झाले नाही तर सारे गाडे उलटून आल्या आंगलट येईल आणि साता-याच्या राजाची सुटका म्हणजे बामण पेशव्याच्या दगाबाजीच्या अध्यायाच्या 'मागील अंकावरून पुढे चालू' अवस्थेला आपल्याला तोंड द्यावे लागेल.

''आपल्या वजनाच्या नि हुकमतीच्या सोळा आणे उपयोग करता येण्यासारखीच राजाची आजची अवस्था आहे. आत्ताच तो बंदीवासातून सुटून राज्याचा अधिपति म्हणून मिरवणार आहे. हे स्थित्यंतर काही त्यांच्या परिश्रमाचे फळ नाही. ब्रिटीश सरकारच्या मेहरबानीचे ते फळ आहे. याबद्दलत्याला कृतज्ञता तर वाटतच आहे. यातच हरएक बाबतीत आपल्या तोंडाकडे पाहण्याची परिस्थिती आपण कुशलतेने निर्माण केली तरच हा संस्थान-निर्मितीचा खटाटोप आपल्याला फायदेशीर होणार आहे. आज राजापाशी काय आहे? ना मुलूख, ना सत्ता, ना सैन्य! भवितव्याची बात कशाला? आज उदरनिर्वाहासाठी तो दमडीला महाग असल्यामुळे, आपल्यावरच त्याला सर्वस्वी अवलंबून रहाणे प्राप्त आहे.

''या राजाला कशाचाच काही अनुभव नाही. त्याच्या भवतालचे दरबारीही त्याच मासल्याचे. लेकाचे सारे आपल्या खानदानीचा बडेजाव मिरवणारे. पण कोणी सांगावे? चालू परिस्थितीचा सोयीस्कर फायदा घेऊन, स्वार्थ साधणारे त्यांच्यात काही कारस्थानी पिसाट निघालेच तर आपण बसवीत असलेल्या यंत्राची घडी विस्कटण्याचा संभव फार. म्हणून, मिस्टर ग्रॅण्ट, तुम्हाला फार चतुरायीने नि चिकाटीने वागले पाहिजे.

''आत एकदम महाराजांचा दरबारी नि खासगीसुद्धा सारा कारभार तुम्ही आपल्याच हाती घ्या. सध्या सैन्य आपले नि खर्चही आपलाच. राजाची हुशारी पाहून, देशात स्थिरस्थावर झाली, संस्थानची गंगाजळी सुधारली, म्हणजे थोडाथोडा मुलूख नि कारभार हस्त्या हस्त्याने त्याच्या हवाली करायचा आहे. हरएक लहानमोठ्या खासगी नि दराबारी बाबतीत रेसिडंटाच्या सल्ल्याशिवाय काहीही करायचे नाही. असे मी राजाला अगोदरच बजावून ठेवले आहे. तसेच, सध्या देशात सगळीकडे बंडाळी अंदाधुंदी चालू आहे, म्हणून तुमच्याच कल्याणासाठी ही रेसिडंटाची योजना मी करीत आहे, हेहि त्याला चांगले पटवून दिलेले आहे. या अवधीत तुम्ही आमच्याशी कसे वागता, राज्यकारभारात किती हुशारी दाखवता, यावर पुढील सर्वाधिकाराचा प्रश्न अवलंबून राहील, असा इषाराही मी राजाला दिलेला आहे.

''आपण जे काही करतो ते सारे निःस्वार्थ बुद्धीने महाराजांच्या कल्य़ाणासाठीच करतो, हे वरचेवर राजाला पटवून, त्याचा आपल्यावर पुरापुरा विश्वास बसवून घेणे, अगत्याचे आहे...... राज्यकारभाराच्या खाचाखोचा त्याला नीट समजावून देत जा. त्याच्या आक्षेपांचे समजूतदारपणाने निराकरण करीत जा आणि राज्यकारभाराची व्यापक तत्त्वे त्याला नेहमी शिकऊन, त्याला त्याची गोडी लागील, अशी कोशीस करा.''

मान्यतेसाठी जाहिरनाम्याचा पक्का खर्डा

करंज्याहून त्याच दिवशी साता-यास जाण्यासाठी निघण्यापूर्वी, बेलसर येथे महाराजांनी ''ठीक आहे'' म्हटलेला जाहीरनामा, कलमबहाद्दर बाळाजीपंत नातू याने पक्का (फायनल) लिहून महाराजांच्या अखेर मान्यतेसाठी आणला. त्यात ''छत्रपति महाराजांना पेशव्यांनी कैदेत टाकले होते आणि सर्व सत्ता पेशवा बळकावून बसला होता. इंग्रेजांनी महाराजांना पेशव्यांच्या कैदेतून सोडविले आणि आज गादीवर बसविले.'' हे वाक्य पहाताच, प्रतापसिंह संतापला. तो म्हणाला, - ''बेलसरला वाचून दाखवलेल्या मसुद्यात हे वाक्य नव्हते. आजच का घुसडले? ही अगदी खोटी वस्तुस्थिती आहे. मी पेशव्यांचा कैदी कधीच नव्हतो. पेशवा शिरजोर झाला, म्हणून मी तुमच्या दोस्तीचा यत्न केला. तुमच्या नि पेशव्यामध्ये बेबनाव झाला तेव्हा मी तुमच्या बाजूला आलो. शिवाय, गादीवर मी १० वर्षांपूर्वीच बसलो. आज नव्याने माझा राज्याभिषेक होणार, असे मुळीच नाही. ही वस्तुस्थिती असता, हा अगदी निराळाच मजकूर नव्याने जाहिरनाम्यात का घातला? मी तो कधीच मान्य करणार नाही. काढून टाका हा, बाळाजीपंत.''

अलपिष्टन आणि ग्रॅण्ट दोघेही जवळ होते. महाराजांचे म्हणणे खरे होते हे ते जाणून होते. पण आतापर्यंत त्यांनी जो राजकारणी बनाव घडवून आणला होता, त्याच्या सफाईदार पूर्तीसाठी या वाक्याची फार जरूर होती. जाहिरनाम्यात तो मजकूर म्हणजे महाराजांचा जाहीर कबुली जबाब होणार होता तो. विलायतेला डायरेक्टरांना दाखवण्यास अत्यंत महत्त्वाचा मजकूर तोच हवा होता. पण चाणाक्ष प्रतापसिंहानने त्यालाच कडवा आक्षेप घेतल्यामुळे अलपिष्टनाला मोठा पेच पडला.

माईसाहेबही गो-यामो-या झाल्या. ''हे काय हो साहेब, सुरुवातीलाच जर असे ध चे मा होत गेले तर पुढे तुमच्या आमच्या दोस्तीचा प्रपंच कसा काय चालायचा?'' ग्रॅण्टने मध्यस्थी करून प्रकरण मिटविले. तो म्हणाला – आम्ही महाराजांच्या इच्छेपलिकडे नाही. हे वाक्य दरबारात वाचले जाणार नाही अशी मी हमी घेतो. हे कलम गाळले असे समजावे.

नंतर एकदम कर्णे, तुता-या, शिंगे वाचू लागले. बादशाही थाटाच्या मिरवणुकीने छत्रपतींची स्वारी सातारा राजधानीकडे निघाली. सातारच्या नागरिकांचा आनंद काय वर्णावा? आज कित्येक पिढ्यांनी नि वर्षांनी, नोकर पेशव्याच्या बंदीतून मुक्त झालेले आपले हिंदुपदपातशहा छत्रपति स्वतंत्र म-हाठशाही स्वराज्याचे धनि नात्याने राजधानीत येणार! म्हणून सर्वांनी सारे शहर भरगच्च शृंगारले. तोरणे कमानी उभारल्या आणि हजारो स्त्री-पुरुष, मुले दिवाळी-दस-याचा पोषाख करून मिरवणुकीची वाट पहात सीमेवर उभे राहिले. इकडे कंपनीच्या अंमलदारांनी सबंध राजवाडा ठाकठीक शृंगारून, दरबारचा बंदोबस्त करून ठेवला.

## प्रकरण ६ वे
## अखेर साता-याला पाय लागले

करंज्याहून छत्रपतींची स्वारी दुतर्फा रस्त्याने रयतेचे मुजरे घेत घेत दोन प्रहरी साता-याच्या राजवाड्यात दरबार मंडपात आली. शहरात नागरिकांनी महोत्सव साजरा केला. आनंदोत्साहानिमित्त तोफांची धडेबाजी चालू झाली. रणवाद्यांचा नि मंगलवाद्यांचा गोंगाट उडाला. अलपिष्टनादि मोठमोठ्या गो-या हापसरांच्या पुढारपणाखाली महाराजांचे स्वागत, तक्तारोहण, जाहिरनामा-वाचन वगैरे दरबारी समारंक्ष थाटामाटात साजरे झाले. अखिल म-हाठी साम्राज्याचा आपला धनी छत्रपति आता स्वतंत्र मुखत्याने राज्य चालवायला राजधानीत परत आला, या कल्पनेने तमाम महाराष्ट्रात आनंद झळकला. ''आज रोजी (११ एप्रिल १८१८ शनिवार) छत्रपति महाराजांना साता-यास आणून गादीवर बसविले. ते सिंहासनारूढ झाल्यावर दरबार भरविला. शहरवासियांनी आनंदोत्सव केला.'' असा अलपिष्टनाने खास घोडेस्वार पाठवून आपल्या वरिष्ठांकडे रिपोर्ट धाडला. इतकेच नव्हे तर थेट विलायतेच्या डायरेक्टरानाही ही बातमी शक्य तितक्या लवकर समजावी, म्हणून अफगाणिस्तान, इराण, इराकच्या मार्गे खास ओवरलॅण्ड टपाल सांडणीस्वाराबरोबर रवाना केले.

दुस-या दिवशी अलपिष्टनाने महाराजांना नि राजकुटुंबियांना थाटाची मेजवानी दिली. दरबारच्या लोकांना मौल्यवान पोषाख दिले. कित्येकांना जवाहिराचे दागिनेही वाटले. ठिकठिकाणाहून आलेल्या जहागिरदारांनाही महाराजांच्या मुलखाति करवून मेजवान्या देणग्यांनी संतुष्ट केले. 'आहाहा! केवढे हो हे गोरे लोक माणुसकीचे! बस्स, दोस्ती करावी तर अशांचीच.' या भावनेच्या जादूने तमाम लोक आंग्रेजांवर निहायत दिलखुष होऊन गेले.

दरबारात पूर्वी सांगितलेला जाहिरनामा, आक्षेपित कलम वगळून, वाचण्यात आला मात्र ते कलम जाहिरनाम्याच्या कागदावर शिल्लक उरले ते उरलेच. क्लैवने कलकत्त्याच्या उमीचंदाला खोटा दस्तऐवज करून जसे फसविले, तोच आंग्लाई संभावितपणा अलपिष्टनाने केला.

दरबार आटोपल्यावर महाराज, माईसाहेब, अलपिष्टन, ग्रॅण्ट नि बाळाजीपंत नातू वगैरेची एक खासगी बैठक झाली. विठ्ठलपंत महाजनी यास दिवाणगिरी, बळवंतराव मल्हार यास चिटणिसी, बळवंतराव राजे भोसले यास सेनापतीचा अधिकार, वगैरे नेमणुका ठरविण्यात आल्या. छत्रपतीची दिवाणगिरी मिळाली नाही म्हणून नातू आंबट तोंड करून बसला होता. अलपिष्टनाने त्याला ग्रॅण्ट रेसिडंटाचा मदतनीस म्हणून साता-यासच कायम केले.

पुढे निघाला स्वराज्याच्या हद्दीचा प्रश्न. तेव्हा, रसेलसाहेब कलकत्याहून बडे लाटसाहेबाचा कसा हुकूम घेऊन येतो, त्यावर तो लोंबकळत ठेवून, ही बैठक बरखास्त झाली. रावबाजीने प्रतापसिंहाचे नाव

‘शाहू’ छेवले होते ते बदलून, ख-या प्रतापसिंह नावाचे शिक्के चालू करण्यात आले. ता. १३ एप्रिलला छत्रपति किल्ल्यावर रहावयास गेले.

ग्रांटच्या मुतालिकीचा जाहिरनामा.

ता. १९ एप्रिलला प्रतापसिंहाकडून ग्रांटने आणखी एक जाहीरनामा प्रसिद्ध करविला. तो असा – कंपनी सरकारची व या सरकारची दोस्ती होऊन स्वारी सातारियाच्या पदावर सिंहासनारूढ झाल्याची पत्रे सादर झाली आहेत. त्यांत सरकारात जो मुलूख होईल त्याची आबादी व्हावी व रयतेस उपद्रव करणा-यांचा बंदोबस्त व्हावा व जे गैर चालतील त्यास शिक्षा होऊन या सरकारची उत्तम रीत सरकारात प्रगट व्हावी, याजकरिता ग्रॅण्टसाहेब बहादूर यांस आज्ञा केलीसे. तरी मशारनिल्हे ज्या त-हेने मुलखाची आबादी होईल ते करतील व जे गैरराहा चालतील व सरकार कामात प्रतारणा करतील व रयतेस उपद्रव देतील, त्यास हे शिक्षा करतील. हे सर्वांस महशूर व्हावे.

सुतकातच समारंभ उरकले!

बापाच्या मृत्यूच्या १३व्या दिवशी त्याचे तेरावे घालण्या ऐवजी प्रतापसिंहाला रावबाजीने, धर्मकर्मांच्या भावना खुंटीवर अडकऊन, राजगादीवर बसविण्याचा समारंक्ष उरकून घेतला होता. तेराव्यालाच बारशासारखा तो प्रकार झाला. आता आंग्रेजांच्या मेहरबानीने प्रतापसिंहाची साता-याला पुनर्स्थापना झाली, त्यावेळीही त्याचे ग्रहमान पिडलेले असावे. स्थापनेपूर्वी अवघे पांचच दिवस वासोट्याच्या किल्ल्यावर प्रतापसिंहाचा पुतण्या अल्पवयी बाबासाहेब राजे भोसले (भाऊसाहेबाचा मुलगा) भाजून मरण पावला होता. स्थापनेनंतर अवघ्या चारच दिवसांनी रावबाजीने कैद करून ठेवलेला चुलता मर्द चतुरसिंग भोसले कांगोरीच्या किल्ल्यावर बंदिवासाचे हाल भोगून मरण पावला. तात्पर्य, राज्यप्राप्तीचा सारा सोहळा सुतकातच साजरा केला गेला, ही गोष्ट मनाला लागून रहाण्यासारखीच झाली.

चतुरसिंगाची अखेरची धडपड

चतुरसिंग कांगोरीच्या किल्ल्यावर तुरुंगात होता, तरी देशात सर्वत्र चाललेल्या राजकारणाचे साद पडसाद त्याच्या कानावर जात येत होतेच. रावबाजी विरुद्ध आंग्रेजांनी हत्यार उपसल्याची बातमी त्याला लागताच आणि खुद्द छत्रपतीच्याही मसलतीचे धागेदोरे अलपिष्टनापर्यंत पोचल्याचे समजताच, त्याने अलपिष्टनाशी आपल्या मुक्ततेसाठी गुप्त पत्रव्यवहार चालू केला. ‘आपण मला मुक्त करून हाताशी एक दोन पलटणी द्याल, तर पेशव्याला उखडण्याच्या कामी मी तुम्हाला मदत करीन. मी लढवय्या आहे. का उगाच तुरुंगात कुज्रून मरू देता?’ अशा आशयांचा तो पत्रव्यवहार होता. त्याचे शेवटचे पत्र. ता. २५ जानेवारी १८१८ चे (पे. द. ४१ नं. १८४) अलपिष्टनाला गेले होते, ते असे –

श्रीसांब हेरंब

अजम क्रम आलपिष्ट साहेब व करणेल
साहे इंग्रज भाहाद्दर दाम मोंबत हूं
छ अजि दिल एकलास चतुरसिंगराजे सेनासाहेब सुभा सलाम बाजत सलाम उं कीं दिगर खैर खुषी कलमे करीत जावी विशेष. राजश्री बाजीराव पेशवे याणी आमच्या राज्याचा बंदोबस्त करून आम्हास कैदेत ठेऊन कारभारात करीत आहेत. हाली फौज पाठवून नाना प्रकारचे उपद्रव आम्हास करीत आहेत. व माहाराज छत्रपति यासही आपलेबरोबर फिरवीत आहेत. या प्रकारे आमची आवस्ता आहे. म्हणोन पेसजी तुम्हास पत्रे पाठविली होती. त्यास दोन महिने जाहाले. आद्याप उतर व कागदी आले नाही. याजकरिता हाली पत्र पाठविले आहे. तरी या समई आम्हास कुमकेस दोन पलटणे पाठवून द्यावी म्हणजे इकडून बंदोबस्त करीत येतो. भेटीनंतर बोलणे होऊन तुमचे आमचे विचारे जे करणे ते करावयासी येईल. परंतु लिहिल्याप्रमाणे पत्र पावताच दोन पलटणे पाठवावी. येविसी गोविंदराव गाईकवाड पाठविले आहेत. मुखजबानी सविस्तर पोलतील ते समजोन घेऊन पलटणसुधा रवानगी करावी. चितात कोणयेक अंदेशा आणू नये. रा छ २९ रोवल जादा काये लिहिणे.

जानेवारी फेब्रुवारीचा महिना अलपिष्टनाला खच्चून गडबडीचा नि धांदलीचा असल्यामुळे, त्याने चतुरसिंगाच्या विनवणीकडे लक्ष दिले नसेल. शिवाय जेथे तो खास म-हाठी राज्याचा धनीच आपल्या जाळ्यात आणण्याच्या कारस्थानात गुंतलेला, तेथे तो या बंदिस्थ सेनापतीच्या सहकार्याला कितीशी किंमत देणार? तशात चतुरसिंगाचा आदेश नि तडखा तो ओळखून होता. असला अष्टपैलू मसलतगार प्रतापसिंहाजवळ उभा ठाकला तर त्याला जोर येणार आणि आपल्याला ज्या कागदोपत्री घालमेली करून,

या पोरसवदा छत्रपतीला ‘बनवायचे’ आहे, ते कार्य चतुरसिंगाच्या निकटपणाने साधणार नाही. हा दूरधोरणी विचार करूनच अलपिष्टनाने चतुरसिंगाच्या पत्रांना केराची टोपली दाखविली असली पाहिजे खास.

अरे हो, पण रंगो बापूजी कोठे आहे?

वाचकांच्या लक्षात एक ठळक गोष्ट आली असेल की मूळ महाराजांना मुक्त करण्यासाठी आणि मसलतीचे लोण अलपिष्टनापर्यंत नेण्यासाठी, ज्याने हजार गुप्त उघड भानगडी केल्या, वेषांतरे केली, धाडसे लढवली, तो रंगो बापूजी अष्ट्याच्या मुकाबल्याच्या घटकेला जो गडप होतो, तो पुढे भरघोस रंगत गेलेल्या नाटकाच्या एकाही अंकाच्या एकाही प्रवेशात चुकूनसुद्धा दिसत नाही! अष्टेवाळकी ते बेलसर, पुन्हा बेलसर ते सातारा, एवढ्या थाटामाट्च्या छत्रपतीच्या स्वा-या गावोगाव मिरव्लाय.साता-याला दरबार भरला. दिवाण, सेनापति चिटणिसादिकांच्या नेमणुका झाल्या. पण कोठेही एका कोप-यात रंगो बापूजी उभा असलेला दिसत नाही! हा काय चमत्कार? सन १८१८ पासून तो १४ नोव्हेंबर १८३१चे त्याने प्रतापसिंहाला लिहिलेल्या पत्रापर्यंत तब्बल १३ वर्षे तो होता कोठे नि करीत तरी काय होता? याचा आता आपल्याला सुगावा घेतला पाहिजे.

‘संकट समई महाराजांची सेवा केली.’ पण संकट निवारण होऊन महाराज हेतूसिद्धीच्या मार्गाला लागताच, रंगोबा मुकाट्याने बाजूला सरला. तो महाराजांबरोबर होता, पण चालू झालेल्या राजकारणात त्याने मुळीच लुडबूड अथवा ढवळाढवळ केली नाही. निश्चळपणे सर्व काही तो पहात होता. दरबार भरून महाराज गादीवर बसले तेव्हाही, भटी पिण्डाच्या मनोवृत्तीने दक्षणेचा अथवा बक्षिसाचा स्वार्थ साधण्यासाठी, हात पसरून तो पुढे झाला नाही. त्याला दरबारात अधिकाराची जागा नको होती. केवळ एकच हेतू तो उराशी घट्ट धरून बसला होता. छत्रपतीच्या चार पिढ्या नि त्याच्याही चार पिढ्या निजधामाला गेल्या. त्याच्या खापरपणज्यावर वतनाबाबत झालेल्या अन्यायाची भरपाई करून घेण्यासाठी तो धडपडत होता. त्याला पोषाख, पदवी, जवाहीर, होन, काही नको होते. रंगोबाच्या जागी एकादा चित्पावन भटजी असता, तर त्याने आपल्या खटपटींचा राईचा पर्वत करून, छत्रपतींपुढे नि अलपिष्टनापुढे एकनिष्ठेचे मोठे प्रदर्शन थाटले असते आणि दक्षणा म्हणून हजारो रुपये इनाम, जमीन, शेतवाडीची सोय करून घेतली असती. प्रतापसिंहाच्या चरित्राच्या उत्तरार्धात, त्याच्याविरुद्ध कारस्थाने करणा-या कवडी किंमतीच्या भटांनी आंग्रेजांकडून भरभक्कम लाच इनामे खाल्ल्याची उदाहरणे पुढे येणारच आहेत.

“हे राजकारण मोठे! दहा वर्षे गप्प बैस.”

प्रतापसिंह गादीवर बसताच, रंगो बापूजीने चाफळच्या स्वामीला आणि विठ्ठलपंताला विचारले की हाती घेतलेले काम सिद्धीला गेले. आता पुढे माझी वाट काय? त्यावर स्वामींनी स्पष्ट खुलासा केला की ‘महाराजांना मुखत्यारी मिळायला पांच वर्षे लागतील. पुढे सर्वाधिकारी झाल्यावर आणखी पांच वर्षे तुला थांबले पाहिजे. म्हणजे सर्व काही ठीक होईल.’ तरीही स्वारीचा मुक्काम करंज्याच्या आंबराईत असताना एक योग आला. त्याविषयी रंगो बापूजी आपल्या १८३१ सालच्या पत्रात लिहितो. - “तो बडेसाहेब करंज्याचे बागेत आले. ते कालीं सर्वांचे म्हणणे पडले कीं आम्ही राजकारण केले. तेव्हा मी पुण्यास विश्वनाथराव याजबरोबर होतो. तेथून मला चिटणिसांनी आणविले आणि बडेसाहेबापासी भेटविले. ते काळी विठ्ठलपंतबाबा व अमात्यपंत व चिटणीस व बाळाजीपंत नातू आसे होते. साहेबाने विचारले की तू चाकर कोणाचा? मग मी उत्तर केले की चाकर चिटणीसाचा, चाकरी सरकारची केली आहे. तेवेळी मी विनंती केली की माझा बंदोबस्त (वतनाचा) साहेबांनी करून द्यावा. ग्रांटसाहेब यास सांगितले (कोणी? महाराजांनी?) याणी चाकरी फार केली आहे. याजकरिता बंदोबस्त द्यावा, बोलले. ते वेळी कोण्हाचे पोटत काय वाकडे आले न कळे. माझे बोलणे कोण्ही बोलले नाहीत.” नातूसारखा जिवंत शनिग्रह सातारच्या बेगडी दरबाराच्या उरावर असताना, थोड्याच दिवसांत भल्या भल्यांची वासलाद लागली. तेथे रंगोबा कुठल्या झाडाचा पाला?

परिशिष्टात समग्र छापलेल्या रंगोबाच्या स्वदस्तुरच्या पत्रावरून असे दिसते की चिटणिसांनी त्याला अक्कलकोटला काही कामावर पाठवून दिले. तेथे असताना महाराजांविरुद्ध काही कारस्थान झाले. त्याचे पुराव्याचे कागदपत्र रंगोबाने मुंबईला जाऊन पक्डले. पण त्या कटबाजांनी रंगोबाला पकडून बेडी ठोकून कैदेत टाकले. या बाबत “हे संस्कार पेशजीचे राजकारणात हस्याची बाकी राहिली होती ती जप्ते याणी केली.” असे तो म्हणतो. यानंतर तो ईस्ट इण्डिया कंपनीच्या नोकरीत गेला. कारण २१ डिसेंबर

१८१८ च्या महिदपूरच्या लढाईत कॅप्टन ब्रिग्ज बरोबर रंगोबाही हजर होता. 'तारीख ३ माहे डिजंबर सन १८२० इसवी' रोजी त्याने लिहिलेल्या पत्रावरून (पे. द. ४१ नंबर २५९) तो कंपनी सरकारचा आमीन (मामलतदार) म्हणून नाशिक खानदेशी पेशवाई अंमलातले गाव, गड, कोट किल्ले कंपनी सरकारात रुजू करण्याच्या कामावर असलेला दिसतो. (पत्र परिशिष्टात छापले आहे) ठाणी जिंकून तेथे कंपनी सरकारचा अंमल बसवायचा, विरोध होईल तेथे प्रथम साम-दाम-दंड-भेदादि यत्न फसल्यावर चक्क लढाईचा सामना द्यायचा. ही कामे तो करीत होता. ''नंतर किले कावनई व गडगडा व त्रिंगळवाडी हे तीन किले पेशव्याकडील अमलात आमचे व्याह्याकडे होते. ते किले हस्तगत होईनात. तेव्हा बनेल त्या रीतीने त्याची खातरजिमा करून भेटीस म्हणोन बोलाऊन आणून धरून घेऊन साहेब बहादुर याचे जवळ हजर केले आणि तिनी किल्ल्यावर ठाणी कायेम केली. या प्रमाणे कितेक किले व महाल लढून व कितेक फूस लाऊन घेतले. मधमधे पेशव्याकडील फौजेची व रूपराम चौधरी याचे पलटणाची गाठ पडून तेथे छापा वगैरे घालून साहेबाचे प्रतापे पराभवाते पाठविले व लूट तोफा वगैरे सरंजाम सापडला तो सरकार दाखल केला.'' या मजकुरावरून रंगोबाने कंपनी सरकारचीही आमीनदारी कमाल कसोशीने नि निष्ठेने बजावली हे दिसते.

कंपनीच्या नोकरीच्या इत्यर्थ

पहिल्यापासूनच रंगोबाचे घराणे गरीबीचे. हक्काने जमीन कसून भाकरी खावी, तर वतनाची वाट लागलेली. तेव्हा चिटणीसांच्या सावलीत पडेल ती छत्रपतींची सेवा करायची, एवढेच या घराण्यातल्या मंडळींनी केले. प्रतापसिंह गादीवर आला, चिटणीस फडणिसादी मंडळी आपापल्या कामावर रुजू झाली, ग्रॅण्ट नि नातू यांचा कारभार चालू झाला आणि रंगो बापूजी तेवढा उघडाच राहिला. अक्कलकोटाहून तो निघाल्यानंतर, लवकरच कंपनीच्या अलपिष्टनादि अधिका-यांनी त्याला आपल्या नोकरीत घेतले. ते सारे रंगोबाचे पाणी ओळखून होते. हातात घेतलेल्या कार्यासाठी हा इसम काय उचापति करील नि काय नाही, याची त्यांना पुरी माहिती होती. त्रिंबकजी डेंगळ्यासारख्या जहांबाज जबरदस्ताच्या कडेकोट अटकेत असलेल्या प्रतापसिंहाची ज्याने अनेक हिकमती संधाने नि मसलती लढवून अखेर सुटका करविली, असला असामी यापुढे छत्रपतीच्या आसपास ठेवणे जसे आंग्रेजी धोरणाला पथ्यकर नव्हते, तसे त्याला रिकामे भटकायला सोडणेही घातकच होते. स्वराज्य नि स्वातंत्र्याच्या तिरमिरीने, छत्रपतीच्या पुनर्घटनेसाठी, ज्यांनी स्वकीय पेशव्याचाही चेंदामेंदा करविण्याच्या कारवाया केल्या, ते रंगोबासाखे छत्रपतीनिष्ठ आम्हा परकीय नि उप-या गो-या लोकांची जराशी बदचाल दिसताच, केव्हा कसे चुटकीसरसे आम्हाला तडाड उखडण्याचा व्यूह रचतील, याचा नेम नाही, ही जाणीव आंग्रेजांना चांगली होती. म्हणूनच अलपिष्टन ग्रॅण्ट नातू संधी दिसताच त्याला आपल्या नोकरीत अडकवून टाकले.

या आंग्रेजांचा धोरणीपणा जसा दिसतो, तसा प्रतापसिंहाचा बेदादपणा स्पष्ट सिद्ध होतो. संकट समयी आपल्यासाठी कोण कोण खर्ची पडले, याची त्याने चौकशीच केली नाही. मराठे नृपतींचा हा बेदर्दीपणा आजदिन तागायत जशाचा तसा चालू आहे, याचा वाईट अनुभव प्रस्तुत लेखकाने चांगलाच घेतला आहे. एका करवीरकर शाहू छत्रपतीशिवाय बाकीचे सारे मराठे संस्थानिक कामापुरता हवा त्याला मामा म्हणतील. काम झाले का मग त्यांना कोणाचीच आठवण राहत नाही. असो. १३-१४ वर्षांनी आंग्रेजांची नातूप्रासादीक कारस्थानांची तात प्रतापसिंहाच्या मानेभोवती भराभर गुंडाळली जाऊ लागली, तेव्हा त्याला रंगो बापूजीची आठवण कशी झाली, हे आपण पुढे पहाणारच आहोत.

एक गोष्ट ठळक दिसते. प्रसंगाप्रमाणे पडेल तो व्यवसाय केला, तरी रंगो बापूजी आपल्या छत्रपतीनिष्ठेत लवमात्र चळला ढळला नाही. सन १८३१ साली केव्हा तरी त्याच्या स्वाभिमानाला धक्का लागून, त्याने कंपनीच्या नोकरीवर लाथ मारली असावी. म्हणूनच प्रतापसिंहाला पत्र पाठवून त्याने आपल्या अस्तित्वाचे नि हलाकीचे त्याला स्मरण करून देण्याचा यत्न केलेला दिसतो. रावबाजी पेशव्याच्या सर्व उघड गुप्त हालचाली, बातबेत आणि ठावठिकाणे जेव्हाच्या तेव्हा कळविण्यासाठी, कंपनीच्या अधिका-यांनी शेकडो ब्राह्मणांना भरपूर तनख्यावर गुप्त हेर म्हणून जागोजाग महाराष्ट्रभर पेरून ठेवलेले होते. पेशवाई घशात पडल्यावर, त्या सगळयांची चंदी बंद झाली. अशा अनेक मंडळींनी अलपिष्टनादि अधिका-यांना आपापल्या कामगिरीचे तक्ते पाठवून 'आमची काही तरी कायमची सोय लावा.' अशा आक्रोशाचे पुष्कळ अर्ज पेशवा दफ्तर नं. ४१मध्ये छापलेले आढळतात. रंगो बापूजीने असा एकही यत्न केला नाही. त्याने विश्वासाने छत्रपतीकडेच धाव घेतली. परिस्थितीप्रमाणे कंपनीची अमीनदारी पत्करली, निष्ठेने चोख कामगिरी बजावली आणि स्वाभिमानाला पटेनासे होताच दिला तो

मार्ग सोडून, यापेक्षा रंगोबाच्या कंपनीच्या नोकरीच्या मुद्यात विशेष ब्रह्म काहीच नाही. मात्र, लंडनला चवदा वर्षे ठाण मांडून, कंपनीच्या हिंदवी कारवायांच्या चिंधड्या चिंधड्या उडवणारा रंगो बापूजी एक वेळ त्याच कंपनीचा नोकर होता, ही गोष्ट मोठी मनोरंजक तर खरीच.

आता रंगोबाला येथेच सोडून आपल्याला प्रतापसिंहाच्या नव्या जीवनाचा ओघ कसा काय चालला आहे, तो पाहिला पाहिजे. चला पुढे.

प्रकरण ७ वे

ग्रॅण्टसाहेब गुरु नि छत्रपती चेला.

म-हाठ्यांचा इतिहास अत्यंत परिश्रमाने, स्वार्थत्यागाने आणि आवडीने इंग्रेजीत लिहून पहिल्यानेच प्रसिद्ध करणारा जो सुप्रसिद्ध ग्रॅण्ट डफ तोच कॅप्टन जेम्स ग्रॅण्ट डफ साता-याचा कंपनी सरकारचा पहिला रेसिडंट. याने प्रथम आपली कचेरी आंग्रेजी टापटिपीने थाटून, प्रतापसिंहाला तसा कित्ता गिरवायला लावले. कचेरीच्या वेळा ठरवून, कामदार कारकुनांनी ठरल्या वेळी बिनचुक यावे, हा नियमतिपणाचा नवीन धडा ग्रॅण्टनेच म-हाठशाहीत प्रथम चालू केला. स्वारांनी नि हुजरे शिपायांनी ‘एका दस्तुराची पागोटी व आंगरखे घालावे,’ अशी युनिफॉर्म पोषाखाची पद्धत चालू केली. खुद्द महाराजांनीही आपल्या खास कचेरीत ठरल्या वेळी नियमित येऊन कामकाज पहावे, न्याय निवाडे करावे, रोजचा जमाखर्च तपासावा आणि रात्री निजण्यापूर्वी प्रत्येक दिवसाच्या दिनचर्येची – कोणकोण भेटले, कां भेटले, काय कामे केली, देवदर्शन, प्रवास, सणवार, वादविवाद इत्यादि सगळया प्रसंगांची हकिकत – तपशीलवार लिहून ठेवीत जावी,*१ असाहि त्याने दण्डक घातला. प्रतापसिंह जात्याच प्रागतिक पिण्डाचा असल्यामुळे ग्रॅण्टच्या प्रत्येक सुधारणेच्या सूचना तो भराभर आत्मसात करू लागला. महाराजांनी धर्माच्या नावाखाली भटाबामणांना दक्षणेची वारेमाप उधळपट्टी करू नये. आपला बडेजाव दाखवण्यासाठी लोकांना किंवा सरदार दरकदरांना विनाकारण देणग्या बक्षिसांची खैरात करू नये, वाजवी तेवढाच खर्च करून आबादाबात रहावे आणि सरकारची गंगाजळी वाढती ठेवण्याची अखंड विवंचना बाळगावी असल्या सर्व बाबातीत ग्रॅण्ट प्रतापसिंहाला वरचेवर सूचना देऊन त्याच्या वर्तनावर नि हालचालींवर कडवी नजर देऊन बसला होता. दररोज ठरल्या वेळी तो प्रतापसिंहाला भेटायला यायचा नि बारीकसारीक गोष्टींची चौकशी करायचा. ३० ऑक्टोबर १८१८ची नोंद पहा. - ‘‘ग्रांट आले जमाखर्चाची वही सरंजामे यांची दाखविली. वहीवर जमा महाराजांचे नावे केली. तकसीरदार (गुन्हेगार) याचे पारपत्याचे व फासी देण्याचे पर्याय बोलिले. नंतर वाकबगारीचे पर्याय. कोणी फिर्याद केली तरी लागलीच जफती करू नये. चौकसीने करावे. माहाराजाचे हातास मुलूक जलद आला, तर चौकसी नीट ब्राह्मण लोक करणार नाहीत, माहाराज दस्तूर चांगला समजो लागले व कंपणी सरकार इतलाने करणे ते कळऊन करावे. म्हणजे काम दुरस्त होईल व ब्राह्मणलोक पैकाहि खाणार नाहीत.’’ लांचलुचपतीबाबत ग्रांटाने प्रतापसिंहाला चांगलेच दहशतवादी बनवले होते. रेसिडेन्सीतल्या एका गो-या साहेबाने एका चपराशाच्या मार्फतीने एक बकरा ४ रुपयाला विकत घेतला. त्यात त्या चपराशाने २ रुपये धनगराला दिले आणि २ रुपये स्वतः ‘पागडी’ म्हणून हबकले. महाराजांना हे समजताच त्यांनी त्या चपराशाला मुसक्या बांधून आणविले आणि खांबाला बांधून चव्हाट्यावर वेताच्या छडीचे एका जागी ५०० तडाखे लगावून चोप दिला. प्रतापसिंह बाहेर दाखवतो तसा तो आतही वागतो का नाही, याचीही ग्रांट गुप्त चौकशी करीत असे. एकदा त्याने विठ्ठलपंताला विचारले. ‘काहो, महाराज आपली डायरी लिहितात का नाही?’

विठ्ठल -लिहितात तर. परंतु कारकुनासारखे आताच आज कसे होईल? कारण बाजीराव यानी काही एक विद्या सिको दिली नाही. परंतु हली लिहितात.

ग्रांट -लिहीत असले तरी राज्य आज नाही उद्या हस्तगत होईल. परंतु या सा-या गोष्टी बालाजीपंतास कलऊ नका. तुम्हीही कळू देऊ नयेत व माहाराजानाही कळऊ नयेत.

एवढेच काय, पण महाराजांनी आपली पत्रे लिहावी कशी, याच्याही सूचना ग्रांटने केल्या. ‘कागद माफतीचा असावा(चार ओळीसाठी सबंध बंद वापरू नये.) माथ्यावर ‘श्रीमंत महाराजा छत्रपति प्रतापसिंह राजे भोसले’ अशी ठळक अक्षरे असावी. पत्रांकासाठी ‘नंबर’ शब्द वापरू नये, ‘आंख’ शब्द लिहावा. ‘पत्रात येवनी शब्द लेहू नये. महाराष्ट्र शब्द लिहावे.’ इतक्या बारीकसारीक गोष्टीतही ग्रांटने प्रतापसिंहाला तरबेज नि बाकबगार करण्याची मनोभावे कसोशी चालविली होती.

नातूने आपले कावळे जमवले.

ग्रांटचा मदतनीस (असिस्टंट रेसिडंट) म्हणून बाळाजीपंत नातू हरहमेष महाराजाकडे जात येत असे. ती त्याची ड्यूटीच होती म्हणाना. ‘अज्ञान’ ‘पालनकर्ते’ छत्रपतिंचे कुंफणीकार, त्यांच्या रसिदंटाचा मी असिस्टंट, या प्रौढीचा डौल महाराज नि माईसाहेब यांच्यापुढे नातू हटकून मिरवीत असे. त्याला पहाताच दोघांच्या कपाळाला आठ्या पडत, हे नातू ओळखून असे. साता-याला रसिदंटाची कचेरी चालू होताच, मुजावर नातूने सगळ्या कारकुनांच्या जागा आपल्या जातभाई चित्पावनांनी भरून टाकल्या. गो-या रसिदंटाच्या हापीसातले आम्ही कारकून, आमच्यापुढे छत्रपति नि त्यांचे ते जातभाई मराठे कोणत्या झाडाचे पाले? अशा आढ्यतेने ते चित्पावन कारकुंडे महाराजाकडील माणसे कामानिमत्त रेसिडेन्सीत गेली, का त्यांची टिंगलटवाळी करायचे. तिटका-याने हिडीसफिडीस वागवायचे. ही गोष्ट महाराजांच्या कानावर जाताच, त्यांनी चारचौघासमक्ष तात्या अभ्यंकर नावाच्या कारकुनाला बोलावले आणि खडसावून विचारले - ‘‘काहो, आमची मंडळी तिकडे साहेबाकडे गेली म्हणजे त्याना तुम्ही ‘चितपावन राग करून घालावयाचे बगतात. ते का?’ खबरदार पुन्हा असला चावटपणा कराल तर. ग्रांटाच्या कानावर घालून मी याचा पुरता बंदोबस्त करीन.’’ तेथेच साक्षी पुरावा नि ख-या खोट्याची समक्ष रुजुवात झाल्यामुळे, तात्या अभ्यंकराने ‘चुकलो’ म्हणून हात जोडून महाराजांची क्षमा मागितली.*२

**‘‘किल्ले सारे पाडून टाका’’**

ता. १ नोव्हेंबर १८१८ रोजी नातू महाराजांच्या भेटीला आला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर म्हणाला - ‘‘महाराज, आता दक्षिणेत जबरदस्त कुंफणी बहादुर सरकारची सत्ता बळकट झाली आहे. आता आपले हे जुने ग़डकोट किल्ले करायचे आहेत काय? पाडून टाकावे सारे.’’

आपण जे काही सांगतो बोलतो, त्याला अलपिष्टनाचा नि ग्रांटाचा प्रत्यक्ष पाठिंबा असतो, अशी नातूने महाराजांची नि माईसाहेबांची पक्की भावना करून ठेवलेली होती. त्यांनाही संध्या आंग्रेजांशी जुळते मिळते घेणे प्राप्त होते. नातूचे बोलणे ऐकून महाराज म्हणाले, ‘‘प्रातपगड आमच्या देवीचा आणि परळी आमच्या गुरूचा. येथले किल्ले पाडू नये. बाकीच्या बद्दल अलपिष्टन साहेब ठरवितील तसे होईल.’’

**महाराज लढाई करतील की नाही?**

१० नोव्हेंबरला ग्रांट भेटीला आल्यावेळी, महाराजांच्या मनाचा ठाव पहाण्यासाठी बोलला - ‘‘बंड जाहाले आहे तरी महाराज लढाई करतील की नाही?’’

प्रताप. – ते वेळेस जे होईल ते खरे.

विठ्ठलपंत – लढाई बाजीरायाचे प्रसंगी पाहिली आहे. पुढेही घेतील. ??

ग्रांट – जे वेळेस संकट कंपनी सरकारास पडेल ते वेळेस दोस्ती करिता दुसमानावर गेले पाहिजे.

प्रताप. – हे खातरजमा दिवसोदिवस होईल ती कंपणी सरकारने पाहावी ऐसे आमचे बहुत मानस आहे.

**ग्रांटची बखरीची योजना**

दीडदोनशे वर्षांच्या निकट सहवासाने हिंदी इसमाला अजूनही उचलता आला नाही. असा इंग्रेजांचा एक सद्‌गुण आहे. इंग्रेज आदमी जगाच्या पाठीवर कोठेही भटकंतीला अगर रोजगाराला जावो, तो तेथल्या रहिवाशांचा जुना इतिहास, त्यांची रहाणी, दिनचर्या, धर्म, नीतीच्या कल्पना, उद्योग, राजकारणी उलाढाली, वगैरे हजार गोष्टींची चाणाक्षपणे चौकशी करतो, आणि त्या पद्धतशीर संकलन करून त्यांचा इंग्लिश भाषेत ग्रंथ लिहून काढतो. यासाठी पडतील ते श्रम, साहस, लागेल तो खर्च, पदराला खार लाऊन तो करतो. आमच्या हिंदी लोकांचा खाक्याच न्यारा! सा-या जगाची यात्रा करून आले तरी सुके ठणठणीत! जंगलभर भटकून सरपणच त्यांना आढळायचे नाही! ग्रांटच्या पूर्वी आमच्याकडे सभासद नि चिटणिसांनी लिहिलेल्या बखरी, हकिकती, याद्या, काव्ये इत्यादी साहित्य होते. पत्रव्यवहार, तहनामे, सनदा आणि याद्यांचा पर्वतप्राय ढिगार घरोघर पडलेला होता. पण त्या सर्वांचा चिकित्सापूर्वक अभ्यास करून, अर्वाचीन तंत्रानुसार पद्धतशीर लिहिलेला म-हाठी रियासतीचा इतिहास म्हणजे ग्रांट डफची इंग्रेजी बखरच होय. ग्रांट डफच्या लेखनातल्या चुका पुढे अनेकांनी दाखविल्या, पण एकंदर पुढील संशोधनाला ग्रांटच्या इतिहासाचाच आधार घ्यावा लागला, ही गोष्ट नाकारण्यात शहाणपणा नाही.

ग्रांटप्रमाणेच अनेक इंग्रेज प्रवाशांनी नि कंपनीच्या अधिका-यांनी हिंदुस्थानाच्या अनेक प्रदेशांचा इतिहास परिश्रमाने लिहिलेला आहे. मालकमने मध्य हिंदुस्थानचा, टॉडने राजपुतान्याचा, फोर्ब्सने गुजराथचा, मनरोने दक्षिण हिंदुस्थानचा, जेन्कीन्सने नागपूरचा, विल्कसने म्हैसूरचा नि वॉकरने बडोद्याचा, असे अनेकांनी अनेक इतिहासग्रंथ लिहून तयार केले.

ग्रांट साता-याला आला तेव्हा म-हाठी साम्राज्य जरी बुडायला लागले होते. तरी त्याचे वैभव, दरारा आणि पराक्रम जागोजाग दिसत होता. आपल्या जातभाईंची बनिया कंपनी हे साम्राज्य घशात घालणार, ही ग्रांटची खात्रीच होती. पण तो जात्याच रसिक, स्नेहाळ नि अभ्यासू वृत्तीचा असल्यामुळे, शिवाजीसारख्या अलौकिक पुरुषाने निर्माण केलेल्या म-हाठी साम्राज्याच्या तपशीलवार इतिहास लिहिण्यासाठी साहित्य जमविण्याचा त्याने निश्चय केला. आज तो सर्वसत्ताधारी होता. मागवील ते कागदपत्र त्याला मिळणार होते. छत्रपतींच्या राजधानीतच त्याची बैठक असल्यामुळे, म-हाठ्यांच्या इतिहास-लेखनाला सर्वस्वी अनुकूल नि उत्तेजक असे वातावरण सभोवार रहाळ्या मारीत होते. शिवाय अलपिष्टनाप्रमाणे ग्रांटनेही म-हाठी भाषेचा अभ्यास केलेला होता.

ग्रांटने बळवंतराव मल्हार चिटणिसाला दररोज आपल्या कचेरीत बोलावून, शिवाजीच्या वेळेपासून तो थेट प्रतापसिंहापर्यंतचे राजकारणाचे असतील तेवढे कागदपत्र, टिपणे, बखरी घेऊन येण्याचा हुकूम सोडला. ठरल्या वेळी कचेरीत येण्याचा चिटणीस पारसनिसांचा बापदाद्यांपासून कधी दस्तकच नव्हता आणि जरा थोडा उशीर झाला तर ग्रांट लगेच हजेरी घ्यायचा. त्यामुळे या जुन्या पोषाखी दरबा-यांची रोज मोठी तिरपीट उडायची. कागद आणले का ते वाचून घेऊन, त्यातल्या बारीकसारीक मुद्यावर ग्रांट कस्सून चिकित्सा करायचा. परशियन कागदांचे म-हाठी भाषांतर आबा पारसनिसाकडून करून घ्यायचे आणि मराठी कागदांचे इंग्लिश भाषांतर नारायण बर्वे नावाच्या कारकुनाकडून घ्यायचे. रेसिडेन्सीतल्या सगळ्या कारकुनांना ग्रांटने घाण्याला जुंपले. चिटणिसाची तर काय रोज प्रत्येक मुद्याबद्दल, उलटसुलट तपासणी चालायची. मधूनमधून बाळाजीपंत नातू कुझकट कुशंका काढून चिटणिसाला आडवायचा. दोघांची जुंपायची. साहेबाची करमणूक व्हायची.

रोजच्यारोज चिटणिसाच्या घरचे रुमालांचे दस्तेच्या दस्ते ग्रांटाच्या कचेरीत येऊन पडू लागले. नकला भाषांतराची गर्दी उडाली. खुद्ध छत्रपतींच्या ताब्यातल्या कागदपत्रांचे रुमालही मागविण्यात येऊ लागले. साहेबाने हे काय बण्ड माजविले आहे याची कोणालाच काही कल्पना येईना. चिटणीस पारसनिसांचा रोज पाचसहा तास घामटा निघू लागला. स्वतः ग्रांट आठआठ तास खर्डेघाशी करू लागला. कागदांतल्या मजकुरांची नि मुद्यांची छाननी करण्यासाठी निरनिराळ्या जहागि-यांतून, प्रतिनिधि सचिवाकडून माहीतगार माणसे बोलावण्यात येऊ लागली. तेव्हा हे काय कारस्थान चालले आहे? आमचे कागद काय म्हणून साहेब हुकमी घेऊन जातो? या विचाराने चिटणीस पारसनीस जसे थकले नि भेदरले, तसे प्रतापसिंह महाराजही चिंताक्रांत झाले. अस्सल अस्सल पत्रे ग्रांट नेत आहे! काय करावे? रात्री महाराजांच्या आणि चिटणिसादि हितचिंतकांच्या बैठका भरू लागल्या. ग्रांटाचा कारभार गिरमिटासारखा एकेका मसलतीचे नि मनसुब्याचे कागद पोखरून पोखरून काढू लागला. साहेबाला विचारावे तरी पंचाईत न विचारावे तर सारा दप्तरखाना रिकामा होऊ लागला!

अखेर एकदा नातू महाराजाला भेटायला आला असता, त्यांनी या प्रकरणाचा खुलासा काढण्याचा यत्न केला. तेव्हा नातूने सांगितले - "सारे कागद पाहून छाप्यात छापून विलायतेस जाईल. सर्वांस महाराजांचा पराक्रम राज्ये वगैरे जाहीर होईल. इतके दिवस कागद नुसते जवळ बाळगून काय केले? आणि पुढे ठेवून तरी काय करणार? ग्रांटाचे लक्ष माहाराजांचे ठिकाणी फार. आसा दुसरा साहेब कोण्ही नाही. वारंवार माहाराजांची काळजी वाहणे व माहाराजांचा बंदोबस्त चांगला व्हावा, आपणास येश यावे, हेच चित्तात आहे." तरीही प्रतापसिंहाला काही उलगडाच होईना. तो नातूला म्हणाला - "कागदपत्रावरी व सनदेवरी काय आहे? आम्ही दोस्ती केली मेलविली, त्याअर्थी जे देतील ते आमचे. अधिक उणे काही म्हणावयाचे नाही. तुम्ही हिंदु आहा. पाहिजे ते करा. आमचे मनात आधिकउणे वाटल्यास तुम्हापासी बोलू. त्यापासी काही बोलावयाचे नाही." नातू गेल्यावर महाराज चिटणिसादिकांना म्हणाले, - "जबरदस्तापुढे आग्रह करून कामाचा नाही व आग्रह करून सिद्ध करून फल होते असे नाही. होणार ते होईल. कागद आणखी आहे पुसतील, तरी नाही म्हणावे."

ऐतिहासिक साहित्यासाठी ग्रांटच्या कामाचा झपाटा जसजसा वाढला, तसतसा महाराज, राजकुटुंबातली मंडळी आणि दरबारी यांचा जीव खालवर होऊ लागला. ग्रांट याने जुनी चित्रे, राजपुरुषांच्या प्रतिमा बाहेर काढवून, त्या नकला करण्यासाठी मुंबईला पाठविल्या. राजघराण्याच्या वंशावळीचा शोध घेताना, "परवा साहेबाने इंग्रजी बुकात लिहिले की सिवाजीराजे याचा वंश भोसाई म्हणोन उदेपूरकर यांनी ठेविली तिचा वंश." हे समजताच प्रतापसिंहादि मंडळी संतप्त झाली. रेसिडेन्सीतल्या कोणातरी शहाण्या भटाने हा ध चा मा साहेबाला सांगितला असावा. त्याचा तात्काळ

फ़डशा करण्यासाठी प्रतापसिंह ग्रांटाच्या भेटीला गेला. इतक्यात ग्रांटाला बापू कानूचे पत्र आले की 'चतरसिंग जयपुरास व जोतपुरास मी उदेपुरास गेलो होतो. तेव्हा तिही जागे चतरसिंग गेले, त्यांनी चतरसिंग याची मान्यता करून बोलले की सातारा व हे संथाने (संस्थाने) येकच. म्हणोन राणाजी व चतरसिंग येका गादीवर बसले.' तेव्हा त्याने ती चूक सुधारली. नंतर ग्रांटाने महाराजांना 'धुरूची डबी'(ध्रुवाची डबी, होकायंत्र) दाखविली. जहाजे लांबवर गेली, की या यंत्राने दिशा पाहून जहाज हाकता येते. असे समजाऊन सांगितले. सर्वांना मोठे आश्चर्य वाटले. कागदपत्रांवरून मी महाराजांच्या राजघराण्याचा विश्वसनीय मोठा इतिहास लिहीत आहे. तो छापला म्हणजे म-हाठ्यांच्या साम्राज्याची सारी माहिती जगाला समजून त्यात महाराजांचा लौकिक वाढणार आहे, वगैरे ग्रांटाने समजाऊन सांगितले. आपल्या रात्रंदिवस श्रमांची नि खर्चाची हकिकत खुलासेवार दिली. तेव्हा महाराजांसकट सगळ्यांचे समाधान झाले आणि ग्रांटाच्या उद्योगाची त्यांनी वाहवा केली.

तहनाम्याच्या काटेरी पिंज-याकडे

१८१८१ एप्रिल पासून तो १८१९ च्या सप्टेंबरापर्यंत म्हणजे दीड वर्ष, महाराज आणि कंपनी सरकार यांचे परस्पर संबंध किती नि काय आणि छत्रपतींच्या स्वराज्याच्या नि अधिकाराच्या हद्दी कोणत्या नि कोठवर, याचा निश्चित असा काहीच उलगडा झालेला नव्हता. ग्रांटने महाराजांना सर्वतोपरी संतुष्ट राखून, आम्ही कंपनीवाले जे काही करीत आहो, ते सारे महाराजांच्या हितासाठीच, असे वरचेवर पटविण्याची कसोशी चालू ठेवली होती. नातूच्या अरेरावी लुडबुडीने महाराज नि माईसाहेब वरचेवर खूप आदळआपट करायच्या नि ग्रांटच्या कानावरही तक्रारी घालायच्या. पण तो कसला धूर्त! 'त्या कारकुनाकडे कशाला लक्ष देता? मी आहे ना.' अशा खुलाशाने त्या मायलेकरांना गारीगार करायचा.

महाराजांची समजूत अशी की पूर्वी रंगो बापूजी, चिटणीस नि नरसू काकडे यांच्याशी अलपिष्टनाने समक्ष शपथपूर्वक केलेल्या संकेताप्रमाणे म-हाठी साम्राज्याची – पेशव्याच्या सत्तेखालची सारी अफाट दौलत आम्हालाच मिळाली पाहिजे. सगळ्या महाराष्ट्रातल्या रयतेचीही अशीच समजूत झाली होती. पेशवा हा नोकर. नोकर गेला अथवा घालवून लावला म्हणजे मालकाची सत्ता नि मत्ता नोकराबरोबर नाहीशी झाली, ही विलायती नीति हिंदू नीतीला पटण्यासारखी नव्हती. पण कंपनीचे विलायती मगजाचे मुत्सद्दी पक्के बनिये! ते आपला डाव धोरणाने खेळत होते. या वेळी रावबाजी ब्रह्मावर्ताला पोचला होता. आंग्रेजांपुढे काही चालणार नाही, या दहशतीने देशात थंडाई येत होती. म-हाठशाहीचा सबंध घास एकदम गिळू लागल्यास, आपली गचांडी धरून तो घास खेचून बाहेर काढण्यासाठी म-हाठे बंडवाले अजून निजलेले नव्हते. अकल्पित घटनेने डोळ्यासमोर घडणारी विलक्षण राज्यक्रांती ते जागरूकपणे अभ्यासित होते. मराठा बारगीर नी त्यांचे सरदार म्हणजे गांधीलमाशांची जात. आपले धोरण जरा थोडे कुठे घसरले, तर सबंध महाराष्ट्रातले हे मोहोळ चहूबाजूंनी घोंगावत येऊन आपले लचके तोडतील, ही पुरेपूर जाणीव ठेवून कंपनीचे मुत्सद्दी, छत्रपतीचे बुजगावणे उभे करून, आपल्या मोठेपणाचा, उदारपणाचा नि न्याप्रियतेचा डांगोरा पिटून, सगळ्या थंड्या बंड्या
म-हाठ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याची योजना करीत होते. बडेलाटानी सुचविलेल्या स्वराज्याच्या हद्दीची कल्पना बेलसर येथे ग्रांटने महाराजांना दिलेली होतीच. पण अखेर फैसला पुन्हा कलकत्त्याहून मागवला होता, तिकडे प्रतापसिंह डोळे लावून बसला होता.

प्रतापसिंहाची हतबल अवस्था

या वेळी प्रतापसिंहाच्या आजूबाजूला निस्पृह सडेतोड मसलत सांगणारा आणि त्यांचे प्रामाणिक मार्गदर्शन करणारा एकही आसामी नव्हता. माईसाहेब बाईमाणूस! तिला गो-या मुत्सद्यांच्या विलायती पाचपेचांचा अंदाज तो काय लागणार? विठ्ठलपंत महाजनी, कंनीच्या मेहरबानीने दिवाण झालेला, म्हणून तो आंग्रेजांचा ओशाळा. बळवंतराव मल्हार चिटणिसाचे बरेचसे वतन रावबाजीने खालसा केले होते. ग्रांट अलपिष्टनादिकांची मिनतवारी करून ते परत मिळविण्याच्या तो विवंचनेत. अर्थात तोही आंग्रेजांचा ओशाळाच. मग आता उरले कोण? बळवंतराव भोसले सेनापति. नुसता नावाचा नि हुद्याचा पोरसवदा बच्चा तो. प्रतापसिंहापेक्षा पाच वर्षांनी लहान. अर्थात आंग्रेज करतील त्याला होकार देणे रास्त, यापेक्षा निराळा सल्ला कोण काय देणार? चतुरसिंग किंवा रंगो बापूजी असते, तर महाराजांना एकादी धाडसी मसलत सुचवून, ती पार पाडण्यासाठी त्यांच्यामागे ते ठासून उभे तरी राहिले असते. पण दोघेही आंग्रेजी धोरणाने दूर झुगारले गेलेले. चतुरसिंगाला अलपिष्टनाने तुरुंगातच मरायला लावेल आणि रंगो बापूजीला युक्तीने बाजूला काढून, नोकरीच्या तोब-यात अडकवून दूरदेशी नेऊन ठेवले.

प्रकरण ८ वे

सोनेरी पिंज-यात सातारचा सिंह

मुकाबला कुझत ठेवून, चर्चा चिकित्सा, वादविवाद आणि कमेट्या यांत कालपहरण करून प्रतिवादीला जेरीला आ यचे आंग्लाई तंत्र फार जुने आहे. समोरचा पक्ष कंटाळून वैतागला म्हणजे मग आपल्याला सोईस्कर असे वाटेल ते त्याच्याकडून लिहून कबूल करून घेता येते. रावबाजीप्रमाणेच प्रतापसिंहावर अलपिष्टनाने हाच प्रयोग केला. सातारच्या गादीवर त्याला आणून बसवले तरी स्वराज्याच्या हद्दी कोणत्या? छत्रपति आंग्रेजांचे दोस्त का मांडलीक? म-हाठी साम्राज्याचे हिंदुपदपातशहा का इतर अनेक देशी संस्थानिकांप्रमाणेच एक छोटा संस्थानिक? इत्यादि कोमत्याही मुद्याचा त्याने दीड वर्षभर प्रतापसिंहाला थांग लागू दिला नाही. ‘कलकत्त्याला लिहिले आहे. येईल थोड्याच दिवसांत खुलासा, काम फार महत्त्वाचे तेव्हा वेळ लागणारच.’ अशा थापबाजीवर कालपहरण करण्याचे धोरण त्याने ठेवले. इकडे ग्रांटाकडून रोजच्या रोज उपदेशाचे काढे, उत्तेजनाची रसायने आणि शिस्तीची कसरत चाललेली. प्रतापसिंह अगदी कंटाळून बेजार झाला. आमचा राज्याच्या काय सोक्षमोक्ष लावायचा असेल तो एकदा लाऊन टाका, येथवर तो अगदी उठवणीला आला. या वेळी त्याचे वय २६ वर्षांचे होते. म्हणजे तो काही बोंडल्याने दूध पिणारा ‘बाल’ नव्हता. पण आंग्रेजांनी आधीच ठरऊन टाकलेले का तो राजकारणात ‘अज्ञान’ म्हणून! काही वर्षे तरी आमच्या सरदारांच्या शिस्तबाज शिकवणीखाली त्याने राहिले पाहिजे.

छत्रपति महाराज म्हणून आपल्या वैभवाला साजेशोभेसा खर्च प्रतापसिंहाने केला का पंतोजी ग्रांट त्याला नाक मुरडीत असे. म्हणजे खानगीचा खर्चही मनासारखा करायला त्याला मोकळीक मिळत नसे. पण माईसाहेब नि महाराज ग्रांटाच्या नाकमुरडणीला वरचेवर धाब्यावर बसवून आपल्याला योग्य दिसेल तो खर्च करीतच असत. या प्रकाराला आळा घालण्यासाठी आणि स्वतःकडे वाईटपणा येऊ नये म्हणून, ग्रांटने या बाबतीत वक्तशील सूचना इषारे देण्याचे काम बाळाजीपंत नातूकडे सोपविले. मग काय? नातूचा भाव भलताच वधारला! त्याने महाराज नि माईसाहेब यांच्याशी रोजच्यारोज खटखटी चालू केल्या. नातू महाराजाशी बोलू लागला का माईसाहेब एकदम त्याच्यावर उसळायच्या. गंभीर चेहरा करून नातू हटकायचा - ‘‘हे पहा माईसाहेब, मला तुमच्याशी काही एक बोलायचे नाही. माझा दस्तुर महाराजांशी. आपण मध्ये विनाकारण तोंड घालू नये. आपला माझा काही संबंध नाही. मी कंपनी सरकारचा नोकर. आज्ञेप्रमाणे कामे होताहेत का नाही, हे पहाणारा.’’ हरहमेष ही बाचाबाची चालायची. एका दिवशी तर कहर झाला. नातू माईसाहेबांचा धडधडीत अपमान करायचा, टाकूनही बोलायचा, ते सारे ग्रांटच्या पाठबळावर. नाहीतर त्या भटाच्या दोन सणसणीत थोतरीत लगाऊन त्याला हुसकवायला माईसाहेब कमी करणा-या नव्हत्या. प्रतापसिंहाच्या हाती त्याचे वाजवी अधिकार असते, तर त्याने नातूला अंधारकोठडीच दाखवली असती. पण त्याचा हात शिळेखाली सापडलेला. माईसाहेब एकदा त्याला बेफामपणे हवे ते टाकून बोलल्या. नातूच्या कुकर्मांचा नि बदकर्मांचा पाढा तिने त्याच्या तोंडावर धडधडा बोलून दाखवला. पण नातू कसला बिलंदर टग्या! चेह-यावर कसलाही विकार न दर्शविता तो म्हणाला, - ‘‘माईसाहेब, या असल्या त्राग्याने काहीएक वळणार नाही. आम्ही जे काही करतो ते सारे महाराजांच्या कल्याणासाठीच. तुम्हाला त्यात काय समजणार?’’

माईसाहेब –मोठा आला मेला मला अक्कल शिकवायला. तुझ्यासारख्या दीडदमडीच्या भटाकडून असले शब्द ऐकण्यापेक्षा, मी सती जाते तरी बरे होते. मग असले हे अपमान करून घेण्याचे प्रसंग तरी आले नसते. वाटतं का या किल्ल्याच्या तटावरून उडी घ्यावी, नाही तर काशीवास पत्करावा.

नातू –आत्महत्येपेक्षा काशीवास बरा. काशीला जायची इच्छा असेल, तर हिला तसे रसिदंटाला. कंपनी सरकार तेव्हाच बंदोबस्त करतील.

खुद्द रावबाजीसुद्धा माईसाहेबांना फार वचकून असे. त्याने एकदाही त्यांचा कधी अवमान केला नाही. रावबाजीविरुद्ध आंग्रेजांशी राजकारणे चालली होती, तेव्हा हाच नातू माईसाहेबांशी राजकारणाच्या मसलति करण्यासाठी मोठ्या मिनतवारीने समोर दूर बसायचा. हरएक लहानमोठ्या बाबतीत त्यांच्या सल्ल्ल्याची याचना करायचा. पण आज? तोच कावळा आंग्रेजी हुद्याच्या प्रासादशिखरावर बसल्यामुळे, गरुडाच्या मिजाशीने त्याच राजमातेचा अवमान करायला धजावला! यानंतर माईसाहेब नातूला आपल्या

समोर येऊच देईनाशा झाल्या. नातूला तेच पाहिजे होते. महाराज एकटे सापडल्यावर त्यांना बनवायचे काम आता सोपे झाले.

हा घ्या तहनामा, करा सही.

ता. २२ सप्टेंबर १८१९ बुधवारी ग्रांटसाहेब महाराजांच्या भेटीला आला आणि त्याने कलकत्त्याहून बड्या लाटांनी पसंत केलेला दहा कलमी तहनाम्याचा खर्डा महाराजांच्या हवाली केला. 'महाराजांच्या ठरावणीप्रमाणे ही कलमे आहेत,' असे सांगून ग्रांट गेला. वाचून पाहिल्यावर प्रतापसिंहाला आश्चर्य वाटले. 'ग्रांट म्हणतात की तुम्ही ठरविली व सारे त्याप्रमाणे चालावे. ता. २४ गुरुवारी सकाळी नातू आला आणि म्हणाला - 'महाराज, इंग्रेजांनी जो तह ठरवला आहे, त्याला बेलाशक रुकार द्यावा. उगाच हेंगल घालण्यात कल्याण नाही.' पाठोपाठ ग्रांटही आला. त्यानेही तेच सांगितले. दीड वर्षाच्या गोंधळा नंतर अखेर आलेला तह! प्रतापसिंहही कातालेला होता. त्याने म्हटले - 'कंपिणी सरकारातून तह ठरला तोच क्राईम.' लगेच दुस-या दिवशी ता. २५ सप्टेंबर १८१९ शनिवारी कंपनीच्या वतीने कॅप्टन जेम्स ग्रांट आणि महाराजांच्या वतीने दिवाण विठ्ठल बळवंत महाजनी यांच्या सह्या होऊन, तहनामा कायम झाला. ''माहाराजांचे हुकूम खावंद मुखत्यार आहे. परंतु जे करणे ते येथे कंपिणी सरकारचे सरदार राहातील त्याचे मसलतीने केले म्हणजे तेहि माहाराजांचा हुकूम मानूनच चालतील. येविसी काही दिवस माहाराज जसे राज्य करितील तैसे माहाराजाचे हाती देतील. पहिल्याने माहाल मुलूक हातात येऊन, मग फौज ठेवून सारे जाहाले, म्हणजे घरचे मंडळीसुद्धा व चाकर सुद्धा कमी करणे आथवा ठेवणे ते माहाराज घालवितील व ठेवतील ते ठेवोत. परंतु जो सरदार राहील त्यास कळवून करावे.'' असे म्हणून ग्रांट वगैरे मंडळी सत्कार झाल्यावर निघून गेली.

तहाने पक्केच हातपाय जखडले.

तहाचे पांचवे कलम तर इतके लवचीक नि सर्वव्यापी आहे की त्यामुळे महाराजांना कोणताही व्यवहार करणे तर अशक्यच व्हावे, शिवाय त्यातल्या शब्दरचनेवर हवा त्याला हवा तो अर्थ बसवता यावा. शब्दरचनेच्या या मनस्वी लवचिकपणानेच पुढे प्रतापसिंहाच्या जीवनाचा कसा अनर्थ उडाला, हे पुढे आपल्याला दिसणारच आहे.*१

तहातली हे पाचवे कलमच येथे देतो, म्हणजे महाराजांचे हातपाय या कलमाने कसे कलमछाट केले, ते वाचकांना समजून येईल.?

कलम पांचवे ५.

''सरकार महाराज छत्रपति आपण व आपले फरजंद व बारीस व कायम मुकाम याचे तर्फेने करार करीत आहेत की या कराराप्रमाणे आपल्याकडील राज्यासिवाय दुसरे कोणी सरदार किंवा जहागिरदार किंवा वकील वगैरे हरकोणास पत्र पाठविणार नाही व त्यांसी जाबसाल ठेवणार नाही. काही तक्रार पडल्यास त्याचा बंदोबस्त सरकार इंग्रेज बाहादूर करतील. वर करार झाला आहे त्या मुलकांतील लोकांसी व बाहेरचे लोकांसी लग्नाचे किंवा घरगुती काही कारण पडल्यास सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरदाराचे मार्फतीने करीत जातील. याप्रमाणे करार करीत आहेत. हेच कलम या तहनाम्याची शर्त आहे. याजकरिता सरकार माहाराज छत्रपति आपण व फरजंद व बारीस व कायम मुकाम या गोष्टीवर हमेशा नजर ठेवितील. महाराज यांचे सरकारांतून काही तफावत पडल्यास या तहनाम्याचे रुईने महाराज यांचे सरकारास जो फाईदा आहे तो बरबाद होईल. कलम.''

कोणत्याही बाबतीत. कोणाशाही कसलाही पत्रव्यवहारकरायचा नाही, करायचाच तर तो आंग्रेजांच्या सरदारांच्या (रसिदंटाच्या) कचेरीमार्फतच केला पाहिजे. दस-याचे पोषाख, तिळगूळ, सणवार, श्राद्धपक्ष वगैरे शेकडो गोष्टीसुद्धा दर वेळेला आंग्रेजी सरदारांच्या मार्फत जाहीर रीतीने उलगडून घ्यायची बळजबरी, म्हणजे बाटलीवरची कसरतच झाली ती. शिवाय, यात जरा चूक झाली का तहनामा मोडल्याचे घोर पाप! सुरुवातीचे रसिदंड जरा समजूतदार होते तोवर या कलमाविषयी फारशी कोणी कदरबाजी दाखविली नाही. पण नंतर ओव्हान्ससारखे मगरूर रसिदंट येताच, याच कलमाचा फास त्यांनी प्रतापसिंहाच्या मानेला लाऊन त्याचा कांटा काढला.

दुस-या कलमातल्या ''सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरकारातून जे राज्य देत आहे ते घेऊन सरकार इंग्रेज बाहादूर यांचे कह्यात व मदतीत*२ निरंतर संतोषाने राहून सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सलामसलतीने हरयेक काम करीत जाऊ.'' या अटीने तर हिंदुपदपातशाहीच्या स्वतंत्र स्वराज्याच्या प्रतापसिंहाच्या आशेच्या चिंधड्याच उडाल्या. कंपनी सरकारच्या पंजाखालचा तो एक मांडलीक संस्थानिकच झाला.

"महाराजांचे मनात येत असेल की हे राज्य आम्हास देत नाहीत. नाव मात्र चालू आहे. असे नाही. माहाराजा वाकब+ जाले म्हणजे आमची मगदूर नाही. सारे माहाराजाचे आहे." असे ग्रांट प्रतापसिंहाला वरचेवर सांगून त्याला धीर देत असे.

दस-याला ग्रांटचा सत्कार

तहनाम्याने आपल्याला कल्पनेपेक्षा फारच कमी प्रदेश मिळाला, याचे महाराजांना वैषम्य वाटणे साहजीक होते. तथापि वडील भावाच्या प्रेमाने ग्रांट आपल्याला अनेक नवनव्या गोष्टी शिकवीत आहे, राज्यकारभाराच्या बारीकसारीक मुद्यांत इंग्रेजी धर्तीची शिस्त लावीत आहे आणि एकंदर विचार-आचाराला विलायती वळण लावीत आहे, त्याचा पुरा फायदा घेऊन आपण हाती आलेल्या छोटेखानी स्वराज्यातसुद्धा अकलेची करामत करून दाखऊ, अशी उत्स्फूर्त भावनेने, प्रतापसिंहाने पुढे पाऊनल टाकण्याचा निश्चय केला. तहनामा झाल्यावर अवघ्या तीनच दिवासंनी दस-याचा सण आला. तेव्हा, विशेष काही झालेच नाही, अशा मोकळया मनोवृत्तीने 'सिलांगणास स्वारी गेली.' इंग्रेजाकडील पलटणे पायदल याची फयर जाली. नंतर स्वारी वाड्यात आली. सर्वांचे नजरनजराणे जाले. सोने सांप्रदायाप्रमाणे देऊन नंतर (रेसिडेन्सीतले कारकून) अन्याबा चितले व तात्या अभ्यंकर व कृष्णराव यास साडेतीन सनगे देऊन, ग्रांटाचे हवाली रुपयांची दऊत व नवे मोर्तब दिले." ग्रांटवर प्रतापसिंहाचे प्रेम चांगलेच बसण्याचे कारण, त्याने त्याच्याशी अधिकारांचा दिमाख शक्य तितका दाखविला नाही. गैरसमजाने किंवा कशानेही मन उद्विग्न झाले तर प्रतापसिंह लगेच ग्रांटला भेटत असे आणि तोही त्याला कळवल्याने मुद्देसूद खुलासा देऊन त्याची वृत्ती ठिकाणावर आणीत असे. तहनाम्यातील शर्तींना न दुखवताही स्वतंत्रपणे महाराजांना स्वराज्याचा कारभार उत्कृष्ट कसा करता येईल, न्यायमनसुब्याची कामे झटपट उरकून रयतेला सुख कसे देता येईल. इत्यादि अनेक उपदेश ग्रांट करीत असल्यामुळे, दोघांची पाठच्या भावाप्रमाणे दोस्ती जमली.

छत्रपतीच्या सैन्याची नेमणूक.

१८ ऑक्टोबर १८१९ रोजी सोमवारी, ग्रांट भेटीला आला, तेव्हा १०० पायदळ शिपायी, 1 जमादार, २ दफेदार, 1 कारकून, २ नालदार, दोन निशाणे, अशी छत्रपतींच्या खानगी सैन्याची व्यवस्था ठरली. मात्र "माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब याणी पाईचे लोक ठेऊ नयेत, ज्याप्रमाणे स्वार स्वारीचे वेळेस लागतील ते वेळेस देणे." राजधानीच्या रक्षणासाठी कंपनीचा रिसाला आणून ठेवलेलाच होता. कंपनीच्या रिसाल्यातले गोरे लोक सातारा शहरात वरचेवर यायचे आणि लोकांनी दमधाटी करायचे. छड्या मारायचे. कुणबिनींच्या मागे लागायचे, शहरातल्या कलावंतिणींची रस्त्यावरून थट्टा मस्करी करायचे, वगैरे प्रकार नेहमी व्हायचे. प्रथम प्रथम महाराज तिकडे लक्ष देत नसत. पण प्रकार फार फार वाढल्यावर ग्रांटच्या कानावर ते घालून पक्का बंदोबस्त करवला. कॅम्पात गोवध व्हायचा. तो थांबविण्यासाठी एकदा एका बैराग्याने वैताग केला. महाराजांना ते समजताच खंडू शिंद्याच्या बरोबर लिटल साहेबाला सांगून पाठविले की, 'येथे गाई मारणे नाही. कंपिणी सरकारचा हुकूम आहे. (गोमांस) लागले तरी बाहेरून आणावे.' ग्रांटनेही हुकूम सोडला की 'जो (गाय) मारील त्यास धरून आणावा म्हणजे पारिपत्य करू.'

'राज्यकारभारात महाराज वाकबगार झाले म्हणजे त्यांना सर्वाधिकार देण्यात येतील.' या ग्रांटच्या आश्वसनावर विसंबून प्रतापसिंहाने ग्रांटच्या अनुमतीने आपल्या कारभाराची सुधारणा करण्याचा निश्चय केला.

अलपिष्टनाची संभावित हरामखोरी

रंगो बापूजी नि चिटणीस यांनी प्रथम अलपिष्टनाशी मसलतीचे बोलणे केले तेव्हा आणि त्यानंतर नरसू काकड्याशी अनेक वेळा "आहे ते म-हाठी साम्राज्य महाराजांचेच आहे, सारी रयत महाराजांच्या मागेच जाणार, महाराजच सगळयांचे धनी, यात शंकाच नाही. सिंहासनाचे अधिपति छत्रपति सरकारच." ही कबुली शपथेवर अलपिष्टनाने केली आणि अष्ट्याच्या समरांगणावर जनरल स्मिथने आरोळया ठोकून जनजाहीर केली. पण अखेर महाराजांच्या हातात काय ठेवले? तर चौदा पेट्यांचे चिमुकले संस्थान! शिवाय दक्षिणेतल्या छत्रपतिनिर्मित जाहागिरदारांचा प्रश्न वांद्यात ठेवला तो ठेवलाच. हा सर्व प्रकार बळवंतराव मल्हारच्या एका लांबलचक कैफियतीने (आणि डॉ. मिल्नच्या इंग्रजी भाषांतराने) येथे नि विलायतेत तमाम हिंदी आंग्रेजी लोकांपुढे मांडला, त्या वेळी अलपिष्टन हयात होता. पण त्यातली विधाने खोटी पाडायची त्याला हिंमत झाली नाही. एरवी नाकावर माशी बसू न देणारा अलपिष्टन, बळवंतराव चिटणीसाने त्याला लेखी कैफियतीने वचनभ्रष्ट, खोट्या शपथा देणारा, असा म्हणताच, तो स्वस्थ बसला

असता काय? पण बाजू आंगावर आली का तोंड मिटून स्वस्थ बसायचे, ही कला आंग्रेज मुत्सद्यांचा तर ठरावीक ट्रेडमार्क, मनात एक, सांगायचे एक आणि अखेर करायचे निराळेच, ही आंग्रेजी दगलबाजीची (डिप्लोमसीची) मक्खी तत्कालीन साध्याभोळ्या म-हाठी राजाला नि त्याच्या मुत्सद्यांना कशाने उमगणार? आजही एवढा मोठा 'भारत छोडो' चा धिंगाणा घालणारे आमचे हिंदी मुत्सद्दी! पण त्यांनाही याच भुलभुलावणीने आंग्रेज लोक खेळवीत आहेतच ना?

## प्रकरण ९ वे

## प्रतापसिंहाच्या प्रतापाने साता-याचे नंदनवन झाले.

''शिवाजी महाराजांनी तरवार केली. बहुत थोर नाव जाले. आपण आकलेनी थोर नाव करावे. मेहनत फार फार करावी. राज्य आलेवरी होणार नाही. थोडे दिवस उरले. मेहनत फार फार करावी. फडणीस चिटणीस मर्जीजोग बोलतील. स्पष्ट बोलणार नाहीत. माहाराजानी मनात आणून वागावे.''

- ग्रांटचा प्रतापसिंहाला उपदेश. ता. ११-८-१८१९

बनिया कुंफणीच्या गो-या मुत्सद्यांनी प्रतापसिंहाला जाळ्यात अडकऊन त्याच्या वाजवी हक्कांची कितीही छाटाछाट केली असली, तरी रसिदंट ग्रांट याने त्याला रोजच्या रोज उत्तेजन द्यावे, राज्यव्यवहाराच्या नवनव्या योजना सांगाव्या, जुन्या मराठशाही ऐदीपणाचा बडेजाव आणि आंग्रेजी कारभाराची कदरबाज शिस्त यांतला भेद पटवावा आणि सर्व बाजूंनी त्याचे राज्य नमुनेदार कसे होईल, याची काळजी वहावी. प्रतापसिंह जात्याच प्रागतिक पिंडाचा असल्यामुळे, तो ग्रांटाच्या सल्ल्याप्रमाणे भराभर आपल्या राज्यात प्रजेच्या हिताच्या अनेक सुधारणा करू लागला. ग्रांटने त्याला शिकारीचा नाद लावला. दोघेही वरचेवर जंगलात जाऊन शिकार करायचे. खासगी आणि लोकहिताची कामे वेळच्यावेळी करण्याचे तर प्रतापसिंहाला त्याने व्यसनच लावले. कारभार नि न्याय इन्साफ उघडपणे कचेरी येऊन तो करू लागला. अगोदर निश्चित कार्यक्रम ठरवून, त्याप्रमाणे प्रांतांत फिरायचे, रयतेच्या सुखदुःखांची चौकशी करायची, पिकांची पाहणी करायची वगैरे कामे ग्रांट स्वतः त्याच्याबरोबर जाऊन त्याला शिकवू लागला. ग्रांटचा बंगला राजवाड्याशेजारीच असल्यामुळे, दोघेडण हरएक बाबतीत सख्ख्या बंधूंप्रमाणेच एकमेकांशी रात्रंदिवस विचारविनिमय करीत असत. याचा परिणाम थोड्याच वर्षांत प्रतापसिंहाने सातारा राज्याचे नंदनवन कसे बनवले हेच या प्रकरणात पहायचे आहे.

शेडगावकर बखर म्हणजे - ''प्रतापसिंहाची बुद्धी फार विशाल असोन ते बोलके उत्तम प्रकारचे होते. धूर्तता चांगली होती. घोड्यावर बसणे व शिपाईगिरीत शूर व सर्व गुण जाणते व सर्व विद्याप्रवीण होते. अंतःकरण निर्मळ असोन पदरचे लोकांचा अभिमान फार होता. इन्साफाचे काम वक्तशीर करोन, जातीचे अकलेने राज्यकारभार सुव्यवस्थित चालविला. अपराधी शरण आल्यावर क्षमेविषयी औदार्य फार होते. त्याने स्वार सिबंदी व कामगार वगैरेचा पगार वेळेवर देऊन व रयत सुखी राखोन लोक हुशार ठेविले. स्नानसंध्या पूजादि नित्य नेम व सुकर्मे करण्याची आवड व कुळस्वामीवर भक्ति होती. पुरातन नोकर गरीबीत आले होते त्यांचे उर्जित केले.''

शहर-सुधारणा –थोरले शाहू सारखे मोठे दीर्घजीवी छत्रपति सातारला झाले, पण एकाच्याही मनात शहरसुधारणेचा प्रश्न कधी आला नाही. राजधानीचे ठिकाण, पण पाण्याची नेहमीच ओरड. प्रतापसिंहाने येवतेश्वराचे देवालयाचे पिछाडीस एक मोठा सुंदरतलाव बांधून, त्यातले पाणी नळाने शहरात आणले. महारदरा येथेही एक तलाव बांधून खापरी नळाने त्याचे पाणी शहरात खेळविले. (सन १८२९) या कामी एक लाख रुपये खर्च आला.

सातारा शहराचे हमरस्ते सरळ नि आखीव तयार केले. साडेपाच लाख रुपये खर्च करून मोठा राजवाडा बांधला. (१८२६). रस्त्यांच्या दोही बाजूला झाडे लावून, शिवाय स्वतः काही वाडे बांधले. इतरांना बांधण्यासाठी पैशांची मदत केली. पेठकरी लोकांना दुकाने बांधण्यासाठी तगाई रकमा दिल्या. नागरिकांच्या मुलमुलींना संस्कृत, मराठी नि इंग्लिश शिकण्यासाठी एक मोठा पाठशाळेची इमारत बांधली. तेथेच बारा हजार रुपये खर्च करून महाराजांनी एक छापखाना काढला आणि अनेक उपयुक्त ग्रंथ छापविले. सन १८२२ साली 'जंजिरे मुंबईस हाली छापखान्यात महाराष्ट्र भाषेत पंचोपाख्यान बालबोध लिपीत, यंत्रे करून, बुके वाचावयास तयार केली.'' त्या पुस्तकाची एक प्रत अलपिष्टनाने प्रतापसिंहाकडे पाठवताच, त्यानेही तो उद्योग साता-यात चालू केला. शहरात नि आजूबाजूला दरबा-यांसाठी अनेक

मोठमोठे वाडे बांधले. देवालयांसाठीही लाखो रुपये खर्च करून त्यांचा जीर्णोद्धार केला. किल्ल्यावरील मंगळाईचे देऊळ रु. ५,०००. प्रतापगडचे भवानीचे देवालय रु. ४०,०००. सज्जनगडचे रामदास स्वामीचे देऊळ रु. २०,०००. येवतेश्वराचे देऊळ व तलाव रु. १०,०००. लोकांच्या उपयोगासाठी शहरात पंचपाळा हौद, गुरुवारचा हौद, छथत्रीचा हौद, वगैरे अनेक हौद बांधले. सारांश, थोड्याचच वर्षांच्या अवधीत प्रतापसिंहाने आपली सातारा राजधानी नवनव्या लोकोपयोगी सुधारणांनी अशी नटवून सोडली का त्यापुढे पेशव्यांचे पुणे फिके पडले. उद्योग धंदा व्यापार नि कारागिरी यांनाही वक्तशीर राजाश्रय मिळत गेल्यामुळे, सातारा राजधानीला एक नवीनच तेजाळ वैभव आले. जो उठला तो साता-याला धावू लागला.

शिक्षणविषयक सुधारणा –प्रतापसिंहाने पाठशाळा बांधली आणि आपल्या जातीच्या मराठे मुलांना, इतरांच्या मुलांबरोबरच, शिक्षण घेण्यासाठी जाण्याची शिफारस केली. पाठशाळेत मराठयांची पोरे शिकू लागली. आणि तेही संस्कृत, मराठी नि इंग्लिश, तर मग आम्हा भटाबामणांचा भाव तो काय राहिला? या सबबीवर ब्राह्मण शिक्षकांनी त्या मुलांना शिकवायचा स्पष्ट नकार दिला. शूद्रांना विद्या शिकवू नये, हा पडला मनुस्मृतीचा दण्डक! महाराजांनी त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ यत्न केला, पण ब्राह्मणांची मनोवृत्ति म्हणजे कुत्र्याचे शेपूट! सदान् कदा वाकडेच! जगात त्यांना सरळ कोठे काही दिसायचे नाही. अखेर महाराजांनी मुंबईच्या डॉ. मिल्नला पत्र पाठवून त्याच्यामार्फत दोनतीन विद्वान् मिशनरी आणवले, जोडीला आवा पारसनीस यांस देऊन ती पाठशाळा जोरात चालविली. ‘म्हराठ्यास सिकवतो, तेव्हा फसलो.’ असे माधवराव नावाच्या ब्राह्मण शिक्षकास वाटले.त्यावर महाराज आपल्या डायरीत लिहितात - ‘आमी आसे मनी दावा येईलसे नोव्हतो. परंतु आसी ब्राह्मण चाल. आमचे ज्ञातीविसी साहेब लोक यासी लगत आमची नसावी, हेहि मन फार ब्राह्मण लोकांचे.’ प्रतापसिंहाच्या मामांनी (शिर्क्यांनी) आपली मुलगी मुलांच्या बरोबर शिकण्यासाठी पाठशाळेत पाठवली. यावर प्रतापसिंहाचे मत असे होते की मुलांमुलींना शिक्षण अगत्य द्यावे, पण मुलांच्या बरोबर शाळेत पाठवू नये, तर घरच्या घरी शिक्षक ठेऊन द्यावे. मुलांमुलींचे सहशिक्षण असावे का नसावे, या मुद्यावर आजही वाद आहेत, तर त्या काळी प्रतापसिंहाने मुलींच्या स्वतंत्र शिक्षणाचा आग्रह धरल्यास त्यात फारसे वावगे काहीच नव्हते. मराठ्यांच्या मुलांनी शिकावे का नशिकावे, हाच मुळी जेथे वादविवादाचा नि शंका कुशंकेचा प्रश्न, तेथे घडाड पाठशाळा घालून, तमाम शहरातील नि सोय-या धाय-यांची मुले तेथे शिकायला पाठवायचा महाराजांचा आग्रह, हेच केवढे अपूर्व प्रागतिकपणाचे होते.

ग्रंथरचना नि प्रकाशन –ग्रांटच्या सहवासाने युरप इंग्लंडमधील सर्व दर्ज्याचे लोक शिक्षणप्रसाराने कसे प्रबुद्ध चौकस आणि सुधारक बनले होते. हे महाराजांनी बिनचूक हेरूनच प्रथम शिक्षणप्रसाराच्या कार्याला हात घातला. मूठभर आंग्रेज लोक या देशात येतात काय, व्यापार करतात काय आणि थोड्या वर्षांत ठिकठिकाणची आमची राज्ये बळकावतात काय! यांचे सामर्थ्य कशात आहे? हे इकडील लोकांना पुरेपूर उमजण्यासाठी, तिकडील अनेक उपयुक्त इंग्लिश ग्रंथांचे मराठी भाषांतर करून ती पुस्तके त्यांच्या हातात पडली पाहिजेत, हे तत्त्व प्रतापसिंहाने शोधून काढले. त्याने माधवराव मुनशी याचेकडून सभारंजनी नावाचा एक ग्रंथ लिहविला. (पुढे तो भारतवर्ष मासिकात छापला गेला.) या पुस्तकाच्या प्रस्तावनेचा थोडासा नमुना मुद्दाम येथे देतो. त्यावरून त्या काळच्या म-हाठी भाषेची घडण वाचकांना समजेल –

‘‘श्रीमत् जगदीश्वराप्रती नमन करून ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करतों कीं, पूर्वी हा ग्रंथ साहेब आलीषान मिस्तर इरन गटन साहेब बहादूर याणी शेर अल्ली मुनशी याजकडून उर्दू भाषेत करवून याचे नांव आरायेन महफील असें ठेवून सन १८०४ या सालांत छापखान्यांत देऊन छापविला. परंतु जे लोक पारशी विद्येत प्रवीण नाहीत त्यांचे समजूतींत येत नाही. याकरिता प्रवृत्तीचे मराठी भाषेत तरजूमा केला असतां इकडील सर्व लोकांचे समजूतीत चांगला येईल म्हणोन श्रीमन्महाराज क्षत्रिय कुलावंतस राजश्री छत्रपती स्वामी प्रतापसिंहमहाराज याणी आज्ञा केल्यावरून इचें नाव सभारंजनी असें ठेविले आहे.’’

सभारंजनी अंदाजे १०६ पानांचे पुस्तक आहे. सन १८२७ साली महाराजांनी राजनीतिविषयक सभानीति नावाचा एक ग्रथं लिहऊन छापला. शिवाय, आय-व्यय प्रकरण आणि सेवक-बोधिनी नावांचे आणखी दोन ग्रंथ लिहऊन छापले. एवढ्यावरून प्रतापसिंहाची राजकारणी अभिरुची आणि लोकहितवादाची तळमळ केवढी दांडगी होती, हे स्पष्ट होते. या शिवाय तत्कालीन संस्कृत, फारशीचे पंडित नि प्राध्यापक आबा पारसनीस यांच्याकडून महाराजांनी सिद्धांत विजय नावाचा एक प्रचंड संस्कृत ग्रंथ लिहवून घेतला. त्यात जुन्या कर्मठ ब्राह्मणी धर्मावर शास्त्राधारे यशस्वी हल्ला चढविला असून, क्षत्रियांचे अस्तित्व सिद्ध केले

आहे. हा ग्रंथ कै. शाहू महाराज करवीरकर छत्रपति यांनी कै. प्रोफेसर महादेव गणेश डोंगरे, बी.एससी., एल्सीई, यांचेकडून मराठीत भाषांतर करून कोल्हापूर मिशन प्रेसमध्ये छापवून सन १९०६ साली प्रसिद्ध करविला. प्रतापसिंहाने या ग्रंथाचे पांच अध्याय सातारा येथे शिळाछापावर छापवून घेतले होते. बाकीचे पाच सरकारी दप्तरांत हस्तलिखित सापडले. मात्र १०वा अध्याय मिळाला नाही. नऊच मिळाले. तेवढे आता उपलब्ध आहेत. याशिवाय, कर्मकल्पद्रुम, रस तरंगिणी, छंदोमंजरी (काव्य), असे अनेक ग्रंथ प्रतापसिंहाने लिहवून घेतले नि छापले. छंदोमंजरी हा काव्यात्मक ग्रंथ छत्रपतीचे आश्रित बेलवडे येथील रामचंद्र दैवज्ञ ज्योतिषी याने १८२७ त तयार केला. त्याबदद्ल त्याला बेलवडे येथे दोन चाहूर जमीन वंशपरंपरा इनाम दिलेली आहे. सन १८२० साली अथानंदकृत चित्पावन भाग्योदय दीपिका नावाचे दोन अध्यायाचे पुराणवजा काव्यहि ‘आनंद’ नामक एका कवीने तयार केले. ते १८७५ त ‘सद्बोध चिंतामणी’ नावाच्या पुस्तकात छापलेले मला आढळले, ते प्रबोधन वर्ष ५वे, अंक ५वा, फेब्रुवारी १९२७ यात मी समग्र छापले आहे. शेवटच्या २-या अध्यायाच्या अखेर हा आनंद कवि लिहितो. –

आनंद विनवी श्रोतया जना। प्राकृत भाषा जाणोनि मना।
उपेक्षा करण्याची कल्पना। चित्तीं स्वल्प ना वागविजे ।।१३२।।
ही चित्पावन भाग्योदय दीपिका। महाराष्ट्र भाषें शुभ बोधिका।
ग्रंथोनि कथिला अन्वय निका। जैसा पिका ये सकलाम्रतरू ।।१३३।।
शालीवाहन सत्राशत। बेचाळिसाचे शकाकांत।
विक्रम नाम संवत्सरांत। हे सातारियांत पूर्ण केले ।।१३४।।

मराठे तरुण तरुणीला लष्करी शिक्षण -

भटाबामणांची मते काहीही असली तरी आम्ही मराठे क्षत्रिय आहोत, क्षात्र पराक्रमानेच शिवाजीने हिंदवी स्वराज्य निर्माण केले. पिढ्यान् पिढ्या हा आमचा क्षात्रधर्म अखंड चालत आला आहे, तेव्हा यच्चावत मराठे तरुणांनी आणि तरुणींनीसुद्धा लष्करी शिक्षण घेतलेच पाहिजे, या हेतूने महाराजांनी ग्रांटच्या सल्ल्याने रेसिडेन्सीतला एक गोरा लष्करी हापसर नेमला. आपली मुलगी गोजराबाई हिला इतर काही सरदारदरबा-यांच्या मुलींबरोबर लष्करी शिक्षण महाराज देऊ लागले. नुसत्या शालेय शिक्षणाला मुली पाठवल्या तर केवढा गहजब! आणि आता तर त्या मुलींना एक गोरा हापसर रोजच्यारोज घोड्यावरून रपेटी, भालाफेकी, बंदूकमारी असले शिक्षण देऊ लागल्यावर सनातनी पिंडाच्या बामण बामणेतरांत एकच बुरखेबाज आकांत उडाला! पण महाराजांनी तिकडे लक्षच दिले नाही.

प्रतापसिंहाला सर्वाधिकार

थोड्याच वर्षांत प्रतापसिंहाने राज्यकर्तृत्वाची आणि लोकहितवादाची दाखविलेला चमक पाहून ग्रांट फार संतुष्ट झाला. त्याने वरचेवर मुंबई सरकारात या प्रगमनशील तरुण महाराजाच्या कर्तबगारीची मुक्तकंठाने स्तुती केली. विलायतेस कंपनीच्या डायरेक्टर बोर्डापर्यंत प्रतापसिंहाची कीर्ती गेली. सारी रयत तर त्याला परमेश्वर मानून त्याचे पोवाडे गाऊ लागली. छत्रपतीच्या राज्यात जेवढ्या सुधारण्या झाल्या, तेवढ्या आपल्या सत्तेखाली असलेल्या महाराष्ट्रातही आपल्याला साधल्या नाहीत, हे मुंबईच्या गवर्नरला-खुद्द एलफिन्स्टनला-स्पष्ट दिसून आले. म्हणून ५ एप्रिल १८२२ शुक्रवारी, ग्रांटने प्रतापसिंह छत्रपतीला सर्वाधिकार देण्याचा मोठा दरबार भरविला. कलकत्त्याचा गवर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्ज आणि मुंबईचा गवर्नर एलफिन्स्टन यांचेकडून आलेले अधिकारदानाचे खलिते वाचण्यात आले आणि ग्रांटने महाराजांच्या अष्टपैलू कर्तृत्वाची मोठ्या अभिमानाने वाखाणणी करून, नवा जाहीरनामा सर्वत्र पुकारला. रयतेने मोठा उत्सव केला.

हु।।

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपनी इंग्रेज बहादूरतमाम लोकांस महशूर व्हावयाकरिता लिहिले जाते जे – सरकार श्रीमंत माहाराज छत्रपतिसाहेब राजे सातारा यांसी कंपनी सरकारातून राज्य देऊन तहनामा जाहाला. त्या वेलेस असे ठरले होते की मुलकाचे आबादी व बंदोबस्ताकरिता व माहाराज व त्याचे अहलकर (कारकून) लोक बंदोबस्ताचे कामास वाकब व्हावयाकरिता काही दिवस मुलकाची वहिवाट माहाराज यांचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करितील. यास हाली माहाराजाचे सरकारातून दरोबस्त वहिवाट आजपासून होत जावी आसे ठरले. त्यावरून उलियम चापलीनं साहेब कमिशनर बाहादूर याणी सातारेयास येऊन माहाराजाचे दरबारात मोठे सरदार व जाहगीरदार वगैरे सारे

लोक जमा होऊन राज्याची वहिवाट माहाराज याचे सरकारात सुपूर्द केली असे. तरी सरदार व जाहागीरदार लाहान मोठे जे माहाराजाचे इलाख्यात आहेत, त्याणी व तमाम रयत वगैरे हरयेक लोकांनी, माहाराज यांचे सरकारचे लक्ष ठेवून त्यांचे हुकमात वागत असावे. मोठे  सरदार व जहागीरदार याणी आपलाले यादीप्रमाणे वागावे. महाराजाचे सरकारातूनही या लोकास हुकूम देते वेलेस यादीप्रमाणे देत जातील. सर्वांनी जाहीरनामा समजोन वागत आसावे. जाणीजे. तारीख ५ येप्रिल सन १८२२ इसवी मु।। छ १२ रजब सु।। इसने आशरीन मयातेन व अलफ. (पे. द. ४२ पा. ४९)

याच सुमारास लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीने प्रतापसिंहाला आपल्या सभासदत्वाचा सन्मान दिला. लवकरच ३१ डिसेम्बर १८२२ ला ग्राटंडफ गेला नि त्याच्या जागी कर्नल ब्रिग्ज रेसिदंट म्हणून आला.

पुढील हकिकती नीट समजण्यासाठी, प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत कोण कोण रेसिदंट आले, मुंबईला कोण कोण गवर्नर होते आणि कलकत्त्याला गवर्नर जनरल कोणकोण होते, याचा तक्ता वाचकांसमोर असणे अगत्याचे असल्यामुळे, तो आधी पुढे दिला आहे.

प्रतापसिंहाच्या कारकीर्दीतील

सातारा रेसिदंट

| | |
|---|---|
| १ जेम्स ग्रांट डफ | एप्रिल १८१८ ते डिसेंबर १८२२ |
| २ कर्नल ब्रिग्ज | जानेवारी १८२३ ते डिसेंबर १८२६ |
| ३ क. रॉबर्टसन | जून १८२७ ते जानेवारी १८३२ |
| ४ क. लॉडविक | जानेवारी १८३२ ते १४ जून १८३७ |
| ५ क. ओव्हन्स | १५ जून १८३७ ते १९ मे १८४५ |
| ६ जेम्स औट्रॅम | २० मे १८४५ ते मे १८४७ |
| ७ बार्टल फ्रियर | मे १८४७ ते १८४८ |

मुंबईचे गवर्नर

| | |
|---|---|
| १ एलफिन्स्टन | ३० ऑक्टोबर १८१९ ते ३१ ऑक्टोबर १८२७ |
| २ मालकम | 1 नोव्हेंबर १८२७ ते 1 डिसेंबर १८३० |
| ३ सिडने बेकविथ | 1 डिसेंबर १८३० ते मृत्यू १५ जानेवारी १८३१ |
| ४ अर्ल क्लेअर | १८३२ ते मार्च १८३५ |
| ५ रॉबर्ट ग्रॅण्ट | मार्च १८३५ ते मृत्यू ९ जुलै १८३८ |
| ६ फेरिस | १८३८ ते १८३९ |
| ७ रिव्हेट कारनॅक | ३१ मे १८३९ ते ८ जून  १८४१ |
| ८ जॉर्ज आर्थर | ९ जून १८४१ ते ५ ऑगस्ट १८४६ |

कलकत्ता गव्हर्नर जनरल

| | |
|---|---|
| १ लॉर्ड हेस्टिंग्ज | ४ ऑक्टोबर १८१३ ते 1 जानेवारी १८२३ |
| २ लॉर्ड अम्हर्स्ट | 1 ऑगस्ट १८२३ ते १३ मार्च १८२८ |
| ३ बेण्टिन्क | ४ जुलैर १८२८ ते २८ मार्च १८३५ |
| ४ चार्लस मेटकाफ | २० मार्च १८३५ ते ४ मार्च १८३६ |
| ५ लॉर्ड ऑक्लण्ड | ४ मार्च १८३६ ते २८ फेब्रुवारी १८४२ |
| ६ लॉर्ड एलनबरो | २८ फेब्रुवारी १८४२ ते १५ जून १८४४ |
| ७ लॉर्ड हार्डिंज | २३ जुलै १८४४ ते १२ जानेवारी १८४८ |

टीप - प्रतापसिंहाला छळणारे मुख्य दोन गोरे मांग – एक गवर्नर रॉबर्ट ग्रॅण्ट आणि त्याचा हस्तक सातारचा रेसिदंट कर्नल ओव्हान्स. शेवटचे पदच्युतीचे बदकर्म उरकणारा गवर्नर रिव्लेट कारनॅक.

## प्रकरण १० वे

## प्रतापसिंहाचा सर्वत्र जयजयकार

### कौटुंबिक घडामोडी

प्रतापसिंहाचा पाठीवरचा धाकटा भाऊ रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब २१ जानेवारी सन १८२१ रोजी वारला. मरणसमयी त्याचे वय अवघे २६ वर्षांचे होते. पुढल्याच वर्षी ता. ३-१-१८२२ रोजी मातोश्री

आनंदीबाई ऊर्फ माईसाहेब तुळजापूरच्या यात्रेहून परत येत असता, भीमातीरी धुळखेड येथे मरण पावल्या. मरणापूर्वी आपल्या राजपुत्राला सर्वाधिकार मिळाल्याचे समाधान तेवढे त्यांच्या पदरात पडले. या वेळी कनिष्ट बंधू आप्पासाहेब भोसला १७ वर्षांचा होता. लहानपणापासूनच हा पक्का उनाडटप्पू निघाला. याच्याविषयी ग्रांट डफने लिहून ठेवले होते की, ‘‘आप्पासाहेब हा हट्टी नि दुराचरणी आहे. त्याला वाईट वाईट व्यसने लागलेली आहेत. प्रतापसिंहाने त्याला ताळ्यावर आणण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले, पण त्याच्या वाईट खोड्या नि व्यसने सुटत नाहीत.’’ मोठमोठे कंपनीचे अधिकारी, जहागीरदार साता-याला आले, म्हणजे या व्रात्य तरुणाचे चाळे नि बदलौकीक ऐकून पाहून, खेद करायचे. कंपनीचे अधिकारी वरचेवर मुंबई सरकारात आप्पासाहेबाचे हलकट धंदे लिहून कळवायचे. पण योगायोग काय पहा, की अखेर त्याच मुंबई सरकारने पुढे सज्जन प्रतापसिंहाचा काटा काढण्यासाठी, सातारच्या गादीवर याच दुर्जन आप्पाला बसविण्याची घिसाडघाई केली.

ग्रांट डफचा जिव्हाळा.

थोड्या अवधीत प्रतापसिंहाने राज्यसुधारणेचा जो कौतुकास्पद आटोप केला, त्याचे सारे श्रेय ग्रांट डफला देणे वाजवी आहे. सन १८२२ अखेर तो स्कॉटलंडात ईडन येथे गेला, तरी नेहमी राजकारण प्रकरणी आणि खुद्द महाराजाच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल लांबलचक स्नेहाळपणाची पत्रे पाठवून चौकशी करीत असे. त्या पत्रांतील दोनतीन त्रोटक वेंचे पहा. म्हणजे ग्रांटच्या विशुद्ध भावनांची खात्री पटेल.

(1) सातारियाचे बरे व्हावे म्हणोन जी मेहनत घेतली ती मेहनत असी की माझा खासगत सातारा असता तरी इतकी घेतली नसती.

(2) आपली सुकीर्ती व उत्तम नामना मेळविली आहे, श्रवण करून मला संतोष वाटला तो पत्री दर्शविता येत नाही. ज्या गोष्टी अलिकडेच माझ्या श्रवणी आल्या आहेत तेणेकरून तर फारच हर्ष जाहाला.

(3) सातारा देश माझा खासगत असता तर इतके अगत्ये केले नसते, परंतु आपले देशाचे सर्वकाळ हित व्हावे म्हणोन इतके लिहिले आहे.

(4) (इंग्रेजीत स्पेलिंग करून लिहिलेले हिंदी) माहाराजकू कबु तखतपर कबु खलबतखानेपे कबु कहा हम दोस्तीसे कबु दो बातकी सलामी बोलतेथे. कबु दस बात चूप आपनी गपसप बी बोलतेथे. आदतसे अलबत लिखने चाहिये. लेकिन माहाराजकू मालूम है के खुशामतकी बात मेरा दस्तूर नही.

(5) कबु माहाराजका घुसा बी मेरेउपर बहुत हुवा होयगा. लेकिन माहाराजने आपने दिलकू पूछा की किस्के करनेसे अछा हुवा?

स्कॉटलंडमधील ईडन येथे वास्तव्य असताना ग्रांटने आपला ‘म-हाठ्यांचा इतिहास’ इंग्रजीत लिहून तयारकेला.तो प्रचंड इतिहास छापायला खर्चही प्रचंडच. तेव्हा त्याने कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाला अर्ज दिला की या महत्त्वाच्या ग्रंथाच्या छपाईसाठी रकम मंजूर करावी बोर्डातल्या मंडळींनी आधी तो वाचून पाह्यातच बराच काळ घालविला. अखेर जबाब दिला की या ग्रंथाला ‘म-हाठ्यांचा इतिहास’ असे नाव न देता, ‘आंग्रेज कुंफणी बहादुर यांच्या यांच्या भारतीय राज्यसत्तेचा पाया’ असे नाव दिल्यास खर्चाची मंजुरी मिळेल. ग्रांटने स्पष्ट नकार दिला. छापीन तर मूळ ठरविलेल्या मूळ नावानेच, नाहीतर फाडून टाकीन. पुढे हे प्रकरण तिकडे लोकांत बरेच गाजले. काही श्रीमंत नि भारतप्रेमी इंग्रेज गृहस्थांनी ग्रांटला पैशाची मदत केली नि तो ग्रंथ बोर्डाच्या नाकावर टिच्चून बाहेर पडला. पुढे केपन नावाच्या एका इंग्रेज इसमाने त्या इतिहासाचे म-हाठी भाषांतर करून, ते लंडन येथे शिळाछापाने छापून इकडे पाठविले. विलायतेला छापलेला हाच पहिला ग्रंथ होय. त्यानंतर सन १८४३त मोडी लिपीत शिळाछापावर छापलेला रंगो बापूजीची कैफियत हा दुसरा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. हा जवळ जवळ तीनशे पानांचा मोडी ग्रंथ (प्रत्येक पानाचा आकार ८¼ ५”) रंगो बापूजीने स्वतः आपल्या मोत्यासारख्या बारीक वळणाने एकटाकी लिहून काढलेला आहे. मोडी लेखनाचे हे सुंदर प्रदर्शन म-हाठी भाषेचा अलंकारच होय.

अलपिष्टन गवर्नरची साता-याला भेट

आंग्रेजी सत्तेच्या प्रसारासाठी किंवा टिकावासाठी झटणा-या हरएक गो-या असामीला गवर्नर किंवा गवर्नर जनरलच्या हुद्यावर चढवून, त्याच्या श्रमाचा मोबदला देण्याची आंग्रेजांची वहिवाट पहिल्यापासून आहे. १९१४च्या पहिल्या महायुद्धात इंग्लंड पैशाच्या बाबतीत कफल्लक झाले. अमेरिकेकडे दातविचकणी करायला अनेक आंग्रेज मुत्सद्दी गेले. पण सारे हात हालवीत परत आले. अखेर लॉर्ड रीडिंग या यहुदी गो-

याला निवडले. त्याने प्रतिज्ञा केली की एका बोटीने जातो आणि दुस-या बोटीने सोन्याच्या लगडी घेऊन येतो. त्याने अमेरिकेच्या मुत्सद्यांना आपल्या मारवाडी शास्त्राने ‘बनवले’ नि खरोखरच तो इंग्लंडसाठी नुसते सोनेच नव्हे तर युद्ध थांबविण्यासाठी जोरदार मध्यस्थीचे वचनही घेऊन आला. या त्याच्या राष्ट्रसेवेबद्दल त्याला हिंदुस्थानची व्हाइसरायकी देऊन इंग्लंडने त्याचे उपकार फेडले.
अलपिष्टनाने तर काय, म-हाठ्यांचे सारे साम्राज्यच कंपनीच्या घशात बिनबोभाट उतरविण्याची लोकविलक्षण कामगिरी बजावलेली! तेव्हा त्याला कंपनीने ३० ऑक्टोबर १८१९ रोजी मुंबईचा गवर्नर बनवून आपली कृतज्ञता व्यक्त केली. कर्नल ब्रिग्ज साता-याचा रजिदंट असताना सन १८२२ साली अलपिष्टन मुद्दाम गवर्नर नात्याने साता-याला भेटायला आला. त्यापूर्वी त्याने प्रतापसिंहाच्या राजकरणी कर्तबगारीबद्दल पुष्कळच ऐकले होते. त्याने महाराजांच्या सर्व कारभाराची कस्सून तपासणी केली. त्याने ‘क ’ म्हणण्यापेक्षा, खुद्द प्रतापसिंहानेच निरनिराळी खाती, तेथला कारभार नि व्यवस्था, हिशेबनिसाच्या कचेरीतील जमाखर्चाचे त्रैमासिक ताळेबंद, न्यायनिकालांचे अहवाल वगैरे सर्व कागदपत्र स्वतःच दाखवून, इंग्रेजांच्या बरोबरीने माझा कारभार चालला आहे का नाही, ते पहा, असेच अलपिष्टनाला दाखवून दिले. या भेटीची हकिकत अलपिष्टनाने आपल्या एका मित्राला पत्राने कळविली, ती अशी –
‘‘साता-याचा हा छोटा राजा किती छान माणूस आहे म्हणून सांगून! दरबारात आम्ही दोघे दोन मसनदीवर बसलो.दरबारी रिवाजाप्रमाणे आम्ही एकमेकाशी एक शब्दही बोललो नाही.पण दरबार आटोपून आम्ही ‘खिलवाती’त (प्रायवेट चेम्बर) गेलो मात्र, राजाने भराभर आपल्या कारभा-यांकडून दिवाणी फौजदारी कामांची नोंदणीबुके, राज्याच्या जमाखर्चाची बजेटे नि अंदाजी तक्ते मागवून, तो मला स्वतः ती समजावून देऊ लागला. आपल्या रयतेची पिकाची नि इतर माहिती देताना तो माझ्यापुढे एकाद्या तरुण कलेक्टराप्रमाणे बोलत होता. तो आपल्या खास दिवाणखान्यात बसून तेथे न्यायदानाचे काम कमाल वक्तशीरपणाने करीत असतो. आम्ही शिकारीला गेलो. सातारच्या रसिदंटाचा मदतनीस मि. मोरीस आमच्या बरोबर होता. त्याच्या घोड्याला ठेच लागली नि तो तडाड अगदी माझ्यासमोर कोसळून खाली पडला. आम्हाला तर वाटले की मोरीस ठार झाला. मी घोड्यावरून उतरून त्याच्याकडे जाणार, तोच माझ्या आधी मोरीसचे रक्तबंबाळ डोके आपल्या ढोपरावर सावरून एक जवान त्याला प्राथमिक उपचार करताना मी पाहिला. कोण होता तो, सांगू का? छत्रपति प्रतापसिंहच होता तो. त्याने झटकन आपला घोडा सोडून देऊन, मोरीसच्या मदतीला तो धावला.’’
पुन्हा सन १८२६ सालीही अलपिष्टन प्रतापसिंहाच्या भेटीला आला, तेव्हा त्याने लिहून ठेवले -
‘‘मराठ्यांचे कुळात प्रतापसिंहाइतका सुसंकृत पुरुष मला दुसरा आढळला नाही. त्याने राज्यात उत्कृष्ट व्यवस्था ठेवली असून, रस्ते, पूल, पाण्याच्या सोयी वगैरे जागच्या जागी करून लोकसुखासाठी तो सारखा झटत आहे. त्याच्या वाड्यातली बसण्याची खोली मला अप्रतिम वाटली. या ठिकाणी हा शिवाजीचा वंशज हिरवी सकलाद घातलेल्या टेबलावर आपली दररोजची रोजनिशी, पत्रव्यवहार आणि दिवसा घडलेल्या भेटीगाठी, भानगडी आणि स्वतःचे विचार लिहित बसतो, हे पाहून कोणास कौतुक वाटणार नाही? असल्या सज्जन नि शांतवृत्तीच्या वंशजाविषयी त्याच्या पूर्वजांना काय बरे वाटले असते? सांगवत नाही!’’
सन १८२९ साली (मालकम गवर्नरची कारकीर्द) मुंबई सरकारचा खास राजकारणी खलिता विलायतेला गेला. त्यात - ‘‘सातारच्या राजाच्या कारभाराने आम्ही कमाल संतुष्ट आहोत. त्याची शांत वृत्ती, काटकसरीने कारभार चालविण्याची शहामत आणि अखंड कार्यमग्नता, या बाबतीत हिंदुस्थानातला एकही इतर राजा त्याच्या पासंगाला पुरणार नाही.’’ असा शेरा दिला होता. ता. २१ सप्टेंबर १८३१ त विलायतच्या डायरेक्टरांनी मुंबई सरकारला लिहिले की ‘‘साता-याच्या राजाच्या स्वभावाविषयी आणि त्याच्या राज्यकर्तृत्वाविषयी आमच्याकडे जे रिपोर्ट आलेले आहेत, त्यावरून आमचा त्या राजाविषयी झालेला अतिशय अनुकूल ग्रह कायम झालेला आहे.’’
‘‘अतिशय दक्षतेने यशवंत राज्य कोणते असे मला विचारले तर मी राजा प्रतापसिंहाने चालवलेल्या साता-याकडेच बोट दाखवीन. या राजाने आपल्या राज्यांत जितक्या सुधारणा केल्यात तेवढ्या आमच्या ताब्यातल्या मुलखातही आम्हाला साधल्या नाहीत.’’ असेही उगद्गार अलपिष्टनाने काढले.

### महाबळेश्वराची प्राणप्रतिष्ठा

महाबळेश्वरामुळे प्रतापसिंहाचे नाव अजरामर झाले आहे, कारण सह्याद्री पर्वताच्या या उत्तुंग शिखराला हवा खाण्याचे सरदारी स्थान म्हणून आज जे महत्त्व प्राप्त झाले आहे, त्याची प्राणप्रतिष्ठा प्रतापसिंहाने

केली. १४ ऑक्टोबर १७९१ रोजी, मॅलेट नि प्राईस या दोन इंग्रेज गृहस्थांबरोबर सवाई माधवराव एकदा महाबळेश्वरास गेला होता. पण ही जागा उन्हाळयात थंड हवेसाठी चांगली वसाहतशीर करता येईल, ही मूळ कल्पना सातारचा ४था रसिदंट लॉडविक याची. प्रतापगडचा किल्ला नि तेथले भवानीचे देऊळ सातारा स्वराज्याच्या हद्दीत येत नव्हते. ती तर भोसल्यांची कुलस्वामिनी. १८२३त प्रतापसिंहाने मागणी केल्यावरून कंपनीने तो किल्ला नि देवालय त्याच्या हवाली केले. १८२४च्या मार्च महिन्यात प्रतापसिंह दोन हजार पायदळाच्या लवाजम्यानिशी प्रतापगडला गेला, देवीची महापूजा बांधली, मोठा उत्सव केला. कर्नल ब्रिग्जच्या सांगण्यावरून महाराजांनी आपल्या खर्चाने साता-याहून महाबळेश्वर तो थेट पुढे प्रतापगडापर्यंत गाडीचा सुंदर रस्ता तयार केला. तोच पुढे महाडपर्यंत नेण्यात आला. महाबळेश्वरावर पहिला बंगला ब्रिग्जने बांधला. १८२७ साली एलफिन्स्टन गवर्नरीच्या जागेवरून निवृत्त झाला. तो स्वदेशी जाण्यापूर्वी त्याला सर्व इलाख्यातील जनतेने मानपत्र दिले त्यावर पहिली सही प्रतापसिंहाने केली. पुढे मालकम गवर्नर झाल्यावर महाबळेश्वरी त्याच्या नावाने मालकम पेठ वसवून, सन १८२८ त प्रतापसिंहाने महाबळेश्वराची प्राणप्रतिष्ठा केली. या नव्या पेठेला महाराजांनी आपलेच नाव देऊन प्रताप पेठ वसवावी, अशी मालकमची सूचना होती. पण ती छत्रपतींनी अमान्य केली. आपल्यासाठी प्रतापसिंहानेही एक छानदार बंगला बांधला होता. पण पुढे त्याच्यावर आंग्रेज उलटल्यानंतर वैतागाने त्याने तो पायासकट उखडून काढला. (३०-४-१८३७)

सन १८३६ साली प्रतापसिंह अलपिष्टनाच्या निमंत्रणाने पुण्याला भेट देण्यासाठी गेला होता. तेथला पेशवानिष्ठ सनातनी भटांना महाराजांची स्वारी आवडली नाही. त्यांनी घरांची दारे खिडक्या लाऊन आपल्या सोवळया भावना व्यक्त केल्या. पण कंपनीच्या अधिका-यांनी आणि इतर हजारो नागरिकांनी प्रतापसिंहाचे थाटात स्वागत केले.

ता. ६ ऑक्टोबर सन १८३३ रोजी लॉर्ड क्लेअर हा मुंबईचा गवर्नर महाराजांच्या भेटीला साता-याला आला. तेव्हा त्याने लिहिले की - ‘‘प्रतापसिंह तरुण, ठेंगू, लठ्ठ नि गौरवर्णाचा आहे. त्याचे कपाळ रुंद असून डोळयात तीव्र चमक आहे. लोकांस विद्यादान देण्याची त्यास मोठी हौस असून त्यासाठी साता-यास त्याने पाठशाळा घातली आहे. त्यात इंग्लिश, पर्शियन, मराठी या भाषा शिकवल्या जातात. रामोहन रॉय या सुप्रसिद्ध सुधारकाची हा राजा मोठी वाखाणणी करतो. त्याचा भाऊ आप्पासाहेब जड व निर्बुद्ध दिसतो. त्याच्या तोंडावर तेज कसे ते बिलकूल नाही. त्याची अक्कलही बेताचीच असल्यामुळे, लोकांस त्याच्याविषयी मुळीच आदर वाटत नाही. प्रतापसिंहाला मुलगा नसल्यामुळे, आप्पासाहेब पुढे गादीवर आल्यास कठीण प्रसंग ओढवेल असे लोकांस वाटते. त्या ऐवजी लोकांचे डोळे बाळासाहेब सेनापतीकडे लागतात. कारण तो हुशार नि तरतरीत आहे.’’

सन १८३० साली इंग्लंडचा राजा चवथा विल्यम याच्या प्रधान मंडळाने प्रतापसिंहाला दोन इंग्रेजी पुस्तके आणि एक सन्मानाचे पत्र पाठविले. त्यात इंग्लंड व हिंदुस्थानातील राजकारणी, भौगोलिक व ऐतिहासिक माहिती होती.

पुण्याचा कारभार पहाणा-या रॉबिन्सन साहेबाने प्रतापसिंहाला विलायतचा प्रवास करण्याची शिफारस केली. भाडे एकलाख रुपये आणि इतर चार लाख, मिळून अवघ्या पाच लाखात यात्रा होईल. त्यावर प्रतापसिंह आपल्या डायरीत लिहितो की मुख्य अडचण पैक्याची, बाकी कसलीही नाही. धर्माची अडचण आहे, पण परत आल्यावर प्रायश्चित्त घेतले म्हणजे झाले. संधी मिळाली तर अगत्य जाऊ. मुलूक पहायला मिळेल. इंग्रज लोकांशी घसट पडून त्यांचा अस्सल स्वभावधर्म वगैरे समजून येईल आणि आपलीही तटलेली कामे परस्पर प्रत्यक्षपणे उरकून घेता येतील.

साता-या जसजसे नवे नवे गोरे अधिकारी येऊ लागले, तसतसा प्रतापसिंह आंग्रेजी स्वभावतल्या खाचाखोचा चांगल्याच ओळखू लागला. एकदा लॉर्ड क्लेअर गवर्नर त्याला म्हणाला - ‘‘माझे मनात महाराजाशी फार बोलावयाचे आहे. परंतु हिंदुस्थाना भाषा येत नाही. आलपिष्टन मालकम वगैरे सरदार याणी सांगितल्याप्रमाणेच माहाराजाचे मुलकी इनसाफ रस्ते वगैरे बंदोबस्त फार चांगला आहे.’’ त्यावर महाराज आपले डायरीत नमूद करतात - ‘किती तारीफ तरी! एक दिवस आपले कामास सोडणे घटका नाही. (आपण आपला मुद्दा कधी सोडायचे नाहीत.) आसे मतलबी गोड लबाड खास.’

रसिदंट नि तत्समान जाणत्या अधिका-यांशी प्रतापसिंह नेहमी जागतिक माहिती नि राजकारणावर संभाषणे नि चर्चा करावयाचा. सन १८३४ साली हिंदुस्थानावरील रशियाच्या स्वारीचा बोलवा फार

होता. त्याविषयी प्रतापसिंह आपल्या डायरीत मोठे मार्मिक विवेचन करतो. यावरून ज्ञानप्राप्तीसाठी तो किती अखंड जागरूक असे, हे दिसून येते.

> ''जोतपुरचे लहानसे राज्यास जिंकावयास इंग्रज तयारी करितात असे नाही. परंतु मध्यभागी काही मोठे प्रकर्ण आहे. जेनेकरून सिंधुनदी स्वाधीन होईल आणि रंजितसिंग व सिंधी लोक व रूसचे दरबारास येकदाच धक्का बसेल व रूसाचा हिंदुस्थानासी संबंध तुटेल. कारण जोतपुरचा मुलूक घेतल्याने त्यास दुपट अवघड पडेल. विलायेत व इरानाहून खबरी येतात की शाहासुज्याचा मुलूक घेण्यास रूस लवकर येण्याची तयारी करितात. इरान येक वेळ आटोपले म्हणजे लवकरच हिंदुस्थानावर रूस येऊ लागलीत..... पाचसात वर्षांत काही तरी ठरते, आम्हासारखे गरिबास आवघड आहे. देवी सर्व काम दये पार करील. बाकी आधार नाही. बुधी नीट ठेऊ. प्रज्यापालन व इंग्रजासी वाकडे न राहणे.''

सन १८३४ साली इंग्लंडचे प्रधानमंडळ बदलले. जुने मंडळ रद्द करून नवे मागण्याचा तिकडील रयतेचा हक्क आहे, असे लॉडविकने प्रतापसिंहाला सांगितले. त्याला मोठे आश्चर्य वाटले. रयत गडबड कते आणि राज्याचे मंत्रिमंडळ उलथून पडते, हा लोकशाही चमत्कार त्याच्या आधी ध्यानातच येई ना.
लॉडविक –राजे व बादशा याणी दुस-याचे स्वाधीन हुकूम ठेविला म्हणजे सदरहू विलायेतेचे वर्तमान लिहून आले, त्या प्रमाणे होते. शाहू महाराजांनी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला त्याजमुळे येवढे थोरले राज्यास धका बसला. तो हुकूम आपले घरात ठेविला असता तर, आजपर्यंत राज्यास धका बसला नसता.
प्रताप –शाहू माहाराजानी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला नव्हता. विश्वासावर गेले हिंदू धरमाने. परंतु त्याणी बेइमानी केली. दुस-यापासी हुकूम न ठेवणे हे खरे आहे. फौज, खजिना, हुकूम व इनसाफ या च्यार गोष्टी राजा व बादशा याणे आपल्याजवळ ठेवाव्या.

असला हा उमदा प्रागतिक लोकप्रिय राजा भटाबामणांच्या चिथावणीने आंग्रेजांनी कसा नेस्तनाबूद केला, हे यापुढे आपल्याला पहावयाचे आहे.

## प्रकरण ११ वे
## कलिपुरुष बाळाजीपंत नातूची कारस्थाने

नेटिव असिस्टंट म्हणून ग्रांट रसिदंटाच्या हाताखाली खर्डी घाशीत बसला असतानाही, बाळाजीपंत नातूच्या मनात, महाराजांनी आपल्याला दिवाणगिरी दिली नाही, हे शल्य बोचतच होते. त्याच्याविषयी महाराजांचे मन पक्के कलुषित झालेले असल्यामुळे, तिकडे पुन्हा शब्द टाकायची सोयच नव्हती. म्हणून तो ग्रांटजवळ संधि साधून वरचेवर दिवाणगिरीच्या नेमणुकीचा टुमणा लावीत असे. अलपिष्टनाकडेही तो संधाने बांधीत असे. पण ते दोघे नातूच्या बराशाच्या घुग-या खाल्लेले! प्रतापसिंहाची चालू झालेली प्रगमनशील राज्यव्यवस्था नातूसारखा कलिपुरुष केवळ स्वार्थासाठी पार नासून टाकील, तेव्हा या हरामखोर घरबुडव्याला ते तसेच दाबून बसले होते. नातू म्हणजे कोण? तर इंग्रजांच्या ''इंटेलिजन्स खात्यातला'' एक प्रमुख देशी हेर. पैशासाठी त्याने आपल्या जातीच्या – स्वतःच्या धन्याच्या – पेशव्याच्या – घरावर आंग्रेजांचे निशाण फडकावले. त्यापूर्वी सारखा घरभेदाचाच धंदा करून, पेशव्याच्या घरची, दरबारातली, शहरकातल्या नागरिकांची, बित्तंबातमी फक्त पैशासाठी इंग्रेजांना त्याने पुरवली. असल्या पायीच्या पायतणाला डोक्यावर चढविण्याइतके आंग्रेज केव्हाही गाफिल नव्हते नि आज नाहीत. बाजीरावाने आपला सैन्याचा कमाण्डर नेमलेल्या पोटसाहेबाची (फोर्ड) हकिकतच पहा ना. हा गोरा अधिकारी वास्तविक पेशव्याचा नोकर. पण खडकीच्या लढाईच्या वेळेला, बाजीरावाने जेव्हा हल्ला चढवायचा हुकूम सोडला, तेव्हा त्याने मोठ्या स्वदेशाभिमानाची ऐट आणून जबाब दिला. - ''श्रीमंत, स्वधर्मबांधवांविरुद्ध मी आपली तलवार उपसणार नाही.'' आपण बावळट हिंदू फोर्डच्या वर्तनाची वहावा करू नि पूर्वी पुष्कळांनी केलीही. पण खुद्द आंग्रेजांनीत्या वर्तनाला काय किंमत दिली? पुणे शहर हस्तगत झाल्यावर, अर्थात तेथे नि आजूबाजूच्या प्रदेशात लोकांची भयंकर दाणादाण उडाली. लूटमार चालू झाली. दरोडे पडू लागले.तेव्हा शहराचा बंदोबस्त कोणी करायचा, हा महत्त्वाचा प्रश्न अलपिष्टनादि अधिका-यांपुढे पडला. एकाने नातूचे नाव सुचवितात त्याने हात जोडले. त्याला माहीत होते की यापुढे नातू पुण्यात एकटा सापडला तर लोक त्याला खरोखरच आंगावर तेल ओतून जाळून टाकतील. तेव्हा स्वधर्माभिमानाच्या तो-याने बाजीरावाला चाट पाडणारा फोर्ड अहंमन्यतेच्या ऐटीत अलपिष्टनापुढे एकदा त्याच्याकडे रोखून पाहिले नि तो म्हणाला - ''शरम वाटत नाही तुला? तू निमकहराम आहेस. आमचे

जाती वेगळा रहा. ज्याचे अन्न खाल्लेस त्याच्या सेवेला पाठ दाखवलीस? ठेव तलवार खाली. तू आमच्यात असता कामा नये.'' पेशवा त्याला दरमहा सहा हजार रुपये पगार देत होता. तो एकदम अडीच हजार केला नि फक्त हिंदुस्थानात असे तोवरच तो मिळायचा, कारण 'तू कंपनीच्या उपयोगी पडलास' म्हणून, असे ठरवून त्याला अलपिष्टनाने हुसकावून दिला. असले तत्त्वनिष्ठ अलपिष्टन किंवा ग्रांट नातूसारख्या हरामखोराला प्रतापसिंहाचा पेशवा करून त्याच्या रियासतीत नव्या भानगडी नि उचापति करायला या नराधमाला मोकळा सोडतील, हे शक्यच नव्हते. खर्डेघाशी करीत असतानाच, नातूने आपल्या चित्पावन जातभाईंना रेसिडेन्सीत आणि महाराजांकडे संभावित मिन्नतवा-या करून नोक-या देवविण्याचा धंदा मात्र अखंड चालविला होता.

ग्रांट सातारा सोडून निघाला (डिसेंबर १८२२) तेव्हा त्याने या नातू पिशाच्चाला तेथे न ठेवता, लगेच पुण्याला बदलून टाकले. आपली बदली होणार नि मग सातारचा नि आपला संबंध तुटणार, ही बातमी लागताच, नातूने ग्रांटची प्रार्थना करून आबा जोशीनावाच्या आपल्या भरंशाच्या एका चित्पावन तरुणाला रेसिडेन्सीत 'कॉन्फिडेन्शियल क्लार्क' हुद्द्यावर नेमण्याची कारवाई सफाईत उरकून घेतली. या छोटेखानी नेमणुकीने नातूने काय साधले. याची मात्र ग्राटंला काहीच अटकळ करता आली नाही. तिकडे विठ्ठलपंत दिवाणाच्या कचेरीत विसोबा भडकमकर म्हणून एक कारकून होते. तो आणि हा आबा यांचेकडून सातारची बित्तंबातमी रोजच्या रोज पुण्याला आपल्याला मिळण्याची हेरगिरीचे यंत्र नातूने निर्माण केले. ग्रांट गेल्याबरोबर नातू पुण्याला पळाला, याविषयी प्रतापसिंहाने डायरीत लिहिले की, नातू आपल्या कर्माला फार भितो. त्याला इंग्रेजांचा आसरा असला तरी घरभेदाच्या पापामुळे लोक त्याच्यावर दात धरूनच आहेत, म्हणून तो भितो.

तरुण पिढीला नोकरीचे आमीश

पेशवाईमुळे ब्राह्मणवर्ग बराच साक्षर झालेलाहोता. त्यांच्या तरुणांना अध्यन किंवा कारकुनी यात आत्ताच अडकवून ठेवायचे नाही, तर पुढेमागे हे रिकामटवळे उगाच नसत्या भानगडी निर्माण करायला चुकायचे नाहीत. या धोरणाने कुंफणी बहादूर सरकारने ''हिंदू लोकांची आबादी व खुशी ठेवावयाचा इंग्रजी सरकारचा सांप्रदाय पहिल्यापासून आहे.'' या नमन-वाक्याने सन १८२१त पुण्याच्या विश्राम बागेत पाठशाळा काढली आणि ब-याच भटपुत्रांना तेथे संस्कृत घोकंपट्टीच्या संथा घ्यायला अडकऊन टाकले. पुढे १८२५त 'कचेरीचे कामात व अदालतचे कामात तरबियेत लोक हुरमतवाले (अब्रूदार) मिलण्याची अडचण आहे.' सबब पाठाशाळेतल्या नि इतर साक्षर तरुणांनी अर्ज्या कराव्या, असा जाहीरनामा काढऊन, येतील तितक्या ब्राह्मण युवकांना सरकारी नोकरीच्या चंदेरी शृंखळात जखडबंद अटकवले.

इकडे साता-याला ग्रांट निघून गेल्यावर ब्रिग्ज आला. त्या वेळेस महाराजांच्या अंमलातील मुलुखाची पाहणी (सर्वे) करण्यासाठी अडॅम नावाचा एक हुशार इंजणेर गवर्नर अलपिष्टनाच्या हुकुमाने आला. त्यानेही शेकडो लिहिणारे वाचणारे (ब्राह्मण, प्रभू वगैरे) तरुणांना आपल्या खात्यात नोकरीवर जुंपले. ठरल्या तारखेला रोखठोक छणछण पगार, शिवाय आंग्रेजांचे नोकरमाने म्हणून समाजात नव्यानेच मिळणारी प्रतिष्ठा, या लोभाने आंग्रेजांच्या नोकरीत घुसण्यासाठी पांढरपेशा म-हाठे तरुणांच्या झुंडीच्या झुंडी सातारा, पुणे, खानदेशात कमिशनरांच्या कचेरीभोवती घोंगावत फिरू लागल्या. नोकरी नि पेनशन या दोन आकर्षणांनी इंग्रेजांनी महाराष्ट्रच काय, पण सारा हिंदुस्थान आपल्या गुलामगिरीत जखडून टाकला.

सातारा नि जहागिरी यांचे सांधे नि वांधे

मागल्या ८व्या प्रकरणात तहनाम्याचे ५वे कलम जसे प्रतापसिंहाच्या दुर्दैवाला कारण झाले, तसेच जहागिरदारांसंबंधी ७वे कलमही बाळाजीपंत नातूच्या कारस्थानानी बाधक झाले. म्हणून मूळ इंग्रेजी कलम आणि त्याचे म-हाठी भाषांतर येथे देत आहे –

ARTICLE 7th

The possessions of the Jagheerdars within His Highness's territory are to be **under the guarantee of the British Government,** which on the other hand engages to secure their performing the service which they owe to His Highness according to established custom.

कलम सातवे ७.

महाराज छत्रपति यांचे सरकारचा मुलूख वर करार होत आहे त्या मुलकांत जाहागीरदार आहेत त्यांची जाहागीर त्यांजकडे सरकार इंग्रेज बहादूर यांचे बहलदारीने चालेल व इंग्रेजी सरकारातून कबूल करीत आहेत की जाहगीरदार दस्तुराप्रमाणे महाराज्यांचे सरकारात रुजू राहून चाकरी करीत जातील.... कलम.

(1) अक्कलकोटकर, (२) पंत सचीव, (३) पंत प्रतिनिधी, (४) जतचे डफळे, (५) निंबाळकर आणि (६) सेख मिरा वाईकर, हे सहा जहागीरदार या तहनाम्याने, पूर्वापार वहिवाटीप्रमाणे, छत्रपतींच्या स्वामित्वाखाली आणि सत्तेखाली, परंतु कंपनी सरकारच्या हमी (गॅरण्टी) खाली रहाणार, एवढा स्पष्टार्थ या कलमातून निघतो. तथापि विशेष खुबीदार शब्दांतून सोयिस्कर खुबीदार अर्थ काढण्यात वाकबगार अशा आंग्रेजांनी, त्यातल्या ‘बहलदारी’ ऊर्फ गॅरण्टी शब्दावर पुढे, नातूच्या चिथावणीने, निराळाच अर्थ बसवून, सांध्यात वांधा कसा निर्माण केला, ते योग्य स्थळी दिसेलच.

(2) डफळयांची जत, तिची भलतीच गत.

अडॅम साहेबाने जत परगण्याची पहाणी केली, तेव्हा तेथे त्याला सारी अंदाधुंदी माजलेली दिसली. डफळे मूळचे विजापूर बादशाहीचे सरदार, औरंगझीबाच्या वतीने त्यांनी एकदा साता-यावर हल्ला चढवून सुरुंगाने मंगळाईचा बुरूज पाडला. त्याला आजही डफळयांचा बुरूज असे म्हणतात. मुसलमानी सत्तेचे उच्चाटन झाल्यावर डफळे पेशव्यांच्या सावलीत सरदार म्हणून राहिले. प्रतापसिंह गादीवर आला तेव्हा कान्होजीराव जतचा जहागीरदार होता. तो सन १८१०त निपुत्रीक वारला, म्हणून रावबाजीने ती जहागीर आपला जानीदोस्त त्रिंबकजी डेंगळे याला इनाम दिली.

त्रिंबकजीने जतचा ताबा न घेता, कान्होजीची बायको रेणुकाबाई हिच्या वहिवाटीखालीच ती जहागीर चालू दिली. काही गावे रेणुकाबाईकडे, तर काही तिची सवत साळूबाई बळकाऊन बसलेली. म्हणजे सवती सवतींच्या झगड्यात जहागिरीची चाललेली वाताहात आणि कायदेशीर मालक कोण? तर त्रिंबकजी. तो तर तिकडे ढुंकूनही पाही ना. गुंडपुंडांना आयतेच फावले. जो उठला तो गावेच्या गावे बळकाऊन बसला. बंडाळी नि बेबंदशाही माजली.

१८१९ च्या तहनाम्याप्रमाणे जत महाराजांच्या स्वामित्वाखाली, अशी कंपनी सरकारनी कबुली दिलेली. अडॅमने अराजक माजल्याची छत्रपतीकडे बातमी देताच, (सन १८२०) महाराज बरोबर मोठे सैन्य घेऊन जत परगण्यात गेले आणि थोड्याच दिवसांत तेथल्या बंडखोरांना चेचून काढून, सगळीकडे स्थिरस्थावर केली. नवे कारभारी नेमून, कारभाराची शिस्त लावली आणि रेणुकाबाईशी तह ठरवून, तिच्या हवाली जहागीर केली. पुढ रेणुकाबाई आणि साळूबाई वारल्यावर, प्रतापसिंहाने वारसाचा शोध करून, कान्होजीचा आजा यशवंतराव याच्या दुस-या मुलाचा मुलगा रामराव याला वारस कबूल करून जतच्या गादीवर बसवले. हाही निपुत्रिकच असल्यामुळे, त्याने महाराजाकडे दत्तकाची परवानगी मागितली. पण एकंदर विचित्र परिस्थिती पाहून महाराजांनी तो प्रश्न तहकूब ठेवला.

नातूचे सातारचे एजंट आबा नि विसोबा यांचे त्याच्याशी पुण्याला जंतरमंतर चालूच होते. रामरावला दत्तकाची परवानगी महाराज देत नाहीत, एवढी बातमी बाळाजी काशी किबे याजकडून समजताच, नातूने रामरावशी संधान बांधले. अहो, या छत्रपतीला विचारतो कोण? आंग्रेजांनी निर्माण केलेले हे कळसूत्री बाहुले! चला, तुमच्या दत्तकाची मसलत मी थेट गवर्नरापर्यंत नेऊन भिडवतो नि तुमचे काम करतो, अशा थापा मारून नातूने रामराव डफळयाकडून सोळा हजार रुपये काढले. अखेर बिचारा निपुत्रिक म्हणूनच १८३९ साली देवलोकी गेला.

सचिवाचे भोर, त्याला छत्रपतीचा घोर.

प्रतिनिधीप्रमाणेच सचीव हेहि छत्रपतीने निर्माण केलेले. छत्रपतीच्या तक्ताचे सेवक. पण पुढे पुढे पेशव्यांची सत्ता भरारू लागल्यावर, छत्रपतींना धाब्यावर बसवून, स्वतःची बामणी सत्ता स्वतंत्र मानण्याकडे पंतसचीवांच्या धडपडी चालू असत. मरगठ्ठ्या छत्रपतीपेक्षा ब्राह्मण पेशवा धनी बरा, असे त्यांना वाटू लागले. पेशवाईला घरघराट लागला तेव्हा भोरचा जहागीरदार पंत सचीव चिमणाजी शंकर होता. तो नेहमी रावबाजीच्या पाठीशी चिकटून असे. ११ फेब्रुवारी १८१८ चा अलपिष्टनाचा जाहीरनामा प्रसिद्ध होताच. टेम्बुरणीच्या मुकामाहून श्रीमंतांना अखेरचा दण्डवत घालून, चिमणाजी सचिवाची स्वारी एकदम येऊन आंग्रेजांच्या चरणावर साष्टांग प्रणिपात घालती झाली. कुंफणी सरकार बहादुरची ‘बहलदारी[गॅरण्टी] आणि सातारच्या छत्रपतींचे मांडलिकत्व बिनशर्त मान्य करणारा तह करून, सचीव भोर जहागिरीची कुंपण राखीत बसले.

चिमणाजी शंकराने रघुनाथ नावाचा एक मुलगा दत्तक घेतला. पण तो सचीवपत्नी भवानीबाईला पसंत नव्हता. चिमणाजी गेल्यावर रघुनाथ आणि भवानीबाई यांच्यात रोज खडाजंगी भांडणे होऊ लागली. कारभाराचा विचका उडाला नि रयत हैराण झाली. हे समजताच, प्रतापसिंहाने मायलेकाला सातारला बोलावून घेतले आणि दोनही बाजू ऐकून घेऊन, निवाडा दिला. भवानीबाईने साता-यासच सचिवाच्या वाड्यात रहावे आणि पंताने तिच्या खर्चाची बेगमी करावी. अशा रीतीने महाराजांनी भोरच्या जहागिरीतल्या कलहाच्या भूताला गाडून टाकले.

गवर्नरापासून नजिकच्या रसिदंटापर्यंत सगळ्यांना तोंडात बोट घालायला लावण्याइतक्या प्रागतिक धडाडीने आणि कमाल समजूतदारपणाने प्रतापसिंह आपला राज्यकारभार चालवीत होता आणि एकीकडे नातूकंपू त्याला भानगडींच्या पेचात खेचण्याची संधी पहात कावळ्यांसरखा टपून बसला होता. सातारच्या आबा जोशी, बाळोजीपंत किबे आणि विसाजीपंत भडकमकर प्रभृति नातूच्या एजंटानी आस्तेआस्ते भवानीबाईपर्यंत आला शिरकाव करून घेतला आणि तिचे कान फुंकले. रघुनाथाच्या दत्तविधानाला कुंफणी सरकारची संमति मिळालेली नसल्यामुळे, झालेले दत्तविधान आपण आंग्रेजांकडून नाशाबित करून घेऊ. छत्रपतीच्या तडजोडीला कोण धूप घालतो? वगैरे गोष्टी सांगून या ब्रह्मपुत्रांनी भवानीबाईचे मन बिथरऊन तिच्या पैशाच्या पिशवीला भले मोठे भोक पाडले. बामण बच्चया! तशात चित्पावन! तो काय रोख दक्षिणेशिवाय मंत्राच्या भानगडीत पडणार? प्रतापसिंहाच्या तडजोडीला तुंकार दाखवून, भवानीबाईच्या गुप्त कारस्थानाचे धागे थेट नातूपर्यंत भिडले. आबा किबे, भडकमकर एजंट तिला हरहमेश काही ना काही खबर देऊन तिच्यापासून पैसा काढू लागले. रघुनाथ नाशाबित झाला तर आपल्याला नवा पसंतीचा दत्तक घेऊन भोरास कर्तुमकर्तमपणाने राज्य तरी करता येईल. नुसते सातारला ऐदी बसून मरेपर्यंत जगण्यात अर्थ काय? या विचाराने भवानीबाईच्या आंगात भवानी संचारली.

तिकडे भोरासही रघुनाथपंताच्या मनात छत्रपतीच्या ताबेदारीचे वैषम्य घर धरीत होते. चिमणाजीला दत्तकाची परवानगी देताना, प्रतापसिंहाने हुकूम केला होता की पुढच्या सर्व सचिवानी छत्रपतीला दरसाल १५ हजार रुपये नजर भरली पाहिजे. त्याप्रमाणे दरसाल ही खंडणी साता-याला येत होती. आम्हाला ही खंडणी भरण्याच सक्ती नसावी, अशी खटपट करण्याबद्दल नातूने रघुनाथाला चिथावले. त्याने (आगष्ट १८२७) एलफिन्स्टनची गाठ घेतली. ११ फेब्रुवारीचा जाहीरनामा प्रसिद्ध होताच, सर्वांच्या आधी आपल्या चरणावर लोटांगण घालणारा, म्हणून सचिवाबद्दल त्याला कितीही मोठा राजकारण जिव्हाळा वाटत असला, तरी १८१९च्या तहनाम्याच्या शर्तीप्रमाणे सचिवाचे छत्रपतीशी बिनशर्त मांडलिकत्व त्याला अमान्य करता येई ना. रघुनाथपंताची कैफियत ऐकून घेऊन एलफिन्स्टनने स्पष्ट खुलासा केला –

**‘‘Although you and your heirs are to hold your jagheer on certain stipulated terms, yet that, on a total failure of heirs, it must revert to His Highness the Raja, and that if His Highness allows it to be continued in such case by adoption or otherwise, His Highness is at liberty to attach what conditions he pleases to the permission.’’**

(तुमची गादी बेवारस झाल्यास ती चालविणे अथवा ती जहागीरच आपल्या राज्यास जोडणे, ही गोष्ट सातारच्या महाराजांच्या इच्छेवर राहील. तुमच्यावर वाटतील त्या अटी लादायला ते मुखत्यार आहेत.)

एलफिन्स्टनने स्वतःच हा जबाब दिल्यामुळे, रघुनाथाचे हातपायच गळले. पण भोराजवळ पुण्यास बाळाजीपंत नातू होताच. त्याने लगेच पंताकडे आपला खास दूत पाठवून, थोड्याच दिवसांत अलपिष्टन स्वदेशी जाणार आहे. तेव्हा नवा गवर्नर येताच सरकारातून मी तुमची दाद लावून देतो, असे कळविले. बाळाजीपंत नातू म्हणजे आंग्रेज अधिका-यांच्या नाकातला बाल! थेट वशिल्याचे तट्टू! हां, या महात्म्याच्या गळयाला मिठी मारली तर हेतूची वैतरणी तरुण आपल्याला पार जाता येईल, अशी पंताची खात्री पटली.

थोड्याच दिवसांनी बाळाजीपंत नातू महाशय आपणहून पंताच्या भेटीला भोरास गेले. आपल्या अडचणीबद्दल खरा कळवळयाचा माणूस हा, असे बावळट पंताला वाटले. काम जाम फत्ते करून देतो वगैरे लोणकढी थापेबाजी करून नातूने पहिल्या तडाक्यालाच पंताकडून मुसेखोरे नि मुठेखोरे यातले दोन गाव स्वतःला इमान करून घेतले. पण दक्षणेशिवाय दान सफल होत नसते, म्हणून ठरल्या कामगिरीच्या खटपटीसाठी दरसाल २ हजार रुपये नक्त दक्षणा नातूने घेण्याची सुरुवात केली. एवढ्याने थोडेच थांबते? पंताच्या दरबारात नातूने आपल्या अनेक चित्पावन जातभाईंची वर्णी लावून घेतली. म्हणजे भोरासही

आपली न्यूज एजन्सी (बातमीयंत्रे) स्थापन केली. नंतर वेळोवेळी निरनिराळ्या कामगि-यांच्या सबबीखाली नातू रघुनाथपंताकडून मन मानेल तशा मोठमोठ्या रकमा सहज पिळून काढू लागला. पंताच्या पूर्वजांनी अनेक शिवभक्तांची वतने गिळून भोराची भर केली. नातूने या देशस्थभटाच्या तिजोरीला चित्पावनी गिरमीट लावून, भरभक्कम नागवणूक चालू केली. सारांश, साता-याला भवानीबाई आणि इकडे भोरास रघुनाथपंत ही पैसा उकळण्याची दोन सावजे नातूने पक्की पकडीत धरून ठेवली. कोणाचे काहीही बरे न करता, उमाप उनामे नि पैका बहकणारा नातूसारखा इलमी असमी भूतो (झाला), पण पुढे न भविष्यति.

## प्रतापसिंहाची अक्कलकोटावर स्वारी

अक्कलकोटच्या जहागिरीने मात्र नातूच्या कारस्थानांना चांगलेच क्षेत्र दिले. येथले जहागीरदार भोसले आडनाव लावीत असले, तरी ते भोसलेवंशज नव्हत. शिवेर परगण्यातील पारद नावाची गढी थोरल्या शाहूने तेथल्या पाटलाला मारून फत्ते केली. त्या पाटलाच्या बायकोने आपला एकुलता एक मुलगा लढाईच्या गर्दीत शाहूच्या पायावर आणून घातला नि म्हणाली - ''यांस वाचवावे. अन्यायी होते ते गेले. मुलाचा अपराध नाही.'' तेव्हा शाहूने त्या मुलाला 'आपला' मानून फत्तेसिंग भोसले असे नाव दिले. तोच या अक्कलकोट जहागिरीचा मूळपुरुष. शाहूनंतरच्या छत्रपतींना अक्कलकोटकर फारसे जुमानीत नसत. आम्ही स्वतंत्र आहोत, आमचा नि सातारच्या छत्रपतींचा मांडलिकपणाचा मुळीच संबंध नाही, असा त्यांचा दावा असे. पुणे पडण्यापूर्वी थोडे दिवस अक्कलकोटकरांनी एलफिन्स्टनकडे हाच सवत्या सुभ्याचा दावा जोराने मांडला होता. [सन १८१८त चिटणीसांनी रंगो बापूजीला अक्कलकोटला पाठविले. तेथल्या फितुरीचे नि बंडाचे कागद 'सरकारी आज्ञेवरून' त्याने मुंबईला पकडले. बंडवाल्यांनी त्याला कैद केले, हा ६व्या प्रकरणातला संदर्भ याच भानगडीविषयी होय.] पण साहेबाने तिकडे लक्ष दिले नाही.

सन १८२७त त्या वेळच्या फत्तेसिंग राजे भोसल्याने प्रतापसिंहाचे स्वामित्व उघडपणे नाकारले. मानी प्रतापसिंह थोडाच असल्या अवमानापुढे मान वाकविणार! त्याने स्वारीची तयारी करण्याचे हुकूम सोडले. बळवंतराव सेनापति यांच्या सेनापतित्वाखाली लष्कर अक्कलकोटला रवाना केले. मोठा मातबर लढाई झाली. इंग्रेजांचा एक ट्रुप कमांडर पडला. रिसालदार दौलतखाना याने अक्कलकोटचा भुईकोट किल्ला सर करताना पराक्रमाची शिकस्त केली. सेनापतीने सारा मुलूख पादाक्रांत करताना आपल्या समशेरीची जरब चांगलीच दाखवली. अखेर उभयपक्षी समेट होऊन अक्लकोटकरांनी सन १८१९ च्या तहनाम्यातल्या जहागिरदारांविषयी ७व्या कलमाला बिनशर्त मान्यता दिली. या लढाईत महाराजांना एक लाख रुपये खर्च आला. तरीही आप्तपणा स्मरून अक्कलकोटकरांचा जिंकलेला तीन लाखांचा मुलूख त्यांचा त्यांना परत दिला. मात्र जहागिरीच्या कारभारावर देखरेख करण्यासाठी आले खास अधिकारी नेमले. या स्वारीमुळे अक्कलकोटकर महाराजावर कायमचे नाखूष झाले.

## अक्कलकोटलाही नातूचे एजंट

अक्कलकोटची स्वारी फत्ते करून महाराजांनी तेथल्या कारभारावर देखरेख करण्यासाठी आपले कारकून नेमले. याचे अक्कलकोटकर भोसल्यांना वैषम्य वाटणे सहाजिक होते. त्यांच्या तडफडाटाचा नातूने सोयिस्कर फायदा घ्यायला सोडले नाही. पुण्याच्या आंग्रेज अधिका-यांना त्याने कायदेबाज कानमंत्र दिला की, छत्रपतीची अक्कलकोटच्या जहागिरीवरची सत्ता तहनाम्याने आणि स्वारीने सिद्ध केली असली, तरी कंपनी सरकारने महाराजांच्या सर्व जहागिरदारांना तहनाम्याच्या ७व्या कलमाने 'बहलदारीचे(गॅरण्टीचे) आश्वासन दिलेले आहे. तेव्हा महाराजांच्या कारकुनांबरोबरच कपनी सरकारचेही काही कारकून अक्लकोटास ठेवणे शांततेच्या हेतूने अगत्याचे आहे. अधिका-यांना हा सल्ला पसंत पडताच, नातूने तात्काळ सातारा रेसिडेन्सीतले आपले पित्ते अक्कलोटास नेमून टाकले. त्यांनी नावे नि दरमहा पगार असे – आबा जोशी – रु. ११०, दाते रु. ११०, श्रीधरपंत रु. ५५, आणि शास्त्री रु. १३०, एकूण दरमहा रु. ४५० शिवाय या महाभागांच्या नि अक्कलकोटकरांच्या संरक्षणासाठी चारपाच संत्री ठेवले ते निराळेच. अशा रीतीने जत आणि भोर प्रमाणेच अक्कलकोट येथेही नातूने आपली कारस्थानी गिरमिटे सफीत स्थापन केली.

## 'साहेबासंगे मी विलायतेला येतो'

कारस्थानी लोक भ्याड असतात. इतरांचे गळे कापण्याची कर्मे ते जरी सफाईत उरकतात, तरी स्वतःच्या सुरक्षिततेविषयी ते नेहमी काळजीतच असतात. अनेक लांड्यालबाड्या करून बाळाजीपंत नातू स्वतः नि आपल्या हस्तकामार्फत, समोर दिसेल त्याला गंडवीत चालला होता, तरी त्याला स्वतःविषयी

असलेल्या लोकांच्या तिटका-याची पुरी जाणीव होती. त्याच्या स्वजनद्रोही खटाटोपांचा पुरस्कर्ता अलपिष्टन, जोवर तो होता, तोवर नातू निर्धास्त होता. पण तो जेव्हा मुंबईच्या गवर्नरीवरून स्वदेशी जाऊ लागला, तेव्हा नातूचा धीर सुटला. या पाचवडच्या भटाला रंकाचा राव केले अलपिष्टनाने. तोच त्याचा पुरस्कर्ता आश्रयदाता हिंदुस्थान सोडून कायमचा जाताना बिचा-या बाळाजीपंताची पाचावर धारण बसली. या विषयी प्रतापसिंहाने डायरीत नोंद केलेली आहे. ‘‘डाकतर (मिल्न) लिहितात की, अलपिष्टन गेले ते वेले बालाजीपंत नातू ब्राह्मण आसून बोलला, तुम्ही जाता. (माझे इकडे कसे होणार?) माझा दावा इकडील ब्राह्मण करितात. मग खातरी गवरनुरानी. तेव्हा राहिला. नाही तरी नातू (विलायतेला) जात होते.’’ सारांश, या बामणाला छत्रपति महाराजाप्रमाणेच ब्राह्मणही पक्के पाण्यात पहातात, एवढे मात्र आंग्रेजी अधिका-ऱ्याच्या लक्षात आले.

ता. ३१ आक्टोबर १८२७ ला लपिष्टनाने गवर्नरीचा चार्ज सोडला आणि त्याच्या जागी सर जॉन मालकम गवर्नर झाला. (ता. १-११-१८२७)

## प्रकरण १२ वे

## भटी वर्चस्वाचा ज्वालामुखी धुमसू लागला.

चालू घडीचा मामला धार्मिक, सामाजिक नि राजकीय बाबतीत व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि स्वयंनिर्णयाचा आहे. म-हाठ्यांची, विद्यमान तरुण पिढी तर देवाला नि धर्माला अफूच्या गोळयाच मानते.

धर्मावांचुनि प्राण न जाई, देवाविण नच अडते ।
आत्मशक्ति खंबीर तयाच्या त्रिभुवन पाया पडते ।।

याची त्यांना पुरी प्रतीति आलेली आहे. सामाजिक उच्चनीचतेच्या वादात सध्या सहसा कोणीच पडत नाही. पडलेच तर तेथे परस्परांत पायतणांचे पानपत थाटल्याशिवाय रहात नाही. ऐदी जीवनाच्या खेड्यांत भटाबामणांच्या सर्वांगीण श्रेष्ठत्वाची मिजास अझूनही थोडीबहुत चाललेली असली, तरी शिक्षणप्रसाराने मंतरलेली गावे नि शहरे येथे आब्राह्मण-चाण्डालादि अखिल हिंदू जनता, आंग्रेजांचे गुलाम म्हणून, शूद्रत्वाच्या नि क्षुद्रत्वाच्या एकाच पाट्यावरवंट्याखाली अभेदाने चिरडली जात आहे. [हे वर्तमान आता भूतकाळ बनले.] कजात शूद्रांनी गजबजलेल्या हिंदुस्थानावर इंग्रेज हे ब्राह्मण नि क्षत्रिय अधिकाराने मन मानेल ती पेशवाई गाजवीत आहेत. अशा अवस्थेतल्या अस्पृश्यांसह बामण बामणेतर हिंदू जनाना, पूर्वीच्या लोकांनी धर्माधिकाराच्या अट्टहासी आग्रहासाठी केलेल ग्रामण्यांचे तंटे म्हणजे पूर्वजांच्या मूर्खपणाची प्रदर्शनेच वाटणार. पण तुम्हा आम्हाला स्पष्ट पटणार मूर्खपणा एका काळी त्य पूर्वजांच्या सामाजिक इभ्रतीच्या जिव्हाळयाचा, म्हणूनच शहाणपणाचा, प्रश्न होता.

जुन्या इतिहासातल्या ग्रामण्यांच्या घटनांकडे आधुनिक विचारक्रांतीच्या चष्म्यातून पाहून निर्णय देणे सोपे असले, तरी ते न्यायीपणाचे होणार नाही. प्रत्येक कालखंडातल्या लोकांच्या आचार विचारांची मोजमाप तत्कालीन रूढी, समजुती, कल्पना, भावना आणि श्रद्धा यांनीच करावयाची असते. असे केले नाही तर शिवाजी सारख्या लोकोत्तर पराक्रमी पुरुषोत्तमालाही त्याच्या धार्मिक भावनांच्या हेक्यापायी नादान ठरवून सांदीला टाकण्याची आपत्ती टळत नाही. औरंगझीबासारख्या शतमुखी रावणालाही ज्याने नामोहरम करून
म-हाठ्यांचे स्वराज्य स्थापन केले, तो स्वतःला राज्याभिषेक करून घेण्यासाठी भटाबामणांच्या मिंथा करीत बसतो? या मुकाबल्याचा आपल्याला अर्थच लागणार नाही. महाराष्ट्रातील मराठे कायस्थादिकांचा जन्मजात क्षत्रियत्वाच्या अधिकाराचा अट्टहास आणि त्याला चित्पावन बामणांचा कस्सून विरोध, यात सामाजिक अन्यायाचे कोणते तत्त्व, धर्म म्हणून ब्राह्मण त्यांच्यावर लादीत होते, एवढेच इतिहासकाराने दाखवायचे आहे. आज विकास पावलेल्या कल्पनांशी त्याची तुलना करायची नसते. आज आम्हाला जी गोष्ट मूर्खपणाची वाटते, तिचा पुरस्कार करण्यात आमच्या पूर्वजांनी प्राणांतीचे झगडे केले. त्यात त्यांचा प्रामाणिकपणा किती होता, इतकेच पाहिले पाहिजे. **Son is wiser than the father** या सनातन नियमाप्रमाणे, आजच्या पिढीचेही आचारविचार पुढच्या पिढ्या टाकू नि नादान ठरवणारच. हा कालमाहात्म्याचा दण्डक नजरेपुढे ठेऊनच प्रतापसिंहाच्या वेळच्या क्षत्रिय ब्राह्मणांच्या झगड्यांकडे आपण पाहिले पाहिजे.

### शंकराचार्यांचा दरोडेखोर दौरा

सन १८२० साली संकेश्वरच्या मठाचे स्वामी संचारार्थ निघाले. त्यांचा परिवार मोठा. तसाच खर्चही दांडगा. शिवाय, स्वामीच्या छबिन्याबरोबर भटकले म्हणजे फुकट पुडीची चमचमीत सोय व्हायची, म्हणून शेकडो ऐतखाऊ भटे गावोगाव पेण्ढा-यासारखी चिकटलेली असायची. ज्या गावातून स्वामी जातील, तेथल्या नि आजूबाजूच्या गावातून रयतेने भरपूर दक्षणा दिली पाहिजे, अशी वहिवाट. दक्षणा भक्तिभावाच्या मापाने मोजून वसूल केली. तर स्वामीच्या लटांबराचा खर्च भागत नसे. तेव्हा राजकीय करवसुलीच्या दमदाटीने पैसा गोळया करण्यासाठी, रामोशी मांग बेरड वगैरे लोक पदरी ठेवून, लोकांवर बेशक जुलूम जबरदस्ती करण्यात येत असे. फार काय, पण दौरा व्हायच्या प्रदेशातल्या दक्षणेचे लिलावही स्वामी करीत असत. त्यामुळे शंकराचार्यांचा संचार म्हणजे रयतेला महामारीचा फेरा वाटायचा.

महाराजांच्या हद्दीत ठिकठिकाणी ही संभावीत धार्मिक लूटमार चालू झाल्याच्या रयतेच्या तक्रारी येताच, रसिदंट ग्रांटने प्रतापसिंहाच्या कानावर ही गोष्ट घातली. त्याने "लोकांकडून सक्तीने दक्षणावसुली करू नका. केल्यास आम्हाला त्याच दाद घेणे प्राप्त. मग अवमानाची जबाबदारी स्वामीवर." असा स्पष्ट हुकुमाचा खलिता स्वामीकडे पाठविला. आजवर काही राजाने शंकराचार्याला असा दणदणीत दम भरला नव्हता. स्वामी नि वती भवती असणा-या कारभा-यादि बामणांची माथी भडकून गेली. पण राजसत्तेपुढे करतात काय! दक्षणा देण्याबाबत दरबारची दौण्डी गावोगाव ठणाणल्यामुळे, रयतेनेही हात आखडता घेतला. अर्थात लिलाववावे हात चोळीत बसले!

स्वामीची स्वारी माहुलीला आली. स्वराज्यात शंकराचार्य आले म्हणजे आजवरचे छत्रपती त्यांना अगत्याने सामोरे जाऊन त्यांचा सत्कार करायचे आणि पायावर डोकी ठेवून आशीर्वाद मागायचे. चारपाच दिवस माहुलीला येऊन झाले तरी छत्रपति दर्शनाला येण्याचा काही रंग दिसे ना. तेव्हा धर्माधिकाराचा तोरा बाजूला ठेवून स्वामींनी "आपण सज्जनम हिंदू आहात, दर्शनास येऊन, राजधानीला येण्याच निमंत्रण द्यावे नि घेऊनही जावे." अशी चिठ्ठी पाठवली. स्वामीबरोबर नागो देवराव नावाचे एक वाईचे जडीबुट्टीचे धंदेबाज वैदुबुवा होते, ते चिठ्ठी घेऊन आले. जबाबाशिवाय हात हलवीत परत गेले. महाराजांनी आपली दखल घ्यावी, यासाठी स्वामींनी नि त्यांच्या सातारकर भट भगतानी खूप धडपड केली. वशिल्याचे सुरुंग लाऊन पाहिले. पय्रण व्यर्थ. अखेर शंकराचार्यच स्वतः उठून साता-याला आले आणि ठकारांच्या वाड्यात छावणीचा मुक्काम ठोकला. भटाबामणांच्या पाद्यपूजा होऊ लागल्या. महाराजांनी स्वामीकडे रोजच्या रोज शिध्याचे लागेल ते सामान बिनचूक पाठविण्याचा मात्र बंदोबस्त केला. या पाद्यपूजेत वेदोक्त नि पुराणोक्त असे भेद असत. ब्राह्मणांकडची पूजाच तेवढी वेदोक्त, बाकीची तमाम हिंदू जनता शूद्र. तेव्हा त्यांची पूजा पुराणोक्त.

'कलीत क्षत्रिय नाहीत,' तेव्हा कायस्थ प्रभू आणि मराठे हे क्षत्रिय नव्हत, या मुद्यावर नातू चिंतामणराव सांगलीवर, थत्ते प्रभृती चित्पावनांनी ग्रामण्यांचा जो ७-८ वर्षे धुडगूस घातला. त्याचा तपशील येथे देण्याचे कारण नाही. कारण या विषयावर स्वतंत्र पुस्तके प्रसिद्ध*१ झालेली आहेत. येथे फक्त धार्मिक मुखवट्याखालच्या राजकारणी चुरशीत चित्पावन आणि इतरांच्या झटापटी कशा झाल्या, एवढेच दाखविणार आहोत.

मराठे आणि कायस्थ प्रभू क्षत्रिय का शूद्र, हा वाद शिवाजीच्या वेळेपासून होता. प्रत्येक ग्रामण्याच्या वेळी शंकराचार्यासारख्यांनी ते 'ते क्षत्रिय' असे निर्णय दिलेले असूनही. वरचेवर या तंट्याचे मूळ उकरून काढण्याची भटांची खोड काल परवाच्या इतिहास संशोधक विश्वनाथपंत राजवाड्यापर्यंत सुटलेली नव्हती. स्वजातीचे वर्चस्व मिरवण्यासाठी प्रतिपक्षाला जेर करण्याचे मार्ग दोन (१) शरीरनाश आणि (२) नीच जातीत समावेश. ब्राह्मणांना पहिला मार्ग शक्यच नव्हता. तेव्हा धर्मनिर्णयाची निस्संदिग्ध सत्ता हाती असल्यामुळे, त्यांनी यच्चावत ब्राह्मणेतरांना उपनयनाचा नकार देऊन, कोट्यवधि क्षत्रियांची शूद्रत्वात हकालपट्टी केली. + म्हणजे, आत्मवर्चस्वासाठी ब्राह्मणांनी त्यांना शूद्र ठरविले, तरी क्षात्रकर्माची त्यांची परंपरा थांबली नाहीच. ती अखंड अविच्छिन्न आणि वंशपरंपरेने चालूच होती. शिवाजीचे कर्म जरी क्षत्रियाचे, तर भटांच्या जानव्यात वर्माने तो शूद्र. कारण भटांकडून त्याचा उपनयन संस्कार झालेला नव्हता. अ्थात् क्षत्रियाचे कर्म करीत असतानाही आम्हाला भटाबामणांनी शूद्र म्हणून हिणवावे, पराक्रमांनी आम्ही सर्वश्रेष्ठ असताही हिंदू समाज व्यवस्थेच्या खालच्या थरावर आम्हाला लेखावे, लौकिकात आमचा सामाजिक दर्जा क्षुद्र नि हिणकस ठरविण्याचा अट्टहास व्हावा, याची मानी क्षत्रियांना चीड येणे साहजिक होते. या चिडीतूनच ग्रामण्यांचे तंटे निघाले, हिंदू समाजसंघटनेचा बोजवारा डाला, आणि त्याच महापाप ब्राह्मण समाजांच्या माथ्यावर कायमचे बसले. ते चालू घडीलाही त्यांना निपटून

टाकता येत नाही. सध्या हिंदू संघटनाची मोठी हिरीरीची चळवळ चालू आहे. पण जोवर ती ब्राह्मण समाजातले महापाप लोक चालवीत आहेत, तोवर त्यांच्या हेतूंच्या शुद्धतेची काही ब्राह्मणेतराला कधीही खात्री पटायची नाही. ग्रामण्यांच्या धुडगुसाने हिंदू समाजात ब्राह्मणांनाच आज अस्पृश्यांप्रमाणे बाजूला निपटून पडण्याचा प्रसंग आलेला आहे.

शिवाजीच्या वेळी त्याच्या क्षत्रियत्वाला नि राज्याभिषेकाच्या योजनेला आक्षेप घेणारे ब्राह्मण देशस्थ होते. 'कलीत क्षत्रिय नाहीत.' या परंपरेने पढविलेल्या सूत्रावर त्यांचा प्रामाणिक विश्वास होता. त्यात राजकारणी नि स्वार्थी चुरस नव्हती असे मात्र नव्हे. शिवाजीने काशीहून गागाभट्टाला आणले, तरी त्यालाही साष्टांग थापटून थोपटून सरल करावा लागला. तेव्हा तो वैदिक राज्याभिषेकाला तयार झाला. प्रतापसिंहाच्या कारकीर्दीतल्या वादात भटांच्या धर्माभिमानापेक्षा, त्यांची राजाविषयी राजकारणी चुरस विशेष होती, हा मुद्दा लक्षात ठेवण्यासारखा आहे. पेशवी रसातळाला गेल्यामुळे, तमाम हिंदू समाजावर हिटलरशाही गाजविणारी आपली चित्पावनांची राजसत्ता आण राज्यसत्ता ठार झाली, आणि मराठ्या छत्रपतीचे राज्य मात्र टिकले, याचा चित्पावनामात्राला विषाद वाटून, संतापाने मस्तक भणाणावे, यात अनैसर्गिक असे काहीच नव्हते.

नानासाहेब पेशवा होईपर्यंत म-हाठी हिंदू समाजात चित्पावनांचे स्थान फार खालच्या दर्जाचे होते. जुने देशस्त क-हाड्यादि महाराष्ट्र ब्राह्मण त्यांना पंक्तीलाही घेत नसत. सत्तेच्या जोरावर नानासाहेबाने अनेक चित्पावनेतर ब्राह्मणांच्या मुलींशी विवाह करून आपल्या जातीला यच्चावत म-हाठी ब्राह्मणवर्गात सर्वश्रेष्ठत्वाचा दर्जा दिला. राज्यसत्ता हाती आल्यावर काय हवा तो चमत्कार घडवता येतो! पण या चमत्कारामुळेच इतर समाज चित्पावनांच्या धार्मिक नि सामाजिक शिरजोरीकडे चमत्कारिक नजरेने नि भावनेने पाहू लागले. आजी ब्राह्मण संघटनेचे खूळ निघाले आहे, तरी चित्पावनेतर ब्राह्मणसमाज चित्पावनांकडे तिरप्या नजरेने पाहून, त्यांच्या संबंधापासून चार हात दूर रहाण्याची लगबग कतात, हा चमत्कार विचार करण्यासारखा नाही का? आंग्रेज सत्तेविरुद्ध हिंदी लोकांच्या मनात जो कमाल कडवा तिटकारा निर्माण झालेला आहे, तितकाच प्रतापसिंहाच्या वेळी चित्पावनी सत्ता नि चित्पावन समाजाविषयी तमाम महाराष्ट्रात फैलावलेला होता.

सातारला आलेल्या संकेश्वरच्या शंकराचार्यांनी पूर्वापार चालत आलेल्या प्रघातानुरुप बळवंतराव मल्हार चिटणीसाच्या घरे वेदोक्त पाद्यपूजा घेतली आणि सहपरिवार भोजन केलेल पहाताच, बाळाजीपंत नातूने एकदम ग्रामण्याची चूड पेटविली. नागो देवरावाने वाईच्या भटांना चिथावून उठविले. निळकंठ शास्त्री थत्ते (नातूचा व्याही) याने सांगलीच्या चिंतामणराव पटर्धनाला भडकऊन उठवले. सातारा पुण्याकडला एकजात चित्पावन "धर्म बुडाला, ब्राह्मण्याचे शंकराचार्याने वाटोळे केले." अशा आरोळ्या मारीत सुटला. प्रतापसिंहाच्या दण्क्याला बाचकूनच या शूद्र प्रभूकडची पाद्यपूजा स्वामींनी घेतली, असा अर्थ बसवून, छत्रपति, चिटणीस, मराठे आणि कायस्थ प्रभू समाज यांना चित्पावन मंडळी राजरोस शिव्यागाळी करू लागली. बखरीच्या निमित्ताने ग्रांटने चिटणीसाला आपल्या रेसिडेन्सी कचेरीतच कामाला मागवून घेतले असल्यामुळे, तेथे रोजच्या रोज चिटणिसाच्या नि नातू, आबा जोशी, थत्ते यांच्या गरमागरम वादविवादाच्या कटकटी चालू झाल्या. इतक्यात ग्रांटची बदली झाली. तेव्हात्याने या कटकटींचा मूळ कलिपुरुष जो नातू, त्यालाही पुण्यास बदली करून नेले. अशाने तरी हा नसता वाद संपेल, अशी ग्रांटची आशा.

पण नातू पडला निश्चयाचा महामेरू. त्याने चिंतामणराव पटवर्धनाला 'श्रीमंताच्या मागे आता ब्राह्मण धर्माचे वाली आपणच.' असे महत्त्व देऊन उठवले. त्याने शंकराचार्याला पुण्याला बोलावून जाब विचारला. ३-४ वर्षे ग्रामण्याची मोठी दंगल उडाली. कायस्थ प्रभू आणि चित्पावन यांच्यात तोंडातोंडी, लेखालेखी आणि मारामारीसुद्धा अखंड चालली. चिंतामणराव इतकेच करून स्वस्थ बसला नाही. त्याने सांगलीला नवीन धर्मग्रंथ लिहून काढण्याचा एक कारखानाच काढला. शेकडो चित्पावन धर्मवीर 'लेखक' म्हणून खपू लागले. 'कायस्थ प्रभू हे व्यभिचारोत्पन्न शूद्राधम आहेत, मराठे शूद्र आहेत. प्रतापसिंह हा राजा हिंदूच नव्हे.' अशा संतापजनक शब्दांनी, बरबटलेले हजारो जाहीरनामे लिहून ते शेकडो गावांत ठळक ठिकाणी चिकटविण्याची आणि लोकांना मोठ्याने वाचून दाखविण्याची व्यवस्था केली. पुण्यात ग्रामण्याचा अखेर बोजवारा वाजला आणि शंकराचार्यांनी 'आपल्यावर नातू नि सांगलीकर यांनी बळजबरी करून त्यांना हवे ते लिहून घेतल्याची' घोषणा केली आणि कायस्थांच्या बाजूने निर्णय देऊन, नातू, थत्ते, जोशी कंपूला फजित केले. मग काय विचारता! आग्रही भटांच्या अंगाचा तिळपापड उडाला.

पुण्याचे राघवाचार्य शास्त्री प्रभूंच्या वतीने भांडत होते. त्यांनी चिंतामणरावाच्या (अ)धर्म ग्रंथलेखनाचा आणि खोडसाळ जाहीरनाम्यांचा निषेध करणारे सणसणीत पत्रक काढले आणि ते शंकराचार्याकडे आणि सर्वत्र पाठवून दिले. याच वेळी (डिसेंबर १८२६) आबा जोशी (रेसिडेन्सीतला कारकून) याने ब्रिग्जच्या कानाला या पत्रक प्रसाराचा विपर्यासी चावा घेतला आणि सांगितले की 'साता-याहून संकेश्वर, सांगली, कोल्हापूर इकडे काही मंडळींनी रात्रंदिवस सारखी जा ये चालू आहे. यावरून महाराज तिकडे काहीतरी गुप्त पत्रव्यवहार करून, तहनाम्याच्या कलमाचा भंग करीत सावे, तर याचा बंदोबस्त पहावा.' याच वेळी ब्रिग्जची बदली झाली आणि कर्नल रॉबर्टसन आला. ब्रिग्जला भटांच्या चळवळीचे मर्म माहीत होते. पण ते नव्या रॉबर्टसनला कशाने असणार? म्हणून आबा जोशीने तीच बातमी चांगली भरदार-तिखटमीठ लावून रॉबर्टसनला कळविली. ग्रामण्याने काही जमले नाही, तर राजकारणी कारस्थाने करून तरी प्रतापसिंहाला छळण्याचा नातू कंपूचा निर्धार दिसून आला.

कायस्थ प्रभूंचा स्वयंनिर्णय

"धार्मिक बाबतीत आमचे आम्ही मुखत्यार, अमुक करू नका नि तमुक करू नका सांगणारे हे ब्राह्मण कोण? आजवर चालत आल्याप्रमाणे उपनयन विवाह वगैरे विधि आमचे आम्ही वैदिक विधीने करणार. ब्राह्मणांची आम्हाला जरूर नाही." ? असा बळवंतराव मल्हारने निर्णय घेतला. स्वतः अग्निहोत्राची दीक्षा घेतली आणि ठिकठिकाणच्या जातिबांधवांनी ब्राह्मणांना बहिष्कार घालून, स्वतः वैदिक तीन कर्मे करावी, अशी पत्रे रवाना केली. पुणे, सातारा येथे ग्रामण्याच्या दंगलीमुळे खोळंबलेली शेकडो लग्ने नि मुंजी कायस्थ प्रभू आचार्यांनी स्वतः लावल्या. हे तर आगीतच तेल पडले! काही ब्राह्मणांनी याद्दल महाराजाकडे तक्रार केली. 'जातिधर्मात ज्याचे ते मुखत्यार' असा त्यांनी स्पष्ट जबाब दिला. महाराजांच्या पाठबळावरच ही कायस्थे मगरूर झाली आहेत, तेव्हा या छत्रपतीचाच काटा काढल्याशिवाय ब्राह्मण्य नि ब्राह्मण यांचा तरणोपाय नाही, असा निर्धार नातूकंपूने केला. सांगलीकर चिंतामणरावाने अस्तन्या वर सारल्या. जुन्या ग्रंथांत खोडाखोड, घालघुसड, नवीन स्मृती लिहिणे, कायस्थ, मराठे, जिनगर, सोनार इत्यादींना शूद्रातिशूद्र ठरविणारे जाहीरनामे गावोगाव फैलावणे, वगैरे कामे जोरात चाललीच होती.

गवर्नरच्या छावणीवर भटांचा मोर्चा

१८२७ ऑक्टोबर अखेर एलफिन्स्टन आणि सर जॉन मालकम मुंबईचा गवर्नर झाला. तो साता-यास महाराजांच्या भेटीला येणार, याच बातमी ठेवून सातारा, सांगली, वाई वगैरे आपल्या खटपटींच्या केंद्रांच्या ठिकाणी नातूने भडाभड पत्रे रवाना केली आणि कळविले का, 'आपला सांगलीच्या ग्रंथाचा खटाटोप आपल्याच अंगावर आला. शंकराचार्य स्वामीने तोंडघशी पाडले, असो. लवकरच मुंबईचे मुख्य साता-यास येणार आहेत. या संधीत वाई वगैरे समस्त ठिकाणी हजार दोन हजार ब्राह्मण मंडळी जमवून, साहेबाच्या छावणीला वेढा द्यावा, 'शूद्रधर्म परभू'ने अग्निहोत्र घेतले, महाराजाच्या पुस्तपन्यामुळे असे होत आहे, महाराज ब्राह्मणांची दाद घेत नाहीत, आमचा सारखा छळ चालला आहे. साहेब बहादुरांनी बंदोबस्त करावा, अशी फिर्याद साहेबापुढे मांडा.' हा येक बेत. दुसरा मनसुबा, ब्राह्मणांनी जमा होऊन सदरी लिहिल्याप्रमाणे वागणुकेचे साहेबाचे जाहिरण्यात आणून आपले वाड्यावर (कोणाच्या? महाराजाच्या का चिटणिसाच्या?) चालून घेऊन मारामारी करून अबरू घ्यावी, त्यांत जे जाया होतील ते होतील, असाही निग्रह करावा.*२"

नातूच्या या पत्राने वाई, सांगली, सातारा, पुणे येथील भटसेना पळ्या पंचपात्री खडबडवीत थरारून उठली. मालकम साहेबाचा मुकाम कोरेगाव तालुक्यातल्या तांदुळवाडी गावी आल्याचे समजताच, चिंतामणराव सांगलीकराच्या पुढारपणाखाली, १० हजार ब्राह्मणांचा जमाव मोठमोठ्याने आरडाओरडा आक्रोश करीत छावणीच्या तंबूला गराडा देऊन उभा राहिला. त्यावेळी मालकमला भेटायला गेलेला रसिदंट रॉबर्टसनही तेथे होता. बाहेर भटांच्या घोषवाक्यांचा गोंगाट चालला असताना, रॉबर्टसनने या भटी चळवळीचा इत्यर्थ थोडक्यात मालकमला सांगितला. मालकमच्या हुज-याने बाहेर येऊन, 'तुमच्या चारपाच पुढा-यांना साहेब आत बोलावताहेत' असे सांगितल्यावरून चिंतामणराव, थत्ते, भडकमकर, आबा जोशी वगैरे महात्मे आत गेले. तावातावाने हातवारे करून ते म्हणाले - "साहेब, तुमच्या राज्यात आम्हा ब्राह्मणांचा धर्म उच्छेद होऊ लागला. कोणी शास्ताच उरला नाही. ते परभूलोक! अहो, ते शूद्र! ते खुशाल वैदिक पद्धतीने धर्मकृत्ये करताहेत, मुंजी लावताहेत. स्वतः अग्निहोत्र घेताहेत, आणि तो राजा प्रतापसिंह त्यांना फूस देत आहे. आमचे श्रीमंत होते तोवर असे करण्याची परभांची छातीच नव्हती. साहेब

बहादुरांनी तातडीने बंदोबस्त केला नाही, तर ब्राह्मणधर्म रसातळाला जाणार आणि त्याचे खापर तुमच्या माथ्यावर फुटणार.''

मालकम –राजा प्रतापसिंह धर्माभिमानी हिंदू आहे. त्याच्याकडे जा.

एक पुढारी –जो ब्राह्मणांचा धर्म जुमानीत नाही तो कसचा हिंदू? तो आहे शूद्र. शूद्राला ब्राह्मणांची काय पर्वा? आणि ब्राह्मण धर्माविषयी निर्णय देण्याचा त्या शूद्राला अधिकार तरी काय? जागोजाग हा मराठा शूद्र राजा आम्हा ब्राह्मणांचा छळ करीत आहे. साहेबानीच आमचा बंदोबस्त केला पाहिजे.

मालकम –हिंदूंच्या धर्माच्या भानगडीत आम्ही इंग्रजलोक हात घालणार नाही, असा आमचा जाहीरनामा तुम्हाला माहीत आहे ना? शिवाय आम्हाला तुमच्या धर्मातले काय समजते? राजा प्रतापसिंहाकडे जायचे नसेल तर पंडितांच्या लवादापुढे जा. चले जाव यहांसे.

काय आश्चर्य आहे पहा. प्रतापसिंह 'शूद्र' म्हणून त्याला ब्राह्मणी धर्मात निर्णय देण्याचा अधिकार नाही, असे म्हणणारे हे वेदाभिमानी शहाणे 'न हिंदुर्नयवन' अशा आंग्रेजांकडे धर्मनिर्णय मागतात! पण आश्चर्य ते कशाचे? त्यांना धर्म निर्णय नकोच होता. कसेही करून कायस्थ प्रभूंच्या पक्षपाती छत्रपतीला गोत्यात आणायचा होता. मुंबई, कलकत्ता विलायतेच्या अधिका-यांच्या गौरवाला पात्र झालेल्या प्रतापसिंहाला नि त्याच्या सिंहासनाला उखडून टाकायचा त्यांचा हेतू होता. ५०-६० वर्षांपूर्वी दक्षिणी हिंदूंच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ज्यांना कसलेच निश्चित स्थान नव्हते आणि देशस्थ, क-हाड्यांदि महाराष्ट्र ब्राह्मणांच्या पंक्तीला बसण्याची ज्यांची पात्रता नव्हती, त्या चित्पावनांनी इरसाल ब्राह्मण्याचा एवढा दिमाख मिरवावा या दांभिकपणागील त्यांच्या कपटनीतीचा त्या वेळी कोणालाच थांग लागला नाही.

रेसिडंट रॉबर्टसन काही वर्षांनी विलायतेस गेल्यावर कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचा मेम्बर झाला. रंगो बापूजी प्रतापसिंहाचा कज्जा तेथे लढवीत असता, बोर्डापुढे ता. १६ जुलै १८४१ रोजी याच भटी मोर्चाचा संदर्भ दर्शवून रॉबर्टसन म्हणाला –This shows that the Brahmins had been even gone so far as to declare that he was no Hindoo and Chintaman Row of Sanghli, a neighouring Brahmin chief, had circulated a manifesto all over Hindostan, saying that he was and enemy to the national faith.*३

(भावार्थ –यावरून असे दिसून येईल की राजाचा सर्वस्वी घात करण्याच्या कामात ब्राह्मणांचे प्रयत्न जारी चालू होते. फार काय पण, 'हा राजा हिंदूच नव्हे' असे प्रतिपादन करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. आणि शेजारचा ब्राह्मण जहागीरदार सांगलीचा चिंतामणराव याने तर सगळया हिंदुस्थानभर एक जाहीरनामा काढून पुकारा केला की 'हा राजा (प्रतापसिंह) राष्ट्रीय धर्माचा वैरी आहे.) जनरल रॉबर्टसन पुढे म्हणाला, - This was not the first time that the Brahmins had made similar attempts to procure the interference of the British government…….. I have been thus particular in regard to this case, as it displays how little the parties regarded truth, when the object was to injure or annoy the Raja.

(भावार्थ –ब्रिटीश सरकारने मध्यस्थी करावी म्हणून कोलाहल करण्याचा ब्राह्मणांचा हा काही पहिलाच प्रयत्न नव्हे. या खटल्यात मी विशेष लक्ष देऊन पाहिले आणि ज्याअर्थी त्या ब्राह्मणांचा उद्देश राजाला पाय करणे, निदान त्याला चिडविणे हा होता, त्यार्थी त्यांच्या पक्षाला सत्याची कितपत चाड आहे, ते दिसतच आहे.)

मालकमने मोर्चावाल्या १० हजार भटांना वाटाण्याच्या अक्षता लावून परतवले. पण, साहेबाकडे आपली खिचडी शिजली नाही म्हणून हताश होणारे ते वीर नव्हते. चिंतामणराव पटनर्धन त्यांचे 'नवे श्रीमंत' आमि बाळाजीपंत नातू 'नाना फडणवीस'. एकापरिस एक मसलती! त्यांनी अखेर थेट प्रतापसिंहाच्या देवधरावर हल्ला चढविण्याचा मनसुबा केला.

देवळात देवी नि गावभर नायटे

नातू-सांगलीकर-संप्रदायी ग्रामण्या भटांचा धुडगूस केवळ छत्रपती नि कायस्थ प्रभूंपुरताच नव्हता. त्याची झळ गावोगावच्या शेकडो बामणेतरांना आणि चित्पावन बामणांनाही लागली होती. मुंबईच विख्यात नगरनायक श्रीमंत जगन्नाथ शंकरशेठ हे वाईला तीर्थयात्रेसाठी आले असताना, तेथल्या भटांनी वेदोक्त मंत्रांनी कृष्णास्नान करण्याची त्यांना मनाई केली. शंकरशेटनी ता. १९ डिसेंबर १८२६ रोजी पत्र पाठवून प्रतापसिंह महाराजांकडे तक्रार केली.त्यांनी ताबडतोब चौकशी करून, गुन्हेगार भटांना धरून

आणवले आणि अपराधाबद्दल दंड केला. शंकरशेटना योग्य त्या शास्त्रीमंडळीचे सहाय देऊन, त्यांचे कृष्णास्नान पार पाडले. झाले, ब्रह्ममुखोत्पन्न भटांना राजा दंड करतो म्हणजे काय? सर्वत्र हाहाकार उडाला! धर्मच बुडाला!

## प्रकरण १३ वे

## प्रतापसिंहाचे ब्राह्मणांना आव्हान

### हे असे का झाले?

राष्ट्राला स्वास्थ्य नि शांती मिळाली, त्याचा मुलुखगिरीचा बाहेरचा व्याप बंद पडला, आपले घर, शेतवाडी, धंदा बरा की आपण बरे असली संकुचित संसारी स्थिती आली, म्हणजे समाजनीति, धर्म, देवदेवळे, रूढी यांचे पोकळ थेर माजविण्याचे उपद्व्याप लोकांना सुचतात. शहरांपेक्षा गावात नि गावांपेक्षा खेड्यात कज्जे, तंटे भांडणे, फिर्यादाआर्यादी यांचा धुमाकूळ फार जोरात चालतो. कारण, तेथल्या लोकांना फुरसद फार आणि उद्योग काहीच नाही. कंपनी सरकारने महाराष्ट्राच्या राजकारणाचा संसार आटोपल्यावर, आमची मुलुखगिरी कायमची बंद पडली. ठरावीक तारखेला पगार घेऊन निवांतपणाने संसार करणा-या नोकरमान्यांचा वर्ग वाढत गेला. सदानकदा ज्या म-हाठ्या जवानांची घोड्यावर मांड, कंबरेला तलवार, पाठीवर ढाल नि हाता भाला, ते सारे आता घरोघर माशा मारीत बसले. ब्राह्मण, मराठे, कायस्थ प्रभू तमाम एकूणेक समाजांतले असामी आता आपल्या पायापुरते पाहू लागले. त्यांची जेतृत्वाची भावना नि स्वराज्याचा अभिमान नाहीसा झाला. म्हणून ते सारे समाजसुधारणेच्या, वर्चस्व-स्थापनेच्या आणि धर्माधिकार-शोधनाच्या ऐदी फंदांत पडले. तू थोर का मी थोर? वेदोक्ताचा अधिकार मला का नसावा? तू कोण टिकोजी मला तो नाकारणार? ब्राह्मण जर ब्रह्मदेवाच्या तोंडापासून आपली उत्पत्ती सांगतात, तर आम्ही मराठे थेट चंद्र सूर्याच्या रेताचे अस्सल वंशज! मराठे मंडळी तर सप्त कुळी नि शहाण्णव कुळयांच्या वादातच रंगले. कायस्थ प्रभूंची हीच अवस्था. जोवर मुलूखगिरी, लढाया, राजकारणे त्यांच्या मागे अखंड लागलेली होती, तोवर आपण क्षत्रिय का शूद्र याचा शोध घेण्याची त्यांना शुद्धही नव्हती. पण तो व्याप खलास झाल्यावर, क्षत्रियत्वाच्या आज्ञापत्रांसाठी शंकराचार्यांच्या नि शास्त्रीपंडितांच्या खडावांवर लाखो रुपयाचे शेण ते थापू लागले. त्यांना घरेदारे, शेतवाड्या इनाम देऊ लागले.

### मराठामंडळ खडबडले

चित्पावन आणि कायस्थ प्रभूंच्या ग्रामण्याच्या तंट्यात, ब्राह्मणांनी “कलींत क्षत्रिय नाहीत.” या मुद्यावर विशेष जोर दिला आणि त्याचा सगळीकडे जोराने पुकाराही केला. साता-याचे ब्राह्मणांनी तर राजवाड्यातल्या पुजारी भटांना वेदोक्त पूजाअर्चा नि विधी करण्याची सक्त मनाई केली. मराठे लोकांनीही आपल्या पंचांच्या सभा भरवून, महाराजांकडे तक्रारी नेल्या की ‘कलीत क्षत्रिय नाहीत’ ही ब्राह्मणांची घोषणा आम्हाला बदनामीकारक वाटते. सरकारने त्याचा बंदोबस्त करावा. वेदोक्तबंदींची घोरपड आपल्या देवघरातच घुसल्यामुळे, प्रतापसिंहाने हा वाद धसाला लावण्यासाठी कंबर कसली. राज्यकारभाराची व्यवस्था आता सुरळीत लागली होती. ग्रांट आणि ब्रिग्ज या दोन रसिदंटांचे थेट बोर्डापर्यंत अनुकूल अभिप्राय गेले होते. तेव्हा छत्रपतीसकट अखिल मराठ्यांना ‘शूद्र’ म्हणून हिणविणा-या भटाबामणांची खोड मोडण्याचा प्रतापसिंहाने निश्चय केला. यासाठी तंजावर, म्हैसूर, कोल्हापूर, नागपूर आणि विशेषतः उदेपूर येथील आपल्या नातलग (?) राजघराण्यात कोणत्या पद्धतीने धर्माचार होतात, याच चौकशी करण्यासाठी रसिदंटामार्फत पत्रे रवाना केली. उदेपूरच्या राजघराण्याशी भोसल्यांच्या घराण्याचा वांशिक संबंध*१ जोडण्याचे काम शिवाजीनेच करून ठेवलेले होते. त्याचे जुने कागदपत्र आता दप्तरातून बाहेर काढण्यात आले.

प्रतापसिंहाचा हा खटाटोप चालला असतानाच, चिंतामणराव सांगलीकराने शूद्रत्वाला संमति देणा-या शिवाजी संभाजी शाहू यांच्या बनावट कैफियती तयार करून त्यांचा गवगवा सगळीकडे केला. बनावट बखरी, याद्या पत्रे नि शंकराचार्यांची आज्ञापत्रे यांची भेण्डोळीच्या भेण्डोळी पटवर्धन फॅक्टरीतून बाहेर पडू लागली. खोटे शिक्के करणारे ब्राह्मण कारागीरही शेण्ड्या झटकून पुढे सरसावले. प्रतापसिंहाच्या उच्चाटनासाठी पुढे या कारागिरांचा फार उपयोग झाला. शिवाय रसिदंटाच्या हापीसात बसून, पुण्याहून येतील त्या नातूच्या सूचना नि इषारे लक्षात घेऊन, त्याप्रमाणे राजाला राजकारणी पेचात पकडण्याच्या कारवाया करणारे जोशी, भडकमकर, किबे मंडळ डोळयात तेल घालून किटाळे निर्माण करण्यात गढलेले होतेच.

अखिल भारतीय पंडितांची सभा.

प्रतापसिंहाच्या संग्रही मराठ्यांच्या क्षत्रियत्वाचा पुरस्कार करणारे कागदपत्र कितीही असले, आणि त्यांच्या जोडीला उदेपुरादि ठिकाणाहून वैदिक आचारांची परंपरा सिद्ध करणारे आणखी कितीही रूमाल आले, तरी पिसाटाप्रमाणे खवळलेल्या दक्षिणी ब्राह्मणांची समजूत तेवढ्याने होणे शक्य नाही, असा पुरा विचार करून, प्रतापसिंहाने अखिल भारतीय शास्त्री पंडितांची एक महासभा वादग्रस्त मुद्यांचा अखेर जाहीर निर्णय देण्यासाठी बोलावण्याचा बेत केला. रसिदंटाच्या सल्ल्याने सगळीकडे मोठमोठ्या पंडितांना निमंत्रणे गेली. तुमचेही कोणकोण शास्त्री पंडित बोलवायचे असतील ते बोलवा, पंडितांची महासभा जो निर्णय देईल तो दोघा पक्षांनी बिनशर्त मान्य करावा, असे महाराजांनी ब्राह्मणांना कळविले. निमंत्रणाच्या पत्रासोबत एक सूचनाही सर्वांना पाठविण्यात आली, ती अशी –

> ‘‘शास्त्री मंडळापैकी शास्त्र जाणत्यास कोणी शास्त्रनिर्णय विचारिला आसता येथार्थ सांगावा. लोभाने किंवा भयाने किंवा पुसणाराचे मर्जीनुरूप सांगू नये. ज्या जातीस जे विहित व बहुत ग्रंथाची संमते असा सांगावा व याप्रमाणे आपण पाहून दुसरे विद्वानाचे सभेत घ्यावे. या उपर विपरीत शास्त्रार्थ सांगितला आसता त्यास निर्णयाचे सभेत बोलाऊ नये व त्याचा शास्त्रार्थ ऐकू नये. असे लोकाची सरकार गरज ठेवणार नाही. याप्रमाणे जाहीरनामा करविला. ब्राह्मणाने दहशत व भय [बाळगू नये.] महाराजाची मरजी जाईल असे सांगणारे लबाड फितूर [त्यांचे ऐकू नये.]’’

अखेर महासभेचा दिवस उजाडला. [सन १८३०] आनेगोंदी, अरणी संस्थान, चांद्रायणपट्टण, म्हैसूर, तंजावर, तोलवदेश, चरकल संस्थान, कोच्ची, वेंकीपूर, विद्यानगर आणि महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणांहून शेकडो शास्त्री पंडित सातारला आले. पक्षभेद मनात न आणता महाराजांनी दोहीकडच्या पाहुण्यांची यथायोग्य सरबराई ठेवली. यापूर्वी साता-यात एवढी मोठी धर्मनिर्णय परिषद कधीच भरली नव्हती. ती पहाण्यासाठी गावोगावचे हजारो लोक आहे. मराठा क्षत्रियांतर्फे विठ्ठल सखाराम ऊर्फ आबा पारसनीस या चांद्रश्रेणीय कायस्थ प्रभू शास्त्र्याची वादासाठी प्रमुख म्हणून नेमणूक झाली. आबा पारसनीस हे फारशीत तर निपुण होतेच, पण संस्कृतातही पारंगत होते. त्यांचे दोन शास्त्रांचे अध्ययनही झालेले होते. कायस्थ प्रभूंना शूद्र ठरविणा-या ब्राह्मण पक्षाने पारसनीसाच्या नेमणुकीला आक्षेप घेतला नाही, कारण पारसनीसांची शास्त्री म्हणून कीर्ती चांगलीच झालेली होती. म्हणून जमलेल्या सर्व पंडितांनी त्यांचे स्वागत केले. विरुद्ध पक्षाने वेदशास्त्रसंपन्न राघवाचार्य गजेन्द्रगडकर या अत्यंत विद्वान पंडिताला आपल्यातर्फे उभे केले. साता-याच्या संस्कृत पाठशाळेत दोघा पक्षांचा वाद लेखी पद्धतीने कित्येक दिवस चालला. रोज पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन वाद सारखा रंगत होता.

शेवटी दोनही बाजू विचारात घेऊन पंच आपला निकाल देणार तो दिवस उजाडला. प्रेक्षकांची पाठशाळेजवळ तोबा गर्दी उडाली. पुण्यापासून बेळगावपर्यंतचे हजारो ब्राह्मण निकाल ऐकण्यासाठी आले होते. आपल्या विरुद्ध निकाल देणारांची साधल्यास डोकी फोडून सूड घेण्याची विद्या भटाभिक्षुकांना चांगली अवगत असल्यामुळे, आणि अलिकडे नातूकंपूच्या तथा चिथावण्याही असल्याचे महाराजांना समजल्यावरून, महाराज स्वतः नागव्या तरवारीने पाठशाळेच्या पुढे बंदोबस्तासाठी फिरत होते. बळवंतराव सेनापति आपली निवडक फौज घेऊन बंदोबस्ताला उभा होताच. शिवाय रसिदंट रॉबर्टसन यानेही आपले ट्रुप्स रेसिडेन्सीजवळ तयारीत ठेवले होते. सरतेशेवटी, पंचानी मराठे क्षत्रिय आहेत असा २४ सिद्धांताचा निकाल जाहीर केला आणि आबा पारसनीसांच्या पांडित्याची मोठा वाहवा कली. त्यांतले फक्त ९ निवडक सिद्धांत येथे देतो –

(1) श्रीपरशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला तरी केव्हाही क्षत्रियांचा अभाव झाला नाही.
(2) ज्या क्षत्रियांचा परशुरामाने वध केला नाही,त्यांचे वैदिक कर्म त्याने सोडविले नाही.
(3) नन्दानंतर क्षत्रियांचे अस्तित्व होते.
(4) सुमित्रानंतर क्षत्रियांचे अस्तित्व होते.
(5) राज्यकर्ता जो राजा त्यास वैदिक मंत्रांनी राज्याभिषेक होतो. सबब त्याने तेवढे वैदिक कर्म करावे व इतर क्षत्रियांनी करू नये, असे नाही. तर कोणत्याही क्षत्रियांस वैदिककर्म विहित आहे.

(6) सातारा, चंदी (तंजावर), नागपूर व करवीर येथील राजघराण्याचे मूळ एक असून, यांचेकडे ऋग्वेदावरून कर्म चालते. चंदीस अग्नि सिद्ध असून, स्वतः राजे [शिवाजीमहाराज] ब्राह्मणांस अग्नौकरण देतात व शास्त्राध्ययन करितात. करवीरही वेदोक्तकर्म चालत आहे.

(7) नर्मदेपलिकडे क्षत्रियांकडे यजुर्वेदावरून कर्म चालते. उदेपुरास अशीच वहिवाट आहे. साताऱ्यास यजुर्वेदी कर्म महाराजांनी सुरू करावे.

(8) क्षत्रियांस मातुलकन्या विवाह वर्ज्य नाही.

(9) क्षत्रियांस स्वज्ञातीत एकपात्री भोजन करण्याची चाल आहे, तरी वैदिक कर्मास बाध येत नाही.

या निर्णयपत्रकावर दोनही पक्षातल्या मिळून १९ पंचांच्या सह्या होऊन ही महासभा बरखास्त झाली.

महासभेने निर्णय दिला. तरी तेवढ्याने 'जे का स्वार्थ परार्थ हानी करण्यास' का पायावर उभे अशा नातू सांगलीवर प्रभृति 'दुर्मति' बामणांची समजूत होणेच शक्य नव्हते. एकट्या धार्मिक कोलदांड्याने काम होत नाहीसे पाहून, त्यांनी आता राजकारणी कटबाजी रचण्याचा बेत केला. खरे पाहिले तर ब्राह्मणांचे धर्मविषयक आक्षेप केव्हाही प्रामाणिक नव्हते. आज नाहीत नि पुढे असणे शक्य नाही. धर्माच्या कळकळीपेक्षा प्रतिपक्षाला समाजाच्या समोर हिणकस क्षुद्र ठरवून, राजकीय क्षेत्रातही त्यांना नालायक ठरविण्याची तळमळ विशेष असते. हे साधण्यासाठी ग्रामण्याचे हत्यार ब्राह्मणांनी पूर्वी मनमुराद वापरले. सध्या ब्राह्मण्याला जुन्या बाजारातही कोणी हाती धरीत नाही, तर ग्रामण्य ही चीज काय, यांची कोण चौकशी करतो?

प्रतापसिंहाची जाति-सुधारणा

महासभेच्या निर्णयाने प्रतापसिंह एकदम शेफारला. त्याला आपल्या भोसले घराण्याची प्रतिष्ठा अतोनात वाटू लागली. उदेपूरकरानी 'आम्ही तुम्ही एक' असा निर्वाळा दिल्यामुळे, स्वतःच्या नावामागे तो 'सिसोदे राजे भोसले' असे नवे पालुपद जोडू लागला. तमाम मराठ्यांना त्याने क्षत्रिय ठरवून घेतले, तरी शिंदे, गायकवाड आणि अक्कलकोटकर यांना तो कमी लेखण्याचा अट्टहास करू लागला. तो त्यांना 'कुणबी' म्हणू लागला.

''आलीकडे कुणबी वगैरे पैकेकरी होऊन या ज्ञातीत फितूर करून बाटवितात. (सोयरिका करतात) हे जहाल्यास धर्म राहणार नाही.... हिंदुस्थानात सिंदे वगैरे कुणबी लोक आहेत त्यास ताकीद जाली पाहिजे... गायकवाडाची सोयरीक करू तर कासीत मात्रागमन केल्याचे पातक.'' असे त्याचे विचार भडकू लागले. त्यामुळे, मराठा मराठ्यांत वितुष्टाचे विष पसरू लागले. प्रतापसिंहाने कुणबी ठरविलेल्या मराठ्यांशी सोयरीक करणारावर तो बहिष्काराचा जाहीर पुकारा करू लागला. उदेपूरकरांविषयी त्याला इतका काही पान्हा फुटला की आपली एकुलती एक मुलगी गोजराबाई हिला तिकडचा रजपूत वर शोधण्यासाठी आणि तिकडच्या मुली इकडच्या मराठा युवकांना लग्नात देण्याच्या खटपटीसाठी त्याने हजारो रुपये खर्चून अनेक शास्त्र्यांना रजपुतान्यात रवाना केले. फार काय, पण वरनिश्चिती होण्याच्या पूर्वीच त्याने गोजराबाईच्या लग्नात कोणकोणाला काय काय आहेर द्यायचे, कोणाला निमंत्रणे पाठवायची, पाहुण्यांची सरबराई कशी ठेवायची, कोण कोण साहेबांना खास निमंत्रणे पाठवायची, याच्या तपशीलवार याद्याही तयार केल्या. ''या देशचे ब्राह्मणाचा द्वेष कर्माविषयी आहे.'' म्हणून उदेपूर कर्नाटकातून ब्राह्मण आणविण्याच्या यातायाती तो करू लागला. सारांश, ज्ञातिसुधारणेच्या बाबतीत प्रतापसिंह अलिकडच्या अफगाणिस्तानच्या अमानुल्लासारखा बेफाम भडकत जाऊ लागला. स्वकुळाची थोरवी अट्टाहासाने गाजवू वाजवू लागल्यामुळे, बाकीच्या मराठ्यांना त्याच्याविषयी आदर वाटेनासा झाला. ते त्याचा मनातल्या मनात तिटकारा करू लागले. एकदा एक कछवा क्षत्रिय प्रतापसिंहाच्या भेटीला आला. तो गायकवाडाकडे नोकरीला होता. आधी तो त्याची भेटच घेई ना. पुढे भेट घेतली तेव्हा त्या कछव्याने सांगितले, ''आमचे घराण्यापैकी कोणी पुरुष चाकरी करिता कोठेही गेला तरी सातारा महाराज किंवा उदेपूर राणाजी किंवा कछवा राजा या तिहीखेरीज कोठेही मुजरा जमिनीस हात लावून करावयाचा नाही आसा शिरस्ता आहे व घराण्यातील हुकूमही आहे. मी गायकवाडापासी चाकरीस आहे, परंतु ते कुणबी लोक, सबब रामराम मात्र करितो, मुजरा करीत नाही. आम्हास या लोकांनी लाखो रुपये दिले तरी यांची सोयरीक करणार नाही, व याणी आम्हा लोकांची मुलगी मागितली आसता तरवारीसी प्रसंग पडेल. सरकारची व आमची ज्ञात एकच आहे.'' इतके सांगताच सिसोदे राजे भोसले प्रतापसिंह महाराज त्याच्यावर निहायत खूष झाले. त्याला नि

त्याच्या बरोबर आलेल्या इसमाला शेला, पागोटे नि पंचवीस रुपये इनाम दिले. गायकवाडाच्या पदरचा कोण कुठला एक शिपायी, पण त्यालासुद्धा छत्रपति मुलाखत देतो नि त्याच्या सन्मान करतो आणि आम्हा जवळच्या मराठे बांधवांना कुणबी लेखतो. या बातम्या बाहेर फैलावताच अक्कलकोटकर भोसले, गायकवाड, शिंदे वगैरे मंडळी प्रतापसिंहाचा द्वेष करू लागल्यास नवल नाही. अनेक खटपटी केल्या तरी गोजराबाईजोगा वर उदेपूरच्या युवकसंग्रहात मिळे ना. तेव्हा १० डिसेंबर १८३४ रोजी तिचा विवाह यशवंतराव गुजर याशी सातारा येथे थाटात साजरा केला.

या असल्या भानगडीत प्रतापसिंहाचे लक्ष लागल्यामुळे आणि त्याच्या आजूबाजूचे दिवाण फडणीस चिटणीसादि कारभारी त्याच फंदात गर्क झाल्यामुळे, आपल्या विरुद्ध बाहेर कसकसल्या कारस्थानांच्या हण्ड्या उकडल्या जात आहेत, याची कोणालाच दाद लागली नाही. १८३२ च्या जानेवारीत रसिदंट रॉबर्टसन गेला आणि त्याच्या जागी कर्नल लॉडविक आला.

## प्रकरण १४ वे

### नातूकंपूच्या कारस्थानांची उभारणी.

सन १८३२च्या जानेवारीत लॉडविक साता-याला रेसिदंट आला आणि मार्चात लॉर्ड क्लेअर मुंबईचा गवर्नर झाला. या वेळी पुण्याच्या दप्तरात बाळाजीपंत नातूचा भाव फार वधारलेला होता. मुंबईच्या कौंसिलात गवर्ननराचे जे गोरे सल्लागार होते, ते कट्टे साम्राज्यवादी पिंडाचे. नातू सांगलीकर मंडळी धार्मिक चढाईच्या बाबतीत पराभूत झाल्यामुळे, त्यांच्या संतापाचा पार विवेकाची नळी फोडून बाहेर पडला. प्रतापसिंहाला राजकारणी चापात चेचण्याचा त्यांनी व्यूह रचला. नातूने मुंबईकर गो-या सल्लागारांना भेटून, त्यांना छत्रपतिविरुद्ध चिथावले. 'जत आणि सचीव या दोन निपुत्रिक जहागिरदारांना दत्तक घेण्याची परवानगी छत्रपति देत नाही, यात त्याचा हेतू त्या जहागि-या आपल्या राज्याला जोडून घेण्याचा आहे. अशा सगळ्या जहागि-या साता-याला जोडल्या गेल्या, तर थोड्याच दिवसांत हा राजा आंग्रेजांना भारी होईल. तहनाम्याचे कलम संदिग्ध आहे. जहागिरदारांवर आपली हुकमत, हा राजाने बसलेला अर्थ चुकीचा आहे.' वगैरे चिथावण्या देऊन, नातूने त्यांना रसिदंटाकडे तहनाम्याच्या मुद्याविषयी खुलासा मागविण्यास लावले, लाडविकने सारे कागदपत्र पाहिले, ग्रांट आणि अलपिष्टन यांच्या वेळच्या वहिवाटीच्या नोंदी तपासल्या आणि महाराजांचाही विचार घेतला. 'जहागिरदार हे महाराजांचे कदीम पूर्वीपासनचे मांडलीक, त्यांवर सत्ता महाराजांची,' असा लाडविकने जबाब पाठविला. गवर्नरचे सेक्रेटरी नि सल्लागार यांनी त्यावर विरुद्ध मत देऊन, जहागिरदारांविषयी तहनाम्याचा कलमाचा असा अर्थ लागणेच शक्य नाही, तसा तो लावूच नये, असा अभिप्राय देऊन प्रकरण खास क्लेअर गवर्नरपुढे ठेवले. हे बडेलाट म्हणजे शुद्ध सह्याजीराव असतात. सल्लागार नि सेक्रेटरी सांगतील ते त्यांना डोळे मिटून संमत. विशेष खोल पाण्यात जायची त्यांना जरूरच काय? गवर्नरने प्रकरणावर 'याऽ स' म्हणून सही ठोकली आणि प्रकरण परत साता-याला आहे.

### छत्रपति आणि आंग्रेज यांची भिन्न मनोवृत्ति.

या ठिकाणी आपल्याला प्रतापसिंह आणि आंग्रेज अधिकारी यांच्या मनोरचनेतला फरक लक्षात घेणे अगत्याचे आहे. प्रतापसिंहाला वाटे, आपल्या पूर्वजांनी कमावलेल्या अफाट राज्यातला एक थोडकासा तुकडाच आपल्याला लाभला. अलपिष्टनादि मंडळींनी थातरमातर करून वचनभंग केला. आंग्रेजांना वाटे की आम्ही प्रतापसिंहाला नवीन राज्य दिले. आंगठाच दाखवला असता तर हा काय करता? अर्थात आमचे त्याच्यावर उपकार आहेत. प्रतापसिंहाला वाटायचे की चला, तुकडा तर तुकडा. पण आता पूर्वजांसारखा काहीतरी पराक्रम करावा, म-हाठी राज्य राखावे, धर्म वाढवावा, नावलौकीक करावा, शक्य तर राज्यही वाढवावे. पण पुढे पुढे पहातो तो आपल्या जहागीरदारांप्रमाणेच कंपनी सरकार आपल्यालाही ताटाखालच्या मांजरापेक्षा अधिक लेखीत नाही, असे त्याला दिसल्यामुळे, तो मनातल्या मनात चडफरडू लागला. ग्रांट, ब्रिग्ज, रॉबर्टसन सारखे रसिदंट आणि अलपिष्टन मालकमसारखे सभ्य नि कनवाळ गवर्नर राजाच्य पूर्व खानदानीला नि वैभवाला जाणून, त्याच्याशी मित्रत्वाने वागत. त्याचा नेहमी गौरव करून त्याला संतुष्ट ठेवीत. पण त्यांच्यामागून जी विलायती मंडळी कारभारावर आली, त्यांना, हे मरगठ्याचे राज्य निर्माण करण्याच चूक झाली, आयता सबंध सलग प्रदेश कंपनीच्या हातात आला असता, पूर्वीच्या कच्च्या दिलाच्या अलपिष्टनादिकांनी उगाच हातचा सोडला. आता तो कायमचा खालसाच केला पाहिजे, असे वाटू लागले. तशाच नातूसारख्याची चिथावणी नि टुमण्या त्यांच्यामागे सारख्या चालू.

जहागिरदारांविषयी तहनाम्याचे कलम सरळ नि उघड असता, त्यावर ता गवर्नरानेच आक्षेप घ्यावा, तेव्हा काय करायचे? म्हणून महाराजांनी डायरेक्टर बोर्डाकडे या वांध्यांचे अपील करण्याची गवर्नरकडे परवानगी मागितली. नशीब की लॉर्ड क्लेअरने ती परवानगी दिली आणि त्याच्यामार्फत राजाचे अपील विलायतेला रवाना झाले.

डायरेक्टर बोर्डाचा प्रतापसिंहाविषयी फार अनुकूल अभिप्राय असल्यामुळे, त्यांनी जहागीरदारांवरील त्याचे मांडलिकत्व निस्संदिग्ध ठरवून, तसा जबाब मुंबईला पाठवला. पण जबाब इकडे आला नि क्लेअर गवर्नर बदलून त्याच्या जागी सर रॉबर्ट ग्रांट झाला. (मार्च १८३५) अर्थात बोर्डाचा जबाब तसाच पडून राहिला मुंबईच्या कचेरीत फायल्यांच्या ढिगाराखाली. आपल्या अभिप्रायाला धुडकावणारा जबाब सेक्रेटरी नि सल्लागार कशाला उजेडात आणतील? तशात त्यांचे कान चावणारा नातू पुण्याहून मुंबईला सारखा खेटे घालीतच होता. क्लेअरच्या अमदानीत नातूने मुंबई सरकारच्य खास कारभा-यांवर आले वजन चांगलेच प्रस्थापित करून ठेवले होते. नातू म्हणेल ते बिनबोभाट होत असे. हा गवगवा चोहीकडे फैलावताच, राज्यक्रांतीच्या काळात ज्यांची नुकसानी झालेली होती, असे लोक नातूच्या वाड्यात गर्दी करू लागले. तो मागेल तितका पैसा त्याला देऊन, आमचे एवढ काम करून द्या, असे सांगू लागले. नातूचे ग्रह या वेळी कमाल उच्चीचे असल्यामुळे, मागल्या पुढल्या दरवाजानी लक्ष्मी त्याच्य घरात घिसाडघाईने घुसू लागली. मुंबईचे सेक्रेटरी नि सल्ल्गार, बोर्डाच्या निर्णयामुळे प्रतापसिंहावर दातओठ खाऊ लागले. नातूकूटाचा श्रीगणेशा.

राजाविरुद्ध गवर्नराच्या कचेरीला बगलेच मारूनच नातू थांबला नाही. आंग्रेजांविरुद्ध फितूर केल्याच्या आरोपाखाली प्रतापसिंहाला चेचण्याचा त्याने मोठा गुप्तकट तयार केला. या कटात हजारो ब्राह्मणपुत्र पैसे चारून त्याने कामाला लावले. याची पहिली चुणूक म्हणजे हरि त्रिंबकपंत नावाच्या एका इसमाचे प्रतापसिंहाच्या नावाने मुंबईहून आलेले पत्र मासलेवाईक आहे. प्रतापसिंहाने त्यातला इसील ता. १३-१०-१८३४ च्य डायरीत लिहिला तो असा –

"अदालतीचे साहेबाबरोबर कोल्हापुरास आमची रवानगी जाली. तेथून परत आल्यावर गवरनर दापोडीस आले. सबब तसेच पुढे गेलो तो आज्ञा जाली की इंदूर देसी जावे. ते समयी बहूत येत्न केला की राजश्री बालासाहेब भोसले व गोविंदराव दिवाण किंवा रवलोजी लिंगोजी कासकर यातून कोणाची तरी येकांती भेट होईल. त्याजपासी नवल विषेश समजाऊ. त्याद्वारे माहाराजास निवेदन होईल. परंतु भेटीचा योग आला नाही. आणि अदालतीची मंडळी निकडीने बानकोटास गेली तेथे फुरसत पाहून हे पत्र लिहिले आहे. त्यास हलीचे कायदे विदितच असतील. हे पत्र येकांती आपण उभेयता व बाळासाहेब पाहून मनास आल्यास येत्न त्वरेने करावा तरी पुढ बहुत उपयोगी पडेल. त्यास मुंबईत डाकतर इसमिटण सो। आहेत, त्यांचा अत्यंत स्नेह करून घेणे.पत्री लिहितो त्याप्रमाणे साध्य करून घेणे. तो मजकूर रघुनाथ राम जोसी वैद्य हे साहेबाचे कारभारी लोभातील आहेत, याचे हातून परिस्फुट न होता कार्य होईल. त्यास सरकारनी येक पत्रसाहेबास पाठवावे की तुमचे कारभारी याचे कारण आहे. त्यास साता-यास पाठवावे. यात वर्कड आदालतीचे साहेबाचे वगैरे इष्टत्व आनायास होईल. वैद्य यास कोलापुरकर छत्रपति नेणार. त्याचे पूर्वी मुदाम कारकून पाठवावा. हा उद्योग कोणासच कळू नये. आपले बुधीनेच लि। (लिहिले) म्हमून पत्र लिहावे. याप्र। सरकारचे नावे पत्र, व सेनापतीचे नावे लि। (लिहावे) त्यात की बुवासाहेब [प्रतापसिंहाला बुवासाहेब असे म्हणत असत.] माहाराज याचे पत्र तुमचे लाखोट्यात भिडले ते येकांती महाराजस उभय बंधूस समजाऊन त्वरेने करून घ्यावे व गोविंदराव दिवाण यास नमस्कार सांगावा."

कोण कुठला हरि त्रिंबकपंत आणि तो महाराजांना हे गुप्त पत्र पाठवतो! राजकारणाचा गुप्त, अगदी जिव्हाळ्याचा सल्ला देतो! अशा पत्रांचा हेतू काय, हे खुलाशाने सांगायला नकोच. प्रतापसिंहाने ते पत्र बाळासाहेब सेनापतीच्या हस्ते रसिदंट लाडवीककडे पाठवून दिले. आता प्रतापसिंहाला समजून आले की आपल्याला खाड्यात घालण्याच्या कारवाया कोठेतरी शिजत आहेत.

इंग्रेज तितुका साम्राज्यवादी

सर रॉबर्ट ग्रांट या घुम्या, खट्याळ नि दुष्ट गवर्नराच्या नावानेच मुंबईचे ग्रांट मेडिकल कॉलेज स्थापन झालेले आहे. याचा जन्म हिंदुस्थानातच सन १७७९ साली झाला.
१८३५ च्या मार्चात तो मुंबईचा गवर्नर झाला. ९ जुलई १८३८ रोजी पुण्यानजीक दापोडीला मेला. त्याचे प्रेत पुण्याच्या सेण्ट मेरी चर्चाच्या आवारात पुरले. सर ग्रांट मोठे पापभीरू, सात्विक, देवधर्मनिष्ठ, अशी ख्याती होती. याने रचलेली अनेक कवने इंग्लंडच्या चर्चांतून मोठ्ये भावीकपणे गाईली जात असत.

असल्या या सोवळ्या नि कर्मठ गवर्नराने, तितक्याच देवभोळ्या नि सात्विक प्रतापसिंहाचा अमानुष छळ करून त्याला माणसांतून कसे उठवले, हे आपल्याला आता पहायचे आहे. साम्राज्यवर्धनाचा प्रश्न आला का आंग्रेजलोक देव, धर्म, न्याय, नीती, फार काय पण माणुसकीसुद्धा चर्चच्या तक्तपोशीला कशी टांगून ठेवतात, हे या सर ग्रांटाच्या उदाहरणाने पटण्यासारखे आहे.

**नातूने गवर्नरला डागळले.**

सर रॉबर्ट ग्रांट मुंबईला येताच. कौन्सिलरांच्या वशिल्याने नातूने त्याची खास भेट घेऊन, प्रतापसिंहाविषयी सगळ्या भानगडींचा पाढ वाचला आणि त्याच्या मनात राजाविषयी तिटकारा पेरला. जत, भोरचे सचीव आणि अक्कलकोट या जहागि-यात राजाने नजराणे वसूल करण्यात फार जुलूम जबरदस्ती चालविल्यामुळे, ते बिचारे जहागीरदार खंगणीला लागले आहेत. त्यांना आंग्रेज बहादुरांशिवाय कोणाचा आता आधार, वगैरे सांगून नातूने सर ग्रांटला कट्टा छत्रपतिद्वेष्टा बनवून ठेवले.

दोन महिन्यांनी रिवाजाप्रमाणे सर ग्रांट गवर्नर महाबळेस्वराला हवा पालटायला मे (१८३५) महिन्यात आले. शिरस्त्याप्रमाणे प्रतापसिंह रसिदंटासह लवाजम्यानिशी गवर्नराच्या भेटीला गेला. साधू महात्म्याच्या आविर्भावाने सर ग्रांटने महाराजांची मुलाखत घेतली. जहागीरदारांसंबंधी तहनाम्याचे कलम नि आजवरचा रिवाज याचे महाराजांनी स्पष्टीकरण केले आणि डायरेक्टर बोर्डाचा निर्णय मागविला आहे तो लवकर आणविण्याची लाटसाहेबानी तजवीज करावी अशी विनंती केली. सर ग्रांटाने मोठ्या सहानुभूतीचा आव आणून, बोर्डाला स्मरणपत्र पाठविण्याची लाडवीकला सूचना केली. लाडविकने तेथल्या तेथेच खलिता तयार करून गवर्नरच्या हातात दिला. त्या बेट्याला नि प्रतापसिंहाला काय माहीत की बोर्डाचा महाराजाला आलेला अनुकूळ निर्णयाचा खलिता संभाषणाच्या वेळी सर ग्रांटच्या खिशातच होता ते! शिरस्त्याप्रमाणे साता-याला भेट द्यावी अशी गवर्नरला विनंती करून प्रतापसिंह परतला. सर ग्रांटाने ‘येतो’ म्हणून आश्वासन दिले, पण तसे काहीही न करता तो तडक महाबळेश्वराहून मुंबईला परत गेला. राजधानीला परतभेट न देणारा हा पहिलाच गवर्नर. प्रतापसिंहाला फार वाईट वाटले. त्याची सारी तयारी नि खर्च पाण्यात गेला.

**डायरेक्टर बोर्डाची प्रतापसिंहाला देणगी.**

पापग्रह नातूने मुंबईचे सेक्रेटरिअट जरी छत्रपतिद्वेषाने भारून ठेवले होते, तरी लंडनच्या डायरेक्टर बोर्डाला प्रतापसिंहाविषयी मोठा अभिमान नि कौतुक वाटत होते. त्यांनी तीन हजार रुपये किंमतीची एक रत्नजडीत तरवार आणि सोबत गौरवाचे एक पत्र, मुंबई सरकारच्या मार्फत, प्रतापसिंहाला ता. २९ डिसेंबर १८३५ रोजी पाठविले. नातूच्या चिथावणीने प्रतापसिंहाला उखडण्याचे पद्धतीर बातबेत मुंबईला शिजत असतानाच, डायरेक्टर बोर्डाचे हे पत्र आणि ती तलवार आलेली पाहून, सर ग्रांटचा सात्विक आत्मा तळमळला, त्याने ते पत्र नि तलवार तशीच दाबून ठेवण्याचा हुकूम दिला.

**प्रतापसिंहाने पेचात धरले**

१८३६चा मे महिना उजाडला. एक वर्ष होऊन गेले तरी आल्या अपिलाचा बोर्डाकडून निकाल येईना, याचे प्रतापसिंहाला आश्चर्य वाटू लागले. नेहमीप्रमाणे सर ग्रांट महाबळेश्वरला आला. महाराजांनी भेट घेऊन स्पष्ट विचारले की, ‘आज दोनतीन वर्षे जहागीरदारांचे प्रकरण कुझत पडले आहे. गुदस्त साली आपणही बोर्डाला स्मरणपत्रे पाठविले. तरीही काही जबाब नाही. मुंबई सरकारचे यात काही वळत नसल्यास, मला कलकत्त्याच्या बडेलाटाकडे किंवा थेट लंडनला वकील पाठवून, शहानिशा करून घेतली पाहिजे.’ प्रतापसिंह निकरावर आलेला पाहून सर ग्रांटची पाचावर धारण बसली. कलकत्ता लंडन याने काही लिहिले अथवा वकील पाठविले, तर त्यात मुंबईकरांचा खोडसाळपणा तेव्हाच सिद्ध होणार आणि आपल्यावरही वरिष्ठांचा ठपका येमार. कदाचित गवर्नरीही जाणार. सर ग्रांटने सारवासारवीची उत्तरे देऊन प्रतापसिंहाला तातपुरता बनवण्याचा प्रयत्न केला. या वेळीही साताराला भेट देतो असे वचन देऊनही सर ग्रांट परस्परा मुंबईला निघून गेला.

आता मात्र प्रतापसिंह आपल्या परिस्थितीचा कस्सून विचार करू लागला. पण त्याला काय माहीत की हा विचार होईपर्यंत नातूकंपूच्या राजकारणी गुप्तकटाच्या वाळवी खुद्द त्याचा राजवाडा पोखरीत होत्या! तशात, ता. ४ सप्टेंबर १८२५ रोजी मुंबई सरकारने हुकूम काढून, पुण्याचा दफ्तरखाना तेथल्या प्रतिष्ठित नागरिकांच्या कौन्सिलखाली देऊन, बाळाजीपंत नातूला ‘प्रधान अमानतदार’ या हुद्याने त्या कौन्सिलचा अधिपती बनविले होते. अर्थात दक्षिणेतल्या अनेक सरदार दरकदारांचा तो मोठा वशिलेश्वरच झाला. मुंबई ते पुणे, पुणे ते सातारा, हवा तेथे हवेसारखा नातू थाटामाटात दौरे काढू लागला. असली

मोकळीक मिळाल्यावर त्याने महाराजांविरुद्ध महाराष्ट्रव्यापी कारस्थानाचा उपद्व्याप केला नसता तर तो नातू कसचा!

यदाकदाचित प्रतापसिंहाने कलकत्ता किंवा लंडन, अथवा दोन्हीही ठिकाणी पत्रे अगर वकील पाठविले, तर मुंबई सरकार नि गवर्नर यांना दोन्हीही वरिष्ठांक्रडून दोष देण्यात येईल. याची गवर्नरच्या बंगल्यावर चर्चा चालली असताना, नातूने तहनाम्याच्या पांचव्या कलमावर बोट ठेऊन, स्पष्ट खुलासा केला की, 'राजाने अशी काही हालचाल केली पुरे, का त्याचे राजेपण कंपनी सरकारला एका क्षणात काढून टाकता येईल. जहागिरदारांविषयी ७व्या कलमाचा जर आपल्याला हवा तसा अर्थ ठरवता आला, तर ५६वे कलम म्हणजे राजाच्या डोईवर केसाने टांगलेली तरवार आहे. केस तोडला की झाले काम.' गवर्नरादि गो-या महादेवांनी नातूच्या बुद्धिमत्तेची टाळया वाजवून वहावा केली.

सातारा पुण्याची ब्राह्मण-संघटना

प्रतापसिंहावर राजकीय फितुरीचा आरोप लावण्यासाठी आणि नाना त-हेच्या कुभांडांच्या अफवा फैलावण्यासाठी, नातूने आपल्या हस्तकांमार्फत महाराष्ट्रातली बहुतेक ब्राह्मणांची घरे आणि पोरे कामाला लावली. तरुण पाठशाळया पोरांपासून तो भिक्षुकीवर संसारगाडे रेटणा-या भिकंभट धोंडभटांपर्यंत यच्चावत ब्राह्मण नातूच्या या ब्राह्मण संघटनेत सामील झाले. अमक्या तमक्या कारस्थानाची बित्तमबातमी मला आहे, साहेब अमुक हजार रुपये देतील तर मी त्या कारस्थानाचे अस्सल दस्तऐवज मिळवून देतो, अशा थापा लष्करातल्या गो-या हापसरांना मारून, पैसे उकळण्याचा ब्राह्मण तरुणांनी एक राजरोस धंदाच चालविला होता. जेथे कंपनीच्या सैन्याचा तळ पडत असे. (आणि
साता-याला तर रेसिडेन्सीच होती.) तेथे काही ब्राह्मण तरुण इंग्रजी बोलायला शिकण्याच्या निमित्ताने जा ये करीत असत. तेथल्या गो-या हापसरांचा साधारण परिचय होताच – आणि ओळख नसताही कोणाशीही घसट पाडण्याच्या कलेत भट जात्याच मोठा चिकट – ते त्यांना राजधानीतल्या नि राजवाड्यातल्या ख-या खोट्या गोष्टी तिखटमीठ लावून सांगत असत. कंपनीच्या सैन्यात आणि कचे-यांतही अचाट बुद्धी चालवून बळेच लक्ष्मी मिळवण्याचा उपद्व्याप करणारे ऊर्ध्व महत्त्वाकांक्षी टॉमीलोक पुष्कळ असत. जात्याच ते चौकस. शिवाय त्यांना मराठी भाषा समजण्याची पंचाईत पजायची. म्हणून इंग्रजीच्या मोबदल्यात ते या जवान भटांकडून मराठी शिकत असत. हिंदु राजाच्या घरातला एकादा नाजूक भेद या बामणांच्या पोरांकडून समजला नि तो आपण वरिष्ठांना कळवला तर बढती नि बक्षिस मिळण्याची मोठी आशा. इंग्रजी, मराठी भाषेची ही संभावित देवघेव म्हणजे छत्रपतिवरुद्ध वाटेल त्य कागाळया नि कुभांडे आंग्रेजी छावण्यांत फैलावण्याचे तारायंत्रच बनले. प्रधान अमानतदार नातूच या तारायंत्राचा पुरस्कर्ता असल्यामुळे, आडज्युटंट कॅपटनचसे काय, पण स्वतः रेसिदंटसुद्धा या थापाड्या भटपुत्रांच्या कच्छपी लागले.

गवर्नरकडे नातूच्या कागाळया

कौन्सिलर आणि नातू आता एकजीव नि एकजिव्ह झाल्यामुळे, ते गवर्नरकडे प्रतापसिंहाविरुद्ध वाटेल त्या नालस्तीच्या बातम्या सांगू लागले. "प्रतापसिंहाला वेड लागले आहे. हिंदुस्थानचे मालक नि अधिपती कुंफणी सरकार बहादूर असता, हा वेडा राजा स्वतःला छत्रपति, हिंदुपदपातशहा, क्षत्रियकुलावंतस म्हणवितो. वेडाच्या भरात आपल्या नि इतर नातेवाईक मराठ्यांच्या तरण्याताठ्या पोरींना बेधडक लोकांसमक्ष घोड्यांवर बसायला लावतो. नेम मारणे, तोफा डागणे, भाला फेकणे असली मर्दानी कामे त्या पोरींना शिकवतो. मरगठ्ठ्यांच्या पोरांना आजवर कधी कोणी संस्कृत शिकताना पाहिले आहे? आता ती कारटी खुशाल वेदवाक्यांचा घोष करतात! त्या परभुटल्यांना तर काय तो वेडापीर डोक्यावर घेऊन नाचतो आहे." इत्यादि नि वगैरे हजार नालिस्त्या नातू गवर्नरासमोर रोजच्या रोज करीत असे. इतकेही करून तो थांबला नाही, तर खुद्द मुंबईचे लाट नातूच्या पक्षाला सामील झाले असून, महाराजावर गवर्नराची तराजी झालेली आहे, अशा गप्पा पुणे ते बेळगावच्या वातावरणात त्याने फैलावल्या. अर्थात लोकांवरही या गप्पांचे विपरित परिणाम झाले. प्रतापसिंहाला उखडण्यासाठी, ब्राह्मण संघटना करूनच नातू स्वस्थ बसला नाही. तर त्याने राजाचा पाठचा भाऊ दुर्व्यसनी आप्पासाहेब यालाही आपल्या कटात सामील करून घेतला. खुद्द राजाचा भाऊ राजाच्य विरुद्ध हातबोटे चोळू लागला. त्याच्यावर नाही नाही ते घाणेरडे आरोप करू लागला.

'नूसपेपरात गैरवाका मजकूर'

त्या वेळी वर्तमानपत्रे नुकतीच कोठे निघू लागली होती. लोकांनाही त्यांचा मोठा बागुलबोवा वाटायचा. या तंत्राचाही नातूकंपूने उपयोग करून घ्यायला सोडले नाही. बाबाजी सुभेदार नावाच्या एका इसमाने प्रतापसिंहाच्या विरुद्ध एका वर्तमानपत्रात खोडसाळ माहिती छापली. त्याचा अर्थात महाराष्ट्रभर मोठा गवगवा झाला. रसिदंट लाडविकने महाराजांची भेट घेऊन ''मनात काही वाकडे आणू नये. कारण नूसपेपरवाल्याची चाल की कोणी काही छापविले तरी छ्यापीत असतात. त्याप्रमाणे खरे मानू होते आसे नाही.'' असे सांगितले. त्यावर महाराज म्हणाले - ''त्याचे शुभ व अशुभ या दोहीचेही मनात आणणे गरज नाही. आपली चाल नीट असून दुस-याने वाईट म्हणाल्यास ते मनास आणावयाची गरज काय? इकडे काहीएक मनात नाही.''

पापग्रह नातू – सचिवाची युती.

छत्रपतीला खाड्यात घालण्याच्या कारस्थानात, नातू सांगलीकराच्या जोडीने नि तंत्राने, भोरच्या पंतसचिवानेही आपल्या दुष्टाव्याची कमाल केली. प्रतापसिंहाविरुद्ध मुंबईच्या गवर्नरला भडकवण्याच्या कामी चित्पावन नातूने हे सचिवाचे देशस्थ पत्र फार चातुर्याने हालवले. जहागिरदार हे छत्रपतीचे मांडलीक, हा मुद्दा अनेक वेळा हडसून खडसून ठरला गेला, तरी तो सपशेल अमान करण्याच्या चिथावण्या नातूने पंताला दिल्या नि त्याच्याबाजूने मुंबई सरकारला उठवले. चिमणाजी मेल्यावर त्याचा दत्तक रघुनाथ याचे नि त्याच्या दत्तक आईचे वाकडे आले. ती भानगड प्रतापसिंहाने मिटवली. तरीही एका बाजूने भवानीबाईला चिथावण्याची आणि दुसरीकडून रघुनाथपंताला नाना प्रकारच्या भानगडीत खेचून कर्जबाजारी करण्याची नातूने शिकस्त केली. जहागीर कर्जबाजारी झाली तर तिचा कारभार आपल्या हाती घेण्याचा अधिकार छत्रपतीचा होता. रामराव डफळयांच्या जतेचा कारभार असाच प्रतापसिंहाने हाती घेऊन थोड्याच वर्षांत ती जहागीर कर्जमुक्त करून दाखविली होती. याबद्दल ता. ३१-१२-१८३१ च्या पत्रात कर्नल रॉबर्टसनने मुंबईला लिहिले होते की 'जो डफळे पूर्वी महाराजाच्या नावाने हातबोटे चोळीत होता. तोच आता महाराजाचा मोठ्यातला मोठा स्तुतिपाठक बनला आहे!' अक्कलकोटचाही असाच बंदोबस्त केला होता. निंबाळकर जहागीरही महाराजांनी सुधारली होती. पण भोरच्या सचिवाला नातूशनि चिकटल्यामुळे, प्रतापसिंहाने तिकडे फारसे लक्ष दिले नाही. वास्तविक नजराण्याबाबत नि दत्तकाच्या परवान्याबाबत प्रतापसिंहाने सचिवाला ऐसपैस सवलती दिल्या. हे मुंबई सरकारलाही माहीत होते आणि त्याबद्दल त्यांनी महाराजांना धन्यवादही दिले होते. पण रघुनाथपंताचा कृतघ्नपणा और होता! तो मुळी छत्रपतीच्या स्वामित्वालाच कबूल नव्हता.

नातूच्या नादाने पंत कर्जाच्या खाड्यात आकंठ बुडाला. तशात त्याच्या हद्दीत उमाजी नायकाचे बंड चालू झाले. अनेक दरोडेखोर टोळया रत्नागिरी, पुणे वगैरे आसपासच्या मुलखात दरोडे घालीत आणि सचिवाच्या हद्दीत पळून जात. पुण्याच्या सुभ्याने किंवा रत्नागिरीच्या कलेक्टराने आरोपींची मागणी केली तर सचिव दाद घेत नसे. याचा बंदोबस्त करावा म्हणून कंपनी सरकारचा सुभा रॉबिन्सन याने रसिदंटामार्फत महाराजाकडे अनेक वेळा लिहिले आणि महाराजांनीही सचिवाला कडक हुकूम पाठविले. या पत्रापत्रीला लागायचा वेळ आणि बंडाचा धिंगाणा तर सारखा जोराने चालू. तेव्हा सचिवाशी परस्पर बोलणीचालणी करण्याची परवानगी रॉबिन्सनने मागितली आणि प्रतापसिंहाने कार्याचे महत्त्व जाणून ती दिली. परस्पर पत्रव्यवहाराच्या या खास सवलतीच्या परवानगीवर मुंबई सरकारने ''सचिवावर हुकमत कंपनी सरकारची, छत्रपतीची नाही.'' असा अर्थ बसवून चांगलाच अनर्थ केला. आ 'इंटरप्रिटेशन' अशी धोकेबाज असतात.

पंतसचिवाला अडीच तीन लाखांचे कर्ज झाले होते. रसिदंटाच्या इषा-यांना धाब्यावर बसवून, नातूने पंताला कर्ज मिळवून दिले आणि त्याचा मोबदला निरा नदीच्या उत्तरेकडचा त्याचा मुलूख स्वतःच्या वहिवाटीला लाऊन घेतला. इकडे मुंबई सरकारला 'हा मुलूख केव्हाही सरकारच्या हद्दीला जोडता येईल.' असी थाप मारली आणि तिकडे पंताला चिथाऊन सरदारांच्या एजंट कचेरीकडे अर्ज करायला लावले की 'मी तर कर्जबाजारी नि छत्रपति नजराण्यासाठी तगादा करतात, त्यांची नजराण्याची अट कायमची उडवून द्यावी.' परइलाख्यात कर्ज काढू नये, असा २ मार्च १८३४चा महाराजांचा सचिवाला खलिता गेला, तेव्हा त्या कृतघ्न भटाने जबाब दिला की 'आम्ही कोणत्या इलाख्यातले हे समजले पाहिजे.' या उत्तराने रसिदंट आणि महाराज दोघेही संतापले. प्रकरण विकोपाला जाऊ नये म्हणून नातू येथेही आडवा पडला आणि 'पंताने गैरसमजुतीने तसे लिहिले, महाराजांनी क्षमा करावी नि ते पत्र माझ्या हवाली करावे.' अशी याचना केली. मागू तेव्हा बिनशर्त हजर केले पाहिजे, अशा अटीवर महाराजांनी ते पत्र

नातूला दिले. सारांश, नातूच्या कारस्थानांच्या अनेकमुखी उभारणीला आणि अखेर छत्रपतीचा नि रंगो बापूजीचाही घात करायला भोरचा पंतसचीव प्रामुख्याने कारण झाला.

प्रकरण ३ रे
टीप *१ – माहुलीला जाताना 'हरवलेली' आंगठी ती हीच. चिटणिसाला गुप्तपणाने ती देण्यासाठी प्रतापसिंहाने नरसू काकड्याच्या हवाली ती करून, हरवल्याचा बोभाटा केल्याचे दिसते.
टीप *२ – पेशव्यानी वाघ्याचे पागे बनवलेल्या यच्चयावत चित्पावन सरदारात, धन्यासाठी नि रियासतीसाठी समरांगणावर वीरोचित प्राणार्पण करणारा फक्त एकटा बापू गोखला! बाकीच्या संधिसाधूंची आज संस्थाने आहेत. गोखल्यांचे वंशज साधेसुधे नागरिक.
टीप *३ – प्रतापसिंहाच्या या वेळच्या आविर्भावाचे कर्नल प्रिंग्ले याने पुढे २० वर्षांनी (म्हणजे महाराजांवर कंपनी सरकारने बालंटे आणल्यावर) किती मार्मिक नि यथार्थ वर्ण केले. ते पहा - ''Before me was a youth, with calm brow and resolved mind, submitting to be cut down by the men of the $22^{nd}$ Dragoons, in preference to the dishonour of relinquishing his sword. When I saved him I felt that such s spirit could never descend to any of the meanness and follies with which he has since been charged.'' (भावार्थ) माझ्या समोर निश्चळ भुवयांनी आपल्या धीरगंभीर व-त्तीचा निश्चय व्यक्त करणारा एक तरुण उभा होता, आपल्या हातातली तलवार टाकण्याचा अपमान सहन करण्यापेक्षा बेहत्तर आहे, आमच्या २२ व्या ड्रॅगून पलटणीशी दोन हात करून शरिराचे तुकडे तुकडे झालेले काय वाईट, असा त्याचा निर्धार मला स्पष्ट दिसत होता. आज त्याच महाराजांवर जी घाणेरडी कुभांडे रचण्यात आली आहेत, तितका मनाचा नीचपणा किंवा मूर्खपणा त्याच्या हातून होणेच शक्य नाही. असे त्याला वाचवताना माझा जो ग्रह झाला, तो अद्यापि कायम आहे.

प्रकरण ७ वे
टीप *१ – अव्वल इंग्रजीतील सामाजिक, धार्मिक नि राजकीय घडामोडींचा संपूर्ण तपशील प्रतापसिंहाच्या या डायरीत पहायला मिळतो. पेशवे दफ्तर ४२ वे पुस्तक मुद्दाम पहावे.
टीप *२ – चित्रापावनांचा हा तुसडा स्वभाव आजही होता तसाच कायम आहे. एकाद्या हापीसात एक चित्पावन घुसला पुरे, का थोड्याच दिवसांत ते सगळे हापीस चित्पावनमय होऊन जाते आणि ते बाकीच्यांना सारखे पाण्यात पहातात. हा देखावा आजही सर्वत्र पहाण्यात येतो. सार्वजनिक हितवादाची पुराणे झोडणा-या
कै. टिळकांच्या केसरी पत्राच्या कचेरीत एकजात एकरकमी चित्पावन पराची पाखरे असतात, हे महाराष्ट्राबाहेर फारसे कोणाला माहीत नाही.

प्रकरण ८ वे
टीप *१ – राजकारणी खलित्यांची शब्दयोजना मोघम करून तिच्या अर्थात भुरळीचे धुके बेमालूम ठेवायचे आणि नंतर वाजवी अर्थ काय, त्याचे 'इण्टरप्रिटेशन' करण्यात समोरच्या मंडळींना चकवायचे, हा आंग्रेजी डिप्लोमसीचा रिवाज फार जुना आहे. चालू घडीच्या राजकारणात हाच देखावा दिसत आहे.
टीप *२ – मूळ इंग्रजी शब्द In subordinate co-operation किती फसवेगिरीचे आहेत ते पहा. 'ताबेदारीचा सहकार' किंवा 'सहकाराची ताबेदारी' काय वाटेल तो अर्थ बसवून अनर्थांची सोय केलेली होती. तसेच पुढे अनुभवाला आले.

+ वाकब झाला म्हणजे तुमच्या देशाचे राज्य तुमचेच आहे. मग आम्ही एक घटकाभर सुद्धा येथे रहाणार नाही, ही आंग्रेजांची भाषा फार जुनी आहे. आम्हाला वाकबगारी शिकवणारे पंतोजी हेच आणि परीक्षा घेणारे पंडितही तेच. दीडशे वर्षे चालवलेली ही हेंगलबाजी अखेर महात्मा गांधींना ''चलो, भारत छोडो.''च्या आरोळीने थंड पाडावी लागली.

प्रकरण १२ वे
टीप *१ – ठाकरे कृत ''ग्रामण्यांचा इतिहास'' के. प्रो. डोंगरे कृत ''सिद्धांत विजय'' वगैरे.

+ या मुद्यांची सांगोपांग चर्चा डॉ. आंबेडकर यांनी इंग्रेजीत लिहिलेल्या Who were the Shudras? या ग्रंथात केलेली अगत्य पहावी.

टीप *२ – समोरच्या पक्षाकडून पराभव झाला, आणखी बाद करण्याची ताकद संपुष्टात आली, वादाच्या मुद्यांचे दिवाळे वाजले, म्हणजे अखेर मारामारीची गावगुंडी करायची, हा पुण्याच्या बामणांचा वैदिक धर्म, परवा पांडुरंग गोपाळ रानडे या इतिहास भास्कराला आहिताग्नि राजवाडे मंदिरात ठार मारण्याच्या बेताने केलेल्या हाणामारीपर्यंत अखंड चाललेला पाहून, वांशिक परंपरा तत्त्वाचे रहस्य किती अगाध आहे, याचा आचंबा वाटतो. सारी दुनिया बदलली तरी पुण्याची नाना नातूची परंपरा जशाची तशी कायम, हा केवढा बरे चमत्कार!
टीप *३ – पुण्याच्या केसरी पत्राने एक जाहीरनामा वजा अग्रलेख लिहून कै. शाहू छत्रपति करवीरकर यांचा स्वराज्यद्रोही छत्रपति म्हणून पुकारा केला होता.
प्रकरण १३ वे
टीप *१ – राज्याभिषेकाची योजना तडीला नेण्यासाठी, त्यावेळचे अखिल हिंदुस्थानात पट्टीचे क्षत्रिय म्हणून गाजलेले जे उदेपूरचे रजपूत घराणे, त्याच्याशी भोसल्यांच्या वंशावळीचा धागा नेऊन भिडविण्याची मुत्सदगिरीची कामगिरी बाळाजी आवजीने केली. वांशिक संशोधनाचे शास्त्र आताइतके त्या वेळी कोणाच्या ध्यानीमनीही नसल्यामुळे, चिटणिसाची ही चिटणिसी वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांनाही चारीमुंडे चीत करायला उपयोगी पडली. रजपूत थोर पराक्रमी खरे. त्यांनीही आपल्य पूर्वजांचे धागेदोरे थेट राम कृष्णापर्यंत नेऊन भिडविले होते. पण ही सारी फार जुनी अशी ब्राह्मणांचीच कारवायी होती. इण्डो-आर्य समाज संघटनेत, बौद्धधर्माच्या –हासकाळीच, क्षत्रिय म्हणून ‘रजपूत’ ही नवीन जात चमकू लागली. त्यापूर्वी हिच्या कुळामुळांचा काहीच पत्ता नव्हता. संशोधनाने आता स्पष्ट सिद्ध झालेले आहे की हिंदुस्थानावर स्वारी करायला आलेल्या नि पुढे मध्यहिंदुस्थानात वसति करून राहिलेल्या हूणांना आणि सिथियनांना, त्यांच्या शौर्यवीर्यादि गुणांवरून, बौद्धधर्मद्वेष्ट्या वैदिक ब्राह्मणांनी व्रात्यस्तोमासारखाच काही अग्निसाक्षिक विधि करून, बोद्धांची नि त्यांच्या धर्माची हिंदुस्थानातून हकालपट्टी करण्यासाठी, आर्य धर्मात सामील करून घेतले आणि त्यांना ‘क्षत्रिय’ संज्ञा दिली. म्हणूनच रजपूतांना ‘अग्निकुल क्षत्रिय’ असे म्हणतात. आर्यधर्मात प्रविष्ठ झाल्यानंतर इतर आर्यजनात आपल्या मूळच्या कुळामुळांचा पत्ता लागू नये, म्हणून या अग्निकुल रजपूत क्षत्रियांनी आपल्या वंशाची मुळे भारतीय प्राचीन थोर आर्य क्षत्रिय राजघराण्यांच्या वंशावळीत नेऊन भिडविली. शिवाजीला हे संशोधन माहीत असते तर तो भोसल्यांच्या वंशावळीचा वेल रजपुतांच्या मांडवावर चढविण्याच्या भानगडीत खास पडला नसता. पण अज्ञानातहि एक प्रकारचे भाग्य असते. तत्कालीन ब्राह्मण ब्राह्मणेतरांवर नि खुद्द रजपुतांवरही त्याचे दाट सावट पडले होते. म्हणून शिवाजीची युगत उदेपुरकरांना पटली आणि त्याचा फायदा शिवाजीला घेता आला. प्रतापसिंहाच्या वेळेपर्यंत ही ‘राजकारणी मुत्सद्देगिरी’ तशीच सोवळी राहिली. म्हणून त्यालाही उदेपूरकर राजघराणे कोल्हापुरापेक्षाही निकटच्या जिव्हाळयाचे वाटत असे.

प्रकरण १५ वे
नातूच्या ब्राह्मण – संघटनेचे स्वरूप

“या भटांना एकादा भटी कावा साधायचा असला म्हणजे ते काय काय अत्याचार नि भानगडी करतील याचा नेमच नाही. त्यांचे बेत साधण्यासाठी करू नये त्या गोष्टीसुद्धा करायला ते मागे पुढे पहात नाहीत. कारण त्यांना पक्के माहीत असते की हेतू साध्य झाला म्हणजे साधनांच्या बरेवाईटपणाची चौकशी कोण कशाला मरायला करतो?” मेजर जनरल रॉबर्टसन (लंडनचे व्याख्यान)

गवर्नर सर ग्रांटच्या एकाच वर्षाच्या अमदानीत, खुद्द त्याच्याच उत्तेजनाने, प्रतापसिंहाला ठेचून काढण्याचे कारस्थान नातूने हिरीरीने हातात घेतले. १८३६च्या मे महिन्यात महाबळेश्वरला, कलकत्ता नि लंडन येथे वकील पाठविण्याची राजाने गवर्नरला दिलेल्या इषारेवजा धमकीने तर खुद्द गवर्नर नि त्याचे सल्लागार मंडळ चांगलेच पेचात पडले होते. तेव्हा काय वाटेल ते कारस्थान करून या मानी राजाला चहूबाजूनी सापळयात धरून कायमचा चेचावा, या बातबेताची चक्रे जोराने फिरू लागली. कर्नल लॉडविक सीधा नि सरळ मनाचा आदमी होता. पण पूर्वीच्या तीन रसिदंटासारखा त्याच्या अकलेचा पाठकणा टणक नि दमदार नव्हता. ग्रांटडफ ब्रिग्ज नि रॉबर्टसन वाजवी दिसेल ते बोलणारे, करणारे आणि मुंबई सरकाराला दणकावून सांगणारे खंबीर होते. लाडविक वरिष्ठांना भिऊन वागला त्याला अनेक कुकर्मे

नाइलाज म्हणून करावी लागली आणि अखेर विलायतला गेल्यावर, त्याने मुंबई सरकारच्या दडपणाचा सगळा पाढा बोर्ड ऑफ डायरेक्टरांपुढे वाचून, स्वतःच्या पापांचे प्रायश्चित्त घेतले.

**कुठे आहे तो रंगो बापूजी? बोलवा त्याला.**

आंग्रेजांच्या प्रसादाने पेशव्यांच्या कैदखान्यातून मुक्तता झाली. राजगादी मिळाली. कारभार चालू झाला. या १७-१८ वर्षांच्या अवधीत या सगळया क्रांतीला उपयोगी पडलेल्या रंगो बापूजीची प्रतापसिंहाला एकदाही आठवण झाली नाही. कंपनी सरकारची मामलतदारी सोडून, सन १८३१ त त्याने आपल्या दीनावस्थेचा अर्ज केला, तरीही त्याची दखल घेण्याची त्याला बुद्धी झाली नाही. देशी राजांचा असला मतलबी विसरभोळेपणा अजूनही कायम आहे. त्यांच्या तोंडासमोर ज्या वेळी जो नाचेल, तो त्यांना प्यार, आपल्या अडचणीच्या किंवा संकटाच्या वेळी कोणी केव्हा किती खस्ता खाल्ल्या, याची त्यांना आठवण रहात नाही. जेव्हा आता पुन्हा तुफानाचे उलटे वादळी वारे जोराने वाहू लागले, तेव्हा प्रतापसिंहाने रंगो बापूजीला आठवणीने परत बोलावून लंडनला वकील पाठविण्याच्या कामाची व्यवस्था पाहण्यासाठी, एजंट-मुखत्यार म्हणून मुंबईला ठेवले. मुंबईच्या मेडिकल बोर्डाचा प्रेसिडेण्ट डॉक्टर मिल्न, ग्रांटडफ अलपिष्टनाचीच प्रतापसिंहाच्या परिचयाचा करून ठेवला होता. सातारला होत असलेल्या सर्व घटनांचे कागदपत्र डॉ. मिल्न यांस दाखवून, रंगो बापूजीने कलकत्ता आणि लंडन येथे जहागिरदारांचा प्रश्न धसाला लावण्याची त्याच्यामार्फत व्यवस्था चालविली. इतकेच नव्हे तर सयद मीर अफजलअल्ली नावाच्या एका मुसलमान गृहस्थाला लंडनला वकील म्णून पाठविण्यासाठीही त्याने तयार करून ठेवला होता. मात्र, मुंबई सरकार त्याला सुखासुखी मुंबई बंदरातून लंडनला जाऊ देणार नाहीत, म्हणून मक्केच्या निमित्ताने त्याने मुंबईच्या बाहेर पडावे, अशीही गुप्त योजना रंगोबाने केली.

**लाडविकची मुंबईला पहिली तक्रार.**

नातूच्या हरएक हालचालीमागे गवर्नरचा हात आहे. अशी लाडविकची खात्री पटल्यामुळे नातू सांगेल ते त्याला आता प्रमाण मानल्याशिवाय सुटकाच नव्हती. महाराज विलायतेत वकील पाठविणार ही कुणकुण नातूमार्फत त्याला समजताच, मुंबईला एकदम तक्रार करण्यापूर्वी या भेदरट परंतु सभ्य रसिदंटाने ता. १६ जून १८३६ गुरुवारी सकाळी महाराजांची भेट घेतली.

लाडविक –डाक्टर मिल्न किंवा दुसरे साहेब यांना महाराजांनी भेटीला नि मदतीला बोलाविले आहे, ही गोष्ट खरी काय?

प्रताप –खरी आहे. डॉक्टर मिलन अलपिष्टन ग्रांटच्या वेळेपासून आमचे दोस्त. मुंबईप्रमाणेच कलकत्ता नि लंडनच्या बोर्डापर्यंत त्यांना मान आहे. ते नेहमी इकडे येतात जातात. जहागीरदारांचा प्रश्न त्यांच्यामार्फत बडेलाटांना कळविण्यासाठी त्यांना इकडे बोलावले आहे.

लाडविक –सयद मीर अफजलअल्ली हा कोण आहे! त्याला तुम्ही विलायतेला पाठविणार असे ऐकतो.

प्रताप –तो आमच्या रंगोबाचा मुंबईचा स्नेही आहे. तो मक्केला जाणार आहे.

लाडविक –रसिदंटाशिवाय बाहेर व्यवहार चालू झाले तर तहनाम्याच्या शर्तीचे ५वे कलम आपण तोडल्यासारखे होणार आहे.

प्रताप –हे कसे काय? ते कलम स्पष्ट परराज्याविषयी आहे. इंग्रेज सरकार काही आम्हाला परकी नाही. आम्ही त्यांचे दोस्त आहोत. दोस्तांच्या बडेलाटाकडे वकिलात करायला किंवा थेट लंडनच्या बोर्डाकडे दावा मांडायला हरकत कसली? आमच्या मांडलीक जहागीरदारांना थेट गवर्नरकडे प्रत्यक्ष अर्ज तक्रारी करण्याची मोकळीक आणि आम्ही कलकत्त्याला किंवा लंडनला वकील पाठविणार म्हणताच तहनाम्याचा भंग होतो! हा पाचव्या कलमावर बसविलेला नवा अर्थ मात्र अजब खरा! तुम्ही आमचे अर्ज दाबून ठेवावे. पुढे गेलेच तर मुंबईकरांनी ते अटकाव करून ठेवावे आणि आम्ही कलकत्त्याला नि लंडनला वकील पाठवू म्हटले तर त्यालाही मज्जाव. हा कोंडमारा मोठा मासलेवाईक आहे. इतक्या वर्षात एकाही गवर्नराने किंवा रसिदंटाने अशी भाषा काढली नव्हती.

महाराजांचे म्हणणे लाडविकला खोडून काढताच येईना. त्याने ता. २० जून १८३६ सोमवारी, या मुलाखतीचा संदर्भ देऊन, 'सयद मीर अफलजअल्ली नावाच्या एका मुसलमान गृहस्थाला महाराज लंडनला पाठविणार आहेत. हा तहनाम्याचा भंग होतो किंवा कसे, हे नामदार साहेबांनी ठरवावे,' असा खलिता मुंबईला रवाना केला.

**बनावट दस्तऐवजांची ब्राह्मणी गिरणी.**

ग्रामण्यांच्या हंगामात प्रभू, मराठे, सोनारादिकांना शूद्रातिशूद्र ठरविण्यासाठी चिंतामणराव सांगलीकराने बनावट याद्या, आज्ञापत्रे, पोथ्या तयार करण्याचा सांगलीला कारखाना काढला होता. तेथेच वाकबगार झालेले अनेक जवानमर्द ब्राह्मण तरुण, प्रतापसिंहाच्या सही शिक्क्याचे बनावट फितुरी दस्तवज तयार करण्याच्या कामावर नातूकंपूने लावले. स्वतःच्या हरएक कर्मांना सार्वजनिकत्वाचा ऊर्फ राष्ट्रीयपणाचा मुलामा देण्याचा चित्पावनांचा शिरस्ता नातूपासून आतापर्यंत अविच्छिन्न चालत आलेला आहे. म्हणून या बनावट पत्रांच्या कटात चारदोन बामणेतर पात्रे लटकावण्याची कारवायी चाणाक्षपणाने करण्यात आली. रेसिडेन्सी कचेरीतला नातूचा मुख्य हस्तक बाळाजी काशी किबे आणि त्याचा उनाड पुतण्या गणपतराव यांनी भास्कर विश्वनाथ ऊर्फ भाऊ लेले नावाच्या एका वाईकर खटपट्याला हाताशी धरला. हा भाऊ लेल्या महापाताळयंत्री नि उलट्या काळजाचा होता. प्रतापसिंहाचा रेसिडेन्सीशी पुष्कळ पत्रव्यवहार झालेला असल्यामुळे, त्याच्या स्वदस्तुरच्या मखलाशांचे शेकडे नमुने किबे कंपूच्या हातात होते. पण पत्रांवर मारले जाणारे शिक्के मात्र खास राजवाड्याच्या जामदारखान्यात पक्क्या पहा-याखाली तिजोरीत ठेवलेले असत. जामदारखान्यात रंगो महिपत लिहिण्याचे कामावर असे. तो आजारी असल्यामुळे त्याचा मुलगा विश्वनाथ लिहिण्याचे काम करीत भाऊ लेल्याने विश्वनाथाच्या मार्फतीने तेथला पहारेकरी जानू भंडारी, हैबतराव सिकारखाने, कारकून आपा सिंदकर, बापूजी आनंदराव, सीताराम गोपाल खरसीकर वगैरे राजाची नोकरमंडळी कुशलतेने डागळून आपल्या कटात घेतली. मुंबई सरकार महाराजावर बिथरले आहे. प्रत्यक्ष पाठचा भाऊ आप्पासाहेब नातूला मिळाला, तेव्हा सद्दीचा जोर अर्थात आप्पासाहेबाकडे. अशा खात्रीने आणि हजारो लाखो रुपयांच्या कंपनीकडून मिळणा-या इनामांची लालूच लेल्याने दाखविल्यामुळे, प्रतापसिंहाच्या नोकरांच्याही मनाची चलबिचल उडाली. भाऊ लेल्याने त्याना किब्याच्या मार्फत थेट नातू आणि लाडविकच्या भेटी करवून, ‘आम्ही महाराजांचे राज्य युक्तीने घेतो. तुम्ही येश द्यावे. दाहा हजार रुपयांचे इनामगाव व येक लाख रुपये बक्षीस देऊ.’ अशी आश्वासने देवविली आणि बनावट फितुराची महाराजांच्या नावाची शेकडो पत्रे लिहून त्यावर अस्सल शिक्के ठोकून, मखलाशांसाठी किब्याकडे पाठविण्याची, खुद्द महाराजांच्या राजवाड्यातच, जामदारखान्यातच गिरण चालू झाली. सर्व ‘ ’ नि ‘हिंदुत्वनिष्ठ’ देशभक्त मंडळी तेथे जमायचे. पत्रे लिहायचे. शिक्के उठवायचे. असा रोजगार चालू झाला. प्रतापसिंह आणि गोविंदराव दिवाण यांच्या हस्ताक्षरांसारखे बेमालूम अक्षर काढणारेही ब्राह्मण कसबी या संघात सामील झाले. या कारखान्याची एक शाखा पुण्यालाही चालू झाली. नुसते शिक्के उठविलेल्या को-या कागदांचे लठ्ठलठ्ठ रुमाल रात्रीच्या अंधारातून सगळीकडे फैलाऊ लागले. हे कटबाज लोक निरनिराळ्या फितुरी मजकुरांची पत्रे एकमेकांच्या नावाने लिहीत आणि ती मग लष्करातल्या कंपनीच्या हापसरांना भारी किंमतीने विकीत असत. ते हापसर ती पत्रे रसिदंटाला किंवा थेट मुंबईला नेऊन तेथल्या अधिका-यांना विकीत असत. सातारच्य राजाविरुद्ध मिळेल तो पुरावा पैदा करण्याचा तो हंगाम असल्यामुळे, गि-हाईकांना तोटा नसे. शिवाय, पत्रांचे आणि शिक्के केलेल्या को-या कागदांचे रुमाल भाऊ लेले ठिकठिकाणी गहाण ठेऊन त्यावर पैसेही काढीत असे. इतक्यात बाळकोबा तात्या केळकर नावाचे एक पात्र संघात सामील झाले. त्याने तर बनावट शिक्के तयार करून पत्रांच्या दैनिक पैदाशीचा जोर वाढविला. या कामात रेसिडेन्सीतले एकूणेक चित्पावन कारकून लेले संघाला सल्ला मसलत द्यायला, मखलाशा करायला तनमनधने मदत करीत होते. लिहिलेल्या कागदांपेक्षा, शिक्के उठवलेल्या
को-या कागदांना तेजी भाव येत असे. कारण, त्यावर वाटेल त्याला वाटेल तो मजकूर लिहून, प्रतापसिंहाचे पत्र, म्हणून हव्या त्या किंमतीने विकता येत असे. कटबाजांनी एकमेकांच्या नावाने पत्रे लिहिली तरी त्यांचा अर्थ स्पष्ट असे की महाराजांनी ते पत्र त्याला लिहिले म्हणून, अशा काही पत्रांचे नमुने पहा –

(1) हस्ताक्षर हैबतराव सिकारखान्याचे, पत्र बाजीराव पेशव्याला.

“बाजीराव पंडत प्रधान पेशवे यास आज्ञा केली. तुम्ही आपले गृहकलहामुळे इंग्रेज आणिला आणि असावधपणे राज्य घालविले व स्वामित्व ध्यानास आणिले नाही. यास्तव राजाचा अभिश्राप तुम्हास अला. तो दूर करणे असल्यास, हुजूरचे पुरातन सेवक आपले पराक्रमाची शर्त करून कतल करीत आहेत. त्याची द्रव्याची वगैरे हरयेकविसी पुरवणी ठेवाल तरी अभिश्राप जाऊन तुमचे पद तुम्हाकडे करार राहील. जाणिजे छ. ११ साबान.”

(2) आपा सिंदकराच्या हस्ताक्षरात बापूजी आनंदला लिहिलेले पत्र -

“इंग्लेश लोकानी ह्या द्वीपावर येऊन मतलब करून सर्व राज्याचा अपहार करावा ही इच्छा धरून

हस्तगत जाहले. त्यात बलाढ्यपणानी वागतात आणि हे द्वीप द्रव्येहीन करावे हे इच्छितात. सबब यास सिक्षा घडावी आणि राज्याचा बंदोबस्त व्हावा. याजकरिता तुम्हास मुकत्यारी दिल्ही असे. तरी याचा बंदोबस्त तुम्ही मुखत्यारीने करावयास प्राचीन दौलतदार संस्थानी गादीचे मालक व जमेदार वगैरे आहेत याची सर्वाची एकच वाट हा दुरंदेशा चित्तात आणोन सर्वत्रानी येक स्नेहभाव ठेऊन धर्म राज्याची अभिवृद्धी होण्याकरिता साह्य करावयास सर्वाची संमते घेऊन जे कार्यास साह्य होतील, त्याचे मान व त्याचा आपला चालण्याचा तह ठरऊन देणे. हा तुम्ही जसा ठरवाल त्याप्रमाणे तुम्ही मुखत्यारीने दस्ताऐवज करून घ्यावे. ते हुजूर सरकारात मंजुर असे. तुम्हास जे अनुकूल होतील ते साह्यास घेऊन कलेल ते रीतीने धर्मराज्याची अभिवृद्धी करावी. जाणीजे. छ. ११ साबान.''

(3) बापूजी आनंद याने लिहिलेले पत्र –
''समस्त सावकारलोक यास की इंग्लश लोक हे समुद्राचे बेटातील रहामार. याणी पृथ्वीवर येऊन मतलब करून सर्व राज्याचा आपहर करून हे द्वीप द्रव्यहीन करावे हे इछितात. सबब यास सिक्षा घडावी आणि राज्याचा बंदोबस्त व्हावा. सबब हुजूरचे लोक हे कामास योजिले आहेत. त्यास तुम्ही आनुकूल जाल्याखेरीज हे कार्य होणार नाही. याजकरिता तुमचा आमचा परंपरा स्नेह चालत अला तरी हुजूरचे लोकास तुम्ही द्रव्याचा पुरावा करून खते लिहून घेऊन लागेल ते द्रव्ये देत जावे. तुमचे पैक्याचा उलगडा व्याजसुद्धा हुजूरून केला जाईल. अथवा जाहगीर लाऊन दिल्ली जाईल. तुम्ही तिलप्राय संशय न धरणे आणि पुन्हा हुजूरचे पत्राचा अक्षेप न करणे. छ. ११ साबान.''

(4) बापूजी आनंदरावचे हस्ताक्षर, पत्र आप्पा सिंदकराला –
''आत्मराम लक्षुमण देशकुळकर्णी तर्फ हिरडस मावल यास आज्ञा की तुम्ही राज्यातील पुरातन वतनदार. स्वामी चाकरी येक निष्ठपणे करून राज्याचे उपयोगी पडत अला. सबब आज्ञा की हे सर्व राज्य इंग्लश याणी हरण केले. याचे शासन करणे जरूर. त्यास तुम्ही फौज पुरातन सरदार व हिंदुलोक व मुसलमान वगैरे विश्वासूक ठेऊन, इंग्लश लोकाचे पारपत्ये करून, स्वामीच्या धर्मराज्याचा उपयोग करावा. जसा उपयोग तुमचे हातून घडेल तसा तुमचा बंदोबस्त करून दिल्हा जाईल. जो मुलुक तुम्ही काबीज कराल त्याची वहिवाट तुम्हाकडे चालेल. तुमचेकडून घालमेल होणार नाही. जाणिले छ. ११ साबान.''

अशा मासल्याची शेकडो पत्रे बाहेर पडली. प्रतापसिंहावर आलेल्या तीन मोठ्या फितुरी राजकारणाला अनुसरून त्यातला मजकूर असे. ती राजकारणे ही

(१) प्रतापसिंहाने गोव्याच्या पोर्च्युगीज व्हाइसरायामार्फत पत्रव्यवहार करून, इंग्रेजांना हुसकावण्यासाठी पोर्च्युगाल राष्ट्राची मदत मागविण्याची खटपट केली.

(२) जयपूराला जाऊन बसलेल्या नागपूरच्या पदच्युत आप्पासाहेब भोसल्याशी संधान बांधले आणि (३) सातारच्या २३ व्या नेटिव पायदळ पलटणीच्या देशी अधिका-यांना फितुर करण्याचा यत्न केला.

पैकी गोव्याच्या फितुरीचे काम चिंतामणराव सांगलीकर, नागो देवराव वैद्य आणि बाळकोबा केळकर यांनी आपल्या अंगावर घेतले. या घाणेरड्या कामात चिंतामणराव आणि नातू यांनी संकेश्वरच्या शंकराचार्यालाही अडकवून टाकले. नागो दावरावने शंकराचार्याला गोव्याकडे संचारार्थ नेले. बरोबरचार उमदे घोडेही होते. ही बातमी रसिदंटाच्या कानावर घालण्याची तजवीज झाली. बिचा-या शंकराचार्याने गोव्यात कसला धर्मप्रसार केला, तो त्यालाही समजला नसेल. पण नातूच्या चिथावणीने मुंबई सरकारने त्यावर मोठा गंभीर अर्थ बसवला. प्रतापसिंहाने गोव्याच्या डॉन मॅन्युअल व्हाइसरॉयला चार उमदे घोडे नजर पाठविले आणि शंकराचार्यामार्फत फितुरीचे राजकारण केले. याच शंकराचार्याने कायस्थ प्रभूंच्या ग्रामण्याचा कायस्थांना अनुकूल असा निकाल पुण्याला दिला होता. त्याचा चिंतामणराव नि नातू यांनी असा सूड उगवण्याचा घाट घातला. शंकराचार्याच्या उरावर गुडघा देऊन, कायस्थांना शूद्राधम ठरविण्यासाठी आणि प्रतापसिंहाचे गोव्याच्या गवर्नराशी फितुरीचे राजकारण सिद्ध करण्यासाठी, या दोन चित्पावन पुरुषोत्तमानी मठाच्या शिक्क्याचे हवे तेवढे कागद खरडून घेतले. या बाबत कोठे एक शब्द बोलाल तर मठासकट अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडावे लागेल, अशी आचार्यांना धमकी दिली.

गोवा प्रकरणाचे फितुरी कागद म्हणजे प्रतापसिंहाने अंग्रेजाना हाकून देण्यासाठी पोर्च्युगीजांच्या १५ आणि फ्रेंचाच्या १५ पलटणी मागविल्याची पत्रे आणि त्याचा डॉन मॅन्युअलची होकारार्थी पोर्च्युगीज भाषेत उत्तरे, यांचा बंदोबस्त बाळकोबा केळकराने पत्करला. त्यात नागो देवराव हा प्रतापसिंहाचा वकील

म्हणून डॉनला भेटला, असा संदर्भ असे. केळकराने पेडणे मुकामी छत्रपतीच्या नावाचे शिक्के बनवून घेतले. या कटात नागो देवरावचे पुतणे, मेहुणे असे निकटचे आप्तसंबंधीच होते. शिवाय ओळखापाळखीच्या अनेक लोकांची नावे कागदात साक्षीदार म्हणून घुसडून त्यांनाही पुढे त्रांगड्यात ओढायला हे नातूभगत विसरले नाहीत.

आप्पासाहेब भोसल्याची ओव्हर-बौण्ड्री

प्रतापसिंहाचे मुख्य दुस्मान म्हणजे सातारा, पुण्याचे सारे चित्पावन. त्यांच्या कच्छपी लागलेले किंवा अडकलेले इतरही अनेक वैरी होते. पण सगळया दुस्मानात पहिल्या नंबरचा डांबीस दुस्मान कोण असेल तर तो त्याचा धाकटा भाऊ उनाडटप्पू आप्पासाहेब भोसला. लाडविकसह पूर्वीच्या तीनही रसिदंटानी या छिनाल पो-याचे भवितव्य ओळखले होते. याला खर्चासाठी प्रतापसिंह दरमहा साडेपाच हजार रुपये नियमित देत असे. पण रंडीबाजी नि दारूबाजीत आकण्ठ बुडालेल्या या नराधमाला ती रक्कम काय पुरणार? तेव्हा तो नेहमी सावकारांकडून दमधाटीने हुकमी कर्ज काढीत असे. आपला भाऊ, त्यालाही काही अधिकार असावे, म्हणून प्रतापसिंहाने त्याला अदालतीचा न्यायधीश नेमले. चोराच्या हाती जामदारखान्याच्या किल्ल्याच मिळाल्या! त्याने लाच खाण्याचा सपाटा चालवला. रयत हैराण झाली. लाडविकनेही महाराजाकडे तक्रार केली. सावकारांचे तगादे लागले, म्हणजे आप्पासाहेब त्रागा करून सारा राजवाडा डोकीवर घ्यायचा आणि लोकलज्जेसाठी प्रतापसिंह त्याला मागेल त्या रकमा द्यायचा. एकदा असेच ३० हजार रुपये दिले. पण ते पुण्याच्या एका फडतूस गावभवानीला तो देणार असे समजताच, त्याने हिसकावून परत घेतले. राजवाड्यात भावाभावांच्या रोज कटकटी चालायच्या. लोकांत त्याची चर्चा चालायची. आप्पासाहेबाला दोन बायका होत्या. त्याच्या व्यसनातिरेकाने थोरलीचा (ताराबाईसाहेब) तो मनस्वी छळ करीत असे. त्याने एक पुण्याची कसबीण आणून साता-यात ठेवली होती. तिच्या चिथावणीने तो बायकोला रोज हाणमार करी. अखेर जिवाच्या भयाने ती प्रतापसिंहाच्या राणीच्या आस-याने राहू लागली. या घटनेवर बाळाजीपंत नातूने 'ती प्रतापसिंहाशी लागू आहे.' असा सगळीकडे बभ्रा केला. या आरोपाने प्रतापसिंह अतिशय दुःखी झाला. या घाणेरड्या मुद्याविषयी लंडन येथे डायरेक्टरांच्या कोर्टापुढे भाषण करताना, माजी रसिदंट नि या वेळी एक डायरेक्टर मि. ब्रिग्ज संतापाने म्हणाला - "हा अत्यंत बदनामी करणारा आरोप सर्वथैव खोटा आहे. हिंदुस्थानात असताना, शेकडो राजांचा नि माझा संबंध आला. पण त्या सर्वात सच्छील नि सद्वर्तनाबाबत प्रतापसिंहाची बरोबर करणारा काही इसम मला आढळला नाही. तसेच, शहाजी (आप्पासाहेबा)इतका स्त्रीलंपट असामी माझ्या पहाण्यात दुसरा नाही." ब्रिग्जच्या या जाहीर विधानाला दुसरा रसिदंट रॉबर्टसन यानेही सडेतोड भाषण करून पुष्टी दिली.

सर जॉन मालकम गवर्नर असताना नातूच्या चिथावणीने आप्पासाहेबाने राज्याच्या फाळणीचा अर्ज देऊन, अर्ध्या राज्याची मागणी केली होती. पण आप्पाला पुरेपूर ओळखणा-या त्या समंजस गवर्नराने ती केराच्या टोपलीत भिरकावली होती. पण आता सर रॉबर्ट ग्रांट या खुनसट धार्मिक गवर्नराची अमदानी चालू होती. चिंतामणराव पटवर्धन नि नातू या तितक्याच खुनसट धर्ममार्तण्डांची नि त्याची दोस्ती जमली होती. प्रतापसिंहाचे नि मुंबई सरकारचे वाकडे आले आहे, हा सगळीकडे गवगवा झालेला पहाताच, आप्पा भोसल्याने मुंबई सरकारच्या आवारात अशी एक बातमी दिली भिरकावून की या ओव्हर-बौण्ड्रीने तमाम महाराष्ट्र चकितच झाला. 'प्रतापसिंहाने आपल्या मुंबईच्या एजंटांना पत्रे पाठवून अशी स्पष्ट सूचना दिलेली आहे की लंडनवाल्यांनी जर आपले जहागीरदारांच्या वांध्यांचे काम नीट निकालात काढले नाही, तर तेथून ताबडतोब रशियाला जा, तेथल्या बादशहाला भेटून सांगा की आमचे साम्राज्य छप्पन कोटी रुपये उत्पन्नाचे आहे, तुम्ही भरपूर रशियन सैन्य घेऊन इराण, काश्मीरच्या मार्गाने यावे, इंग्रेजांना हिंदुस्थानातून हुसकावून द्यावे, आम्हाला आमच्या पूर्वीच्या अफाट म-हाठी साम्राज्याचे धनी करावे, या स्वारीचा जो खर्च येईल तो पै न् पै हप्तेबंदीने आम्ही फेडून टाकू. का आहे की नाही नातू कंपूच्या कटबाजीवर ताण! कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सच्या सभेपुढे आप्पाच्या या महामूर्ख करणीवर लाडविकनेच पुढे ता. २९ जुलै १८४२ रोजी आवेशाचे भाषण करून, आप्पा भोसल्याच्या नालायकीचे अनेक पुरावे दिले. शिवाय, नराधम नातूने सज्जन प्रतापसिंहाच्या शीलावर उडवलेल्या चिखलाचा कर्नल ब्रिग्ज, कर्नल रॉबर्टसन आणि थॉमसन यानी जळजळीत भाषेत निषेध केला, तेव्हाही लाडविकने आपल्या जाहीर संतापाने त्या निषेधाला पाठिंबा दिला.

सर ग्रांटने लाडविकला गाढव बनवले

नातूच्या कारस्थानाचा गवर्नरने पुरस्कार करून त्याचा गुप्त शह लाडविकला लागेपर्यंत, प्रतापसिंहाशी लाडविकचे वागणे फार दोस्तीचे होते. जहागीरदारांविषयी डायरेक्टर बोर्डाने राजाला दिलेल्या अनुकूल निकालाचे पत्र आणि पुढे मुद्दाम पाठविलेले सन्मानाचे पत्र आणि पुढे मुद्दाम पाठविलेले सन्मानाचे पत्र आणि तलवार, ही सर रॉबर्ट ग्रांटाने दडपून टाकली, तरी ती पत्रे नि तलवार मुंबईला आल्याची गुप्त खबर लाडविकनेच राजाला दिली होती. कारण त्या पत्रातील मजकुराचा सारांश प्रतापसिंहाने ता. ६ मे १८३५ च्या आपल्या डायरीत लिहून ठेवला होता –

“विलायतेहून पत्र आले त्यातील मजकूर कोर्ट डरकतरातून पत्र आले की गौरनर क्लार गेला व याचे (सर ग्रांटचे) नावे पत्र आले की माहाराज सरकारचे मुलकाचा बंदोबस्त व दौलतीचा व आदालतीचा व शालेचा वगैरे हरयेक बंदोबस्त चांगला आहे व याची खुशी फार वाटली, असे लाडविक साहेब याणी सांगत होते व कर्ज करीत नाहीत, व खर्चही ठीक आहे, व माहाली जाणे, जमाबंदीस जे हे रयेत हावालास ठीक आहे. व मेहनत व हुशारी व याविसी विलायतेत फार खुसी वाटली. दरसाल हावाल वकिलाने गवरनरास लिहीत जावे. त्याणे विलायेतेस लिहिणे. सबब भाव लिहिला की देवीने ठीक केले व एकादे वेलेस लिहिणे जागा जाहाली, ही खुषी वाटली. परंतु फार जपून वागवणे व आकल देऊन देवी कृपेने पार असे. (५) कोर्ट डकतरातून पत्र आले की जाहागीरदारांविसी महाराज सरकारचे सरहादीचे व आमचे हादीत जे मुलुक आसेल तो आमचा, हे कोर्ट डकतर याणी लिहिले. यावरून हे गौरनर याचे पत्र (विलायतेहून उत्तरच आले नाही सांगणारे) खरे नवे, आसे दिसते. कोर्ट डकतर याणी लिहिले हेच खरे, गौरनर यांचे हे लिहिणे बाद.”

लाडविक जात्या सज्जन नि सरळ मनाचा होता. प्रतापसिंहाचा राज्यकारभार नित्याचे खासगी व सार्वजनिक जीवन निर्दोष नि निर्मळ होते, जहागीरदारांसंबधी त्याच्या हक्कांचा आग्रह वाजवी होता, त्या हक्कांना मुंबई सरकारने शेकडो वेळा लेखी मान्यताही दिलेल्या होत्या, डायरेक्टर बोर्डाने याबाबात राजाच्या मागणीलाच उचलून धरले होते, हे लाडविकला स्पष्ट दिसत होते. पण मुंबई सरकारच जेथे तहनाम्याच्या सरळ शब्दांवर उलट अर्थ बसवून, वाटेल त्या शक्याशक्य सबबीखाली राजाला सफाई उखडून टाकायलाच उठलेले, तेथे येईल तो गुप्त उघड हुकूम मान्य करण्यापलिकडले त्याच्या हातात काय होते? सदसद्विवेकबुद्धीला बाजूला सारून, अनेक गोष्टी चक्क मनाच्या विरुद्ध करणे त्याला आता भाग होते. भाऊ लेल्या, बाळकोबा केळकर, नागो देवराव आणि चिंतामणराव सांगलीकर यांचा बनावट फितुरी कागदपत्रांचा व्यापार जोरात चालला होता नि त्यातले बरेचसे पुरावे हजारो रुपयांच्या खरेदीने मुंबई सरकार आणि कलकत्त्याच्या गवर्नर जनरलापर्यंतसुद्धा जाऊन भिडले होते. सातारच्या पलटणीतला फितूर नुसता कागदोपत्री सिद्ध करण्यापेक्षा, पलटणीतले दोनतीन अंमलदार ‘बनवून’ त्यांच्याकडून प्रत्यक्षच तसे नाटक बसवून घेतले, तर पुराव्याचा खुंटा अधिक बळकट होईल, या विचाराने अंतोबा वाघ नावाच्या एका गावगुंड भटाला उभा करून, नातूने त्याही नाटकाची उभारणी केली.

## प्रकरण १६ वे

## संत्री कटाच्या नाटकाची उभारणी

साता-यात रेसिडेन्सी होऊन, तेथे कंपनीची एक पलटण कायमची राहिली. तेव्हापासून सातारा शहरात पलटणीच्या लोकांची आणि गो-या मेजर आडजुटंटांची बरीच वरदळ चालू झाली. वेश्याव्यवसायाला ऊत आला. “साहेब लोक शहरात येऊन रस्त्याने माणसास कमची मारतात... बुगी कलावंतीन इच्या पोरीना बोलावतीतात.” अशा लोकांच्या तक्रारी येऊ लागल्या. “विठोबापासी पारगावकर सावकार पालीत राहात असतो. त्याणे येऊन कलविले की वॉरण साहेब व येशवंतराव सरसुभेदार हे चवकसीस आले होते. ते वेलेस पारगावकर याणे आपले घरी वारणसाहेब आणला. पानसुपारी देऊन गेले. ते वेलेस त्याची घरची कुणबीण ईस नलात बोलावून पंचवीस रुपये दिल्हे. तिचे संगे बदकर्म केले.” इतकेच काय पण पाचवे पलटणचा एक गोरा मेजर खुद्द महाराजांना भेटला. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यावर शहाणा काय सांगतो, “आम्हास नाच इकडले मुलकाचा चांगला लागतो. येक वेला दाखवावा. आम्हासहि विषयेयास बायेकू पाहिजे. जर पैसा असता तरी लग्नच केले आसते. नाही, सबब दुसरेया बायका पाहिजेत.” पलटणीच्या असल्या लोकांचे हलकट धंदे साता-यात चालू झाले. महाराजांनी रसिदंटाच्या कानावर वरचेवर तक्रारी घालाव्या, त्यांनी जरब द्यावी. काही काळ धिंगाणा बंद पडावा, पुन्हा येरे माझ्या मागल्या. गावात किंवा गावानजीक पलटणी आल्या म्हणजे लोक हवालदिल होतात, याची कारणे उघड आहेत. धंदेवीक वेश्यांच्या जोडीनेच हुंडग्या गरतीसुद्धा या हंगामात पैसा

करतात आणि शिपायांची वरदळ शहराच्या गल्याकुच्यातून राजरोस होते. दुस्मानदारी, गुंडगिरी आणि राजकारणी हेवेदावे यांचे सूड उगविण्याचे कट अशा ठिकाणी तयार होतात आणि त्यात वरून धुवट सोवळे दिसणारे अनेक संभावीत सामील होतात.

प्रतापसिंहाविरुद्ध पलटणीत फितूर केल्याचा आरोप ठसठशीत सिद्ध करण्यासाठी नातूने ज्या नाटकाच्या उभारणीचा उद्योग केला, त्यात त्याच्या हस्तकांनी असल्याच गल्लीकुच्ची धंडणा-या पलटणीतल्या सुभेदार शिपायांचा 'नट' म्हणून उपयोग केला. प्रतापसिंह वरचेवर या शिपुरड्यांच्या हलकटपणाविरुद्ध आणि गुंडगिरी विरुद्ध रसिदंटाकडे लेखी तक्रार करून त्यांना चेपीत असल्यामुळे, ते त्याच्यावर नेहमी दातओठ खात असत. शिपायांना अटकाव झाला, म्हणजे त्यांच्या साजण्या नि साजिंदे यांचाही तिळपापड व्हायचा. महाराज कधी शहराबाहेर फिरायला निघाले का हे पलटनवाले त्यांना ऐकू येईलशा आवाजाने एकमेकात बोलायचे, 'अरे जा रे यार, इस चिडियोकू छे महिनेके अंदर बरबाद कर डालेगे.' ही गोष्ट बाळाजी काशी किबेच्या मार्फत महाराजांनी अनेक वेळा रसिदंटाच्या कानावर घातली. पण किबे पडला नातूचा कावळा! तो का कानाने ऐकायचा नि दुस-याने बाहेर सोडायचा. रसिदंट लाडविकने महाबळेश्वरावर गोविंदराव दिवाणाच्या बंगल्यासमोर शिपायांसाठी एक हंगामी चाळ बांधली. गोविंदरावाने आक्षेप घेतला. लाडविकने ती काढून टाकली. तेव्हा शिपाई-राजावर फार उखडले. दादजी कदम नावाचा महाराजांचा एक नोकर विहिरीवर आंघोळ करीत होता. त्याला काही सुभेदार म्हणाले - 'आमच्या झोपड्या उखडल्या? ठीक! पाहून घेऊ. सहा महिन्यांत तुमच्या दिवाणाला नि महाराजाला बंगाल पंजाबची हवा दाखऊ याद रखो.'

महाराणीसाहेब एकदा माहुलीला कृष्णास्नानास गेल्या. उन्हाळा फार कडक पडला होता. म्हणून एका विस्तीर्ण वटवृक्षाखाली बैठक घालण्याचा तिने हुकूम केला. त्या जागेवर आधीच काही पलटणचे शिपाई ऐसपैस बसले होते. हुज-यांनी त्यांना जरा दूर लांबवर बसायला सांगताच, ते एकदम उसळले आणि खुशाल महाराजांना नि महाराणीला शिव्या देऊ लागले. कारभा-याने त्यांना शुद्धीवर आणण्याचा पुष्कळ यत्न केला, पण व्यर्थ. 'आम्ही कंपनी सरकारचे शिपायी, विचारतो कोण या हिंदू राजाला! सहा महिन्यात तमाशा दिसेल.' अशी त्यांनी बडबड चालविली.

महाबळेश्वरवरच्या महाराजांच्या विहिरीवर तेथल्या व्यवस्थापकाने पाणी भरण्याची शिपायांना मनाई केली. कारण त्यात अनेक नहिंदु जातीचे शिपाई असायचे. बाटबाटीच्या नि वाटाळाच्या कल्पना त्यावेळी फार. पाणी बंद केल्यावर, शिपायी रामगरीब गंगापुत्राला म्हणाले, 'राजाने आमचे पाणी बंद केले काय? सहा महिन्यांत समजेल कोण कुणाला पाणी पाजतो ते.'

महाराजानी रसिदंटाला हे सांगताच तो म्हणाला, ''त्यांच्या बरळण्याकडे महाराजांनी काय एवढ लक्ष द्यावे?'' वास्तविक, प्रतापसिंहाला कसल्यातरी कचाट्यात अडकवून चेचण्याचा मुंबई गवर्नराचा निश्चय झालेला आहे आणि त्याप्रमाणे नातूच्या नानामुखी खटपटींची यंत्रे सारखी हालचाल करीत आहेत, याची लाडविकला चांगली खबर होती. भाऊ लेल्याच्या कंपूने तयार केलेली काही बनावट पत्रे पैदा करून, ती राजाच्य कारस्थानांचा पुरावा म्हणून मुंबईच्या सेक्रेटरीअटच्या गुप्त खात्यार्यंत पोहचली होती. गवर्नर सर रॉबर्ट ग्रांट नि त्याचे गोरे कौन्सिलर्स साता-याहून महत्त्वाची खबर येते कधी नि आम्ही प्रतापसिंहावर धाड घालतो कधी, याची आतुरतेने वाट पहात होते.

नातूचे संत्री-कट नाटक

प्रतापसिंहाने गोव्याकडून पोर्च्युगीज पलटणी मागविण्याच्या कटाच्या उभारणीसाठी संकेश्वर शंकराचार्यांची दस्तऐवजी मान अडकवून, नागो देवराव आणि बाळकोबा तात्या केळकर यांची सांगलीकराने नि नातूने सावंतवाडीला आधीच रवानगी केलेली होती. आता खुद्द साता-यासच छावणीतल्या पलटणी फितूर करण्याचे नाटक उभे करण्यासाठी, नातूने अंताजी वाघ*१ नावाच्या एक उपद्व्यापी भटाला हाताशी धरले. त्या वेळी २३वी नेटिव पलटण रेसिडेन्सीत छावणीला होती. ता. ११ जुलाई १८२६ सोमवारी अंताजी वाघाने शिवगुलामसिंग नावाच्या एका परदेशी सुभेदाराला गाठला. एकदम नमस्कार ठोकून, स्वारीने बोलायलाच सुरुवात केली. ''शिंद्याचा वकील आलाय सध्या सातारला. इंग्रज सरकारला हिंदुस्थानातून हुसकावून लावण्याचा बेत ठरलाय. सगळे देशी राजे एक झालेत. आमचे महाराज तर या कटाचे मुख्य सूत्रधार आहेत.'' पुन्हा १० दिवसांनी अंताजी शिवगुलामला त्या बि-हाडी छावणीत जाऊन भेटला. तेथे चंदरसिंग हवालदार होता. हेच आमचे आडजुटंट अशी शिवगुलामने थाप मारली नि अंताजीला बनवले. राजाच्या कटाबद्दल अंताजीची वटवट चालली असतानाच, शिवगुलामने

चंदरसिंगाला खूण करून पाठवून दिले. तो ले. स्टोकला जाऊन भेटला आणि अंताजीने आणलेली खबर त्याला कळविली. 'गोविंदराव दिवाणाने तुम्हाला भेटीला बोलावले आहे. माझ्याबरोबर चला.' असे अंताजी शिवगुलामला सांगत हे तोच चंदरसकिंग हवालदार परत आला आणि स्टोक साहेबाने त्याला बोलावले आहे असा निरोप दिला. शिवगुलाम गेला. स्टोकने त्याला अंताजीबरोबर गोविंदराव दिवाणाकडे जायला परवानगी दिली. पण गुलजार मिश्रालाही बरोबर न्यायला सांगितले. शिवगुलामने 'गुलजार मिश्र हमारे बचपनसे बडे प्यारे दोस्त' अशी अंताजीजवळ प्रस्तावना केली आणि ही चौकडी गोविंदराव दिवाणाला भेटायला शहराकडे निघाली.

अंताजीने या तिघा परदेशी शिपायांना बगलेत मारून मोठे विचित्र नाटक रंगविले. दिवाणाच्या खेटराशीही उभे राहण्याची अंत्या वाघाची लायकी नव्हती, तर तो त्याच्या भेटीगाठी काय घेणार? त्याने त्या शिपायांना दिवाणाच्या वाड्यातल्या बाहेरचा भाग एकदा दाखवला. एकदा दुरून गोविंदराव कोण, महाराज कोणते, हे दाखवले. एकदा चोरून राजवाड्यात नेले नि तेथले एकदोन दिवाणखाने दाखवले. नागपूरकर भोसल्याचे वकील आणि शिंद्याचे वकील म्हणून भलतेच लोक दाखवले. असा क्रम अनेक वेळा वरचेवर अंताजीने चालवून, आपल्या कपटनाटकात या तीन पात्रांचा ठाकठीक मिलाफ करून घेतला. नातूकडून मिळत गेलेल्या गुप्त दक्षणेचा मलिदा त्यांना आणि छावणीतल्या आडजुटंट लेफ्टनंटादि हापसरांना चारून, त्यांच्याकडून फितुरी प्रकरणातले निरनिराळे प्रवेश चोख वठवून घेतले. 'आज आम्हाला गोविंदराव दिवाण भेटले. उद्या ते महाराजांशी मुलाखत करून देणार आहेत.' 'नागपूरकर भोसल्याच्या आणि शिंद्याच्या वकीलाशी आज दिवाण अमूकतमूक बोलले, ते आम्ही ऐकले.' 'दिवाणाजवळ आज आम्ही शपथा घेतल्या.' 'महाराजांनी आम्हाला पलटणातले शिपायी कसे फोडावे आणि सूचना येताच बंडावा कसा करावा, याच्या सूचना दिल्या.' असल्या थापा हे तीन शिपुरडे वरचेवर आपल्या हाफसरांना देत आणि ते त्यांच्य जबान्या लिहून घेऊन लाडविकाकडे पाठवीत. एकदा अंताजी शिवगुलासिंगाला बोलवायला आला असता, तो होता
पहा-यावर. मला येता येत नाही, असा त्याने जबाब दिला. लाडविकला ते समजताच त्याने ताबडतोब दुसरा शिपायी नेमून, शिवगुलामला अंताजीबरोबर जाण्यासाठी मोकळा केला. यावरून, या संत्री-फितुराच्या नाटकात रसिदंटापासून तो थेट कटबाज शिपुरड्यांपर्यंत सारे रेसिडेन्सीवाले किती आतुरतेने भाग घेत होते, हे दिसून येते.

पलटणीच्या छावणीत हे फितुरीचे नातू-नाटक अंताजी सूत्रधाराच्या खटपटीने रंगत होते, याची गोविंदराव दिवाण किंवा प्रतापसिंह यांना दादही नव्हती आणि अंत्या वाघासकट त्या तीन परदेशी शिपायांची तोंडओळखही त्यांना असण्याचे काही कारण नव्हते. कोठे महाराज नि गोविंदराव दिवाण आणि कोठे हे फाटक्या पायतणांचीही लायकी नसलेले परदेशी शिरपुडे नि त्यांचा तो सूत्रधार गावगुंड अंत्या वाघ!

''आपापल्या राज्यातल्या इंग्रजी पलटणीतले देशी शिपाई फितूर करून ठेवण्याचे निरोप घेऊन, कित्येक दक्षिणी नि कर्नाटकी ब्राह्मण, अनेक वेषांतरांनी, अनेक देशी राजेरजवाड्यांकडे महाराजानी गुप्तपणाने रवाना केले आहेत आणि आम्हालाही तयारीत असायला सांगितले आहे.'' असे शिवगुलाम त्रयीने स्टोकला ता. २१ जुलै १८३६ च्या रात्री कळविले. लगेच स्टोकने ही बातमी लाडविकला कळविली. त्याने ताबजतोब त्या तीन शिवायांना आपलेसमोर बोलाऊन, त्यांच्या जबान्या घेतल्या. तारखा, वार, वेळ, जागा. भेटी, भाषणे, शपथा, मेजवान्या. इत्यादि अंताजीने पढवून ठेवलेल्या तपशीलांसह त्या तिघांनी पोपटाप्रमाणे धडाधड न कचरता, आपापल्य जबान्या दिल्या. लाडविक पुरा 'बनला.' त्याने दुस-या दिवशी ता. २२ जुलै रोजी 'महाराजानी इंग्रजी पलटणीतले देशी शिपायी फितूर करण्याचा मोठा देशव्यापी कट केला असून, आमच्या पलटणीतल्या दोन सुभेदारांनाही डागळल्याच्या त्यांच्या जबान्यांच्या नकला सोबत पाठविल्या आहेत.' असा तातडीचा खलिता खास सांडणीस्वाराबरोबर मुंबईला रवाना केला.

बस्स, सर रॉबर्ट ग्रांटला जे हवे होते ते मिळताच, त्याचा आनंद चर्चचा घुमट फोडून आकाशातल्या बापापर्यंत जाऊन भिडला. त्याने तडाड ता. २४ जुलैलाच उलट जबाब दिला की, ''आपण फार चांगली माहिती दिलीत, पण इतक्यातच या प्रकरणाचा गवगवा होऊ देऊ नका. आणखी जितका पुरावा मिळेल तितका मिळवा आणि या कटाची माहिती देणा-या अंताजीला त्याच्या साथीदारांसह ताबडतोब अटक करा. कैदी असाम्यांच्या घरांच्या झडत्या घ्या. कागदपत्र जप्त करा. आपल्या सुभेदारानांही नजरेखाली

ठेवा. कारण राजाला ही कुणकुण लागली तर तो या लोकांना पकडून सगळा डाव उलथून टाकण्याचा फार संभव आहे.''

प्रकरण एवढ्या थराला गेल्यावर अंताजी भेदरला आणि तो आपल्या सुभेदार दोस्ताना भेटण्याची टाळाटाळ करू लागला. कसेही करून अंताजीला छावणीत आणण्याबद्दल लाडविक सुभेदारांना आग्रह करू लागला आणि अंताजी तर कोठेच सापडे ना. कधी चुकून कोठे भेटलाच तर थापा मारून निसटायचा. अंताजीच्या भेटायच्या जेवढ्या जेवढ्या म्हणून जागा होत्या, तेथे तेथे सुभेदार सारखे टेहळणी ठेवू लागले. त्याचा भाचा परशराम याचे सुगंझी सामानाचे दुकान होते. तेथे एकदा ६ ऑक्टोबर १८३६ रोजी चंदरसिंगाने अंताजीला दुरून पाहिला नि चटकन एक इसम पाठवून, दूर असलेल्या शिवगुलासिंगाला इषारा दिला. शिवगुलामने अंताजीला गोडगोड बोलून, एक थाप दिली. आमच्या छावणीतल्या एका हापसराची बदली झाली आहे. त्याची एक दुभती गाय विकायची आहे. तू आलास तर थोडक्यात सौदा पटवून देतो. शंभराची गाय पंचविसात मिळेल. भटाच्या तोंडाला पाणी सुटले. तो आणि परशुराम सुभेदाराबरोबर छावणीत जाताच, दोघांच्या हातात बेड्या पडल्या. लाडविकने त्यांच्या जबान्या घेतल्या. मुंबईला खलिता रवाना झाला.

गवर्नर ग्रांटची लगीनघाई

प्रकरण येथवर जाईपर्यंत क्रिस्तभगत सर रॉबर्ट ग्रांट याला कोठचा धीर निघायला. प्रतापसिंहाचा गळा कापतो कधी आणि त्याचे रक्त पितो कधी, अशी या अर्कट इंग्रेजाला अगदी तहान लागली होती. त्याने १५ सप्टेंबर १८३६ लाच कंपनीच्या लंडनच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या गुप्त समितीला मोठे मानभावीपणाचे गुप्तपत्र पाठवून, 'सातारचा राजा प्रतापसिंह याने देशी शिपायांत फितूर फैलावण्याचा कट केल्याचे पुरावे हाती' आल्याबद्दल नक्राश्रु गाळले. आपण पुढे जो खाटीकखाना चालू करणार, त्याला लंडनच्या वरिष्ठांची हरकत राहू नये आणि राजाबद्दलही त्याचे मन पुरेपूर कलुषित व्हावे, असा सर रॉबर्टने पक्का बंदोबस्त केला. इतकेच नव्हे तर गोविंदराव दिवाणाला शक्य तितक्या लवकर अटक करावी असाही हुकूम त्याने लाडविकला पाठविलेला होता. दिवाणालाच अटकेत टाकले म्हणजे प्रतिवाद करण्याच्य कामात राजा लंगडा पडेल, अशी ही आंग्रेजी शहाणपणाची तरतूद होती. अंताजी नि परशराम यांना अटक करून, यांच्या जबान्या घेतल्यावर लाडविकची नजर गोविंदराव दिवाणाकडे वळली.

राडवाड्याला लष्करचा वेढा

संत्रीकटाचे नाटक इतके सपाटेबंद रंगले तरी त्याची दिवाणाला नि महाराजांना दादही नव्हती. जहागिरदारांच्या वादाचे कागद तयार करून मुंबईत बसलेल्या रंगो बापूजीच्या मार्फत डॉ. मिल्नला देण्यासाठी, ते दोघे रात्रंदिवस कागदांच्या रुमालांची उलथापालथ करीत होते. शुक्रवार ता. ७ ऑक्टोबर १८३६ उजाडला. बिचारा गोविंदराव दिवाण मोठ्या पहाटे उठून मुंबईला पाठविण्याच्या कागदांची जुळणी करीत आपल्या वाड्यात कार्यमग्न होता. इकडे प्रतापसिंह महाराज स्नान उरकून नित्याप्रमाणे देवघरात संध्यावंदन करीत होते. एकाएकी राजवाड्याबरोबर मोठा गलका ऐकू आला. रेसिडेन्सीचे लष्कर आणि तोफांच्या गाड्या खडाड कर्कश आवाज करीत राजावाड्याकडे धावत येत होत्या. त्यांचा राजवाड्याला गराडा पडला. रेसिडेन्सीतले एक कामदार बाळाजी काशी किबे आंग्रेजी हापिसराच्या मिजाशीने, पहारेक-यांना न जुमानता एकदम राजवाड्यातल्या देवघरात घुसू लागले. हुज-याने अडविले, त 'ऊहे, आडवतोस कशाला? आता आडवणार कोणकोणाला?' असे दरडावून किबे महाराजांसमोर जाऊन उभा राहिला. 'महाराज, संध्या ठेवा बाजूला. बाहेर या जरा. जरूरीचे काम आहे.' असे किबे हुकमाच्या आवाजात म्हणाला. प्रतापसिंहाला काही उलगडाच होईना. इतक्यात राजवाड्याला लष्कराने वेढा दिल्याची बातमी हुज-याने येऊन महाराजांना सांगितली. 'काय हो किबे, काय भानगड आहे?' असे महाराज विचारणार, तोच स्वतः लाडविक एकदम आला.

लाडविक –डेखो महाराज, हमारे सेण्ट्रीमे गोविंदराव डिवानने कुठ फिटूरका काम किया, ऐसा अंडेशा है. हम डिवाणकू मंगटा है.

प्रताप. – फितूर? आणि तो दिवाणाने केला?

लाडविक –हां हां, हम क्या झूट बाट बोल्टा है? हम डिवाणको मंगटा है.

प्रताप. – मग तेवढ्यासाठी हा लष्कराचा दंगा कशाला हवा होता? निरोप येताच पाठवून दिले असते.

गोविंदरावाला लष्कराने पकडून भर शहरात घेऊन जावे, अशी नातूकंपूची लाडविकला चिथावणी होती आणि त्याने तसा हट्टही धरला. पण प्रतापसिंह एकदम चिडला असे पहाताच, 'दिवाणांना लवकर पाठवून द्या' एवढेच सांगून तो लष्करासह परत गेला.

महाराजांनी गोविंदरावाला निरोप पाठवून छावणीत रसिदंटाच्या भेटीला जाण्याची आज्ञा केली. दोन इभ्रतदार दरबारी इसम बरोबर घेऊन, गोविंदराव छावणीत जाताच, त्यांना ताबडतोब कैद करून, गोविंदरावाला दारूगोळा ठेवण्याच्या एक दरवाजी खोलीत बंदिस्त केले आणि बाहेर नागव्या संगिनीचा पहारा ठेवला. दिवाण कैद होताच, रसिदंटाने एकदम साता-यात अनेक लोकांची धरपकड सुरू केली. राजधानीत एकच हाहाकार उडाला. महाराजांची सत्ता धाब्यावर बसवून, मन मानेल त्याच्या घराची झडती घेण्याचा सपाटा चालू झाला.

मुंबईहून गोरे 'न्यायाधीश' निघाले.

इकडे हा प्रकार चालू असतानाच, तिकडे मुंबईहून गवर्नरच्या हुकमाने विलोबी सेक्रेटरी आणि कर्नल ओव्हान्स हे दोन गोरे शहाणे न्यायाधीश घोड्यावर स्वार होऊन, ५० स्वारांसह दौडा मारीत साता-याकडे निघाले होते. प्रतापसिंहाच्या कटाची चौकशी करायला सर रॉबर्टने हे दोघे आणि तिसरा रसिदंट लाडविक, यांचे एक गुप्त चौकशी कमिशन न्यायाधीश म्हणून नेमून पाठविले. राजाविरुद्ध जहागिरदारांचा प्रश्न खुंटीवर टांगणारा विलोबी, हा गवर्नरचा सेक्रेटरी. अर्थात तो आपल्या नाठाळ वरिष्ठाचेच फत्तरी काळीज नि मत्सराचा काळा चष्मा चढवून आलेला. दुसरा. ले. कर्नल ओव्हान्स. मुंबईच्या फौजेचा हा क्वार्टर मास्टर जनरल होता. 'हिंदुस्थान सरकारच्या राजकारणी खात्याचे तोंड काळे करणारा हा ठगातला ठग होता.' असे इंग्रजी बखरकार म्हणतात. म्हणूनच सर ग्रांटाने त्याची भरपूर कानफुंकणी करून आणि हे चौकशीचे काम ठाकठीक पार पाडलेस तर तुलाच साता-याचा रसिदंट करून आशी आशा लावून, या कमिशनरांच्य टोळीत पाठवून दिले. तिसरा न्यायाधीश कोण? तर खुद्द लाडविक रसिदंट. म्हणजे फिर्यादीच न्यायधीश बनले. इतकेच नव्हे तर या कमिशनच्या अध्यक्षपदाचा मान लाडविकलाच दिला होता.

चौकशीचा आंग्लाई फार्स

तू नाही शिव्य दिल्यास, तर तुझ्या बापाने दिल्या, या लांडगा नि मेंढराच्या गोष्टीप्रमाणेच ही चौकशी आंग्लाई कारवायी होती. ता १२ ऑक्टोबर पासून ते ४ नोव्हेंबर १८३६ पर्यंत तब्बल एकवीस दिवस चौकशी चालली होती. आरोपी गोविंदराव दिवाण आणि साक्षीदार अवघे तीन. महाराजातर्फे अगर गोविंदरावातर्फे साक्षीदारांची उलटतपासणी वगैरे काहीएक झाली नाही. आमच्या बाजूने चौकशीचे काम पहाण्यासाठी साक्षीदारांची उलटतपासणी करण्यासाठी वकील द्यावा, ही महाराजांची विनंती सुद्धा धुडकाऊन लावण्यात आली. मग २१ दिवस काय चालले होते? साक्षीदारांच्या परस्पर जबान्यांची जुळवाजुळव आणि आरोप शाबीत करण्यासाठी कोणी कायकाय बोलले पाहिजे, याच्या रोजच्या रोज रंगीत तालमी चालू होत्या. अखेर परस्परविरोधी जबान्यांचा भंबाळा उडाला तो उडालाच. पहिला साक्षीदार शिवगुलासिंग कमिशनपुढे येऊन उभा राहताच त्याची तर घाबरगुंडीच उडाली. अंगाला घाम फुटून तो लटलटा कापू लागला. तोंडातून एक शब्दही निघे ना. विलोबी नि ओव्हान्स लागले एकमेकाच्या थोबाडाकडे पहायला. साक्षीदारच लटपटू लागले, तर उभारलेल सारा पत्त्याचा डावच उधळण्याची वेळ आली! तशात अध्यक्ष लाडविकने त्याला खोचून खोचून सूचक प्रश्न विचारताच, शिवगुलाम मटकन खालीच बसला. भांबावल्यामुळे त्याच्या डोळ्यापुढे काजवे चमक लागले. घसा कोरडा पडला. विलोबी नि ओव्हान्सने रागरंग पाहून, लाडविकला 'तुम्ही काहीच विचारू नका' असे सुचवून, दोघानी शिवगुलामला धीर दिला. मतलबाला सोयिस्कर असे सूचक प्रश्न विचारून, 'होय ना? होय म्हण. नाही ना? नाही म्हण.' अशा पद्धतीने २१ दिवसांत ३ साक्षीदारांचे पुरावे कसेबसे लिहून हा चौकशीचा फार्स उरकला. या विषयी पुढे डायरेक्टर बोर्डापुढे साक्ष देताना लाडविकने स्पष्ट कबूल केले की "या साक्षीदारांची जर उलट तपासणी झाली असती, तर त्यांच्या जबान्यातल्या एकेका शब्दाचे राईराई एवढे तुकडे उडाले असते. शिवगुलाम आणि गुलजार मिश्र साक्षीला आले तेव्हा त्यांचे चेहेरे प्रेतासारखे काळवंडलेले दिसत होते." बरोबरच आहे. सगळेच मुळी काल्पनिक नाटक. २९ ऑक्टोबरला लाडविकने महाराजास बोलावून, साक्षीदारांच्या जबान्यांचा सारांश तोंडी सांगितला. महाराजांनी नकला मागितल्या. देतो असे सांगूनही मुळीच दिल्या नाहीत. त्या पुढे रंगो बापूजीच्या हातात सन १८४२ साली लंडनला आल्या. त्या सरकारी खर्चाने पार्लमेण्टरी पेपर्समध्ये छापल्या गेल्या. त्यावर रंगो बापूजीने आणि त्याच्या मदतगार सर जोसेफ

ह्यूम, जॉर्ज थॉम्प्सन वगैरेमंडळींनी फार कडाक्याचा वाद करून डायरेक्टर बोर्डाला लज्जेने खाली माना घालायला लावले. याच वेळी, कर्नल लाडविकने डायरेक्टरांना पत्र पाठवून कळविले की, ''प्रतापसिंहाने गुन्हा केला, अशी माझी खात्री नव्हती. तरी कमिशनच्या ठरावावर भिन्न मत लिहिण्याऐवजी मी नुसती सही केली, याचा मला आता खेद वाटून पश्चात्ताप होत आहे. यावज्जन्मात ती मी एक मोठी चूक केली, असे मी समजतो.'' हजारो जाहीर व्याख्यानांपैकी रंगो बापूजीचे २ डिसेंबर १८४६ रोज लंडन येथे दिलेले एक महत्त्वाचे व्याख्यान परिशिष्टात दिलेले आहे. त्यात या तर्कटी कमिशनची कारवायी, साक्षीदारांचा फजितवाडा वगैरे सगळ्यात भानगडींची मुद्देसूद भंबेरी उडविली असल्यामुळे, त्याबाबत विशेष पशिलाने येथे जागा अडविण्याचे कारण नाही. कमिशनरनी अंताजी वाघाबद्दल - ''Untajee was a man of the most worthless and unprincipled character, guilty of the grossest prevarication and deceipt, on whom it was impossible to place any reliance.''
(भावार्थ –अंताजी पक्का हलकट नि टग्या. बनवाबनवी आणि लुच्चेगिरीत बिलंद असामी. त्याच्यावर विश्वास ठेवणे फार धोक्याचे.) असे उद्गार नमूद करून ठेवले. पण त्याच हलकटाने उभारलेल्या सुभेदारांच्या कटावर मात्र त्या तीन धूर्तांचा विश्वास बसला! एक गोष्ट मात्र लक्षात घेण्यासारखी झाली. या सर्व फितुरी प्रकरणांचा मूळ उत्पादक आणि सूत्रधार जो बाळाजीपंत नातू त्याचा या चौकशीच्या लांबलचक ताग्याच्या एकाही धाग्यात चुकूनसुद्धा कोठे संदर्भाचा वास लागला नाही. मात्र, अगदीच नाही असे नव्हे. कारण नातूची कसलीच जबानी नसेल, तर कारस्थानाला जोरच लागायचा नाही, मग ती जबानी गुप्त ठेवण्यात आली तरी चालेल. नातूने ज्या जबान्या दिल्या नि कमिशनरानी गुप्त ठेवल्या. त्या पुढे रंगो बापूजीने लंडनला अस्सल दस्तऐवजी उघडकीस आणल्या. त्या अशा –

(1) या बारा महिन्यामागे मला मजकूर समजला की मुधोजी भोसले नागपुराहून काढलेले राजे हल्ली जोतपुरात आहेत. त्याची पत्रे राजास आली व सातारच्या राजानी उत्तरे पाठविली व हैदराबाद व उदेपूर व नागपूर व गोवा (येथे) या कामाचीही तजवीज चालविली आहे. कारण राजाचे मनात आले आहे की आपले राज्य मोठे व्हावे आणि इंग्रेजास या मुलकातून काढून टाकावे आसे आहे. रोज गुदस्त राजाचे बंधु आपासाहेब याणी मला सांगितले की मुधोजी भोसले याची पत्रे महाराजास व सेनापतीस सिवानंद शास्त्री वगैरे याजबरोबर आली. परंतु ती राजानी जालली. त्यास तीन दिवस जाहले (३१-१०-१८३६)

(2) माहाराजाचे तर्फेनी नागो देवराव वैद्य आणि दुसरे लोक गोव्यास जातात येतात. त्याजबराबर माहाराजानी घोडा व पोषाख गोवे गवरनरास पाठविला होता. हा मजकूर कोणा राबर्टसन साहेबास समजाविला. मला साहेबानी सांगितले की माहाराज या कामावरून राज्ये बुडवितील. याजकरिता तुम्ही जाऊन राजास सांगावे की हे काम तुम्ही करिता परंतु या सबबीवरून तुम्हाला बहुत इजा होईल. त्या वेली मी राबर्टसन साहेबास सांगितले की या फितुरीचा मजकूर मी जाऊन माहाराजास सांगितले असता, ही खबर तुम्हास कोठून आली, आसे विचारितील तेव्हा मी सांगेन की साहेबाचे तर्फेनी आली, वगैरे (५-२-१८३८)

नातूच्या जबानीचा हा कागद रंगो बापूजीने डायरेक्टर कोर्टाच्या भरसभेत कर्नल रॉबर्टसनला दाखविताच, तो इतका उसळला की नातूच्या हा हलकट खोटेपणाबद्दल त्याच्या मागच्या पुढच्या बेचाळीस पिढ्यांचा त्याने उद्धार केला.

चौकशीच्या फार्सानंतर

गोविंदराव दिवाणाला एकदम पुण्याला नेले आणि तेथून अहमदनगरच्या तुरुंगात ठेवले. गुन्हा कबूल करावा म्हणून तेथे त्याचे मनस्वी हाल करण्यात आले. महाराजांना जबान्यांच्या नकला देतो म्हणून सांगितले तरी त्या दिल्या नाहीत आणि विलोबी नि ओव्हान्स या शिष्टांना, रिवाजाप्रमाणे, मुंबईला परतण्यापूर्वी, आश्वासन देऊनही, महाराजांना परतभेट न देता, तडक निघून गेले. गवर्नरला सालाबादप्रमाणे, रसिदंटाच्या परवानगीशिवाय, पोषाक पाठविण्याचा प्रघात. तो यंदा लाडविकचा सल्ला घेऊन मुंबईला पाठविला. गवर्नराची भेट झाल्यावर त्याच्या कानावर एकंदर आगळिकीचा तपशील आपल्या प्रतिनिधीने घालावा, हा महाराजांचा हेतू. पण सर ग्रांट न्यायनीतीचे श्राद्ध घालून बसलेला. त्याने पोषाक घेऊन येणाराला तीन महिने मुंबईत लोंबकळत ठेवले आणि अखेर एका सेक्रटरीमार्फत 'पोषाक घेण्याची गवर्नरसाहेबांची मर्जी नाही,' असा उद्धट जबाब देऊन परत पाठविले. यावर

“चपराशा इतका मगदूर राहिला नाही ही गोष्ट बिनतोड आहे.” असे प्रतापसिंहाने आपल्या डायरीत लिहिले.

### और पुरावा मंगटा है

चौकशीच्या फार्सात गोविंदरावाला किंवा महाराजांना एका शब्दानेही विचारले नसता, कमिशनच्या त्रयाणां धूर्तानाम शहाण्यांनी, “महाराजाविरुद्ध केलेले आरोप त्यांनी मुळीच खोडून काढता आले नाहीत.” असा अजिबात खोटा शेरा मारून ठेवण्यात माणुसकीचीही लाज बाळगली नाही. एकतर्फी पुरावा पुरेसा नाही, तेव्हा प्रत्यक्ष प्रतापसिंहाला अडकविण्यासाठी सर ग्रांटाने २४ जुलै १८३६च्या एका महानगुप्त पत्रातच लाडविकला काही सूचना केल्या होत्या. त्या अशा –

‘सुभेदारांनी महाराजांना भेटावे, महाराज, आम्ही या कटाची उभारणी शुद्ध हेतूने केली. पण सारे बेण्ड फुटले. आता आमचा बचाव करा. पळून जावे तर जवळ पैका नाही. निदान आम्हाला दुसरीकडे कोठे नोकरी मिळण्यासाठी हुजूरनी शिक्का मोर्तबाची शिफारसपत्रे तरी द्यावी. महाराजांनी त्यांना पैसा दिला म्हणजे पुरावा भक्कम झाला. शिक्कामोर्तबाचे शिफारसपत्र दिले, तरीही पुरावा पक्का झाला.’ या सूचना अमलात आणण्याची लाडविकला सवड झाली नाही. तरीही चौकशी चालली असता, शिवगुलामसिंगादि तिघांनी लखोटा पोचविण्याच्या निमित्ताने महाराजांची एकांती भेट घेण्याचा ढालगजपणा केला. पण बळवंतराव सेनापतीने त्यांना आंगणातूनच हुसकावून दिले.

### लाडविकची सारवासारव

यानंतर प्रतापसिंह सहाजाकीच उद्विग्न होऊन रसिदंटाला भेटेनासा झाला. १२ नोव्हेंबर १८३६ला बळवंतराव सेनापतीला लाडविक म्हणाला, - ‘संत्री लोकांनी मला आधी कळविले असते, तर मुळातच मी मिटवामिटव केली असती. पण लेकाच्यानी आपल्या पलटणीच्या हापसरांना कळविले आणि त्यांनी वरिष्ठांकडे रिपोर्ट केला. माझा इलाज राहिला नाही. अहो, हल्लीचे हे साहेबलोक पूर्वीच्या अलपिष्टनादिकासारखे थोडेच आहेत! दुस-याला बुडवून सरकारचा फायदा करणारे.’ त्यावर प्रतापसिंह डायरीत म्हणतो - ‘साहेबलोक दिवसेंदिवस आसेच फायदे करणारे यावयाचे. तेव्हा यांची अस्ता धरून तरी उपयोग काय?’ सारांश, प्रतापसिंहाचा हात आंग्रेजी यंत्राच्या दात्यात सापडला. पुढ तो त्यात कसा सफाई चिरडला गेला, हे पहायचे आहे.

## प्रकरण १७ वे

## ओता, ओता आणखी तेल ओता.

गोविंदराव विठ्ठल महाजनी ऊर्फ गोविंदराव दिवाण याला एकाकी कैद केल्यामुळे, प्रतापसिंहाचा एक हातच तोडल्यासारखे झाले. तरीही बळवंतराव मल्हार चिटणिसाने कंबर बांधून, साता-याला चाललेल्या यच्चावत भानगडींच्या माहितीचे कागद रोजच्या रोज तयार करून मुंबईला रंगो बापूजीकडे पाठविण्याचे काम चालू ठेवले होते. रंगोबाने मुंबईला आपल्या वकिलातीचे एक सेक्रेटरिअट हापीसच उघडले होते. डॉक्टर मिल्न, एम्, डी. (प्रेसिडेंट मेडिकल बोर्ड) हा कंपनीचा पेनशनर गोरा अधिकारी रंगोबाला मनोभावाने सहाय देत होता. गुप्त कमिशनचा फार्स, अधिका-यांच्या धरपकडी वगैरे इत्यंभूत तपशिलाच्या तक्रारी डॉ. मिल्न मुंबई गवर्नर आणि कलकत्त्याचे बडेलाट यांच्याकडे स्वतःच्या सहीने पाठवू लागला. कंपनी सरकारच्या एका गो-या अधिकारी पेनशनरानेच हिंदू राजाची बाजू घेऊन अट्टहासाने सरकारशी भांडायला उठावे, हे पाहून सर ग्रांट नि त्याची कोणसिलदारांची प्रभावळ यांची डोकी भणाणली. डॉ. मिल्नने साता-याला भेट देण्याची परवानगी मागितली, ती मुंबई सरकारने नाकारली. रंगो बापूजीने ही सेक्रेटरिअटच्या अंतर्भागातल्या हालचालींची गुप्त बातमी काढण्याची यंत्रेतंत्रे ठाकठीक बसऊन ठेवली होती. त्यांची माहिती सांकेतिक भाषेत तो साता-याला वरचेवर कळवीत असे.

### लाडविकला उखडला.

प्रतापसिंहाची बाजू बळकट आहे आणि तो कलकत्ता अगर लंडनला वकील पाठवून, अगर डॉ. मिल्न सारख्या वजनदार पेनशनराकडून तिकडे लेखी तक्रारी करील, तर राजाला अनुकूळ अशी आलेली डायरेक्टर बोर्डाची उत्तरे आणि सन्मानाची तलवार आपण दाबून ठेवली, हे बेण्ड फुटून आपली नाचक्की होणार, हे सर ग्रांट मि. नातूच्या पचनी पडलेल्या त्याच्या प्रभावळीला चांगले माहीत होते. रसिदंट लाडविक पहावा, तर तो बेटा साधा सरळ गडी. छक्केपंजे त्याला माहीत नाहीत. शिवाय, गुप्त कमिशनची एकतर्फी चौकशी चालली असता, त्याने साक्षीदारांना उलटसुलट प्रश्न विचारून सत्यशोधनाचा प्रयत्न

करताना, कमिशनचा सारा डोल्हाराच उलथण्याचा प्रसंग कसा आणला होता, ते विलोबही नि ओव्हान्सनी नेक नामदारांना खुलाशाने सांगितलेच होते. तेव्हा असला माणूस रसिदंटीच्या जागेवर राहिल्यास. प्रतापसिंहाला चिरडण्याचे आपले कारस्थान तडीला जाणार नाही, हा पोच ठेऊन, सर ग्रांटाने लाडविकला प्रथम प्रकृति बरी नाही अशी सबब लिहून पाठविण्याचा मंत्र दिला. 'माझ्या प्रकृतीला काय धाड झाली आहे? मी खोटा अर्ज करणार नाही.' असे त्याने स्पष्ट सांगितले. पुढे लाडविक एका पत्रात सापडला. त्याने 'हल्ली राजा मला भेटेनासा झाला आहे, त्याचा माझ्यावर भरंसा असलेला दिसत नाही.' अशा मजकुराचे साधे पत्र गवर्नराकडे पाठविताच, तहनाम्यातील राजा-रसिदंट-स्नेहाच्या मुद्यावर बोट ठेऊन, त्याची तडाड बदली केली आणि ओव्हान्सला त्याच्या कामाचा चार्ज घ्यायला रवाना केला. (१४-१५ जून १८३७)

ओव्हान्स म्हणजे रॉबर्ट ग्रांटांचा नि नातूचा पक्का पित्त्या. चाण्डाळचौकडीची साखळी आता अव्वल अखेर बिनतोड जमली परळच्या गवर्नमेण्ट हौसपासून तो थेट साता-याच्या रेसिडेन्सीपर्यंत नातूचे कारस्थानयंत्र बिनअटकाव नि बिनबोभाट चालू झाले. गुप्तचौकशीचे एवढे मोठे नाटक केले. पण अखेर ते अंगावरच शेकणार, तेव्हा त्यातल्या साक्षीदारांच्या मुद्यांना उपयोगी पडतील, असे आणखी दस्तऐवजी पुरावे जमा करण्याची कामगिरी ओव्हान्स आपल्या खिशात घेऊन आला.

भाऊ लेल्यांचे पांढरे उखळ

मुंबई साता-यात ही सरकार दरबारी बाचाबाच चालली असतानाच, भाऊ लेल्याचा बनावट कागदपत्र विकण्याचा 'वेदोक्त' धंदा चालूच होता. ओव्हान्स येण्याच्या सुमारास त्याने छावणीत विंग्रजी शिकायला जाणा-या पांडोबा नावाच्या एका भटाच्या पोरामार्फत, लैन आडजुटंट कॅपटन डराक यांच्याशी वळण बांधून, 'प्रतापसिंहसाहेब मला जमीनजुमला, रोख बक्षिस वगैरे देतील तर राजाच्या फितुरीचे अस्सल कागद मी आणून देतो.' अशी सौद्याची भाषा करून ठेवली होती. ओव्हान्सला हे कळताच, भाऊ लेले मागेल ती रक्कम देऊन, मिळतील तेवढे कागद पैदा करायला त्याने डराकला सांगितले. लेल्याची तोंडओळख नसताही आणि रसिदंटीवर येऊन अवघे २४ तासही झाले असतील नसतील तोच ओव्हान्स लेल्यासारख्या गावगुंडाला कॅ. डराकमार्फत रोख रुपये आणि काम फत्ते झाल्यावर इनान जमीन व रोकड बक्षिसाचे वचनपत्र लिहवून देतो, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

लेल्याची महाराजांवर कुरघोडी

भाऊ लेले एवढेच करून थांबला नाही. थांबणार कसा? श्रीयुत नरसोपंत केळकर ३ आगष्ट १९२०च्या केसरीत चित्पावनांविषयी लिहितात, - ''ते (चित्पावन) स्वावलंबी, मेहनती, कोठेही पुढे घुसणारे, दीर्घ सूचना मनात आणणारे, पण काही अंशी आपल्यापुरते पहाणारे, बुद्धीमान पण संकुचित दिलाचे लोक आहेत.'' बाळाजीपंत नातू काय, कै. विश्वनाथपंत राजवाड्यांचे 'शतकृत्य करणारे अग्रेसर नरपुंगव' चिंतामणराव सांगलीकर काय, अथवा भाऊ लेले, नागो देवराव, किबे, जोशीस वगैरे जवानमर्द ब्राह्मणभाई काय, एकजात सारे नरसोपंतांच्या या व्याख्येत ठाकठीक बसणारे.

कॅ. डराकच्या मार्फत ओव्हान्सकडून भाऊ लेल्याने बनावट फितुरी पत्रांचा सौदा करून १५० रुपये बयाणा घेतलाच. तरीही अमृत गणेश खडमकर नावाच्या एका इसमाला गाठून, त्याने आणखी एक छातीठोक काम केले. अमृतरावाच्या मार्फत त्याने थेट प्रतापसिंह महाराजांनाच निरोप पाठवला की, ''सरकारचे नावची सीक्क्यासुद्धा फितूर प्रकरणी पत्रे तमामा सावकारलोक याजला आज्ञापत्रे गेली. त्यापैकी एकदोन पत्रे माजे जवळ आहेत. परंतु माहाराज सरकारनी याज बाबत बक्षीस रुपये पंचवीस हजार दिल्हे तरी मी देईन. नाहीपेक्षा मी पत्रे इंग्रजी सरकारास दाखवून बक्षिस तिकडून घेईन.'' आहे का नाही भाऊ लेले स्वावलंबी, मेहनती नि कोठेही पुढे घुसणारा?

ओव्हान्सचा सौदा ता. १४ मि. १८ जून १८३७ रोजी झाला. ता. १५ रोजीच त्याने रसिदंटांचा चार्ज घेतला. खडमकराने लेल्याचा निरोप महाराजांना कळवून, ताबडतोब लेल्याला महाराजापुढे उभे केले. चिटणीसाने त्याची जबानी लिहून घेतली. जबानीची नकल रंगो बापूजीकडे मुंबईला रवाना झाली. ती लगेच डॉ. मिल्न यांनी 'बंगाल सरकारचे हुकुमावरून मुंबई कौसलातून ता. १८ सप्टेंबर सन १८३७ चे पत्राबरोबर रवाना केली.' ही बातमी ओव्हान्सला लागताच त्याने लेल्याला एकदम अटक करून काहीतरी नवीन जबान्या लिहून घेतल्या नि मोकळा केला. पण हा बनावट पत्रांचा गडबडगुंडा डॉ. मिल्नमार्फत कलकत्त्यार्यंच पोहचला.

कबुलीजबाबासाठी दिवाणाचा छळ.

गोविंदरावाने गुप्त कमिशनपुढे "फितुरीचा आरोप खोटा बनावट आहे, साक्षीदारांची उलट तपासणी मला करू द्या, तुमचा सगळा व्यूह मी ढासळून दाखवतो," असे स्पष्ट सांगितले. त्यावर, 'नातू म्हणतात तसा जबाब लिहून द्यावा, मुक्तता होईल, शिवाय स्वतंत्र जहागीर इनाम मिळेल.' वगैरे लालूच दाखविली. पण गोविंदराव सत्याला नि खाल्लेल्या अन्नाला पाठ दाखवी ना, म्हणून त्याला पुण्यास नेऊन, तेथेही समजावणीचा प्रयोग करून तो फुकट गेल्यावर त्याला अहमदनगरला नेऊन अंधा-या कोठडीत ठेवले. [अहमदनगरचा किल्ला राजबंद्यांच्या हालअपेष्टेसाठी नाना फडणसाच्या वेळेपासून तो आजदीनतागायत नाठाळ ठरलेला आहे.] चोवीस तास गोविंदरावाला अंधा-या कोठडीत ठेवायचे. पोलिशी समाजवणीसाठी थोडा वेळ बाहेर आणायचे, तेवढाच त्याला सूर्यप्रकाश दिसायचा. गोविंदरावाचा कबुली जबाब मिळाला नाही, तर गुप्त कमिशनच्या उपद्व्यापाचा भंबाळा वाजणार, म्हणून हरप्रयत्न करून तो मिळविण्याच्या सूचना मुंबईहून ओव्हान्सला सारख्या येत असत. हे काम कुशलतेने उरकण्यासाठी ओव्हान्सने साखाराम बल्लाळ महाजनी (गोविंदरावाचा चुलता) हे पात्र हाताशी धरून अह्मदनगरला ठेवले होते. हा सखाराम मयत विठ्ठलपंत महाजनी दिवाण याचा भाऊ. आप्पासाहेब भोसल्याच्या पक्षाला चिकटल्यामुळे, सहाजीकच तो नातूकंपूत सामील झाला. आप्पासाहेब भोसले गादीवर येताच आपल्याला आपल्या मयत भावाची दिवाणगिरी मिळेल, या तुपाच्या आशेने नातूकटाची खरकटी चाटायला सखाराम तयार झाला होता. अहमदनगरचा कलेक्टर हट्ट आणि सखाराम दररोज कबुली जबाबासाठी गोविंदरावची 'पोलिशी' समजूत घालीत होते.

पण 'दीर्घ सूचनावाला' नातू याने गोविंदरावाला अटक झाली तेव्हाच एक कारस्थान रचून ठेवले होते. कृष्णाजी सदाशिव भिडे नावाचा त्याच्या हाताखाली काम केलेला एक पेनशनर गृहस्थ होता. लक्ष्मणपंत शेकदारातर्फे त्याला १२५० रुपये रोख बक्षिस देण्याच्या कराराने बांधून, त्याच्या हाताने, गोविंदरावाची आई गिरजाबाई हिच्या नावाचा एक कबुली जबाब लिहून घेतला नि तो गवर्नरकडे पूर्वीच पाठऊन दिला होता. ओव्हान्स साता-याला निघाला तेव्हा सर ग्रांटाने तो कागद त्याला देऊन, कमिशनचा पुरावा पक्का करायची सूचना दिली. हा कागद कृष्णाजी भिड्याने साता-यास सखाराम महाजनीच्या घरातच बसून लिहिला पण पाठविला मात्र पंढरपुराहून थेट गवर्नराकडे. त्यात महाराजांच्या सगळया फितुरी कामात गोविंदराव होता, त्याने फितुरी पत्रे लिहिली. अशी गिरिजाबाईची कबुली होती आणि तिचा भाऊ विष्णू केशव देवस्थळी याची (खोटी सही करून) साक्ष घातली होती. अर्जावरची तारीख मात्र गोविंदरावाला पुण्याला नेला त्य वेळेला जुळती अशी घातली होती. कारण, गिरजाबाई ही गोविंदरावाला भेटायला पुण्याला गेली होती आणि तेथे तिने त्याच्या संमतीने या अर्जात 'सत्याला स्मरून, अक्कलहुशारीने' फितुरीचा उलगडा केला. असे सिद्ध करायचे होते. साता-यास येताच, ओव्हान्सने या महत्त्वाच्या अर्जाची चौकशी करण्यासाठी कृष्णाजी सदाशिव भिड्याला समोर आणण्याचा नातूला हुकूम केला. लिहिणावळीबद्दल भिड्याला ठरलेल्या १२५० रुपयांपैकी फक्त १५० रुपये देऊन पावती घेतली आणि बाकीचे रुपये नातू, किबे, जोशी कंपूने आपसात वाटून घेतले होते. बाकीसाठी भिडे नातूला वरचेवर भेटायचा. तो काहीतरी थापा देऊन त्याला गप्प बसवायचा. अशा अवस्थेत ओव्हान्सने त्याला बोलाविले. चौकशी करताच त्याने खरे मजकूर स्पष्ट सांगितला. मुख्य साक्षीदारच उलटल्यावर ओव्हान्सची पंचाईत झाली. तेव्हा त्याला लाचलुचपत, धाकदपटशा देऊन, बाजूला बसायला सांगितले. अर्जदार मुख्य गिरजाबाई तरी वळते की काय, हे पहाण्यासाठी ओव्हान्सने तिला भेटीला आणण्याचा बाळाजीपंत किब्याला हुकूम सोडला. आता तर सारेच भांडवल फुटायची वेळ आली. आपल्या नावाने बनावट अर्ज मुंबई सरकारकडे गेल्याची गिरजाबाईला नि देवस्थळीला स्वप्नातही काही कल्पना नव्हती. पण खोटे शिक्के खरे म्हणून लेल्याची रद्दी खरडी ओव्हान्सच्या पदरी बेधडक बांधून त्याला बनविणारे नातू, किबे, जोशी नि महादजी गंगाधर पटवर्धन काय अशा पेचप्रसंगाला जुमानतात! भाऊ लेल्याच्या बनावट कागदांच्या भानगडीत वावरणारी सातारची एक भिकी सोनारीण वेश्या होती. तिलाच त्यांनी पैसे चारून गिरजाबाई बनवून ओव्हान्सपुढे उभी केली आणि अर्जाच्या अस्सलपणाबद्दल साहेब बहादुरांची खात्री पटवली. खात्री का न पटावी? या (तोतया) गिरजाबाईने गोव्याच्या पोर्च्युगीजानी गोविंदरावाला बक्षिस दिलेली एक गोव्याची तलवार, घरातला पुरावा म्हणून, खुदाबंद ओव्हान्सच्या चरणांवर वाहिली.

तिकडे गोविंदरावचा अहमदनगरला अखंड छळ चालू होताच. जीव जाईल तर बरे, इतका तो त्रासला होता. सखाराम काका तर हात धुवून रात्रंदिवस त्याच्या कोठडीच्या दरवाजावरच यमासारखा बसलेला.

अखेर एका दिवशी हट्ट कलेक्टराने लिहून आणलेल्या कागदावर गोविंदरावाची बळजबरीन सही घेण्यात आली आणि सखाराम नि हट्ट साहेबाने सर ग्रांटाची शाबसकी मिळवली.

भिडे नातूवर उलटला.

कृष्णाजी भिडे पुढे पिसाळला आणि त्याने नातू नि ओव्हान्स यांची सगळी कुलांगडी नि लफडी बाहेर काढणारा अर्ज गवर्नराकडे पाठविला. पण नातूचा पल्ला ठेपीचा! तेथे त्याची काय दाद लागणार? भिडे अर्जावर अर्ज करीत होता. नातूला नवलाख शिव्या देत होता. ओव्हान्सला चोर दरवडेखोर ठरवीत होता आणि 'तुमच्या खोडसाळ अर्जाचा विचार करता येत नाही.' असे मुंबईहून त्याला जबाब जात होते. नंतर त्याने या अर्जांच्या नकला रंगो बापूजीकडे मुंबईला नि नंतर लंडनलाही पाठविल्या. त्या त्याने पार्लमेण्टरी पुस्तकांत छापल्या. भिडे याच्या या उलाढालीमुळे ओव्हान्सने त्याला कैदेत टाकले होते. ७ मार्च १८४८च्या पत्रात रंगो बापूजी म्हणतो, 'कैदेत असतानाही पार्लमेण्टकडे अर्ज पाठविता येतो. पण हे जमले नाही तर पुणे मुकामी वार्डीण याजपासी ता. १७ आगष्ट सन १८४४ रोजी मेघःश्याम भट बिन जगनाथ भट ढेकणे इनामदार पेठ शनवार हे भिडे यास मालजामीन आहेत. भिडे याची चौकशी न करिता जबरीने कैद केले असे खास असल्यास, सदरहू भटजींनी पारलमेंटास अर्जी लिहून, त्याजवर पाच अगर तीन साक्षी घालून ती अर्जी आपण (यशवंतराव चिटणिसाने) घेऊन इकडे जलद पाठवावी.'' कृष्णाजी भिड्याच्या या पश्चात्तापदग्ध अर्जाअर्जीबद्दल काही म-हाठी इतिहास लेखक त्याच्या पदरी सत्यप्रियतेची पुण्याई बांधतात, नातूच्या यच्चावत हलकट भानगडी त्याने मुद्यापुराव्यानिशी मुंबई सरकारपुढे मांडल्या, ही गोष्ट खरी. पण ती त्याने का केली! त्याच लिहिणावळीचे ठरलेले १२५० रुपये त्याला मिळाले असते, (म्हणजे येणे बाकी ११०० बुडाली नसती) तर भिडे भटाने हा अर्जाअर्जीचा उपद्व्याप केलाच असता कशाला? दक्षणेच्या कणकेने भटांची तोंडे तेव्हाच बंद होत असतात, हा सनातन धर्म कोणाला माहीत नाही? कृष्णाजी भिड्याची अर्जांची परवड रंगो बापूजीला नातू ओव्हान्सविरुद्ध इतर पुराव्यांबरोबर अस्सल पुरावा म्हणून लंडनच्या अधिका-यांच्या तोंडावर फेकायला छान उपयोगी पडली, एवढे मात्र खरे तेवढ्या पुरते कृष्णाजीपंताचे उपकार मानायला मी तयार आहे.

फत्तरी काळजाचा नातू

आपण उडविलेल्या अनेकमुखी भुतावळींची राजाला पुरी माहिती आहे नि मनातून तो आपल्यावर जळफळत असते, हे पक्के माहीत असतानाही, बाहेरून साळसूदपणाचा आव आणून, ता. २२ मे १८३७ रोजी, नातू बेधडक प्रतापसिंहाच्या भेटीला राजवाड्यात गेला. राजाच्या आगतस्वागताचा भरगच्च हस्तिदंतीने स्वीकार केल्याव चालू राजकारणी मतभेदांबद्दल, गोविंदराव दिवाणाच्या अटकेबद्दल आणि इतर अनेक जिव्हाळयांच्या गोष्टींची बेट्याने एकाद्या संभाविताप्रमाणे चर्चा केली. महाराजही फार जपूनच बोलत होते. शेजारी बळवंतराव चिटणीसही होतेच. ''दिवाणाला अटक करण्यात या शहाण्या रसिदंटाने काय मोक्ष साधला कोण जाणे! अगदी बेकायदेशीर काम केले ते! अहो, पण त्या गवर्नराला तरी काही अक्कल! त्याने तरी चौकशी करायची होती! न्याय, अन्यायाची त्यालाही पर्वा दिसत नाही. छे! वाईट दिवस आले! सध्या माणसाचा या रिसायसतीत काही आबदाब राहिलाच नाही.... जहागिरदारांच्या तंट्यांच्या बाबतीसुद्धा, बळवंतरावजी, आपण आपले तहनाम्याच्या शब्दांवरच जोर द्यावा. इतर विधानांचा विचारच करू नये.'' वगैरे भाषणे नातूने केली. जाताना ''गरिबाच्या घरी पाचवडला महाराजांनी एकदा पायधूळ झाडावी, अशी माझी प्रार्थना आहे. बळवंतराव बरोबर येतीलच. ठीक. बुधवारी तयारीसाठी मी पुढे होतो. मागाहून सूचना येताच महाराजांनी अगत्य येण्याची कृपा करावी.'' असे बोलून फत्तरी काळजाचा नातू जरीचे उपकरणे फडकावीत निघून गेला. ६व्या हेन्री नाटकात शेक्सपियरने रंगविलेली ब्लॉस्टरची भूमिकासुद्धा नातूपुढे फिकटच पडत नाही काय?

बळवंतराव चिटणिसाची उचलबांगडी

महाराजांसमोर लेल्याने जबानी देऊन बनावट पत्रांच्या कटातल्या सर्व लोकांची माहिती दिल्यामुले, नातूकंपू अस्वस्थ झाला. शिवाय रंगो बापूजींकडे चिटणीसाची डाक रोजच्या रोज जातयेत असून, डॉ. मिल्नच्या मार्फत थेट कलकत्त्यापर्यंत इकडील बातम्या जाऊ लागल्यामुळे, ओव्हान्स बेचैन झाला. या सगळ्या झटपट डाकाडाकीचा सूत्रधार चिटणीस तेवढा उखडला की मग प्रतापसिंहपक्षा उघडा पडेल. गोविंदराव दिवाण नि चिटणीस म्हणजे राजाचे डावे उजवे हात. तेच तोडण्याची कारवाई पुरी करण्याचा नातूने ओव्हान्सला सल्ला दिला आणि ता. १ ऑगस्ट १८३७ आषाढ वद्य ३० मंगळवारी पहाटे, बळवंतराव

मल्हार चिटणिसाला अटक करून रेसिडेन्सीत आणले. त्याची हकिकत खुद्द बळवंतरावाच्या शब्दांनीच वाचा –

''साता-यास रेसिदंट वोविन्स साहेब यांनी आम्हास बाळाजीपंत किबे व भालदार पाठवून कैद करून आपले बंगल्याजवळ वेगळा बंगला तेथे नेऊन ठेविले व पाहरा ठेविला. फार इजा केली की एक शिष्या (खिसमतगार) व एक चाकरीचा माणूस जवळ ठेविला. त्यासी बोलू नये. ती माणसे झाड्यास व आंघोळीस गेली असता त्याबराबर शिपायाने जाऊन कोणासही बोलू देऊ नये व घरातून खाना अन्न व कपडे येतील ते उलगडून पहावे व रात्रीस दर तासास पाहा-याचे वेळेस आम्ही शाबूद आहो नाही, हे तोंडावरील पांघरूण उलगडून पहावे. असे करीत दोन महिने पर्यंत सातारचे बंगल्यात ठेविले. बेवीस दिवसापर्यंत आमची काही भेट व बोलणे विचारण केले नाही. नंतर तेविसावे रोजी बोलावून नेले.''

ओव्हान्सने कंपनी सरकारच्या सामर्थ्याचा धाक घालून, छत्रपतीवरील आरोपांना अनुकूल अशी चिटणिसाची जबानी काढण्याचा खूप यत्न केला. लाचलुचपतीची लालुच दाखविली. सर्व काही केले. पण व्यर्थ. मुळातच बाजार खोटा, तेथे ख-याचे खोटे करण्याइतका चिटणीस 'नातू' किंवा 'चिंतामणराव' थोडाच होता? ओव्हान्सच्या दमधाटीला न भिता स्पष्ट जबाब देताना, बळवंतरावाने काढलेले उद्गार त्याच्या घराण्याच्या लौकिकाला साजेशोभेसेच होते. तो म्हणाला - ''वास्तवीक असेल ते जबाब करू. केवळ आपले फायद्यासाठी लबाड बोलून दुस-याचे घरावर आग ठेवणे, हे कधीच व्हावयाचे नाही. आम्ही पुस्त दरपुस्त सात पिढ्यांचे नोकर मातबर आब्रूचे आहोत. केली ही चाकरी दोनी सरकारचे नजरे समोर व पूर्वी वडिलानी सेवा बहुत केली. त्याच बक्षिस व कल्याण हल्ली बेआब होतो, हेच मिळत आहे. खावंदाकरिता होते. विलाज काय?.... लोभामुळे शाई दिवाले हजारो सरकारमेहरबानीकरिता उभे राहतील. आम्हास मजकूर माहित नाही. आमचा गुन्हा फंदफितूर दस्तऐवजी मुद्यानिशी आम्हावर लागू जाल्यास, तोफेची बती आपले हाते अगर दारूचा बदरा आम्ही घेऊ.''

नंतर एकदोन दिवसांनी ओव्हान्सने पुन्हा चिटणिसाला बोलावून नेले. नातूने चिटणीसाला एकांतात गाठून पोलीशी समजून देण्याचा यत्न केला. (परिशिष्ट पहा) नंतर, नातूने पाच पन्नास जबानीपत्रके तयार करून, त्यावर चिटणीसाने मुकाट्याने कबुलीजबाबाच्या सह्या कराव्या, असा पोलिसी बंदोबस्त केला होता. पण चिटणीस नातूच्या बापाचे बारसे जेवलेला त्याने आपल्याला निवांत एकटे बसण्याची सवलत मागितली. ती दिल्यावर. त्याने प्रत्येक जबानीपत्रकातल्या खोडसाळ मजकुराचा खोटेपणा सिद्ध करणारे लांबलांब शेरे भराभर मारून, त्याखाली सह्या ठोकल्या ते कागदाचे पुडके ओव्हान्सच्या हाती दिले.

फितुराच्या प्रकरणात चिटणीसाचे आंग आहेच आहे, हे सिद्ध करताना, ओव्हान्स १७-११-१७३७च्या गुप्त खलित्यात मुंबईला लिहितो की, - ''सबंध म-हाठी साम्राज्याचे धनी महाराज. त्याचे हे राज्य सबंध सलग त्यांना देण्यात येईल, अशी इंग्रेजी वचनाची भाषा, पण अखेर थोडासा प्रांतच महाराजांना देऊन, कंपनी सरकारने वचनभंग केला, अशी चिटणीसानेच चिथावणी देऊन राजाचे मन इंग्रजांविषयी कलुषित केले. ते साम्राज्य परत मिळविण्यासाठी त्याने राजाला या निरनिराळ्या फितुराच्य फंदात गोवले. मुंबईला एजंट ठेवण्याची नि विलायतेला वकील पाठविण्याची शक्कल चिटणीसाचीच, अशी माझी बालंबाल खात्री आहे.''

चिटणीस बधत नाही असे दिसताच, ५० संगीनवाल्या हत्यारी सोजीरांच्या पहा-यात त्याला पुणे येथे रवाना केले. तेथेही त्याचे मन वळविण्यासाठी नातूने दीडदोन तास भेट घेतली. पण चिटणीस निमकहराम नि असत्यवादी होई ना. पुण्याच्या तुरुंगात ता. ३ ऑक्टोबर १८३७ पासून तो २७ सप्टेंबर १८३९ पर्यंत चिटणीसाला ठेवले होते. कैदेत असताना, नातूने चिटणीसाचे वाडे लुटवले, कागदरपत्र जाळले आणि त्या वाड्यात आप्पासाहेब भोसल्याच्या जामखिंडीकर रांडाना बि-हाड करून दिले.

नागो देवरावचा गोवा कट

भाऊ लेल्याच्या जबानीमुळे बनावट पत्रांचे बेण्ड फुटण्याचा प्रसंग आला. तरी धीर खचू न देता, नागो देवराव वैद्य आणि महाशय बाळकोबा तात्या केळकर यांनी सावंतवाडीला बसून, गोवा कटाची उभारणी केली होती, तिकडील साहित्य पैदा करण्याचा नातूने ओव्हान्सला सल्ला दिला. पैकी, नागोबा (आयुर्वेद धन्वंतरी) पेडणे मुकामी रक्ती आवेचा आजार होऊन मेला होता. बाळकोबा केळकर आणि मोरोपंत जोशी कुंदगोळकर यांनी, उमाजी नायकावर बामणी ताण करण्यासाठी, पटाईत भुरट्यांच्या टोळ्या जमऊन, रत्नागिरी सावंतवाजी भागात दरोडे घालण्याचा चालविला होता. खेड तालुक्यातील पाली गावच्या जगन्नाथ दादाजी गोंधळेकर यांच्या वाड्यावर केळकर, जोशीने दरोडा घातला आणि १८३६च्या

नोव्हेंबरात वेंगुर्ल्याचा सरकारी खजिना लुटला. म्हणून रत्नागिरीच्या तुरुंगात हे दोन नातूभगत पडले होते. केळकराशिवाय गोवाकटाचे कागद मिळायचे नाहीत तो तर अटकेत! तेव्हा, ओव्हान्सने कलेक्टर स्पूनर यास निकडीचा खलिता लिहिला की, ''मुंबई सरकारला जरूर असलेले काही महत्त्वाचे कागद, बाळकोबा केळकर याजपाशी आहेत. ते आम्हाला ताबडतोब पाहिजेत. केळकराला माफी देऊन त्याला वाडीला जाण्याची मोकळीक देण्याविषयी सावंतवाडीकरांना लिहा आणि त्याला आमच्या कामदाराबरोबर कागद शिक्क्यांसह सातारला पाठवूनद्या.'' ता. १२ ऑगस्ट १८३७ ला हा खलिता घेऊन दाजी बल्लाळ वैद्य आणि बाळाराम चपराशी वाडीला निघाले. तेथे २४ तारखेला पोहचले. नंतर रत्नागिरीला जाऊन तुरुंगात केळकराची भेट घेतली. तो म्हणाला - ''मी आहे सध्या गुन्ह्यात, कागद नि शिक्के आहेत वाडीला. माझे मेहुणे नागो देवराव वारले. त्यांच्या उत्तरक्रियेला पैसे हवे होते, म्हणून ते कागद शिक्के मी एका मारवाड्याकडे ९०० रुपयाला गहाण टाकले आहेत. इथून मला सोडवा, गहाणाची रकम द्या, म्हणजे झाले.'' दाजी वैद्याने स्पूनरला भेटून त्याला ओव्हान्सचा खलिता दिला. तो केळकराला जामिनावरही सोडायला तयार होऊ ना. वैद्याने सारे राजकारण त्याला सांगितले. तो म्हणाला - ''पत्रापत्री चालू झाली. गवर्नर ग्रांटाने केळकराला साता-याला पाठवण्याचा स्पूनरला हुकूम सोडला.

वाडीला येताना बाळाराम चपराशाने केळकराच्या गहाणाच्या थापेचा छडा लावला आणि कागद शिक्क्याचा सौदा ४०० रुपयाला ठरवला. केळकराने एकदंर ३८ कागद ओव्हानसला आपल्या पुडक्यातून काढून दिले. त्यात ३ पोर्च्युगीज पत्रे होती. शिवाय दोन शिक्के. ओव्हान्सने ४०० रुपये रोख दिले. नातू, किबे, आबा जोशी नि महादोबा पटवर्धन यांनी कागद तपासून ते अस्सल असल्याबद्दल ओव्हान्सची खात्री पटवली. सातारकरांनी गोव्याला नि गोवेकरांनी साता-याला लिहिलेली पत्रे एकाच भटाच्या कोथळीत सापडतात कशी, या मुद्याचा विचार करण्याचे त्यांना कारणच पडले नाही.'' २५ पलटणी पोर्च्युगीजांच्या, १५ फ्रेंचाच्या, शिवाय जर्मनी, ऑस्ट्रिया नि रशियाच्या पलटणी घेऊन गोव्याचे गवर्नर डॉन मॅन्युएल इंग्रेजांना हिंदुस्थानातून हुसकावण्यासाठी, साता-याला येणार.'' असा ११ कलमी तहनामा! आणि तो ठरला कोणाकोणांत? तर म्हणे, राजाधिराज राजे शिवाजी छत्रपति मुकाम सातारा यांचे दरबारी वकील नागो देवराव आणि डॉन मॅन्युएल यांचेमध्ये! सातारी दरबारच्या शिक्क्यातला मजकूर :- श्री राजा शिवाजि छत्रपति आधार हाति जयवंति न तरवार. (शिक्क्यांचे फोटो पहा) वा वा! सातारचे सन १८३९ साली विद्यमान असलेले 'राजे शिवाजी छत्रपति' आणि त्यांचा हा असला विचित्र शिक्का असलेले कागद म्हणजे प्रतापसिंहाच्या फितुरीचा केवढा हो अस्सल पुरावा? शिवाय नातू कंपनीने त्याला अस्सलपणाचा 'वेदोक्त' आशीर्वाद दिलेला! ओव्हान्स तर क्रिस्तानंदात नाचू लागला. ओव्हान्सने लगेच सारे कागद नि शिक्के 'प्रतापसिंहाच्या फितुरीचा अव्वल दर्जाचा पुरावा' म्हणून मुंबईला रवाना केले. सर ग्रांटाने ते आपल्या जोरदार शे-यानिशी कलकत्त्याला धाडले. नातू कंपूने अनेक हरामखोरीची घाणेरडी कर्मे करून स्वकियांचे गळे तर कापलेच, पण कंपनी सरकारच्या अधिका-यांनाही 'बनवून' आपल्या तुंबड्या भरल्या!

**कलकत्त्याने थप्पड दिली.**

सर ग्रांटादि चाण्डाळचौकडी प्रतापसिंह-द्वेषाचा गांजा ठासून तर्र झाली असली, तरी कलकत्ता पुरा शुद्धीवर होता. २ ऑक्टोबर १८३७च्या खलित्यात लॉर्ड ऑक्लण्डचा सेक्रेटरी मॅकनाफटन मुंबईला लिहितो, - ''आक्षेपित फितुराचे आपण पाठविलेले कागदपत्र नि शिक्के पहाता, आम्हाला तर हा सारा अक्कलशून्यतेचा फापटपसारा दिसतो. कोणीही शहाणा त्यावर विश्वास ठेवणार नाही. असल्या क्षुद्र भानगडीत पडण्याइतका सातारचा राजा मूर्ख नाही. शिवाय, या पत्रांत नि शिक्क्यांत प्रतापसिंहाचे नावही आढळत नाही. याचा अर्थ काय? पाठोपाठ पुन्हा ता. १६ ऑक्टोबरला आणखी एक खलिता पाठवून मॅकनाफटन लिहितो, - ''मुंबई सरकारने अशा बिनबुडाच्या घाणेरड्या प्रकरणाचा पराचा कावळा करून एका राजाला बदनाम करावे, लॉर्ड गवर्नर जनरल नि त्यांचे कौन्सिल यांना नामंजूर आहे.''

क्रिस्तभगत बर्ट ग्रांट गवर्नर याची या दोन थपडांनी तर कंबरच खचली. त्याने ३० ऑक्टोबरला बडेलाटाला पत्र लिहिली की, ''हे काम आता असेच अर्धवट टाकल्यास आमच्या सरकारची सगळीकडे नाचक्की होणार आहे.'' एक हिंदी राजा सिंहासनासकट गाडला गेला तरी हरकत नाही, पण ''आमची नाचक्की होईल!'' केवढे हो या आंग्रेजांचे इभ्रत-माहात्म्य!

गवर्नर दिंग्मूढ झाला, तेव्हा मुंबईचे एक कौन्सिलर मि. अण्डरसन यांनी या प्रकणाचा पुरा छडा लावण्यासाठी, सारे कागद नि शिक्के धारवाडचा सुभा मि. डनलप यांच्याकडे पाठवून, त्यात नावानिशी

असलेल्या सर्व लोकांच्या प्रत्यक्ष साक्षी घेण्याचा, इतकेच नव्हे तर आणखी काह पत्रे कोणाकडून मिळत असतील तर ती विकत घेऊन त्यांचा खरेखोटेपणा तपासून कळविण्याचा हुकूम सोडला. त्याने प्रथम संकेश्वरच्या शंकराचार्याला बोलावून आणले. कारण प्रतापसिंहाने गोव्याशी फितुराचे संधान बांधले ते या शंकराचार्याच्या मध्यस्थीने, असे नागो देवरावकडून नातूने सांगलीकराने नि थत्त्याने नाटक केले होते आणि तसे मठाच्या शिक्क्याचे कागदपत्रही तयार केले होते. बिचारा शंकराचार्य! कलेक्टरचा हुकूम येताच घारबला. अखिल हिंदूंचा धर्मगुरू! पण आज त्याला कंपनी सरकारच्या एका मामुली हापसरापुढे हात जोडून उभे राहण्याचा प्रसंग आला! डनलॉपने स्वामीना, एकीकडे नेवून विचारले, - ''स्वामी, हाता गीता गंगोदक घेऊन खरे असेल ते स्पष्ट सांगा. तुमच्या मार्फत साताराच्या राजाची गोव्याला पत्रे गेली आली, हे खरे काय?''

स्वामी –श्रीगीतेची पोथी हातात घेऊन श्रीनारायणाचे शफतपुरसर सांगतो. हे सारे तुफान आम्हावर उभे केले आहे.

डनलॉप –तुम्ही ब्राह्मणांचे गुरु. तुम्हावर तुफान उभे करण्याची सबब काय ती सांगावी.

स्वामी –पुणे वगैरे ठिकाणचे ब्राह्मणांनी बळवंतराव चिटणीस सातारकर व विठ्ठलराव देवाजी बडोदेकर यांचा द्वेष करून प्रभु त्रातीचे धर्माकर्मात तंटा उत्पन्न करून ग्रामण्य केले. त्यात मुख्य चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातू यांच्या म्हणण्यात प्रभू ज्ञातीची कर्मे बंद करावी. परंतु या उभयतांचे द्वेषाचे बोलणे, सबब आम्ही कबूल केले नाही. तेव्हा आम्हावर अशी तुफाने उभी केली. ते वेळी आम्ही लाचार होऊन संस्थानमठास इनामगाव वगैरे आहे हे जप्त होईल या भयामुळे पटवर्धन व नातूनी जे काही सांगितले त्याप्रमाणे कबूल करून पत्रे व यादी दिली. त्या गैरशिस्त असता आम्ही काही न बोलता दिल्या. असा मजकूर जाहला असता, साहेब गोवा आणि सातारचे वगैरे मजकुराची सबब विचारीतात. परंतु हा तुफानाचा मजकूर आम्हाला काही माहीत नाही आणि येविसी साहेबांनी पुरी चौकशी करावी. मी संन्यासी गोसावी. मला या कामाची गरज काय? हे श्रीची शपथ करून सांगतो.

डनलॉप –प्रभूंचे जातीचे खटल्याचा मजकूर ऐकत आहो आणि तुम्हीही कोणास भेऊ नये. पेशजीप्रमाणे तुमचे मठाकडे गावखेडी चालतील. तुम्ही सारे ब्राह्मणाचे गुरु असता तुम्हास बुडविण्याबद्दल हे काम उभे केले. येविसी आम्ही चौकशी केली व तुम्हीहि साफ सांगितले. परंतु या कामात एक दोन खोटे तरकटी माणसे आहेत. याजवर स्वामीनी भरंसा ठेऊ नये.

स्वामी –खोट्याचा सहवास आम्ही करणार नाही.

यानंतर डनलॉपने बाळकोबा केळकर, कुंदगोळकर मोरोपंत जोशी, दाजी बल्लाळ वैद्य, बाळाराम चपराशा, नारायण चितळे, रावजी कोटनीस, खोटे शिक्के करणारा नि पोर्च्युगीज पत्रे नि तहनामा लिहिणारा पेडण्याचा सखाराम कामत आणि तर अनेक लोकांच्या कस्सून तपासण्या घेतल्या. पत्रे नि शिक्के बनावट आहेत, असे कामताने कबूल केले. तर काहीनी ईश्वरसाक्ष कानांवर हात ठेवले. ता. १९-२-१८३८ ला डनलॉपने आपला रिपोर्ट अण्डरसनकडे मुंबईला पाठविला. त्यात तो म्हणतो - ''हे दस्तवेज मिळविण्याच्या कामी फार त्रास पडला, खर्चही झाला नि पुष्कळ बुद्धीही खर्च करावी लागली. तथापि हे कागद नि शिक्के खरे आहेत, असे मला वाटते. डनलॉपने पैदा केलेल्या काही कागदांवर श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान सदाशिव बाजीराव मुख्य प्रधान हा शिक्का होता. तो प्रतापसिंहाचा ठरविणे मूर्खपणाचे होते. राज्याभिषेकाचे वेळी रावबाजीने 'शिक्का बदलेल' या सबबीवर प्रतापसिंहाला त्याच्या बापाचे शाहू नावच पुढे चालविण्याची आज्ञावजा प्रार्थना केली होती, तरी प्रतापसिंहाने हे खोटे शाहू नाव कधीच कोठे वापरले नव्हते. शिवाय, हा सदाशिव बाजीराव मुख्य प्रधान कोण कोठचा? सदाशिव बाजीराव नावाचा कोणीही आसामी भट पेशव्यांच्या घराण्यात जन्माला आला नाही नि मेलाही नाही.''

अण्डरसनने सर्व प्रकरणाचा अभ्यास करून, अखेर निर्णयाचे मिनिट लिहिले की - ''साक्षीदारांच्या जबान्या एकमेकाच्या नाहीत. एकाही कागदात प्रतापसिंहाचे नाव नाही. शिक्का पहावा तर एक शिवाजीच्या नावाचा. सातारच्या गादीवर शिवाजी नावाचा एक राजा (प्रतापसिंहाचा बापाचा दत्तक आजा) थोडे दिवस होता. मूळ म-हाठी राज्य स्थापन करणारा शिवाजी मरून १५९ वर्षे झाली. दुसरा शाहू नि मुख्य प्रधान सदाशिव बाजीराव यांचे शिक्के तर चक्क बनावट आहेत. सारांश, या कागदपत्रांवरून सातारच्या प्रतापसिंहावर कसलाही गुन्हा शाबीत होऊ शकत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.'' अण्डरसनच्या या शे-याने गवर्नर ग्रांट तर सर्दच पडला. पण जातीवंत दुष्टांना कोणताही पेच फार वेळ अटकाव करू शकत नाही. कसे, ते पुढे पहायचेच आहे.

प्रकरण १८ वे

क्रांतिचक्र जोराने गरगरू लागले.

जोधपूरच्या कटाची उभारणी

कटबाज लोक म्हणजे खरोखरच सुताने स्वर्ग गाठणारे जादुगर म्हटले तरी चालतील. या जोधपूर कटाचा धागा नागपूरच्या मुधोजी ऊर्फ आप्पासाहेब भोसल्याशी नेऊन भिडवण्याची कादंबरी रचण्यात आली. या मुधोजी भोसल्याचा इतिहास मोठा रोमांचकारी आहे. इतिहासभास्कर पां. गो. रानडे यांच्या श्री. राजे लक्ष्मणराव भोसले चरित्रातून तो मी सारांशाने येथे देत आहे.

मुधोजीऊर्फ ऊर्फ आप्पासाहेब भोसले अतिशय पराक्रमी नि स्वाभिमानी होता. इंग्रजांचा तो मनस्वी द्वेष करायचा. त्याने फौजफाटा जमवून इंग्रेजांशी नागपूरला चारपाच दिवसांचे तुंबळ युद्ध करून, इंग्रजांची दाणादाण उडवून दिली. परंतु मुधोजीची चुलती बांकाबाई नाठाळ, कारस्थानी होती. तिने इंग्रेजांच्या पाठिंब्याने मुधोजीच्या सैन्यात फितुर केला. खुद्द मुधोजीचा सेनापति महमदअल्लीच आंतून इंग्रेजांना सामील झाला. अर्थात सीताबर्डीच्या लढाईत मुधोजीचा पराभव होऊन, इंग्रेजांनी त्याला कैद केले. (सन १८१८) अलाहाबेदच्या किल्ल्यात कैद करून ठेवण्यासाठी गोरे सैन्य त्याला घेऊन जात असता, वाटेत जबलपुराजवळ तो त्यांच्या हातावर तुरी देऊन निसटला. डोंगरकपारीच्या भागाने गुप्त वेषात चालत चालत तो जोधपुरात आला. तेथल्या महामंदिरात दहा हजार गोरखपंती कानफाटे गोसावी साधू रहात असत. त्यांतच मुधोजी गोसावी म्हणून राहू लागला.

महामंदिर ही जोधपूरच्या राजगुरूची गादी. ती गोरख सांप्रदायी आहे. त्या वेळी जोधपुरच्या राजगादीवर मानसिंहजी आणि महामंदिराच्या गादीवर राजगुरू लक्ष्मीनाथजी होते. मानसिंहजीनी या महामंदिराची एवढी इभ्रत ठेवली होती की तेथे कोणी एकदा नाथमहाराजांच्या आश्रयाला येऊन राहिला की त्याचे कोणतेही अपराध असोत, ते त्याला माफ होत असत. पहिल्याने मुधोजी आपल्याबरोबर एकच मनुष्य घेऊन आपण नागपूरचा एक रजपूत म्हणून नाथजींकडे गेला. पोषाख साधूचा. लक्ष्मीनाथजीचे दर्शन घेतल्यावर त्याला तेथे आश्रय मिळाला. आप्पासाहेबाच्या आंगी दोन उत्कट गुण होते. एक चित्रकला नि दुसरा वैद्यकी. तेथे जाताच त्याने महामंदिराच्या आतल्या बाजूच्य खोल्यांत देवादिकांची चित्रे काढण्याची सुरुवात केली. आश्रमातल्या साधूलोकांना आजारीपणात औषधोपचार चालू केले. कित्येकांचे असाध्य रोग बरे केले. पुढे राजगुरु लक्ष्मीनाथजी हेच भयंकर आजारी पडले असता. आप्पासाहेबाच्या औषधाने ते बरे झाले. त्यामुळे थोड्याच दिवसांत हा (मुधोजी आप्पासाहेब) साधू आश्रमातल्या प्रत्येकजणाचा मोठा प्यार बनला.

इकडे, आप्पासाहेब भोसला फरारी झाला, त्याला पकडून देणाराला मोठमोठी बक्षिसे आंग्रेजांनी जाहीर केली आणि उभ्या हिंदुस्थानात हेरांचे जाळे फैलावले. पण महामंदिरातल्या कोणालाही आप्पासाहेबाचा चुकूनसुद्धा कधी संशय आला नाही, इतकी चोख आपल्या वेषांतराची भूमिका त्याने सांभाळली होती. तो खुशाल निर्भयपणाने तेथे आपला कालक्षेप करीत राहिला.

एका दिवशी महामंदिरात गुरूच्या गादीचा महोत्सव होता. त्यासाठी जोधपुर दरबारची एक नामांकित कलावंतीण तेथे गाण्यासाठी आली. लक्ष्मीनाथजी महाराज आप्पासाहेबांना जवळ घेऊन तिचे गाणे ऐकत बसले. ती कलावंतीण अप्रतिम गाणारी नि अभिनय-चतुर होती. आप्पासाहेब गाण्याचे पक्के दर्दी नि शौकी, चांगले मर्मज्ञ. गाणे अगदी रंगात आले. आप्पासाहेब आपले साधूपण विसरले आणि ती नायकीण तानदारीची कमाल दाखवलीत असताना, अजाणता तिला आपल्या हातातली हि-याची आंगठी बक्षिस देऊन मोकळे झाले. तेथल्या कानफाट्या गोसाव्याना गाण्याची कदर जेवढी, तेवढीच आंगठीची. त्यामुळे या आंगठी प्रकरणाची मुळीच काही चर्चा न होता तो समारंभ आटोपला.

पुढे थोड्याच दिवसांनी ती नायकीण मानसिंग महाराजांच्या दरबारात ती आंगठी बोटात घालून गात नाचत असता, अभिनयाचे वेळी, दिव्यांच्या प्रकाशात तिचा हिरा फार चमकू लागला. मानसिंहाने चौकशी केली, तेव्हा पंधरा दिवसांपूर्वी महामंदिरातल्या एका साधूने ती दिल्याचे तिने सांगितले. मानसिंगाने ती मागून घेतली आणि जोधपुरच्या सराफ कट्ट्यावर पाठवून हि-याची किंमत काय म्हणून विचारले. व्यापा-याला हि-याची किंमत लागेना. कारण इतका बेअयब नि पाणीदार हिरा पूर्वी कधी त्यांनी पाहिलाच नव्हता. मानसिंहाने दोन तर्क बांधले. कोणातरी मोठ्या राजाची ही आंगठी चोरून आणलेली असावी. चोरीची नसेल तर तो साधूच कोणीतरी मोठा राजा असावा. मानसिंगाने स्वतः महामंदिरात जाऊन चौकशी केली. नाथ महाराजांनी आप्पासाहेबाला जवळ बोलावून म्हटले - ''ज्यापक्षी तुम्ही

महामंदिराच्या आश्रमातले आहात, त्यापक्षी तुम्हाला पूर्ण अभय आहे. तुम्ही खरे कोण आहात हे सांगा. तुम्ही सामान्य व्यक्ती आहात, असे आम्हाला वाटत नाही.'' तेव्हा, नाथजीच्या पायावर मस्तक ठेवून, ''नागपूरचे राजे आप्पासाहेब मुधोजी भोसले तो मीच.'' असे सांगितले. मानसिंहाचे आपण राजवाड्यात येऊन राहिले पाहिजे असा फार आग्रह केला. पण 'मी महामंदिर सोडार नाही.' असे स्पष्ट कळविल्यावर महामंदिरात त्याची राजेशाही थाटाने रहाण्याची मानसिंहाने व्यवस्था केली.

थोड्याच दिवसांत ही बातमी आंग्रेज बहादुरांच्या कानावार गेली आणि आप्पासाहेबाला आमच्या ताब्यात द्यावा, असे त्यांनी मानसिंहाला फर्मावले, 'ते महामंदिराच्या आश्रयाला असल्यामुळे, आपल्या ताब्यात देता येणार नाही.' असा त्याने जबाब दिला. आंग्रेज म्हणजे नाकावर माशी बसू द्यायचे नाहीत, तर त्यांना नकार कसा सहन होणार? 'आप्पासाहेब आमचा कैदी आहे नि त्याला तुम्ही आमचा ताब्यात ताबडतोब दिलाच पाहिजे.' असा धमकीवजा निर्वाणीचा खलिता मानसिंहाला आला. मानसिंहाने न डगमगता जबाब दिला की - ''महामंदिराची इभ्रत जर आपण घेऊ इच्छीत असाल, तर त्या इभ्रतीचे रक्षण करण्याकरिता नऊ लाख रजपुतांच्या समशेरी तयार आहेत. आधी ते मरतील नि मग महामंदिर नि तेथले आश्रित साधू तुमच्या ताब्यात येतील. तोवर येथल्या एकाही आश्रिताच्या केसाला धक्का लावण्याची कोणाची शहामत नाही.'' या उत्तराने आंग्रेज बसले गपचीप मनगटे घाशीत नि दातओठ खात.

नंतर बरेच वर्षांनी १५ जुलै १८४० बुधावारी आश्रमातच आप्पासाहेबांचे देहावसान झाले. जोधपुराच्या राजवंशाचे दहनसंस्काराचे स्थान जे 'कागा' तेथे राजचिन्हांनी युक्त आप्पासाहेबाचा दहनविधी होऊन, तेथे छत्री बांधण्यात आली.

नातूकंपूची सुताने स्वर्गावर स्वारी

सन १८३० सालच्या ग्रामण्य प्रकरणात, तंजावर, म्हैसूनर, कोल्हापूर, उदपूर, नागपूर वगैरे ठिकाणच्या भोसलेवंशीय नातेवाईकांत धर्माचार वैदिक पद्धतीने चालतात किंवा कसे, याची चौकशी करण्यासाठी प्रतापसिंहाची पत्रे घेऊन अनेक विद्वान ब्राह्मण पाठविण्यात आले होते. ती पत्रे नि ते ब्राह्मण रसिदंटाच्या सल्ल्याने नि त्याच्याच मार्फतीने गेलेले होते. या वेळी मुधोजी आप्पासाहेब भोसला गोसावी म्हणून जोधपुरच्या महामंदिराच्या आश्रमात राहिलेला होता नि त्याला बाहेरच्या जगाची पर्वा उरलेली नव्हती. मात्र आंग्रेज तेवढे त्याच्यावर डोळा ठेवून बसले होते. नागपुरास अल्पवयी बाजीराव ऊर्फ रघोजी हा दत्तक होता आणि नाठाळ बांकाबाई सारा कारभार स्वतः पहात होती. मुधोजीचे नि तिचे कडवे हाडवैर. म्हणजे नागपुरास मुधेजीचा कसलाही संपर्क शिल्लक राहिलेला नव्हता. वेदोक्ताची चौकशी करण्यासाठी, उदेपुराहून आलेला शिवानंदशास्त्री याला प्रतापसिंहाने नागपुरला धाडले. बस्. तेवढ्या सुताच्या धाग्यावर बाळाजीपंत नातूने जोधपूरच्या तिस-या फितुराचा केवढा मोठा स्वर्ग गाठला पहा. धर्मकारणाचे राजकारण नि राजकराणातच धर्मकारण, राजापूरच्या गंगेप्रमाणे, वाटेल तेव्हा वाटेल तेथे निर्माण करण्याची राजापुरी भटांची शहामत आजही पुष्कळ पहाण्यात येते. प्रतापसिंहाचा एकही ब्राह्मण जोधपुरला गेला नव्हता. शिवानंद फक्त नागपूरला गेला होता. पण मुधोजी भोसले नागपूरचा, एवढ्याच मुद्यावर या कटाचे पाप जोधपुराला नेऊन भिडवण्याची कारवायी झाली. कट काय? तर म्हणे, उत्तर हिंदुस्थानातल्या शिंदे, होळकरादि मंडळींच्या सहायाने, मुधोजी आप्पाला मुक्त करून, इंग्रजांना हिंदुस्थानातून हुसकवाण्याचा कट केला. या धोरणाने कृष्णाजी चिंतामण आगाशे, बाबाजी महिपती, पुरुषोत्तम अनंत आणि (प्रतापसिंहाचे एका वेळचे सातारा किल्ल्यावरचे जेलर) महाशय काशीपंत बंदरे, यांच्या कारकुनी कसबाने शिक्के मोर्तबाची पत्रे, याद्या नि तहनामे तयार करवून, नातूने हे जोधपूर कटाचे वांग्याचे भूत ओव्हान्सपुढे नाचवून, मुंबई सरकारलाही आपल्य बुद्धिचातुर्याने थक्क केले. पलटण-फितूर नि गोवा-फितूर कारस्थाने वेळेला आंगलट आली, तर हे जोधपूर प्रकरणच असे रंगवायचे का त्याच्या रंगात पूर्वीची दोन प्रकरणे अस्सल खरी वाटलीच पाहिजेत, असा नातू कंपूने चंग बांधला होता. लेखी पुरावा भरपूर तयार होता. मुधोजी भोसल्याचे म्हणून एक 'अस्सल' पत्रही जन्माला आणलेले होते. पण दोनचार जिवंत साक्षीदार मिळाले तर बहारच बहार, पैकी शिवानंदाला गाठणे बरेच धोक्याचे होते. आसेतु-हिमाचल फिरलेला नि हजारो गावचे पाणी प्यालेला आदमी तो. त्याची बनवाबनवी करावी, तर तो आपल्यालाच पाणी पाजायचा एवढा पोच नातूला होताच. त्यांनी एका गरीब यात्रेकरू गयावळावरच धाड घातली.

राघोबा गयावळाचा साडेसाती.

जोधपूर कटातला महाराजाविरुद्ध अव्वल दर्जाचा जिवंत साक्षीदार म्हणून नातूकंपूने राघो गोपाळ गयावळ नावाच्या एका यात्रेकरूवरच धाड घातली. महाराष्ट्रातून काशीयात्रेला लोक जमा करून नेणारा गया येथील छोटेलाल वैद्य गयावळ यांचा हा एजंट. नेहमीसारखा श्रीभागीरथीची कावड घेऊन रामेश्वरला जाण्यासाठी आणि परत येताना गयेच्या यात्रेला लोक नेण्यासाठी हा माहुलीला आला होता. माहुलीस त्याच्या बायकोचे माहेर होते. याला मोडी लिहिता वाचता येत नसे. बिचारा सासुरवाडीस थोडीशी विश्रांती घेत पडला आसताना, माघ वद्य १० शके १७५९ ता. २४ फेब्रुवारी सन १८३८ शनिवार रोजी नातूचे ३ जासूद ओव्हान्सचे दोन पट्टेवाले, पंतप्रतिनिधीचा वकील महादजी गंगाधर ऊर्फ दाजीबा पटवर्धन आणि त्यांचे ४ शिपाई, अशा १० असामीनी एकदम घराला वेढा दिला आणि राघोबाची उचलबांगडी केली. त्या बिचा-याला कळेच ना का हा गहजब कशासाठी तो! त्याने पुष्कळ गयावया केली. हात जोडले. शिपायांसकट सगळयांच्या पायावर डोकी घासली. भर उन्हात त्याला पायी फरफटत माहुलीहून रेसिडेन्सीकडे चालविले. विसाव्याच्या मारूतीजवळ थोडी दमछाट तरी मला करू द्या, म्णून त्याने विनवले.

पण दाजीबा पटवर्धनाने पायातल्या जोड्याला हात घालून, ‘खेटराखाली तोंड फोडीन असा दम भरून, राघोबाला घामाघूम अवस्थेत तसाच पुढे रेटीत नेला आणि एकदम ओव्हान्सच्या पुढे उभा केला. ओव्हान्सच्या सल्ल्याने नातूने या राघोबाचे कसकसे धिंडवडे काढले, उपाशी कसे ठेवले, दम कसा भरला, बनावट मोडी कागदांवर गणेश, विष्णु गुणे नावाच्या एका धटिंगणाकडून राघोबाचा हात धरून मोडी सह्या कशा काढून घेतल्या आणि अखेर आधीच जप्त करून बाजूला ठेऊन दिलेल्या त्याच्या कंठाळीतून फितुराच्या पुराव्याचे कागद नातूने कसे काढून दाखविले, हा सारा प्रकार हतभागी राघोबाच्याच शब्दांत वाचकांनी वाचावा. साडे अठरा महिने हकनाहक कैद भोगून सुटल्यानंतर त्याने त्यावेळचा गवर्नर जेम्स रिवेट कारन्यात याला हा अर्ज पाठविलेला आहे –

“मेहरबान गौरनर साहेब, सेवेसी अर्जी राघोबा भट निसबत छोटेलाल वैद्य गयावळ राहणार श्रीक्षेत्र गया प्रांत बंगाल जिल्हे बिहार अर्ज करितो ऐसाजे. आम्ही वैद्य गयावळ याचे मुखत्यार गुमास्ते आहो. या देशात यात्रा न्यावयासी नेहमी येत असतो. येते वेली श्री भागीरथीची कावड घेऊन श्रीश्वेतुबंध रामेश्वरास जात असता, इलाखा सातारा येथे माहुली मुकामी आमची बाइको आपले बापाचे घरी आहे, तेथे मी जाऊन राहिलो. तेथून माघ व।। ३० शके १७५९ ता. २४ फेब्रुवारी सन १८३८ रोजी बालाजीपंत नातू याचे जासूद ३ व रसिदेंट वोविन्स साहेब याचे पटेकरी २ व प्रतिनिधीचा वकील दाजीबा पटवर्धन ऊर्फ माहादाजी गमंगाधर १ व त्याचे सिपाई ४ ऐसे दाह असामी येऊन आम्हास कैद करून रसिदंटापासी बारावर तीन वाजता आणिले. तेथे पाहा-यात कैदेत ठेवून रसिंदट पुसो लागले की माहाराजाकडून तुम्हास पगार पंध्रा रुपये पोहचतो की काये, व महाराजांनी तुम्हास कागद देऊन कोठे पाठविले होते, व फितुराबाबद मजकुर काये ठाऊक आहे तो लिहून द्यावा. त्याजवरून जबाब दिल्हा की आम्ही श्रीक्षेत्र गया येथील उपाध्ये आहो. त्याबाबद माहाराजानी उपाध्येपणाचा कागद मात्र आम्हास लिहून दिल्हा. त्यासिवाय पगार आम्हास पोचत नाही व फितुराबद्दल वगैरे कागदपत्र आम्हास काहीच ठाऊक नाही. असे सांगितले असता रसिदंट साहेब बोलिले की तुम्ही च्यार ४ दिवस येथे राहावे, काही पुसावयाचे आहे. आम्ही जबाब दिल्हा जे आठ दिवस पाहिजे तर राहू. सरकारातून जे पुसणे से ते पुसावे. रसिदंट साहेब याणी बालाजीपंत किबे यासी आमच्या खाण्याचा पिण्याचा बंदोबस्त करावा म्हणोन सांगितले. परंतु आमचा ब्राह्मणधर्म, करिता कैदेत संध्याकाली दूध खाऊन उपोसीत होतो. दुसरे दिवसी रसिदंट साहेब याणी सांगितले की बालाजीपंत नातू व दाजीबा पटवर्धन सांगतील त्याप्रमाणे ऐकावे. त्याजवरून बालाजीपंत नातू व दाजीबा पटवर्धन या दोघांनी आम्हास खोलीत नेऊन सांगो लागले की ज्यपूर जोतपुरचे राजे व सिंदे होलकर गायकवाड याजकडे फितुराबाबद माहाराजानी पत्रे दिल्ही, ती आम्ही पोहचविली, असे तुम्ही कबूल करून लिहून द्यावे, अगर बालासाहेब सेनापति यांचे तरी नाव लिहून द्यावे, म्हणजे रसिदंटसाहेब याजकडून तुम्हास दहा हजार रुपये बक्षीस व एक गाव इनाम देवितो. यांत तुमचे कल्याण आहे. आम्ही जबाब केला की (आपण) थोर मनुष आणि असे सरकारात खोटे लिहून देणेविसी बोलता, हे ठीक नाही. त्याजवरून बालाजीपंत नातू बोलिले की आम्ह सांगतो हे ऐकावे म्हणजे इंग्रेजी सरकार तुम्हावर मेहेरबानी ठेवितील. तूर्त कैदी मंडली आहे. त्याणी आमच्या सांगण्याप्रमाणे लिहून दिल्हे. त्याजवर रसिदंट साहेब याची मर्जी बाहल आहे. त्याप्रमाणे तुम्हावर खुश मर्जी होईल. हे तुम्ही कबूल होत नाही तर तुम्हास काल्या पाण्यावर पाठवू अगर फासी देऊ अथवा बेडी घालून जन्मठेप देऊ, असे भय

घालून लिहून मागो लागले. परंतु आम्हास मुळीच काही ठाऊक नाही, त्यापेक्षा खोटे काय लिहून द्यावे असे बोलिलो. नंतर नातू पटवर्धन याणी आम्हास रसिदंटापाशी आणिले आणि सांगितले की आम्ही सांगितल्याप्रमाणे हे लिहून देत नाही. त्याजवरून रसिदंट साहेब वोविन्स याणी आम्हास धमकी देऊन बहुत घुसा केला की तुम्ही बालाजीपंत नातू सांगतील त्याप्रमाणे लिहून देत नाही तर फासी देऊ अगर काल्या पाण्यावर पाठऊ. हे ऐकिल्यावरून आम्हास जिवाचे भय दिसोन चित्त बेहोष जाहलो आणि मनात विच्यार केला की रसिदंट साहेब सरकारचे कामगार, याचीही नजर बालाजीपंत नातू सांगतील तसे लिहून द्यावे.'' त्यापेक्षा आता काय होणार ते होईल, असे चिंत दिलगीर जाहले. नंतर नातू व पटवर्धन याणी आपला श्वज्ञाती गणेश विष्णु गुणे, कारकून नि।। मंत्री, यासी आणोन रसिदंटाचे समक्ष, रुजु वोविन्स याचे समक्ष, कागद लिहविला. त्याजवर माझी सई करून मागो लागले. आम्ही जबाब केला की कागद कशाचा लिहिलात तो आम्हास ठाऊक नाही. मोडीचे अक्षर आम्हास लिहिता येत नाही. असे सांगत असता पटवर्धन व त्याजबरोबर येक दांडगा, गुण्या, होता. त्याचे नाव आम्हास ठाऊक नाही, या दोघांनी माझे हाती लेखणी देऊन हात धरून अक्षरे काढून घेतली. असे तेरा १३ दिवस पर्यंत दररोज वोविन्स रसिदंट साहेब व नातू व पटवर्धन हे कागद लिहून त्याजवर माझे हाते लेखणी देऊन हात धरून अक्षरे काढून घेत होते व आमची कंठाल (कंठाळी) जप्त करून आणली. त्यांत कागदाचा रुमाल होता. तो वोविन्स साहेब याणी आम्हास दाखविला. परंतु त्यांत कागद कोणी काय घातले व काढून नेले, हे आम्हास कळले नाही. असा जुलूम आम्हावर कैदेत टाकून केला व सिकवीत होते त्याप्रमाणे कबूल न जाहल्यामुळे आम्हास साडे आठरा महिने कैदे ठेविले. रसिदंट साहेब याजपासी दाद न लागे. गौरनर साहेब सर जेम्स कारनाक सातारियास येतात. हे हिंदु रिवाजास वाकबगार व मोठे आकलवान आहेत. चांगली चौकसी करितील, असा भरवसा धरून आम्ही खूष होतो की जसा परमेश्वर तसेच गौरनर साहेब येत आहेत. ते आमची चौकसी करून दाद करतील. परंतु कैदी लोकांची चौकशी काहीच जाहली नाही. इंग्रेजी सरकारात असा जुलूम करून लिहून मागण्याचा कायेदा व दस्तुर नाही. माझी सर्वोपरी नुकसानी जाहली. मोठमोठे यजमान व राजेरजवाडे व जाहगिरदार व संस्थानी याजपासी दक्षणा मागणे व यात्रा नेणेचा उद्योग कर्णे व क्षेत्र गया येथे आमची प्राप्ती मोठी त्याबद्दल मिलोन सुमारे साठ हजार रुपयाची लुकसानी जाहली. याजकरिता गौरनर साहेबापासी ही अर्जी केली आहे व गौरनर साहेब या देशातील रयतेची धणी मालक. तेव्हा या लुकसानीचा जाब आम्ही कोणास पुसावा. याची तजवीज होऊन हुकूम व्हावा व ही अर्जी कौसलात कौश्यल होईल, ते समई मला समक्ष बोलावून दर्याप्ती व्हावी. म्हणजे मजवर बेनाहक वोविन्स रसिदंट याणी बालाजी नारायण नातू व दाजीबा पटवर्धन व बालाजी कासी किबे याच्या सांगण्यावरून जुलूम केला, असी गौरनर साहेब व कौसलदार याची खात्री होईल. गौरनर साहेब दयावंत होऊन, चांगली दर्याप्ती करून माझा भिक्षुक ब्राह्मणाचा बच्याव होणेविसी हुकूम कर्णार खावंद मुखत्यार आहेत. ता. २४ मार्च सन १८४०. सही राघोबा हा। खुद.

ओव्हान्स रसिदंट हा एकपट सैतान तर त्याचे नातू किबे पटवर्धनादि शुंभ निशुंभ शंभरपट हरामखोर. अर्थात् या मानवरूपधारी सर्पाच्या लीला किती जहरी नि फत्तरी काळजाच्या असत, याचे प्रत्यंतर या पत्रावरून चांगलेच दिसून येते. अशी शेकडो पत्रे आहेत आणि त्यातला मनोवृत्तीचा नीचपणा कोणत्याही विवेकी ब्राह्मणाला संताप आणल्याशिवाय राहणार नाही, मग ब्राह्मणेतरांनी शिव्या शापांची लाखोली वाहिली, तर त्याना दोष कसा देता येईल? बिचारा राघोभटजी कारन्याक गवर्नराला परमेश्वर समजला. पण तोहि नातूच्या पचनी पडलेला! सर रॉबर्ट ग्रांट नि नंतर आलेले बहुतेक गवर्नर आपापली माणुसकी नि काळिजे विलायतेला खुंटीला टांगून इकडे येत असत. शिवाय छत्रपति नि त्याचे राज्य नावालासुद्धा शिल्लक ठेवायचे नाही, असाच जेथे ठाम निश्चय ठरलेला, तेथे रसिदंट गवर्नरादि कंपनी सरकारची यंत्रे त्या धोरणानेच फिरायची, एवढी अक्कल त्या वेळच्या हिंदी लोकांना आलेली नव्हती.

### गवर्नर ग्रांटाची 'आंतली गाठ'

नातू किंवा ब्राह्मणकंपू कितीही दुष्ट असला तरी त्यांना दरवेशी मानून स्वतः आस्वलाचा नाच करायला मुंबई सरकारचे गवर्नरादि शहाणे का तयार झाले, हा प्रश्न महत्त्वाचा म्हणून विचार करण्यासारखा आहे. 'जे का स्वार्थ परार्थ हानि करिती' असा दुर्मति पैकी नातू कंपू असला, तरी सर ग्रांट नि त्याची कौन्सिलरांची प्रभावळ तितकीच 'दुर्मति' असल्याशिवाय, या भटांच्या कटबाजीच्या बाजाराला एवढी तेजी येणे शक्य नव्हते. सर ग्रांट वरून जरी मोठ्या धार्मिक सात्विकपणाचे ढोंग माजविणारा होता, तरी पिंडाने तो अर्कट साम्राज्यवादी होता. गुप्त कमिशनच्या चौकशीवर ता. ३० जानेवारी १८३७चा

त्याचा जो शेरा मारलेला आहे, तो पाहिला म्हणजे सातारा राज्याविशयी त्याच्या भावनांची आतील गाठ तेव्हाच उघड होते. तो लिहितो. - ‘‘सातारा पलटणीतल्या फितुराच्या अपराधाने राजाने तहनीम्याचा भंग करून, कंपनी सरकारच्या मैत्रीची बंधने तोडून स्पष्ट कृतघ्नपणाचे वर्तन केले आहे. अर्थात त्याला राज्यावर ठेवणे वा न ठेवणे हा आता चक्क आपल्या मेहरबानीचा प्रश्न झालेला आहे. ब्रिटिश राज्याच्या सलंग मुलुखाच्या सरळ पट्टीत, हे सातारचे राज्य म्हणजे निष्कारण अडगळ आहे आणि ती निर्माण करण्यात (पूर्वीच्या आपल्या मुत्सद्यांची) झालेली चूक सुधारण्याची हीच वेळ आहे, असे इकडच्या मुत्सद्दी मंडळात बोलले जात आहे. तशात हा सातारच्या राज्याच प्रदेश म्हणजे दख्खनचा सर्वात उत्तम सुपीक प्रदेश, तेव्हा आम्हीच निर्माण केलेले हे राजेशाहीचे बाहुले उचकून फेकून देण्याची आत्ताच छान संधी आलेली आहे.’’ तथापि गुप्त कमिशनने केलेली केवळ एकतर्फी चौकशी न्यायाच्या कसोटीला कितपत उतरेल याची शंका सर ग्रांटाच्या मनाला टोचीत असावी. कारण त्याच शे-यात तो म्हणतो - ‘‘मला या प्रकरणी तीन मार्ग सुचतात. (१) सर्व हक्कांसह राजाला पदच्युत करावा, (२) त्याने केलेल्या अपराधाबद्दल त्याची सणसणीत कानउघडणी करून, एकवार त्याला अपराधाची क्षमा करावी, किंवा (३) त्याच्या राज्याचा थोडासा भाग खालसा करून त्याला अद्दल घडवावी. (१) आणि (२) बद्दल मी सध्याच हेका धरू इच्छित नाही. म्हणून (३) त्याच्या मध्यम मार्गाची शिफारस करतो. शिवाय, जोधपूर येथे बंदिवान असलेल्या नागपूरच्या पदच्युत मुधोजी भोसल्याशी प्रतापसिंहाने केलेल्या कारस्थानाच्या शोधनाविषयी आम्ही आग्रा सरकारकडे विचारणा केली आहे. त्यांचा जसा रिपोर्ट येईल, तसा मी सुचविलेल्या तीन मार्गापैकी एक किंवा अनेक मार्ग हाताळण्याचा प्रश्न सोडविणे सोपे होईल.

लाडविकला का हुसकावले, ओव्हान्ससारख्या पाताळयंत्री प्राण्याला रेसिदंट म्हणून साता-याला का पाठविले, गोवा कटाचे पुरावे गोळा करण्यासाठी (शक्य तर तयार करण्यासाठी) त्याला हव्या त्या सवलती का दिल्या, आणि जोधपूरच्य कटासाठीही साहित्य जमविण्याचा सर्वाधिकार ओव्हान्सला का मिळाला, या सर्व ग्रांट-करणीची आतली गाठ वर सारांशाने दिलेल्या त्याच्या शे-यातच स्पष्ट दिसते. या त्याच्या खटपटींना महाराष्ट्रातल्या नातू सांप्रदायिक यज्ञावत चित्पावनांनीच कायावाचामने उचलून धरायचे ठरविल्यावर, प्रतापसिंहाला उखडून, कंपनी सरकारातून अर्ल ऑफ सातार हा बहुमान मिळवूनच मग क्रिस्तवासी होण्याची रॉबर्ट ग्रांटने महत्त्वाकांक्षा बाळगली, यात तो चुकलाच कोठे?

प्रतापसिंहाने मुधोजीला आणि मुधोजीने प्रतापसिंहाला लिहिलेली बरीच बनावट पत्रे आणि गयावळ राघोबा भटाच्या कंठाळीतून, डोंबा-याच्या चलचल मदारी कौशल्याने, काढलेली इतर पत्रे आणि त्याच्य घेतलेल्या अनेक जबान्यांच्या पुराव्यावर जोधपूर कटाचा आरोप सिद्ध करून, ते प्रकरण रसिदंट ओव्हान्सने मुंबईला रवाना केले. गुप्त कमिशनातल्या जबान्यांच्या नकला मागितल्या असताही जशा महाराजांना दिल्या नाहीत, तसे गोवा आणि जोधपूर कटाचे पैदा केलेले पुरावे महाराजांना न दाखवताच, परस्पर रसिदंट आणि गवर्नर त्या पुराव्यांच्या वावड्या कलकत्त्याच्या गवर्नर जनरलपर्यंत फडफडवीत होते. हे पुरावे, गिरजाबाईचे बनावट पत्र, गोविंदराव दिवाणाचा जबरीने घेतलेला कबुली जबाब आणि राघो भटाकडून लिहून घेतलेली सामग्री महाराजांपुढे मांडण्याचे नैतिक धैर्य ओव्हान्सला काय किंवा सर ग्रांटाला काय, थोडेच होते? राजाने तडकाफडकी त्यांचा बनावटपणा सिद्ध करून सा-या कटांचा खोडसाळपणा चव्हाट्यावर फोडून कलकत्ता लंडनपर्यंत निषेधाची एकच हाकाटी केली असती. तेवढे वकिलातीचे साधन त्याने जय्यत तयार ठेवलेच होते. पण कसलीच काही दाद लागू न देता, अंधारात त्याच्य पाठीत खंजीर खुपसण्याचा सर ग्रांटाचा हेतू त्याच्या प्रभावळीतले काळे गोरे अधमाधम सफाईत पार पाडण्याची कसोशी करीत होते.

### कारस्थान ‘राष्ट्रीय’ असावे

ठरावीक धोरणाने उठविलेल्या कारस्थानांच्या नि कटांच्या वावटळींना ‘राष्ट्रीय’ स्वरूप देण्यासाठी, इतर जातींपैकी नि इतर पक्षीय थोडे लोक, आपल्या संप्रदायात लटकावून ठेवण्याचा वरघाटी चळवळया ब्राह्मणांचा प्रघात बाळाजीपंत नातूइतका तरी खास जुना आहे. आंग्रेजांचे नि राजाचे वितुष्ट पाडणे, ही एक बाजू झाली. पक्की बळकट झाली. आणखी चार किंवा तीन बाजूंनी जोरदार शह लावल्याशिवाय ओव्हान्स-नातू कंपूला सुटकाच नव्हती. एक आरोप ढासळला तर दुसरा तिसरा लगेच हाताशी तयार पाहिजे. धार्मिक बाबतीत नातूचे ‘धर्ममार्तण्ड अनभिषिक्त पेशवे’ चिंतामणराव सांगलीकर यांचा भिक्षुकांचा संघ, हातात द्वेषाचे पेटलेले चुडे घेऊन प्रतापसिंहाची होळी करण्याची संधी पहात टपून बसला होता. आप्पा भोसल्याला गादीच्या आशेने फोडून, खुद्द राजवाड्यात यादवीची पोखरण घालण्यात

आलेलीच होती. भोर, जत, अक्कलकोट इत्यादि जहागिरदारांच्या तक्रारींचा विस्तव नातूने अखंड फुलता ठेवलाच होता. शिवाय, बारीकसारीक इनामदार, मठवाले गोसावडे नि त्यांचे ऐतखाऊ शिष्यपोळ यांच्याही टोळया प्रतापसिंहाविरुद्ध हाकाट्या करीत महाराष्ट्रभर मोकाट सुटल्याच होत्या.

हेळगाव पाडळी हे गाव मूळचे महाराजांचे. पण ते रावबाजीने विश्वनाथ नीळकंठ कात्रे नावाच्या आपल्या एका पुजा-याला, महाराजांना न विचारताच, इनाम देऊन टाकले होते. अडाम साहेबाच्या सरव्हे पाहणीत ही भानगड बाहेर येताच, प्रतापसिंहाने ते इनाम रद्द करून गाव खालसा केले. अर्थात कात्रे भटजी महाराजांच्या निंदकांच्या पलटणीत सामील झाला.

गुमानपुरू गोसावी याच्या मठाला काही गावे इनाम होती. दुर्व्यसने नि दुर्वर्तनांनी हा इतका बहकला की लोक अखेर त्याला ठआर मारायला उठले. गुमानगिरी मठ सोडून परागंदा झाला. त्याने पट्टशिष्याची निवड केलेली नव्हती. शिष्यपोळांनी मठ मात्र गजबजलेला होता. जो तो गादीवर नि इनामगावांवर हक्क सांगू लागला. अखेर एक दिवस सगळयांनी एकमेकांची डोकी फोडली. महाराजांनी चौकशी केली, तेव्हा एकालाही आपला हक्क सिद्ध करता येई ना. तेव्हा ती सगळी गावे महाराजांनी स्वराज्यात खालसा करून घेतली. झाले. सारे शिष्यपोळ महाराजांना शिव्याश्राप देत गावोगाव भटकू लागले. ऐतखाऊंची पोळी बंद झाल्यावर त्यांनी बारमास होळीचा शिमगा साजरा करू नये तर काय करावे?

वाळवे तालुक्याला ओझर्डे गावचा इनामदार सरकारात ठरावीक वार्षिक रु. १८० ची. नजर भरीत नसे. अनेक हुकूम त्याने धुडकावल्यावर, महाराजांनी ते इनाम रद्द करून खालसा केले. इनामदार रघुनाथ गोपाळ देशपांडे आणि कात्रे एकजीव एकजिव्ह होऊन प्रतापसिंहाविरुद्ध शिमगा करू लागले. इनामगावे पाहिजेत पण सरकारबाब मात्र द्यायची नाही, अशा वृत्तीचे गुंड इनामदार फार बोकाळले होते. पेशवाई होती तोवर त्यांना कोणी विचारीत नव्हता. 'ब्राह्मण जगतो आहे, जगू द्या.' हे धोरण कायदेबाज प्रतापसिंहाला थोडेच मानवणार? सरकारबाब दिली नाही का इनाम जप्त करण्याचा त्याने तडाका चालू केला. त्यामुळे अनेक इनामदार त्याचे शत्रू बनले आणि नातूकंपूचे मित्र झाले.

या वेळी औन्धांच्या पंतप्रतिनिधी गैरवर्तनाने जहागिरीत हवे ते उत्पात करीत होता. महाराजांच्या हे लक्षात येताच, त्यांनी जहागिरीची व्यवस्था स्वतःच्या कामदारांकडे दिली. प्रतिनिधीच्या व्यसनांवर चैन मारण्यास सोकावलेल्या तेथल्या दरबार-यांना हा सासुरवास पत्करे ना. त्यांनी प्रतिनिधीला चिथाऊन नातूच्या गळयात गळा घालायची शिफारस केली आणि महाराजांविरुद्ध एक फिर्याद ता. १-१२-१८३७ रोजी इंग्रेजीत दाखल केली. असे अनेक तक्रारवाले नि फिर्यादवाले प्रतापसिंहाविरुद्ध उठवून, ओव्हान्स नातू कंपूने राजाला चारी बाजूनी पक्का शह देण्याचा बंदोबस्त केला.

### ग्रांट गवर्नराची अखेरची तंगडझाड

जोधपूर कटाच्या साहित्यात मुधोजी भोसल्याने प्रतापसिंहाला लिहिलेले एक पत्र ओव्हान्सला फार महत्त्वाचे वाटले. गोविंदराव दिवाणाकडून बळजबरीने सही करून घेतलेल्या जबाबाचे गोवा नि पलटणच्या फितूरकटात मुंबई सरकारने जसे फार मोठे नाटक नाचवले. तसे मुधोजीच्या पत्राचेही नाचवले. सर ग्रांटच्या हाती प्रकरण येताच त्याने ता. ३१ मे १८३८ ला कलकत्त्याला खलिता रवाना केला. त्यात तो म्हणतो, ''गोव्याचा नि जोधपूरचा कट असे दोन आरोप राजावर आहेत. यांपैकी एक किंवा दोनीही विशेष भयंकर स्वरूपाचे आहेत असे म्हणता येणार नाही. पण माझ्या मते राजाचा महाभयंकर गुन्हा आपल्या सैन्यातल्या शिपायांना फितूर करण्याचा प्रयत्न केल्याचा होय..... ज्या गुन्ह्यासाठी बाजीरावाला पदच्युत करण्यात आले, त्याच गुन्ह्यासाठी, बाजीरावाच्या शिल्लक दौलतीवर ब्रिटीश सरकारने बसवलेल्या या राजाला तेच शासन करणे अगत्याचे आहे, असे मला वाटते.''

पदच्युतीही शिफारस करतानाही सर ग्रांटाने सातारा राज्याची वासलाद कशी लावावी, याच्याही शिफारशी केल्या. फाशीची शिक्षा झालेल्या इसमाच्या तिरडी मडक्याची तक्याच्या डोळयादेखत तयार करतात, त्यातलाच हा प्रकार होता. सर ग्रांट पुढे म्हणतो - ''या राजाच्या गादीवर त्याच्या भावाला बसवावे, अशी शिफारस मला करवत नाही. तहनाम्याप्रमाणे तसे काही करण्याची आपल्याला जरूरही नाही. तह प्रतापसिंहाशी झाला होता आणि त्याचे फायदे फक्त त्यालाच मिळणारे होते. ते त्याने गमावले आहेत. शिवाय, हे राज्य आपल्या ब्रिटीश मुलुखात मध्येच अडगळीसारखे असल्यामुळे सरळ दळणवळणात नेहमीच अडथळे येतात. तेथे नेहमी तट, भांडणे नि तर्कटे सारखी चालायची. तेव्हा राजाला पदच्युत करताना, हे राज्यच खालसा करावे. राजाने कंपनी सरकारचा विश्वासघात केला, राजद्रोही वर्तन केले

आणि तहनाम्याचा भंग केला म्हणून त्याला पदच्युत करून हे राज्य खालसा करण्यात येत आहे, असा जाहिरनामा काढणे आता अगत्याचे आहे.''

धर्ममार्तंड सर ग्रांट* एवढेच बरळून स्वस्थ बसला नाही. त्याने पोर्च्युगीजांचा गोवा प्रांतही खालसा करून ब्रिटीश राज्याला जोडण्याची गवर्नर जनरलला शिफारस केली. तो लिहितो - ''गोव्याच्या गवर्नरने सातारच्या राजाला लिहिलेल्या का पत्रात सुचविले आहे की 'ब्रिटीश सत्तेला हुसकावण्यासाठी युरपियन मदत आणायला तुम्हाला गोवा हे एकटेच दार मोकळे आहे.' हे गैरसोईचे नि धोका उत्पन्न करणारे दार कायमचे बंद करून टाकण्याची ही आलेली पहिली संधी सरकराने दवडू नये, असे मला वाटते.''

आकाशातल्या बापाचा लेक थडग्यात गेला.

प्रतापसिंहाला पदच्युतीच्या थडग्यात जिवंत गाडलेला पाहून आयुष्याचे सार्थक पाहण्यास उतावीळ झालेला सर ग्रांट ता. ९ जुलै १८३८ रोजी पुण्यानजीक दापोडीला मेला आणि कॅण्टोनमेण्टच्या सेण्ट मेरी चर्चच्या मसणवटीच्या थड-ग्यात शिरला. बिचा-याच्या सा-या आशा अपु-याच राहिल्यामुळे, भूत होऊन तो दापोडीच्या भागात वावरत असतो, असे म्हणतात. त्याच्या जागी त्याचा एक कौन्सिलर मि. फेरीस, अकटिंग गवर्नर म्हणून काम पाहू लागला.

दापोडीचे भूत रॉबर्ट ग्रांटाचेच

जेम्स डुग्लस आपल्या 'बॉम्बे अँड वेस्टर्न इंडिया' ग्रंथात लिहितो की, 'सर बार्टल फ्रियर (१८४७-१८४८ पर्यंतसातारचा रसिदंट, नंतर मुंबईचा गवर्नर) यानी मला प्रथम या भुताची माहिती दिली. त्यांच्या मताने ते भूत मौण्ट स्टुअर्ट एलफिन्सनचे असावे. मी त्यांचे हे मत खोडून काढले. ९ जुलै १८३८ रोजी दापोडीच्या त्याबं गल्यात मेलेल्या सर रॉबर्ट ग्रांटाचेच ते भूत आहे खचित. सातारच्या त्या निरपराध नि सद्‌गुणी (इन्नसेण्ट अँड व्हर्च्युअस) प्रतापसिंह राजाचा याच गळेकापू (ट्रेचरस) गवर्नरने सत्यानाश केला. दुष्ट माणसांची पिशाच्चे आपल्या मृत्यूच्याच जागी वावरत असतात, असा भूतयोनीवर विश्वास ठेवणारांचा अभिप्राय आहे. भुतांवर विश्वास ठएवणारे प्रो. आलफ्रेड रसेल वॉलेस लिहितात की, 'ज्य ज्या ठिकाणी माणसांनी दुष्कर्मे केलेली असतात, त्याच जागांवर ती भुते होऊन सक्तमजुरीच्या कैद्यांसारखी वावरत असतात, त्यांना ती शिक्षाच असते. त्या ठिकाणी ती भुते आपल्या हयातीततील दुष्कर्मांची नाटकासारखी नक्कलही करीत असतात.' या सिद्धांतावरून दापोडीचे भूत सर रॉबर्ट ग्रांटाचेच, याविषयी मला बिलकूल शंका नाही.'

रंगो बापूजी आणि डॉ. मिल्न

महाराजाकडून येतील त्यातक्रारींचे लोण लगेच मुंबई नि कलकत्ता येथे अर्जामागून अर्ज करून पोचविण्याचा  डॉ. मिल्न याने धूमधडाका चालवला होता. या अर्जाचे प्रकरण 'वरून खाली' ओव्हान्सकडे आले का त्यातले मुद्दे खोडता खोडता नि डॉ. मिल्नच्या रोखठोक सवालांना जबाब देताना, बिचारा रडकुंडीला यायचा. अहमदनगरच्या किल्ल्यात गोविंदराव दिवाणाला अतिशय वाईट त-हेने वागविण्यात येते, अशी मिल्नची तक्रार येताच, गवर्नर जनरलने मुंबईच्या मार्फत तेथल्या कलेक्टरचा जाब मगवावा. आंग्रेजी कारभाराच्या पूर्वापार शिरस्त्याप्रमाणे मि. हट्ट याचे उत्तर जायचे की, 'तक्रार खोटी आहे. कैद्याला त्याच्या इतमामाप्रमाणे आणि जेलच्या नियमाप्रमाणे सर्व सोयी देण्यात येत असतात.' सेनाकर्ते दिनकरराव मोहिते याला साता-यात गोविंदरावच्या बरोबरच अटकेत ठेवले होते. त्याच्याविषयी तक्रारीला ओव्हान्सचा तोच जबाब. इंग्रेजी राज्यात अर्जाअर्जीला अटकाव नाही, मात्र कोणी सरकारवर काही दोषारोप करील, तर ते केव्हाही खरे म्हणून सरकार मान्य करणार नाही.

बनावट पत्रवाल्या कटबाजांची धरपकड.

ओव्हान्स नातू कंपूचा परमेश्वर सर ग्रांट थडग्यात गेल्यामुळे, त्यांना फार दुःख झाले. साहजिक आहे ते. राजाविरुद्ध उभारलेल्या अनेक कटांचा सूत्रधारच मातीला मिसळल्यामुळे ते थोडा वेळ स्वस्थच बसले. इकडे १८३८ च्या ऑक्टोबर नोव्हेंबरात महाराजांनी एक छातीठोक पाऊल टाकले. रंगो बापूजीची सूचना विचारत घेऊन, भाऊ लेल्याने नावे सांगितलेल्या सगळया कटबाजांना पकडले नि त्यांच्या जबान्या घेऊन सोडून दिले. 'कोणालाही आम्हाला शिक्षा करायची नाही. फक्त घडला प्रकार ईश्वरसाक्ष सत्याला स्मरून लिहून द्यावा नि निघून जावे. कोणाचाही आम्हाला सूड घ्यायचा नाही. अपराध कबूल करा नि माफीने घरोघर जा.' असे आश्वासन दिल्यावरून, सर्व कटबाजांनी आपापल्या कर्मांचे पुराण स्वदस्तुरच्या सह्यांनी लिहून महाराजांच्या हवाली केले. तेव्हा कोठे आपल्या विरुद्ध कायकाय कारस्थानांचा डोंबाळा ओव्हान्स नातूकंपूने पेटवलेला आहे, याची प्रतापसिंहाला स्वच्छ कल्पना आली. (या जबान्या परिशिष्टात

दिलेल्या आहेत.) त्यांची एक प्रत महाराजांनी रसिदंटामार्फत मुंबई सरकारकडे ता. ४-११-१८३८ रोजी आणि रंगो बापूजीकडे ता. ४/९-१२-१८३८ रोजी पाठवून दिली. सर्व कागदपत्रांच्या इंग्रजी भाषांतराच्या नकला करून, रंगोबाने सयद मीर अफलजअल्ली याला तयार ठेवलेलाच होता. महाराजांची आज्ञा होताच त्याला, मक्केच्या यात्रेला जात आह अशा सबबीवर, जहाजात बसवून, लंडनला रवाना केले. मीर अफलजअल्ली लंडनला दाखल होऊन, डॉ. मिलन्च्या पत्रांनी तेथे ओळखी पाळखी करू लागल्यावर ब-याच दिवसांनी मुंबई सरकारला समजले आणि ओव्हान्स नातूला उमजले का अखेर महाराजांचा एक वकील लंडनला ठाण मांडून बसला.

गांधीलमाशांचे पोळे खवळविले

१८३८ च्या ऑक्टोबर नोव्हेंबरात कटबाजांच्या जबान्या घेण्यापूर्वी, प्रतापसिंहाने एक निष्कारण उपद्व्याप करून ठेवला. त्याच्य सोवळया धार्मिक कल्पनांचा नि क्षत्रियत्वाच्या अट्हासाचा परिचय पूर्वी करून दिलाच आहे. ओव्हान नातू कंपूच्या राजकारणी कटबाजीच्या भानगडी चालल्या असताना, चिंतामणराव सांगलीकरांचे भिक्षुक मंडळ स्वस्थ बसलेले नव्हते. ‘कायस्थ प्रभू हे शूद्राधम आहेत, सोनार हे दैवज्ञ ब्राह्मण नसून शूद्रच आहेत, मराठ्यांना क्षत्रियत्वाचा नि वेदोक्ताचा अधिकार नाही. कारण कोणत्याही ब्राह्मणाने त्याचा किंवा त्याच्या काही पूर्वजाचा वेदोक्त राज्याभिषेक केलेला नाही. त्याला फार तर ‘भोसलेकुलावतंस’ हा मायना लावला येईल.’ अशा चिथावण्यांवर पोथ्या, याद्या नि जाहिरनामे चिंतामणराव सांगलीकराच्या कारखान्यातून शेकड्यांनी बाहेर पडत होते आणि गावोगाव नि खेडोपाडी शेकडो तरुण भटपोळ त्यांचा फैलावा करीत होते. भटांच्या या कावकावीला बंद पाडण्यासाठी, प्रतापसिंहाने आबा पारसनिसाकडून वेदोक्त राज्याभिषेकाची पोथी तयार करून घेतली होती. त्या विधीप्रमाणे १८३८ च्या सप्टेंबरात त्याने स्वतःला वेदोक्त राज्याभिषेक करून घेतला. समारंभाचा थाटमाट वैभवशाली झाला, पण त्यामुळे ब्राह्मणांच्या द्वेषाग्नीवर जी अनेक यंत्रेतंत्रे नातूकंपूने सज्ज ठेवली होती, त्यात या अग्निची भर पडली.

प्रकरण १५ वे

टीप *१ – हा अंतोबा अस्सल चित्पावन टाईप घा-या डोळयांचा असल्यामुळे,
ब-याच ठिकाणी याचा ‘घा-या’ ‘अंतू घारे’ असाही उल्लेख आलेला आहे.

प्रकरण १८ वे

टीप *१ – याच सर रॉबर्ट ग्रांटाची आठवण अजरामर करण्यासाठी मुंबईत त्याच्या नावाने ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज चाललेले आहे. स्मारकाची ही कल्पना काढणा-या शहाण्याला सर ग्रांटाचे कोणते अविस्मरणीय सद्गुण आढळले. ते सांगायला तोही आता मातीला मिसळून माती झाला असेल. या कॉलेजातला अभ्यासक्रम पुरा करणा-या उमेदवारांना पूर्वी एल.एम. अँड एस. अशी पदवी देण्यात येत असे. कित्येकजण या पदवीवर विनोदाने ‘लायसेन्स्ड टु मर्डर अँड स्लॉटर(खून नि हत्या करण्याचा परवानेवाला) अशी कोटी करीत असत. आणि सर ग्रांटाची गवर्नरीची अंमदानी पहाता, त्याच्या नावाने निघालेल्या पाठशाळेतील शिष्यांना मिळणारे हे लायसन वाजवी नव्हते असे कोण म्हणेल? आता ती पदवी बदलून, त्याऐवजी एम. बी. बी.एस. पदवी चालू हे. सर रॉबर्ट ग्रांटाचे चरित्र विचारात घेता, या पुढे मुंबीच्या या कॉलेजाला या गो-या खाटकाचे नाव चालू ठेवणे, आमच्या स्वाभिमानाला नि राष्ट्रीय भावनांना कसे बदनामीकारक आहे, याचा तरुण हिंदी मेडिकल विद्यार्थ्यांनी नि जनतेनेच निर्णय घेतला पाहिजे.

प्रकरण १९ वे

यशवंतराव शिर्के याची लंडन-यात्रा.

सात समुद्र ओलांडून परदेशगमन करण्याविषयी महाराष्ट्रातल्या लोकांची समजूत अजून बरीच मागासलेली होती. रघुनाथराव दादा पेशव्याने एकदा एक ‘आरदाशीर फारशी’ आणि आबा काळे असे दोन वकील विलायतेला पाठविले होते. परत आल्यावर आरदाशीर आग्यारीतल्या अग्निदेवाची विभूति लावून पाक पावन झाला. पण आबा काळे नापाकाच पाक होई ना. धर्ममार्तंडांच्या सभावर सभा भरू लागल्या. विलायतचे आंग्रेजादि म्लेंच्छ सत्ताधारी म्हणून नालदार बुटांसकट उरावर येऊन बसले, तरी धर्मग्रंथात विलायत कोठेच आढळे ना! अखेर शहाण्या भटांनी तोड काढली. आबा काळयाचा पुनर्जन्म ‘केल्याशिवाय(झाल्याशिवाय नव्हे!) केल्याशिवा, त्याची शुद्धी होत नाही. त्यासाठी एक भले मोठे स्त्रीलिंग

तयार केले  आणि त्या नापाक आबा काळयाला त्यातून बाहेर काढल्यावर तो पूर्ववत पाक पवित्र ब्राह्मण बनला! स्त्रीलिंगाचे सोने विधि करणा-या भिक्षुकांनी एकमेकांत वाटून घेतले.

प्रतापसिंहाच्या प्रागतिक वृत्तीला ग्रांटडफच्या सहवासाने बरेच सुधारकी वळण लागलेले होते. विलायत-प्रवासाबद्दल ता. १५-११-१८३०च्या डायरीत तो लिहितो. - ‘राबीसन बो(ल)ले, विलायतेत जावे महाराजानी. पाच लाखात होईल. भाडे १०००००, बाकी सर्व शहरी व बादशा वगैरे ४०००००. आम्ही बो(ल)लो की, न यावे असे नाही. परंतु पैका पाहिजे. व बाकी दिकत नाही, व नाही म्ह(ण)णे आवघड व गेले तरी चिंता नाही. येक धर्मास आवघड. येताना प्रायश्चित घेऊ. मुलूख पाहिलासे होऊन इंग्रज साफी हा फायदा व कामे जाहाली काही, तरी बरेच आहे.’ सन १८३० साली विलायतेला जाण्याचा प्रश्न केवळ चैनीचा, जिज्ञासूणाचा नि हौशीचा होता. पण १८३६ साली तो निकडीचा होऊन बसला होता. १८३८ च्या अखेरीला तर लंडनला वकील गेल्याशिवाय सुटकाच नव्हती. या कामी प्रतापसिंहाने यशवंतराव शिर्के याच्याशी सातारा-मुंबई-लंडनची डाक वेळच्या चालू ठेवावी, अशी योजना, निदान सन १८३६ सालात तरी ठरविलेली दिसते. पण १८३९ सालापर्यंत शिर्के लंडनला जाऊच शकला नाही का, ते आपण याच प्रकरणात पाहू. या अवधीत आणि विशेषतः १८३९ साल उजाडताच, मि. फेरीस कामचलाऊ गवर्नर असताना, सगळयाच धामधुमीची चक्रे बेफाम वेगाने चालू लागली. अशा प्रसंगी रंगो बापूजीसारखा धाडसी नि खटपट्या असामी मुंबईला नुसती खरडेघाशी नि टपालबाजी करीत बसेल, हे संभवते तरी कसे? मुंबईतील थोर थोर हिंदी गृहस्थ, नामदार जगन्नाथ शंकरशेट, जमशेटजी जिजीभाई यांच्यासारखे स्थानिक पुढारी आणि हिंदी लोकांशी समजुतीने नि सहानुभूतीने वागणारे निवडक इंग्रेज गृहस्थ यांच्या तो सारख्या भेटीगाठी घेऊन, सातारा प्रकरणाविषयी त्यांची सहानुभूती मिळविण्यासाठी नेहमी भटकत असे. इतकेच काय, पण ग्रांट गवर्नर मेल्यावर त्याचे नातूकलंकित फेरीस विलोबीसारखे प्रतापसिंहद्रोही लोक सेक्रेटरिएटमध्ये राजाविरुद्ध काय काय कारवाया करीत असत, त्यांचा अंतर्वेध काढण्यासाठी आणि कित्येक गुप्त कागदांच्या नकला मिळविण्यासाठी, रंगो बापूजीने पैशाच्या गिरमिटाने सेक्रटरिएटच्या भिंतीनाही नाजूक भोके पाडून ठेवलेली होती. सन १८३९च्या जानेवारीत जगन्नाथ नाना शंकरशेटच्या भेटीला तो गेला असता, अकल्पितपणे रंगोबाची नि कॅप्टन कोगन या थोर इंग्रज अधिका-याची नानांच्या मध्यस्थीने दोस्ती झाली.

कोगन आणि रंगोबा

कॅपटन रॉबर्ट कोगन लष्करी नोकरीतून निवृत होण्यापूर्वी वर्षे मुंबईतच होता. तेथे त्याची अनेक स्थानिक थोरथोर देशी पुढा-यांशी दोस्ती होती. मुंबई सरकारने निवडक थोर हिंदी गृ-हस्थांना ‘जस्टीस ऑफ ध पीस’ हा हुद्दा देऊन, त्यांना निमसरकारी अधिकारी केले, तेव्हा न्यायदानाच्या कामी जे जेपींचे नवे न्यायालय उघडले गेले, तेथे कॅपटन कोगन याची ‘चेअरमन ऑफ ध बेंच’ म्हणून योजना झाली. त्यावेळी जे. पीं. गृहस्थांचा अधिकार फार मोठा असे. फाशीच्या जागेजवळून एखाज्या जे.पी.ची गाडी नुसती जरी गेली, तरी फासावर चढविलेल्या आरोपीची बिनशर्त सुटका होत असे. इतका मान जे.पी.ना असे म्हणून फाशीची शिक्षा झालेल्या आरोपींचे नातेवाईक नाना शंकरशेट नि जमशेटजी जिजीभाई यांच्या घरी धरणी धरून बसत असत.

कॅपटन कोगनचा नि या थोरथोर जे.पीं.च्या न्यायालयात नित्याचा संबंध आल्यामुळे, हिंदी सच्छील, हिंदी संस्कृती आणि हिंदवी मनाचा सरदारी बाणा यांचा त्याला प्रत्यक्ष परिचय आला नि तो मोठमोठ्या हिंदी पुढा-यांचा आणि प्रतापसिंहादि अनेक देशी राजांचा मोठा चहाता बनला. यानंतर कोगन लंडनला परत गेला. त्याचे अनेक क्षेत्रांतील कामगिरीचे महत्त्व ओळखून खास बादशाही सरकारने त्याला मसकतच्या सुलानाच्या दरबारात महाराणी विक्टोरियाचा कमिशनर आणि सुलतानाच्या दरबारातला प्लेनीपोटेनशियरी (म्हणजे दरबारी वकील) म्हणून नेमले. तो इंग्रजी हुद्दा असा - ‘हर ब्रिटानिक मॅडेस्टिस कमिशनर प्लेनीपोटेनशियरी टु ध कोर्ट ऑफ हिज हायनेस ध सुलतान ऑफ मसकत.’ मसकत हे पूर्व आरबस्थानात असून, त्याची राजधानी आरबी समुद्र नि इराणचे आखातावर ओमन येथे असे. काही सरकारी कामानिमित्त कॅपटन कोगनला झांजीबारला जायचे होते आणि पासपोर्टची व्यवस्था लागेपर्यंत त्याला मुंबईला राहणे प्राप्त होते. या अवधीतच रंगो बापूजीची नि त्याची भेट होऊन दोस्ती जमली.

रंगो बापूजी एकाद्याला चिकटला की गिरमिटाची अवस्था. तशात डॉ. मिल्न निघाला कोगनचा जुना जानीदोस्त. डॉक्टरने मुंबी सरकारच्या कारभा-यांच्या दुष्ट राजकारणाची कोगनला तपशीलवार माहिती दिली आणि रंगोबाच्या खटपटींना कळकळीचा पाठिंबा देण्याविषयी त्याला आग्रहाची विनंती केली.

कोगननेही रंगोबाला अंतर देणार नाही अशी डॉ. मिल्नला शपथ दिली. मुंबईला रहात असलेल्या दोनतीन प्रतिष्ठित मसकती आरबांचा नि रंगोबाचा त्याने परिचय करून दिला. रंगो बापूजी, डॉ. मिल्न, कोगन आण ते अरब गृहस्थ मुंबईभर एकाच गाडीतून फिरताना पाहून, गुप्तक पोलिसांनी सरकारात बातमी दिली. आधीच डॉ. मिल्नसारख्या प्रतिष्ठित इंग्रेज पेनशनराचे प्रतापसिंहाला मिळालेले पाठबळ मुंबई सरकारच्या डोळयात सलतच होते. तशात आणखी हा (आता खुद्द बादशाही उच्च हुद्यावर चढलेला लष्करी पेनशनर) कॅपटन कोगन या लाल पागोटीवाल्या रंगो बापूजीने बगलेत मारला तर आपल्या दुष्कर्मांची बोंबाबोंब थेट डायरेक्टर कोर्टापर्यंत, कदाचित विक्टोरिया महाराणीपर्यंतही जाण्याचा संभव फार! परळच्या गवर्मेण्ट हाऊसमध्ये गुप्त खात्याच्या वरिष्ठ अधिका-यांची खलबते चालू झाली. अचानक १ मार्च १८३९ शुक्रवारी सकाळी कोगनसाहेब न्याहारी घेत असताना, पोलिशी घोडेस्वाराने त्याला एक खलिता आणून दिला. 'सिक्रेट डिपार्टमेंट, मुंबई कोर्ट, ता. २८ फेब्रुवारी १८३९' च्या या खलित्यावर, जे. पी. विलोबी, सेक्रेटरी, याची सही होती, पत्राचा सारांश असा –

''आपण या प्रांतात आल्यापासून, बॉम्बे मेडिकल बोर्डाचे माजी अध्यक्ष डॉक्टर मिल्न आणि सातारच्या राजाचा एक देशी एजंट यांच्याशी, दोन सरकरांत चाललेल्या काही भानगडीबद्दल, सहविचार करीत आहाता, असे या सरकारच्या नजरेत आलेले आहे. सातारच्य राजाने ब्रिटीश सरकारविरुद्ध अनेक कट रचलेले आहेत. आपण बादशाही सरकारचे मोठे प्रातनिधिक अधिकारी आहात. आपण असल्या भानगडीत लक्ष घालू नये, असे सुचविणे आम्हाला योग्य वाटते.''

कॅपटन कोगनने विलोबीला डावलून खुद्द फेरीसच्या नावानेच ताबडतोब जबाब दिला की, 'माझी नि डॉ. मिल्नची ओळख फारा वर्षांची आहे. सातारच्या राजाचे एजंटही मला भेटतात. पण तेवढ्यावरून मी तुम्हा परस्पर सरकारातल्या गुप्त भानगडीत ढवळाडल करीत आहे, असा माझ्यावर आरोप करताना तुम्ही दहा अंक मोजणे जरूरीचे होते. माझ्या अधिकाराची पायरी मी ओळखून आहे. पण तुमच्या पत्राची भाषा पाहिली तर तुम्ही मात्र ती ओळखली नाहीत, असे मी म्हणतो.' या पत्राला नुसती पोच आली आणि कोगन झांजीबारला निघून गेला.

ता. २८ जून १८३९ रोजी तो मसकतला जाण्यासाठी परत मुंबईला आला. त्यापूर्वी यशवंतराव शिर्के याच्या लंडन –प्रयाणाच्या काय काय भानगडी झाल्या, त्या आपण आता पाहिल्या पाहिजेत. त्याला लंडनला रवाना केल्यावर मग आपण पुन्हा कॅपटन कोगनच्या भेटीला मुंबईला परत येऊ.

यशवंतराव राजे शिर्के

क्षत्रिय मराठा समाजात समशेरीचा पराक्रम त्रिलोकविश्रुत आहे. पण समशेरबहाद्दरीच्या जोडीने कलमबहाद्दरी गाजविणारा मराठा बच्चा यशवंतराव शिर्क्याशिवाय दुसरा आढळत नाही. हा 'शिरकाण' केलेल्या विख्यात शिर्के घराण्यातला प्रतापसिंहाचा मामेभाऊ. याच्या भाऊबंदकीचे तंटेबखेडे फारच असत. या बखेड्यांच्या पायी एका घराण्याची अनेक घराणी झाली नि ती नेहमी एकमेकाना पाण्यात पहात असत. यशवंतराव फार टापटिपीचा, सरळ पण संशयखोर मनाचा गृहस्थ दिसतो. याने लिहून ठेवलेली स्मरण वही अनेक दृष्टींनी फार महत्त्वाची आहे. त्याचे मोडी अक्षर वळमदार नि प्रेक्षणीय आहे. लिहिण्याची सफाई, शोध घालण्याची पद्धती नि बारीकसारीक मजकूर मनमोकळया दिलाने तपशीलवार लिहून ठेवण्याची दक्षता वाखाणण्यासारखी आहे. शिर्क्याने आपल्या स्मरण वहीत भाऊबंदकीची अनेक त्रांगडी, त्यांचा पूर्वापार संबंध, नि त्यांचे परिणाम मुद्देसूद तारीख मितीवार लिहून ठेवले आहेत. या भाऊबंदकीची रडकथा लिहीत असतानाच, छत्रपति प्रतापसिंहाने त्याला विलायतेला जाण्याला सांगितले. अर्थात भाऊबंदकीचे पुराण तसेच राहून, पुढे विलायत-पुराण सुरू झाले. हे सुद्धा यशवंतरावाने मोठे मार्मिक नि शोधक दृष्टीने लिहून ठेवले आहे. त्यावर त्याची टापटीप मते नि स्वभाव चांगली समजतात.

शिर्क्याची भाऊबंदकी म्हणजे एक मोठे भयकंर प्रकरणच. त्यात फसवाफसवी, ठोकाठोकी, मारामारी, जाळपोळ, लूटमार, खून नि रक्तपात या सगळयांचा भरपूर समावेश झालेला दिसतो. याचा परिणाम यशवंतरावाच्या स्वभावावर विपरीत होऊन, तो जात्या धाडसी नि उमदा असूनही, अत्यंत चिडचिड्या, संशयी आणि कोणावर सहसा विश्वास ठेविनासा झाला. जिकडे तिकडे त्याला विश्वासघात दिसायचा. त्यामुळे त्याच्याबरोबर काम करणा-या अनेक लोकांवर संशयीपणाने त्याने अनेक आरोप केले. प्रत्येक गोष्ट मी स्वतः करीन, तो अमका तमका माणूस काम करीलच कशावरून? अमकी रकम त्याला तुम्ही दिली का स्वतःच हबकली? पावती का नाही? एकादे सरकारी काम मुकाट्याने करून घेण्यासाठी दिलेल्या 'चायपान्या'चीही पावती त्याला लागे. रंगो बापूजीने मुंबईस काही आरब मित्रांचा स्नेह जोडला होता

आणि नित्य सहवासाने तो त्यांच्याशी आरबी भाषेतही बोलत असे. यशवंतरावच्या समक्ष असे आरबी भाषण झाले का 'रंगो बापूजीने या परक्या आरबाना माझ्याविषयी काय सांगितले कोण जाणे?' अशा संशयाने तो व्यग्र व्हायचा. यामुळे विलायतेला जाण्यासाठी छत्रपतीनी त्याची जून १८३६ मध्य रवानगी केली, तरी १९ मार्च १८३९पर्यंत त्याचा पाय मुंबईहून निघाला नाही. या मुदतीतसुद्धा त्याच्या भाऊबंदकीची लफडी अखंड चालूच होती आणि तो अनेक वेळी घरी सिंदला जायचा. तेथून साता-याला यायचा नि मुहूर्त पाहून मुंबईला जायचा. याविषयी यशवंतरावच स्मरणवहीत काय लिहितो, ते वाचणे मनोरंजक आहे.

''नंतर सरकारानी सांगितले की तुमची व आणखी मंडळीची नेमणूक विलायतेस जाण्याची केली आहे. तर तुम्ही येथून निघोन मुंबईस कागपत्रसुधा घेऊन जावे आणि तेथे मीर आफजल आली मुसलमान विलायतेस जावून आलाला माहीतगार आहे. त्याची भेट घेऊन तुमचे त्याचे विच्यारे पुढे विलायतेस जाण्याचा बेत ठरवावा. म्हणोन उभयता बंधू सरकारानी सर्वत्र मंडळी जवल असता आज्ञा केली. व विलायेस पाठवावयाचे काय कारण, ते कागदपत्र तयार जाहले होते, ते दाखविले आणि जेष्टमासी व।। १३ सके १७५८ व सन १८३६ जून* सुक्रवार रोजी मुहूर्त पाहून निघते समई जी मंडळी निघणार ती रंगो बापूजी व हणमंतराव दलवी कोकणात विन्हेर येथे राहाणार याच्या आमच्या समंक्षता केल्या. व उभेयता बंधूसरकार श्री देवीसरकार येथे उभे राहून त्या कागदाचा रुमाल श्रीचे पुढे ठेविला आणि आम्हास उचलावयास सांगितला की कोणतीही प्रर्तणा (प्रतारणा) करू नये. श्रीस स्मरोन वागावे. म्हणो शफती घेतल्यादाखल केले. नंतर विडे सरकारानी उभयतानी देऊन ते कागदपत्र व खर्चाससुधा मुंबईकडे रवानगी केली. व वस्त्रेही आधले रोजीच दिल्ही होती. विलायतेस बोलणार पाठवावयाचे कारण की पेशजीचे तहनाम्याचे वहिवाटीस फरक इंग्रजी सरकारचे कामगारांनी आणिला स।। त्याचा बंदोबस्त विलायतेहून करावयाचा म्हणोन.''

यशवंतराव मुंबईला आल्यावर जहाज मिळण्याची वगैरे व्यवस्था लवकर लागे ना. मुंबईहून वाफेची पहिली आगबोट २० मार्च १८३० रोजी सुएजकडे जाण्याचा समारंभ झाला होता. त्यात फक्त व्यापारी माल नि सरकारी टपाल पाठविले होते. आगीने पाण्याची वाफ करून त्यावर गलबते चालविण्याच्या गो-या लोकांच्या भुताटकीवर हिंदी प्रवाशांचा विश्वास नसे. शिवाय आताच्या पी. अँड ओ. कंपनीसारखी संस्था त्यावेळी नव्हती. कोणातरी व्यापा-याच्या मेहेरबानीने भरंसाट पैसे देऊन प्रवासापुरते जहाज किंवा जहाजातली थोडीशी जागा भाड्याने विकत घ्यावी लागत असे. जहाजासाठी बरोबरची मंडळी ज्या खटपटी करीत, त्यावर यशवंतरावचा विश्वास बसायचा नाही. कोठे थोडी चिरमिरी दिली, का हा एकदम उस्तळायचा नि म्हणायचा ही पैशाची उधळपट्टी. सगळ्या गोष्टी सरळ नि सहज घडून याव्या, त्यात आत बाहेर उघड गुप्त काही नसावे ही त्याची मनाची ठेवण. परिस्थितीप्रमाणे आचारविचारांत बदल करायची वृत्तीच नाही. त्यामुळे रंगो बापूजी, भगवंतराव विठ्ठल चिटणीस आणि हणमंतराव दळवी वगैरे मंडळी कंटाळून गेली. प्रत्येक वेळेला संशय नि बेविश्वास. 'मला तुझ्याबरोबर विलायतेला येण्याचे जमणार नाही, जा जाऊन सांग महाराजांना.' असे म्हणून हणमंतराव आपल्या गावी परत गेला.

शिवाय, यशवंतरावाची भाऊबंदकी कोठे स्वस्थ बसली होती? मुंबईलाही ती त्याचा पिच्छा पुरवीतच होती. म्हणून तो विलायतेचा बेत रद्द करून अनेक वेळा मुंबईहून सिंदाला, सिंदाहून साता-याला, तेथून पुन्हा मुहूर्त पाहून मुंबईला, अशा सारख्या येरझारा घधालीत होता. इकडे पहावे तो नातूप्रकरणाला चांगला कढ येऊन ते अनेक बटाट्यांना शिजवू लागले. पहिल्या धडाक्याला 'गोविंदराव फडणीस दिवाम याजवर रसिदंटानी फितुराचे तुफान विलायतेस जाणारे निघाले सबब उभे करून शके १७५८ भाद्रपत व।। १२ रोजी बोलावून नेऊन कापात कैद करून ठेविले.' सर्वत्र आणखीही धरपकड सुरू झाल्यामुळे छत्रपतींनी 'तुम्ही पुणीयास जाऊन तेथे स्वस्त राहावे' असे यशवंतरावास सांगितले 'म्हणोन सातारियाहून फालगुण मासी शके १७५८ या साली निघोन पुणीयात येऊन च्यार पांच महिने राहिलो. त्यावर महाराजाकडून बोलावणे आले की जलद सातारियास येणे. त्यावरून निघोन आशाढ व।। ११ शके १७५९ या रोजी (२८ जुलै १८३७) सातारियास पोहचलो. सातारियास पोहचताच माहाराज सरकारची भेट घेतली. तेव्हा सरकार बोलले की आमचे दुस्मानदार लोकांनी आमची व कुंपणी सरकारची तेड हाकनाहक दिवसेंदिवस फार वाढविली. त्याविसि डाकटर मिलन बोलण्याच घातला. परंतु त्याच्याने काही होत नाही व दुसरीही पुस्कल मेहनत त्याची आमची सफाई होण्याविसी करीत आहो. परंतु इंग्रजी सरकारातून गोविंदराव धरल्यापासून आमचेकडील यादीपत्राचा जबाब काहीच येत नाही. तेणेकरून पुढे

कोणते वेलेस काय होईलयाचा नेम लागत नाही. यास्तव.... तुम्ही विलायतेस निघोन जाण्याचे केल्यास आम्हास पुढील कामाचा भरवसा वाटेल.'

पुन्हा आणाशपथा, प्रतिज्ञा, सुमुहूर्त वगैरे होऊन शिर्के मुंबईला आला. रंगो बापूजी नि भगवंतराव विठ्ठल यांनी खटपटी करून 'उलमारDe Ulma नावाच्या एका फ्रेंच कप्तानाला मथवून त्याचे 'जॉर्ज कुबेर' नावाचे जहाज शिर्के भगवंतरावच्या लंडन-प्रवासासाठी ठरवून ठेवले. यशवंतराव लिहितो - 'त्याची तारीख माघ अखेरीस फेब्रुवारी महिन्यात निघावयाची होती. ती आम्हास उलमार याणे सांगितले. तेव्हा इकडे आमचाही सरंजाम वगे तयारी बहुतेक आटपली होती व दुभाशी जवळ पाहिजे म्हणोन पेशजी महाराजांनी नरसिंराव मुनसी पाठविला होता तो चोंगला नहुता. म्हणोन व त्याचे गुण नीट नसोन त्याचे मनात जावयाचे नहुते. सबब परत गेला होता. त्या बद्दल फिरंगी करस्ताव पेट्रो लोरेस देमोत यास दरमहा करून ठेविला.'

जहाजात **'आक्षेपार्ह माल'** सापडला.

यशवंतराव सरंजामाच्या तयारीत मग्न होण्याच्या आधी कितीतरी महिने त्याच्या लंडनप्रयाणाला बंदी करण्याचे सरकारी कारस्थान शिजत होते. २८ नोव्हेंबर १८३८ रोजीच ओव्हान्सने मुंबईला लिहून कळविले की 'मुंबईला एक डेलमूर नावाचा फ्रेंच गृहस्थ आहे. त्याच्या जहाजावरून महाराजांनी लंडनला आपले वकील पाठविण्याची मसलत केलेली आहे. सबब सावधान.' आंग्रेजी कारभाराच्या शिस्तीप्रमाणे अँक्टिंग गवर्नर मि. फेरीस, त्याचे सल्लागार आणि सातारा रसिदंटी मंडळ यांच्यात गुप्त लेखालेखी होऊन, मुंबईत मोठ्या उत्साहाने वावरणा-या यशवंतराव रंगोबा प्रभृति वकिलांवर नजर ठेवणारे सरकारी पाळत्ये, सावलीसारखे त्यांच्या मागावर राहिले. ८ प्रवाशांचे भाडे साडेपाचशे पौंड म्हणजे साडेपाच हजार रुपये डेलमूर ऊर्फ उलमार याला भरून त्याची पावती यशवंतरावने घेतलेली. आता काय, ठरल्या दिवशी आपण जहाजात बसून लंडनला जाणार, यात शंका कसली?

अखेर तो दिवस उजाडला. यशवंतराव शिर्के, भगवतराव विठ्ठल, चिटकोजी सुर्वे आणि त्यांचे ५ मदनीस नोकर धक्क्यावर रंगो बापूजीचा नि डॉ. मिल्नचा निरोप घेऊन होड्यात बसले आणि जॉर्ज कुबेर जहाजात जाऊन, आपले बाड बिस्तर लाऊ लागले. पण जहाजाचा मालक कपतान उलमार कोठे आहे? तो येईल तेव्हा जहाज बंदरातून बाहेर पडणार. इकडे धक्क्यावर मुंबईचे कस्टम नि पोलीस अधिकारी आणि उलमार यांच्यात बाचाबाची चालू. ते त्याला बंदराबाहेर पडण्याचा दस्कत (पासपोर्ट) देईनात. 'तुमच्या जहाजावर 'ऑब्जेक्शनेबल गुड्ज(आक्षेपार्ह माल) आहे, तो उतरून टाका नि मग जा कोठे जायचे ते.' उलमारच्याही डोक्यात काही उजेड पडे ना. अखेर पोलिसांनी प्रवाशांची यादी दाखवून, हे आठ हिंदू प्रवाशी सरकारचे आरोपी आहेत. त्यांची पुष्कळ चौकशी व्हायची आहे. सबब ते आमच्या हवाली धक्क्यावर आले की तुमचा मार्ग मोकळा, असा खुलासा केला. उलमार नि पोलीस जहाजावर चढले. 'तुम्ही पोलिसांची काय भआनगड आहे ती मिटवा, तुमच्यासाठी आज जहाज न हाकारता आणखी पाच सहा दिवस मी थांबतो, तुम्ही सारे धक्क्यावर जा.' असे उलमारने यशवंतरावास सांगितले आणि त्या आठही जणांना होड्यात बसवून परत पाठविले. आधीच यशवंतराव चिडखोर, तशात ही ऐन प्रयाणाच्या क्षणाला निघालेली भलतीच पेचदार भानगड पाहून तो भयंकर संतापला. धक्क्यावर येताच त्यांच्यामागे पोलिशी चौकशीचा ससेमिरा लागला. रोजच्या रोज आठ जणांच्या वेगवेगळया जाबजबान्या, हेलपाटे नि अर्जाअर्जी. इकडे तब्बल एक आठवडा वाट पाहून उलमाराने यशवंतरावादि  मंडळींचे सारे प्रवासाचे सामान धक्क्यावर त्यांच्या नोकरांच्या ताब्यात देऊन तो जहबाज घेऊन निघून गेला. भाड्याच पैसे गेले पाण्यात! मुंबईच्या मॅजिस्ट्रेटाने यशवंतराव, भगवंतराव, सुर्वे यांना पोलीस कोठड्यात कैद केले. मोठमोठ्या रकमांचा जामीन घेतल्यावर मुक्त केले. सरकारी परवान्याशिवाय कोठे जाऊ नये, असा मनाई हुकूम बजावला. 'साता-याला लिहून गेले आहे. तिकडील रसिदंटाचे जसे लिहून येईल, तसा तुमच्या प्रकरणाचा मुंबई सरकार विचार करील.' एवढ्यावर त्यांना मुंबईत रिकामे लोंबकळत ठेवले. (या वकिलांना कसकसा त्रास दिला, त्याचा तारीखवार तपशील, परिशिष्टांत छापलेल्या रंगो बापूजीच्या पार्लमेंटापुढील व्याख्यानात असल्यामुळे, येथे जागा न आडवता पुढे जातो.)

या भानगडीच्या बरोबरीने यशवंतरावाच्या भाईबंदकीची खट्याळ लफडी जोरात चालू होती. यशवंतराव अझून मुंबईलाच आहे, हे समजताच त्याच्या वडिलाने सिंदास येण्याचे त्याला पत्र लिहिले. झाले. यशवंतराव पुन्हा घरी परत. ओव्हान्सच्या खलित्याला महाराजानी स्पष्ट दिलेला जबाब मुंबईला आल्याचे कळल्यावरून, रंगो बापूजीने यशवंतरावाला मुंबईला बोलावून घेतले. त्याने सेक्रेटरी मि. बैट

याची भेट घेतली. त्याने सरकारी खुलासा केला की, 'तुम्हास विलायतेस जाण्यास गौरमेंटचा आटकाव नाही. परंतु गौरमेंटच्या सल्ल्याशिवाय तुम्ही विलायसेस गेल्यास तेथे तुम्हाला वकील असे म्हणणार नाहीत व जाणे तर इंग्रजी जहाज करून जावे. याप्रमाणे तुम्हास कलवावयास मजला गौरमेंटचा हुकूम जाहला.' शिवाय, हे हिंदुलोक विलायतेला गेले आणि जवळ पैका नसला तर बिचारे उपाशी मरतील, म्हणून दयाळू मुंबई सरकारने त्यांच्याकडून दर असामीला पाच हजार रुपये प्रमाणे ४९ हजाराची रकम मुंबई तिजोरीत भरण्याचा हुकूम दिला. हेतू वढाच की यांच्य खिशालाच मोठी कात्री लावली तर कंटाळून हे लंडनला जाण्याचा बेत रहीत करतील. यशवंतरावाचा चिरचिरेपणा न जुमानता, रंगो बापूजीने ही रकम तिजोरीत भरणा केली. मुंबईत मार्च महिन्यातच आलेल्या रिलायन्स नं. ४७१५ नावाच्या इंग्रेज जहाजाच्या कपतानाशी त्याने संगनमत करून, त्याला सारी हकिकत सांगितली. त्याने जहाजावर मंडळी घेण्याचे आश्वासन दिले आणि ता. १९ मार्च १८३९ रोजी सकाळी यशवंतरावादि ८ मंडळी जहाजावर चढवली. पोलिसांनी पुन्हा त्रास देण्याचा यत्न केला. त्या गो-या इंग्रेज कपतानाने 'मुंबई सरकारच्या पासपोर्टाची माझ्या जहाजाला मुळीच जरूर नाही. मी वाटेल तो माल नि वाटेल ते प्रवाशी घेऊन जी. तुम्हाला काय तकरार करायची असेल ती माझ्या लंडन हापीसकडे पाठवून द्या. माझ्या गलबतावर चढाल तर गोळी झाडीन. याद ठेवा.' असे सांगून तो आपले जहाज घेऊन गेला. यशवंतरावाने या आल्या १४४ दिवसांच्या प्रवासाचे वर्णन स्मरण वहीत लिहिले आहे. त्याला ऐतिहासिक महत्त्व तर आहेच, पण विद्यमान विमानयुगात ती माहिती वाचकांना यशवंतरावाच्या शब्दांत अतिशय मनोरंजक वाटेल, म्हणून विस्ताराने येथे दिली आहे.

सन १८३९ सालचा विलायतचा प्रवास

छ ३ माहे मोहरम इंग्रजी मुताबला तारीख १९ मार्च सन १८३९ इसवी चैत्र शु।। ४ रोज मंगळवार शके १७६१ विकारीनाम संवत्सरे सुरू सलास सलासीन मयातैन व आलफ या रोजी प्राथकाली भोजनोत्तर सकालचे दहा वाजता सुमारे मुंबईहून बिराडीहून निघोन कोटातून फारबस हापेसातून नवे बोरीबंदरावर गेलो. तेव्हा पोहचवावयास बरोबर मंडळी पुस्कल आली होती. त्यातून कोणी बंदराचे किना-यास निरोप घेऊन राहिली. कोणी जहाजापर्येंत आली व बंदराचे किना-यास राहिले त्याजला पुसोन बोटीत बसोन जाहजावर आकरा वाजता सुमारे जाऊन चहडलो. मुंबईहून तारीख मजकुरी इंग्रजी जाहाज रिलायंच्ये (रिलायन्स) नंबर ४७२५ यातून केपेच्या मार्गे पाण्यातून चालते जाहलो ते छ ९ मोहरम तारीख २६ मार्च्य चैत्र शु. ११ सोमवार रोजी आकरा वाजता मुकाम तालीकोट प्रांत मलबार या बंदरावर जाहाजवाले याणी जाहाज नांगर सोडून खुटंविले. तालिकोटास आमचे सरंजामपैकी काही घेणे होते व पाणी जाहाजवाले याणी भरले व पत्रे मुंबईकडे पाठविण्यास तेथील डाकेवर घातली. नंतर मंगलवारी दुसरे रोजी तेथून जाहाज चालते जाहले. मुंबईहून निघाल्या दिवसापासून आमहास वांती लागली. तेणे करून दिवसे दिवस सुखास न वाटे व तालिकोटापासून पुढे त्याच मुलकाची लगत कोची म्हणोन गाव आहे ते जाहाजापासून पंधरा विसा कोशावर दिसत होते. ते चैत्र शु. १५ शुक्रवारपासून काहीच दिसे (नासे)...... (येथून २० ओळी मजकूर गहाळ आहे.)

सोबत नसता व पुढील मागील आंदेशा मनात न आणिता महाराज सरकारावर प्रसंग फार जबरदस्त. यामुळे मागील घरचे वगैरे सर्व प्रकर्ण सोडोन देऊन, वडिलाचा वृधापकाल मनात न आणिता, प्राणावर धार होऊन, जी गोष्ट कधी जाहली नाही ती स्वीकारून, आपला देश टाकून, मुंबईपासून विलायेत मैल सुमार १३५० येकून सात हजार कोश पाण्यातून ज्या मार्गे आलो त्या मार्गानी आहे. तिकडे एकसे चवतीस रोजानी (१४४ दिवस होतात.) परमुलखी जाऊन पोहोचलो. वाटेनी जाहादत हाल फार जाहले. हरविसी हाल जाहले. तो कचा तपसील आपले हातानी रोजनिसीचे बुकावर सुधा लिहवला नाही. आसो. वडिलाचे पुण्याई व आयुशाची बळावल व महाराज सरकराची सलाबत सबब त्यातून निभावणी होऊन कडेस लागलो. मकाम लंडन सेहर प्रांत विलायेत इंगलीस्थान या शेहरात लिवरपुलाहून पूर्व दिवसी आगीच्या गाडीतून सुक्रवारी संध्याकाळी सात वाडजता निघालो ते दुसरे दिवसी २९ जमादिलावल मु. तारीख १० माहे आग,ट श्रावण शु. १ सके १७६१ रोज शनवरी प्राःथकाळी साहा वाजता सर्वत्र मंडळी आपली माणसे सुधा व माहीतगारीस जाहाजाचा कपतान याची दोस्ती वाटेनी पडली होती सबब त्यासच घेतला होता.त्याणी आधी लंडनात आम्हास उतरावयास जागा पाहिली होती. त्या जागी सर्वत्र सुखरूप येऊन पोहोचलो.

बरोबर मंडळी

१ खुद                                              १ गंगु बिनी सिदोजी सालेकर

१ चिटकोजीराव सुर्वे                                  १ राणु बिन मालजी घोलप

१ भगवंतराव विठ्ठल*२                                 १ मानाजी मोहिता

१ रावजी सिशा नि. भगवंतराव   १ तुलज्यां नि. भगवंतराव

१ बापु बुदगुडा                                      १ दुभाशी करस्ताव

येकूण मुंबईहून जहाजातून निघालेलो ते मु. मजकुरी तारीख मजकुरी पोहचलो असो.

''लंडन मुकामी आल्यावर तेथील लोकास जे हिंदुस्थान दक्षणेतून गोरे लोक गेलेले तेथे होते, त्यास आम्ही आल्याचे वर्तमान जाहाज लिवरपुलास पोहचताच छ्यापून आमचे नावे चहुकडे गेले. त्यावरून लंडनात वगैरेकडे सर्व हेंदू लोक इंग्लिश प्रांती आल्याचे माहीत जाहले. लंडन मुकामी पोहोचल्यावर दक्षण हिंदुस्थानातून गोरे लोक लहान मोठे कामगार तेथे गेलेले. त्यातून जे कोणी लंडनात होते ते येऊन भेटू लागले व मुंबई मुकामी फारबस हापेस आहे. तेथे दोस्ती हापेसवाल्याची आम्ही मुंबई मुकामी करून त्याचे येजमान लंडन मुकामी आहेत. ते फार मोठे माणूस सबब हापेसवाल्याकडून लंडनास लिहविले होते व आम्हीही त्याचे लिहिणे घेतले. व जमसेटजी बाटलीवाले मुंबई मुकामचे याची व हापेसवाल्याचे येजमान सर च्यारलिस फारबस साहेब याची दोस्तीजाणून जमसेटजी पारसी याचे पत्र सर च्यारलिस यास घेतली. त्यावरून सर च्यारलिस याणी आमचा बंदोबस्त व बातमी लिवरपुलापासून ठेवून, लंडन मुकामी प्रथमच भेटावसायस येऊन, भेट घेतली आणि बिराडी माणसाची तजवीज व जाहाजातील कपतान बरोबर होता तोच आमचेजवळ ठेऊन, खाण्यापिण्यास हेंदू चालीप्रमाणे पीठ तांदळाचा व वगैरेचा बंदोबस्त करून आपले घरी गेले आणि आपले घरीहून हरएकविसी आमचा पुस्तपणा ठेऊ लागले. आमचे पुढे माहाराज सरकरातून मुंबईहून येक मुसलमान सयद मीर आफलज आली विलायतेस पाठविली होता. तो लंडन मुकामी होता. त्यास हे वर्तमान कलताच तो येऊन भेटला व तिकडील हावाल वगैरे सर्व त्याणी सांगितले. आणि त्याजबरबर लखनोरचा नबाब आपले कामाकरिता विलायतेस गेला होता तोहि येऊन भेटला व टिपूचा लेक ज्यांबुदीन नामे आपले कामास गेला तो लंडन मुकामीच होता. त्यास आम्ही आल्याच कलताच तोहि भेटला. आम्ही त्या मुलखी नवेच गेलेले व हिंदुलोक कधी कोणी त्या मुलखी गेलेलाच नहुता. तेव्हा तेथील माणसे दरोबस्त आम्हास पाहण्यास फार चाहत असे. जिकडे आम्हास जाणे तिकडे जाण्यास तेथील रिवाजाप्रमाणे गाडी उंचीपैकी आणऊन त्यातून जाणे होत असे. तेव्हा रस्त्यातून जाते समयी पाहावयास मनस्वी माणसाची गर्दी हरहमेस होत होती, ती लिहिताच येत नाही. कोण्ही दोस्त मंडळी जाहलेली आपलाले घरी आम्हास नाच  तमाशा वगैरे पाहावयास नेत असत. ते तमाशे वगैरे जे पाहू ते फारच चमत्कारीक. तसे दुसरे मुलखी कोठेच नसेल व आपल्या प्रांती तर नाहीच. तेव्हा त्याचा तपशील काय लिहावा? इकडील हावा फार थंड ती असी की इंग्रजी महिना माहे मे महिन्यापासून तिकडील उन्हाळ्याचे दिवस. सेतात पेरण्या होणे व माणूस सेतातून फिरणे व बागबगीचे पाहणे होत असते. तो उन्हाळा म्हणजे फार नाही. जसे आपलेकडील थंडीचे दिवस पौष मासचे असतात त्यापेक्षा काही कमी. असे तिकडे उन्हाळ्याचे दिवस व थंडीचे दिवस नवंबरापासून येतात. ती थंडी फार मोठी पराकाष्टेचीच असती. नद्या व किरकोल बागातील वगैरे पाणी सुधा थिजून दगडी प्रमाणे होते. केवल पांढरा खडकच दिसतो. त्याजवरून माणसे हाजारो फिरत असतात. वरते जितके पाणी जमलेले तितके दगडाप्रमाणे आणि त्याचे खाली नद्यातून पाणी पुस्कल खोल असते.

''लंडन हे शेहर आदमासे पाच लक्षाचे वर साहा लक्ष परयेंत घरे आहेत. ती घरे व रस्ते सडका व दुकानदारीच्या जागा व रात्रौ रोषनाई वगेरे सर्व फार चांगले. माणूस उदेगी फार त्याच्या कळा कुशळता फारच. विशेष सर्व माणूस गोरे लोक. हा विलायेत टापू आदमासे तीनसे कोस परयेंत लांबी व रुंदी आडीचशे परयेंत इतक्या भोवताले दरोबस्त पाणी. खुसकीच्या रस्ता या टापूस नाही. लंडनाखेरीज आणखी या मुलखात शेहरे आहेत व खेडी तर पुस्कलच असतील. त्यातून येकंदर माणूस गोरे लोक लाहान मोठे आदमासे दोन कोट परयेंत व वरते काही, याप्रमाणे ठिकाण लागला.

''विलायेत मुकामी धान्ये सातूप्रमाणे बारीक गहू व सातूही आहेत. आणि पांढरे वाटाणे व बताटे व आणखी बारीक काये असते व तेल काढण्याचे येक त्यास फले बारीक येतात. याप्रमाणे धान्ये व धान्यादाखल दुसरे येकूण, तांदूळ बाहेरून जाहाजातून येतात. तेथे पिकत नाहीत. ही सेते विकविण्यास बैल नाहीत. घोडे आऊतास धरीत असतात. अउते इंग्रजी चालीप्रमाणे. घोड्याच्या जाती दोन तीन आहेत.

चांगल्या जातीचे घोडे तिकडील आहे, त्यातून काही घोडी मासलेदार चांगली आहेत बैल ठेवितात ते गाईपुरते. गाई पुस्कल. दुधेही त्यास पुस्कल असतात. आम्ही मुंबईहून निघालो तेव्हा दरोबस्त जीणस धान्ये वगैरे पुस्कल घेतला होता. आणि पाणीयाची पिपे लाकडी कोरी करऊन त्यात पाणी आपले माणसाकडून भरऊन जाहाजावर चढविले. नंतर ते पाणी पुरेलन पुरेल म्हणोन तालिकोट या बंदरात जहाज उभे राहिले तेव्हाही घेतले होते. तेच पाणी नित्य जहाजात पियावयास खर्च होत होते. नंतर काही सांटि लयन (सेण्ट लायन) या बंदरात पिपे सदरहू प्रमाणे भरून घेतली. जहाजात जागा स्वतंत्र अर्धे जहाज भाड्यानी घेतले.त्यात इंग्रजी माणूस कोणी न यावे, असा बेत ठेऊन, बोली करारातही याप्रमाणेच होते. त्याप्रमाणे ते माणूस आमचेजागी येत नसे. त्या आपलेच जाग्यात लोखंडी चूल मांडून तिजवर तांदूल भाजून येकवेला करावयाची. बाकी कोणास काही लागल्यास फुटाणे हरभरे खावे. यासिवाय जिनस खाण्याचे होते तेहि खाऊन दिवस घालवावा लागत असे. पुढे विलायतेस पोहोचल्यावर सचंत्र जागा घेऊन तांदूल अणऊन, गाया रस्त्यानी दुधाच्या वासरासुधा फिरतात. त्या गाईस उभी करून, आपले माणसाकडून दुध काढऊन, आपले भांड्यात घेऊन खर्च होत होते. आणि पाणीयाची तर सोयी चांगलीच. ती असी की शेहरातून टेस्म (टेम्स) म्हणोन नदी फार मोठी चालली आहे. तिचे पाणी शेहराचे वरलेकडोन नळानी घेऊन नळ बांधोन ती नदी सर्व शेहरात नळ घरोघर फिरविले आहेत. शेहरात जागोजाग पाण्याचे खजिने मात्र आहेत. तेहि झाकलेले. त्याचे पाणी चहूकडे त्या प्रमाणे जेथे त्या घरात राहावे तेथे पाणी नळाचे पुस्कल. ते पाणी घरातले घरात घेऊन खर्च लागेल तितके करावे. आपला हेंदू धर्म चालण्यास नड मिळोन जाता येता पाण्यास त्या लोकाचा स्पर्शास्पर्श आणि तेथे त्याचे घर इतकेच आहे. वरकड कोठेच अडचण नाही. जसा धर्म ठेविला तसा चालतो. त्यात त्या लोकाकडून काही येक गैरशिस्त नाही. वर लिहिले यातूनही स्पर्शास्पर्श पाण्यासुधा त्या लोकाचा होऊ न देता पराकाष्टाने जितका जसा सांभाळावयाचा तितका सांभालून राहिला. तो कचा मजकूर लिहिल्याने विस्तार फार होतो सबब न लिहिला.

“या विलायतेमधी व्यापाराची व जिनसाचा जो कारखाना आहे त्याची व सभोवते जहाजाची व हरयेकविसी घडामोडीची वगैरेची जी घालमेल आहे, ती पराकाष्ठेची आहे. बहुतेक सर्व पाहिली. त्याजपैकी अमुक त-हेचे हे ते काहीच लिहवत नाही. माणूसही मसलतीत आकलवान व हुशार व इमानदारीस नीट, याप्रमाणे वागत आहे. विलायत देशात आज ईश्वरी कृपा पूर्ण आहे. तेणे करून मनुष्याचे आयुष्याची वृद्धि व चैनात. माणूस खरे व खरे चालीने वागावयाचे. देशात पैसा द्रव जव्हाहीर पुस्कल. त्या लोकास नित्ये आनंद. शेहेर चांगले. त्यातून गाड्या रथ. त्याचे फिरणे हिंडणे त्याचे त्यास शोभइवंत आहे. दिसण्यात आले. आसो. सर्व तपसीलवार मजकूर कोठपर्यंत लिहावा. परंतु जातीवर्ण एकसारखा व एकच जात. दुजा विच्यार नाहीच. दुसरी जातच त्या लोकास माहीत नाही. सदरी जे लिहिले ते याजमुले निस्तेज्य, त्याचे आशा कृतीमुले वाटते.”

यशवंतराव लंडनला आल्यावर त्याने सर चार्लस फोर्ब्स प्रभृति सज्जन इंग्रज गृहस्थांच्या मदतीने बनिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाकडे सातारा प्रकरण मांडण्याची तजवीज चालू केली. यासाठी अनेक दुभाष्ये व भाषांतरकार नोकरीस ठेऊन, मराठी भाषेतल्या कागदपत्रांचे इंग्रजी तरजुमे करण्याचे काम चालविले. आमच्या या सोवळया डेप्युटेशवाल्यांना तर यासफॅसचा गंधही नव्हता. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढत गेल्या. भाषांतर बरोबर झाले का नाही, याचा अव्वल पडताळा पाहायचा कोणी? त्यात यशवंतराव म्हणजे अघडाउघड सीधा आदमी. त्याची समजूत की एकदा एक मुद्देसूद पुराव्यांचे अपील डायरेक्टरांच्या बोडक्यावर आदळले का झाले. पाण्याच्या तोटीप्रमाणे चावी फिरविताच निकाल-गंगेची धार आपोआप धो धो सुरू. त्याला आंग्रेजी मनाचे आडाखेच कायदेबाजीची तेढीबाकी वळणे जाणिवेत घेण्याइतका पोच नव्हता. त्यामुळे, दुस-या काही ज्या अन्य मार्गांनी खटपटी करायच्या, त्या न करता, तो चार दोन इंग्रजी मित्रांपलिकडे दृष्टी न फोकता, नुसते तरजुम्याचे काम होलपाटीत बसला.

यशवंतरावला सध्या येथेच लंडनात ठेवून आपल्याला परत स्वदेशी गेले पाहिजे. कारण तिकडे साता-यात एका भयंकर कारस्थानाचा सुरुंग उडवायला हातात पेटलेली बत्ती घेऊन मुंबई तयार उभी आहे.

## प्रकरण २० वे

## करन्याक गवर्नरचा सैतानी धिंगाणा.

ता. २४ मार्च १८३९ रविवारी सकाळी बाळाजीपंत नातू, प्रतिनिधीचा कारकून दाजीबा पटवर्धन, बजाबा पराडकर आणि यशवंतराव फौजदार राजवाड्यात आले. आप्पासाहेबाशी थोडेसे भाषण करून,

त्याला घेऊन बाहेर गेले. मागोमाग त्याचे काही सामान घेऊन जाताना प्रतापसिंहाला हुजरे दिसले. तपास करता समजले की आप्पासाहेब रेसिडेन्सीत रहायला गेले. दोन प्रहरीही आप्पा परत आला नाही, तेव्हा महाराजानी बरोबर कयास केला की कटबाजांच्या घेतलेल्या जबान्यामुळे नातूकंपूची नि रसिदंटाचीही कृष्ण कारस्थाने चव्हाट्यावर येणार, तेव्हा त्यांचा भक्कम पाठपुरावा करण्यासाठी अव्वल दर्जाचा साक्षीदार म्हणून आप्पाला वै-यानी आपल्या कटात घेतला. आप्पाला महाराज बलजबरीने परत नेण्याचा यत्न करतील म्हणून प्रतिकार करण्यासाठी रसिदंट ओव्हान्सने छावणीतले लष्कर बागनेटे सरसाऊन खडे उभे ठेवले होते.

त्याच दिवशी महाराजानी रंगो बापूजीला मुंबईला पत्र पाठवून या भानगडीचा तपशील कळविला. त्यात ते लिहितात - ‘‘धाकटे चिरंजिवानी सरंजाम मागविला तर आम्ही लगेच पाठवून देऊ. ग्रांटडफ रसिदंटाने त्यांच्यासाठी जे जे ठरवून ठेवलेले आहे, तेवढे नेहमीप्रमाणे पोहचते करण्याचे आम्ही बिनदिक्कत करणारच. कापात लष्कर उभे आहे.पण तंटा वगैरे करण्याचा आमचा मानस मुळीच नाही. या प्रकरणाचा पराचा कावळा करून रसिदंट मुंबईला लिहिणारच. त्याच्याआधी तुम्ही डॉ. मिल्न साहेबांकडून मंबई, कलकत्ता नि लंडनला गेलेले आपले मित्र यांना तात्काळ पत्र पाठवून खरा मजकूर कळवावा. हे सारे काम त्या कळसूत्र्या नातूचे आहे.’’

ता. ९ मे १८३९ गुरुवारी सकाळी किबे आणि यशवंतराव फौजदार वाड्यात आले. बरोबर दोन कुणबिणी होत्या. त्या आत गेल्या. आप्पासाहेबानी धाकट्या बायकोला बोलावले आहे. असे महाराजांना समजले. घेऊन जावे, असा जबाब त्यांनी दिला. मेण्यात बसून ती आपल्या परिवारासह किबे नि फौजदारबरोबर निघून गेली. दुसरे दिवशी प्रतापसिंहाने या घटनेबद्दल आपले विचार रंगो बापूजीला नि लंडनास शिर्के भंगवंतरावला कळविले. ते पत्र परिशिष्टात पहावे.

सर जेम्स रिबेट करन्याक

कारन्याक हा कंपनीच्या लष्करातला जुना नोकर. नंतर तो पोलिटिकल खात्यात गेला. पंढरपूरला गंगाधर शास्त्र्याचा खून झाला नि रावबाजीच्या अंग्रेजांशी चकमकी चालू झाल्या. तेव्हा हा बडोद्याच्या रसिदटांचा मदतनीस होता. या वेळचे सारे गोरे अधिकारी पक्के पैसेखाऊ लुटारू असत. एकाचाही हात निर्मळ मिळायचा नाही. पैशासाठी हेव ते उत्पात करायचे, गडगंज लूट कमवायची नि परत विलायतेला जाऊन नबाबाच्या थाटात मिरवायचे, एवढाच त्यांचा जीवनमक्रम असे. कारन्याक याला अपवाद नव्हता. बडोद्याला असताना, याने केले गलिच्छ धंदे नि लुबाडलेली लूट त्यावेळी ज्याच्या त्याच्या तोंडी असे.

मय रॉबर्ट ग्रांटाच्या जागेवर येण्यापूर्वी कारन्याक कंपनीच्या बोर्डाचा डायरेक्टर नि काही दिवस तर चेअरमनही होता. २९ डिसेंबर १८३५ रोजी, प्रतापसिंहाच्या राज्यकर्तृत्वाची अफाट स्तुति करणारे बोर्डाचे पत्र आणि रत्नजडित तलवार आली (आणि जे पत्र नि तलवार ग्रांट खाटकाने दडवून ठेवली) त्या पत्रावर डेप्युटी चेअरमन म्हणून याच सर जेम्स रिवेट कारन्याकची सही होती. हा मुद्दा लक्ष्यात ठेवण्यासारखा आहे. जहागिरदारांच्या वादाबद्दल राजाचा हक्क मान्य करणारे आणि मुंबई सरकारला कडकडीत दोष देणारे कोर्टाचे ता. ७-२-१८३८ चे पत्र गवर्नर जनरलला पाठविले. त्यावर याच कारन्याकने चेअरमन म्हणून सही केलेली होती. मुंबई सरकारने राजाचा चालविलेला छळ लंडनच्या डायरेक्टर कोर्टाला बिलकूल पसंत नव्हता आणि जानेवारी १८३९पर्यंत तरी ‘या प्रकरणाच्या चौकशा आता एकदम बंद करा.’ असे इषारेही गवर्नर जनरलमार्फत मुंबईकरांना देण्यात आलेले होते. कोर्टाने कारन्याकची मुंबईच्या गवर्नरीवर नेममूक करताना, ‘राजा आणि कंपनी सरकार या पूर्वी होता तसा निर्मळ स्नेहभाग निर्माण करावा, झाल्या केल्या गोष्टी खोल गाडून त्यांची आठवणही बुजवून टाकण्याची खटपट करावी आणि मुंबईला जाऊन चारप्ज घेताक्षणीच राजाचा चाललेला अनेकमुखी छळ तात्काळ बंद पाडावा.’ असे डायरेक्टर कोर्टाने त्याला हडसून खडसून बजावले होते .पण हिंदुस्थानात पाऊल ठेवताच, येथल्या कोट्यवधि जनतेवर, राजे महाराजांवर नि धर्मगुरुंवरही सुलतानी नबाबी गाजविण्यास धाधावलेल्या या गो-या अधिकारी गुंडेश्वरांना माणुसकीचीही दाद नसायची, तर सत्याची वचनाची नि शपथांची पर्वा कशी असणार?

कारन्याकला मुंबईची भुते झोंबली

नवा गवर्नर किंवा गवर्नर जनरल मुंबईला आला का त्याला पंचारत्या ओवाळायला खुषमस्क-यांचा नि स्वार्थसाधूंचा एक ठरावीक घोळका धक्क्यावरच गाठतो. डायरेक्टर कोर्टाने सातारा प्रकरण कायमचे विझविण्याचा कारन्याकला दिलेल्या आज्ञा अंमलात आल्या तर राजाविरुद्ध उठविलेल्या सगळ्या

कट्याळांचे वांग्याचे भूत मुंबईचे गोरे कौन्सिलर, नातूकंपू आणि रसिदंट ओव्हान्स यांच्याच मानगुटीला बसणार नि लोकांत त्यांची तोंडे काळी होणार, हे ते जाणून होते. कारन्याकने ता. ३१ मे १८३९ शुक्रवारी गवर्नरीचा चार्ज घेताच, त्याला या काळया गो-या कटबाजानी घेरून त्याचे कान भारले. राजाविषयी त्याचे मन विषारी हकीकतीनी जहरदार केले. कान्याक पक्का पैसेखाऊ, राजाच्या शत्रूनी त्याची पाटलूण मोहोरानी भरून, त्याला स्वच्छ, 'विकतच घेतला' म्हणा ना. राजाची नीट समजूत घालून, पूर्ववत त्याचा स्नेह निर्माण करण्याचे कोर्टाचे निश्चित धोरण कारन्याकने ठेवले आपल्या बुटांच्या घामोळीत आणि राजाचा काटा काढण्याचा त्याने निर्धार केला. प्रतापसिंह  मोठा मानी आहे. अपमानास्पद क्षमेच्या याचनेचा खर्डा सहीसाठी त्याच्यापुढे केला तर तो राज्यत्यागच पत्करील. पण अपमान लवमात्र सहन करणार नाही. त्याने राज्यत्याग केला का सुंठीशिवाय खोकला गेला, असे धोरण कारन्याकच्या सल्लागारानी त्याच्यापुढे मांडले. या धोरणाची गंगोत्री नातूच्या लाल पागोट्यातूनच निघाली, हे सांगायला नकोच.

कारन्याक-कोगन खटका.

कॅपटन कोगन झांजीबारला जाण्यापूर्वी रंगो बापूजीने महाराजाना त्याच्याविषयी संपूर्ण माहिति दिली. 'वाटेल ते करून कोगनसाहेबाला सा-याला पाठवून देण्याची खटपट करावी' असे महाराजांनी रंगोबाला लिहिले. एक तर तो झांजीबारला जाण्याच्या गडबडीत, तशात मुंबई सरकारची फेरीसची अंमदानी प्रतिकूळ, तेव्हा नवीन गवर्नर आल्यावर काय ते पाहू, असे कोगनने सांगून तो झांजीबारला निघून देला.य २८ जून १८३९ला मसकतला जाण्यासाठी तो परत मुंबईला आल्यावर, 'आपण साता-याला येऊन आम्हाला भेटल्यास उपकार होतील.' अशा अर्थाचे महाराजांचे आलेले पत्र रंगोबाने कोगनला दिले. या वेळी सर जेम्स कारन्याकने गवर्नरीचा चार्ज घेतला होता. म्हणून कोगनने ता. २३ जुलै १८३९ ला कारन्याकलाच एक पत्र पाठविले आणि त्यात प्रतापसिंहाचे आलेले पत्र न उघडता, सीलबंध, त्याचबरोबर पाठवून दिले. उद्देश एवढाच की सातारच्या राजाला प्रामाणिक सहाय करून, त्याच्या तक्रारीना न्याय मिळावा, यापलिकडे आपला कोणताही इतर स्वार्थी भाव नाही, हे नव्या गवर्नरला कळावे. ''मी पुण्यास जाणार आहे, आपण परवानगी दिली तर केवळ एक मित्र नात्याने मी राजा प्रतापसिंहाला साता-याला भेटू इच्छितो. यापेक्षा दोन सरकारतल्या भानगडीत मी प्रत्यक्ष काही भाग घेऊ इच्छित नाही.'' असे कोगनने कारन्याकला लिहिले. त्याला विलोबी सेक्रेटरीने २५ जुलैचा जबाब दिला की 'सातारच्या राजाला तुम्ही भेटणे या सरकारला अत्यंत अनुचित (व्हेरी अनडिझायरेबल) वाटते. तुम्ही त्याच्याशी कसलाही संपर्क किंवा पत्रव्यवहार ठेऊ नये, अशी सूचना द्यावीशी वाटते. राजाने तुम्हाला पाठविलेला खलिता सोबत परत पाठविला आहे.' कारन्याकलाही त्याच्या मुंबईच्या परिवाराने डागळला, असी कोगनची खात्री झाली. त्याने प्रतापसिंहाला दिलगिरीचे आणि धैर्याने संकटांना तोंड देण्यास सिद्ध रहाण्याचे पत्र पाठविले. (२९ जुलै १८३९)

प्रतापसिंहासाठी चार गाठींचा फास

मुंबई सरकारच्या चांडाळचौकटीने एक चार कलमांचा यजितपत्राचा खर्डा तयार केला. त्यातली ४ कलमे सारांशाने अशी (१) इंग्रेज सरकारविरुद्ध महाराजांनी कट केला, त्या आरोपांना बिनशर्त मान्यता द्यावी आणि १८१९ सालच्या तहनाम्यातल्या २-या कलमाप्रमाणे अक्षरशः वागण्याचे लेखी वचन द्यावे. (२) आप्पासाहेब भोसले यांना मिळत असलेला तनखा कायम चालू रहावा, ते जेथे राहतील तेथे त्यांची खासगी मालमत्ता पोहोचती करावी, काही तंटा पडल्यास त्याचा निकाल रसिदंट देणार नि तो महाराजांना मान्य करावा लागेल. (३) बळवंतराव चिटणीस यांना मंत्रीमंडळातून कायमचे हाकलून द्यावे नि त्यांना इंग्रजी सरकारच्या परवानगीशिवाय सातारच्य राज्यात येण्याची मनाई असावी आणि (४) सोबत जोडलेल्या यादीतील असामींना आणिपुढेही वेळोवेळी यादीत दाखल होतील त्या असामींना सन १८३६ सालापूर्वी जे तनखे होते, ते पूर्ववत चालू रहावे. त्यांच्या शरिरास किंवा मालमत्तेस महाराजाकडून यत्किंचितही तोषीस लागता कामा नये. (या यादीत सगळ्या हरामखोर कटबाजांची नावे होती.) हा अटींचा खर्डा सन १८१९ च्या तहनाम्याची पुरवणी म्हणून समजण्यात यावा. असे झाले तरच इंग्रेज बहादुर कुंफणी सरकार प्रतापसिंह महाराजांना सर्व अपराधांची माफी देऊन पूर्ववत स्नेहभावाने वागविण्यास तयार होईल.

कलम (१) तर प्रतापसिंह तडाक्यासरसा लाथाडणार, हे कारन्याक कंपू जाणू होता. आप्पासाहेब भोसल्याविषयीकलम २रे पूर्वी प्रतापसिंहाने कधी अमान्य केले नाही नि पुढे अमान्य करण्याची त्याची

इच्छाही नव्हती. बळवंतराव चिटणीसाच्या बडतर्फीचे नि कायम हद्दपारीचे कलम (३) नातूकंपूच्या आजन्म हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे नि जिव्हाळ्याचे होते. तसेच ते कंपनीच्याही हिताचे होते. प्रतापसिंह नि कंपनी यात दोस्ती घडवून आणणारा आणि त्या दोस्तीच्या अटी ठरविणारा चिटणीसच. इकडे नातूकंपूच्या भटाभिक्षुकांना चिटणीसाचीच धास्ती फार मोठी. तो मोकळा होऊन महाराजांच्यापाठीशी आला तर नातूकंपूचा डाव तो तेव्हाच त्यांच्यावर उलटविल्याखेरीज रहाणार नाही आणि त्यांचे ब्राह्मण-माहात्म्यही शीरसलामत टिकणार नाही. तेव्हा प्रतापसिंहाच्या काही अटी सैल करून तो राज्यावर टिकला तरी परवडला, पण कोणत्याही अटीवर बळवंतराव चिटणीस पुन्हा कोठेही मोकळा रहाता कामा नये. चवथे कलम म्हणजे मान कापणा-या खाटकांचे गाईनी पाय चाटण्यासारखे कमाल मुर्दाडपणाचे. प्रतापसिंहासारखा मानासाठी जान देणारा तत्त्वनिष्ठ ते मान्य करणे शक्यता नव्हती. तथापि, काही कौन्सिलरांना मात्र असे वाटत होते की राज्याला मुकण्याच्या भयाने प्रतापसिंह हा खर्डा मुकाट्याने मान्य करील. जातिवंतांच्या तल्लख वृत्तीची दुष्टांना कल्पनाच काय असणार?

कारन्याक-प्रताप मुलाखत

प्रतापसिंहाचा सोक्षमोक्ष लावण्याच्या उद्देशाने नेक नामदार सर जेम्स रिवेट कारन्याक गवर्नरससाहेबांची स्वारी मि. अंडरसन (एक कौन्सिर), मि. विलोबी सेक्रेटरी (गुप्त चौकशीचे एक स्वयंमान्य न्यायाधीश) यांसह ता. २३ जुलै १८३९ मंगळवारी पुण्याला येऊन दाखल झाली. तेथून प्रतापसिंहाला एक खलिता रसिदंट ओव्हान्सच्या मार्फत रवाना केला. ‘आम्ही तिकडे येत आहोत. डाकगाडीनेच येत असल्यामुळे आणि हवाही पावसाळी असल्याने, महाराजांनी, रिवाजाप्रमाणे, सत्कारासाठी पुढे येण्याचे कारण नाही. साता-यास दाखल होताच सूचना पाठविण्यात येईल.’ खलिता हाती पडताच प्रतापसिंहाने नव्या गवर्नराच्या भेटीविषयी आनंद दर्शवून, भेटीची नक्की तारीख वेळ कळविण्याची विनंती जबाबात लिहून पाठविली.

ता. २२ ऑगस्ट १८३९ गुरुवारी संध्याकाळी गवर्नर लवाजम्यासह सातारा छावणीत येऊन दाखल झाले. दुस-या दिवशी ओव्हान्सने गवर्नरच्या भेटीचे निमंत्रण राजवाड्यात जाऊन दिले. प्रतापसिंह दुपारी ३ वाजता करारन्याकला भेटला. सभोवार अंडरसन, विलोबी आणि रसिदंट ओव्हान्स यांचे कोंडाळे पडले होते. महाराज एकटेच होते.

हुज-यालाही आत येऊ दिले नाही. त्यांनी तशी काही विनंती केलीच नाही. प्रास्ताविक हस्तिदंती झाल्यावर -

कारन्याक –महाराज आमच्याविरुद्ध कट रचीत आहेत. पुराव्याने हे सारे सिद्ध झालेले आहे.

महाराज –मी कसलाच नि कोणताच कट केलेला नाही.य तुम्ही कमिटी नेमून खुशाल कस्सून चौकशी करा की.

कारन्याक –मी सगळे पाहिले आहे. आणखी चौकशीची जरूर नाही नि मला तितका वेळही नाही. वादविवादाची काय जरूर आहे? मी काय सांगतो ते महाराजांनी ऐकावे आणि तयार केलेल्या या खर्ड्यावर मुकाट्याने सही करून मोकळे व्हावे.

महाराज –नामदाराना वेळ नसल्यास, मी सारे कागदपत्र नि दस्तऐवज कर्नल ओव्हान्सना दाखवतो. आमच्या विरुद्ध पुरावा कसकसा गोळा करण्यात आलेला आहे आणि तेढ कशी वाढविली आहे, याची ते चौकशी करतील. आपण फक्त न्यायाने वागा, हां, कटात माझा संबंध असल्याचा एकतरी कागद पुरावा म्हणून सापडला तर माझे म्हणणे काही नाही.

कारन्याक –नागपूरच्या मुधोजी भोसल्याचे कटाबाबद तुम्हाला लिहिलेले पत्र आमच्यापाशी आहे.

महाराज –समजा, अंडरसनसाहेबांना कोणी एकाद्याने पत्र लिहिले नि त्यांना त्याची दखलही नाही. ज्याने पत्र लिहिले त्याच्याकडे चौकशी केली पाहिजे. अंडरसनना विचारून काय फायदा? ते काय उत्तर देणार? याच नियमाने मी म्हणतो, त्या पत्राची मला काहीच माहिती नाही. तुम्ही खुद्द भोसल्यांकडे चौकशी केली पाहिजे. हे पहा नामदार, इंग्रेजांच्या दोस्तीसाठी वेळ पडली तर मी विहिरीत उडी घेईन, पण जे कधी काही मी केलेच नाही, त्याचा आरोप मी केव्हाही कबूल करणार नाही.

(कारन्याकला उत्तर देता येत नाही.)

कारन्याक –मुंबईला तुम्ही एजंट ठेऊन तहनाम्याचा भंग केला आहे.

महाराज –मी मुळीच भंग केलेला नाही. दस्तऐवजी पुराव्याने सिद्ध करून दाखवा. मी जबाब द्यायला तयार आहे.

कारन्याक –महाराजांनी मुंबईला एजंट पाठविले.
महाराज –होय, माझ्या दरबारची प्रकरणे इंग्रजी सरकारात रुजू करण्यासाठी मी मुंबईला एजंट पाठविले. पण त्यामुळे तहनामा कसा भंग होतो?
कारन्याक –रसिदंटाला न कळविता तुम्ही हे केले.
महाराज –रसिदंट जर माझी एकही गोष्ट मनावर घेईनासा झाला, तर इंग्रजी सरकारात ते कळविणे मला जरूरच होते. इंग्रजी सरकार काय परकी सरकार आहे की काय आम्हाला? तर तहनाम्याचा भंग झाला म्हणता? शिवाय, रसिदंटाच्या मध्यस्थीशिवायही इंग्रज सरकारकडे प्रकरणे थेट नेण्याला हरकत नाही, अशा रिवाजाची एलफिन्स्टन साहेबाची पत्रे आहेत.
कारन्याक –मला एलफिन्स्टनच्या पत्राची किंवा इतर बाराबत्तल पुराव्याची पर्वा नाही. मी फक्त तहनामा मानतो.
महाराज –तुमच्या अधिका-यांची लेखी प्रमाणे तुम्हीच जुमानीत नाहीत, तर मग पंचाईत म्हणायची.
कारन्याक –मी काय म्हणतो, ते महाराजानी ऐकावे, नाहीतर तुमचे राज्य रहाणार नाही.
महाराज –मी कधीच राज्याच हाव धरलेली नाही. मी फक्त इंग्रजांच्या दोस्तीचा चाहता आहे. उघड चौकशी शिवाय केले आरोप मान्य करून राज्यावर रहाम्याची माझी मुळीच इच्छा नाही. तुम्ही मला तुरुंगात टाकले, तर तुमच्या सण्ट्रीच्या पहा-यात भिक्षा मागून मी राहीन. अशीच तुमची मर्जी असेल तर उशीर कशाला? मी आता तुमच्या बंगल्यातच आहे आणि परत जातच नाही, म्हणजे झालं.
कारन्याक –महाराजांनी असे काही करू नये. मी सांगतो ते ऐकावे. नाहीतर मला निराळीच व्यवस्था करावी लागेल.
महाराज –काय वाटेल ती व्यवस्था करा ना. नाही कोण म्हणतो? जे गुन्हे मी केलेच नाहीत, त्यांची उघड चौकशीशिवाय मी कबुली देऊ काय? प्राणांतीही शक्य नाही ते.
कारन्याक –तुम्ही विलायतेला काही ‘ पोरं पाठविली आहेतकोण विचारतो त्यांना तिकडे! आणि कायहो ती तिकडे काय करणार? योग्य दिसेल ते करण्याचा मला भरपूर अधिकार आहे. सांगतो तसे करा. नाहीतर भलत्याच अडचणीत लटकून पडाल.
महाराज –मी कधी कोमाचे वाकडे केलेच नाही, तर मला कसली अडचण येणार? तुम्हाला काय करायचे असेल ते खुशाल करा. मी कशालाही भीत नाही.
कारन्याक –मी तहनाम्याच्या पुरवणीचा नवीन तयार केलेला खर्डा पाठवतो. त्यावर महाराजानी सही करावी.
महाराज –सही करण्यालायक असेल तर करीन सही, नाहीतर तसे कळवीन.

ता. २४ ओवान्स खर्डा घेऊन राजवाड्यात गेला. महाराजांनी तो वाचला आणि कपाळावर तिटका-याच्या आठ्या घालून परत केला. ‘‘मी असल्या कागदावर सही करणार नाही. जा घेऊन तो परत.’’ ‘ज्या गोष्टी मी केल्याच नाहीत, त्या केल्या अशी कबुली देऊन, राज्यावर राहण्याची मला पर्वा नाही. जा जाऊन सांगा असे तुमच्या गवर्नराला.’

ता. २५ ला कारन्याकने पुन्हा महाराजांना सही करण्याचा आग्रह केला, तेव्हाही निर्धाराने त्यांनी स्पष्ट नकार दिला. ‘नुसत्या सहीसाठी कशाला विनवण्या करता नि धाक दाखवता? छाती असेल तर उघड चौकशी करा. कट कोणी केले नि का केले, त्याचा मुद्दापुरावा मी घालतो एकेकाच्या पदरात, प्रत्येक गोष्टीत रसिदंटाचा सल्ला घेतलाच पाहिजे, हे बंधन म्हणजे काय मी तुमच्या रसिदंटाच्या लाळघोट्या होऊन बसू की काय? अप्पा महाडीक, येलोजी मोहिते, तो तुमचा यशवंतराव फौजदार आणि तो विठ्ठल सखाराम ऊर्फ आबा पारसनीस, यासारख्या बिलंदर टग्यांनी मी काय म्हणून क्षमा करावी नि त्यांना पूर्ववत तनखे द्यावे? होणार नाही ते माझ्याकडून.’
कारन्याक –चिटणिसाने तुम्हाला बदसल्ला दिला.
महाराज –मी कधीच कोणाचा सल्ला घेत नाही. मला योग्य दिसेल तेच मी आजवर करीत आलो आहे. नामदारसाहेब, आपण एवढे दूर मुंबईहून आलात तरी तुमचा सल्ला मी जुमानीत नाही, तर शेजारच्या घरातून चटकन माझ्या घरात येणा-या चिटणिसादिकांचा सल्ला मी थोडाच जुमानणार आहे. १८१९ साली तुमच्या तहनाम्यावर सही केली तेव्हा मी चिटणीसाला, ते जवळ असूनही, नाही विचारले. मला योग्य वाटले नि मी सही केली.
कारन्याक –चिटणिसाने लंडनला जाण्यासाठी जहाज ठरविले, कशासाठी?

महाराज –माझे वकील लंडनला पाठविण्यासाठी.
कारन्याक –मग गेले का नाहीत ते वकील? राहिले कशाला?
महाराज –का राहिले, ते हे विलोबीसाहेब सांगतील. त्यांनाच विचारा दुसरे जहाज मिळेपर्यंत थांबले ते. मिळाल्यावर गेले.
कारन्याक –जहाजाचे काय करणार आहात?
महाराज –जहाज मिळाले तर मी सुद्धा लंडनला जाईन. काय हरकत आहे?
कारन्याक –चिटणीसाने डॉ. मिल्नला मध्यस्थीसाठी का घेतले?
महाराज –चिटणीसाने नव्हे, मी त्यांना नेमले आहे. चिणिसाला तुम्ही अटकेत टाकले, तर माझी दरबारी कामे करायला कोणी हवा का नको? डॉ. मिल्नला नेमले, तर त्यालाही साता-याला येण्याचा तुम्ही प्रतिबंध करता. सारे कोकणस्थ ब्राह्मण ग्रामण्य प्रकरणामुळे चिटणिसावर खवळले आहे.
(येथे कारन्याकने ‘ग्रामण्य’ शब्दाचा अर्थ विलोबीला विचारला.)
कारन्याक –महाराज नेहमी कोणाची सल्ला मसलत घेतात आणि कोणकोणते नातेवाईक महाराजांना सध्या अनुकूल आहेत?
महाराज –मी कोणाचा सल्ला घेतो, ते मी सांगितलेच आहे. नातेवाईक पुष्कळ आहेत.
कारन्याक –बाळासाहेब सेनापतीवर महाराजांची मेहरबानी बरीच दिसते.
महाराज –बाळासाहेब माझ्यापुढे पोर आहे. त्याचा सल्ला मी कशाला घेऊ?

नंतर आप्पासाहेब भोसल्याला त्याचा तनखा नि मालमत्ता देण्याविषयी कारन्याकने विचारणा केली. त्यावर माझी त्या बाबतीत केव्हाही तक्रार नव्हती नि आज नाही, असा महाराजांनी खुलासा केला आणि ओवान्सने त्याला पुष्टी दिली. तेव्हा कारन्याकने अंडरसनला विचारले – मग तो पराडकर उलटे का सांगत होता?

कारन्याक –आमच्या २३व्या पलटणीचे शिपायी राजवाड्यात भेटीला आले नव्हते का?
महाराज –हे सारे बतावणीचे खोटे कपटनाटक आहे.
कारन्याक –हे शिपायी ३० वर्षे आमच्या नोकरीत आहेत ते खोटे कसे सांगतील?
महाराज –अहो, हे आमचे मोहिते नि महाडीक. सात पिढ्यांचे आमचे नोकर. त्यांना खोटे बोलायला नि करायला काही वाटले नाही. सात पिढ्यांच्या पुढे तीस वर्षांच्या नोकरीची काय मातबरी! शिवाय ते तुमचे तोतया चतुरसिंगाच्या बंडात आमच्यावर आरोप करणार फिर्यादी होते. पण अखेर चौकशीत लबाड खोटे ठरले. आमचे दिवंगत बंधू भाऊसाहेब यांचा तोतया निघून धामधूम माजली होती. त्या भानगडीत हेच तुमचे शिपाई पुन्हा खोटे लबाड नि कारस्थानी असे ग्रांट डफ साहेबानेच चौकशीत ठरवले. अशा लोकांवर तुम्हाला विश्वास तरी कसा ठेववतो. हेच मला समजत नाही.
कारन्याक –हे पहा, महाराज, मी सांगते तसे करा. नाहीतर हे चांगले राज्य गमाऊन बसाल.
महाराज –जाई ना का हे राज्य. मला पर्वा नाही राज्याची. हव्या त्या कबुलीजबाबावर सही करायला मी काही बाजीराव नव्हे, कारन्याकसाहेब. तो आणि त्याचे लोक हयात आहेत. मी तुमच्या खर्ड्यावर सही करण्यापेक्षा मरण पत्करीन, समजलात! माझा जीव घेण्याऐवजी अवमानात मला सडत ठेवण्याचा तुमचा डाव दिसतो. मी तो पत्करणार नाही. घ्या, घ्या, आत्ताच घ्या माझे राज्य तुमच्या ताब्यात. जेव्हा माझ्याविषयी तुमचे सारे संशय नाहीसे होतील, तेव्हा वाटल्यास परत द्या, अगर देऊ नका.
कारन्याक –बाजीरावाचा घेतलेला प्रदेश त्याल परत देण्याचा आमचा अजून काही विचार नाही.
महाराज –बाजीरावचा प्रदेश अफाट नि सुपीक आहे. तो बिचारा भेदरट भटजी होता. म्हणून तुम्ही त्याचे राज्य घेतलेत, मी त्याच्यासारखा डगमगणार नाही. माझे चिमुकले राज्य. राहिले काय नि गेले काय. माझी कशालाच काही हरकत नाही. आमचे म-हाठी स्वराज्य शिवाजी महाराजानी कमावले, ते संभाजी महाराजांनी गमावले. पुन्हा ते थोरल्या शाहू महाराजाने परत मिळविले नि माझ्या आजाने घालवले आणि मी पुन्हा ते परत मिळविले. आपण डाकगाडीने येथे आलात. चला, मी पण येतो तुमच्याबरोबर डाकगाडीने, मला कलकत्त्याला पाठवा. लंडनला नेऊन ठेवा. काय वाटेल ते करा पण प्राण गेला तरी असत्यापुढे या प्रतापसिंहाची मान वाकली जाणार नाही.
कारन्याक –हे पहा, महाराज, फार तर आणखी एक दोन दिवस येथे थांबू शकेन. तोवर महाराजांनी विचार करावा.
महाराज –माझा विचार मी स्पष्ट कळविलाच आहे. आणखी काय विचार करायचा!

नंतर गवर्नरादि मंडळींना पानसुपारी अत्तर वगैरे देऊन महाराज परतले.

ता. २६ ऑगस्ट सोमवार सन १८३९. या दिवशीच्या मुलाखतीतही पुन्हा कारन्याकने महाराजांना 'हा मेमोरॅण्डम म्हणजे एक तहनामाच आहे. तेव्हा त्यावर सही करायला महाराजांना काही हरकत नसावी.' असा साळसूदपणाचा उपदेश केला.

महाराज –एवढा माझ्या सहीचा का तुमचा आग्रह?

कारन्याक –हे पहा, संशय उत्पन्न झाला, तेव्हा त्याचा निरासही झाला पाहिजे.

महाराज –सहीने निरास कसा होणार? गेले दोन दिवस मी अट्टहासाने सांगत आहे की माझी तुम्ही उघड चौकशी करा नि संशयाचे निराकरण करून घ्या. पण तुम्ही ते मनावरच घेत नाही. या खर्ड्यावर मी सही केली की जुना तहनामा आणि एलफिन्स्टन, मालकम आणि लॉर्ड क्लेअर यांच्याशी झालेले इतर करारमदार सारे रद्द होणार. तुम्ही निघून गेला, म्हणजे दुसरा गवर्नर येणार. पुन्हा लुच्च्या लोकांनी उचल करायची, कटांची उभारणी करायची, त्या नव्या गवर्नराचे कान भरायचे का या महाराजांना कट करण्याची नि ते नाकारण्याची सवयच आहे. त्याने पुन्हा नवीन खर्डा ठेवायचा आमच्यापुढे. आणि हे गाडे अखंड चालूच रहायचे. त्याला अंतच रहाणार नाही मग तेव्हा तुम्हाला जे काही करून टाकायचे असेल, ते आत्ताच एका झटक्यात आटपा. मी तहनाम्याचा लवमात्र जरी भंग केला असता, तर तुमचा सल्ला धिक्कारला नसता. हे पहा, नामदार गवर्नरसाहेब, फायद्याचा किंवा स्वार्थाचा लोभ धरून, मी आपले चारित्र्य कलंकित करून घेणारा नव्हे.

छावणीतून महाराज परतले. गवर्नर कारन्याक आणि त्यांचे हापसर दोस्त, प्रतापसिंहाचा तेखदारपणा पाहून चारीमुंडे चीतच झाले. सत्यासाठी स्वत्वावरही निखारे ठेवणारा मर्द मराठा या पूर्वी त्यांच्या पहाण्यात वा ऐकण्यात आला नव्हता. होळकर, गायकवाड, शिंदे वगैरे त्यांनी पुष्कळ पाहिले होते आणि नजरेच्या हालचालीने दबविलेलेही होते. पण हा नमुना काही और असाच आढळला. प्रतापसिंहाच्या या मुलाखतीचा तपशीलवार अहवाल डायरेक्टर कोर्टापुढे मांडताना, माजी रसिदंट (मागाहून डायरेक्टर) कर्नल रॉबर्टसन म्हणाले - ''प्राचीन रोमन साम्राज्याच्या नैतिक सुवर्णयुगाला साजेशोभेसेच वर्तन महाराजांनी केले. त्यांच्या सत्याग्रही तडफेतच त्यांच्याविरुद्ध उभारलेल्या बनावट किटाळांचा फोलकटपणा सिद्ध होत आहे.''

ता. २७ ऑगस्ट, मंगळवार उजाडला, प्रतापसिंहाला वठणीवर आणायचे कसे, हा मोठा बिकट प्रश्न मुंबईकर गो-या शहाण्यांपुढे पडला. दोन प्रहरी ओवान्सकडून एक भालदार महाराजांकडे आला. रसिदंट साहेब महाराजांची भेट घेऊ इच्छितात, सा निरोप त्याने दिला. ठीक आहे, असा जबाब घेऊन तो परत गेला. संध्याकाळी ५ वाजता, ओवान्स स्वतः अखेरची शिष्टाई करायला राजवाड्यात आला.

ओवान्स –गवर्नरसाहेब उद्या जाणार. तेव्हा मेमोरॅण्डमवर महाराजा सही करणार किमंवा नाही, याचा खुलासा त्यांना हवा.

महाराज –गेले तीन दिवसांच्या मुलाखतीत त्यांना खुलासा मिळालाच नाही की काय? मी स्पष्ट नकार दिलेलाच आहे.

ओवान्स –हेच अखेरचे उत्तर समजायचे काय?

महाराज –होय.

ओवान्स महाराज सही करू इच्छित नाहीत, असेच मी जाऊन सांगू का?

महाराज –होय, अगदी अस्सेच जाऊन सांगा.

ओवान्सने सलाम केला आणि ही मुलाखतींची परवड येथे संपली. वाचकांना येथे एक नमुना मुद्दाम सांगायचा आहे. वरील संभाषणे मी प्रसंगानुरुप कल्पनेने चितारलेली असतील. असे त्यांना वाटण्याचा संभव आहे. तसे काहीही नाही. या तीन दिवसांच्या मुलाखतींची गवर्नरच्या मदतनिसांनी तपशीलवार संभाषणांची टाचणेच (मिनिटस) तयार केलेली होती. ती छापलेली आहेत. त्यांवरून मी संभाषणांची सरळ भाषांतरे करून वाचकांपुढे ठेवली आहेत.

ता. २८ ला गवर्नर जर जेम्स कारन्याक आले तसे हात हालवीत परतले.

( हे पुस्तक अपूर्ण आहे. लवकरच ते पूर्ण अपलोड केले जाईल)